म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १७२८

REFBK-0016033
REFBK-0016033

# श्री संत रोहिदास



प्रा. अशोक प्रभाकर कामत

# श्रीसंत रोहिदास

## जीवन आणि वाङ्मय

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय.
अनुक्रम १९२९६ वि: चरित्र
क्रमांक ११२६९ नोंद दि: १६।६।६८

: लेखक :

REFBK-0016033
REFBK-0016033

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १६०३३
शाखा (स्थानक ठाणे)

भारती मुद्रण मंदिर, पुणें ९.

मूल्य : १० रुपये

•

प्रकाशक :
पंढरीनाथ गोपाळ कदम
नाथ प्रकाशन मंदिर
७५७ सहकारनगर,
मेहर सहकारी गृहरचना,
पद्मावती, पुणें ९.

•

प्रथमावृत्ति
तुकारामबीज : शके १८८९

•

सर्व हक्क प्रकाशकाधीन

•

चित्रकार :
जि. भि. दीक्षित, पुणें

•

मुद्रक :
एकनाथ पंढरीनाथ कदम
भारती मुद्रण मंदिर,
२२७ नारायण पेठ, पुणें ९.

ज्यांनीं
सेवापरायणतेंतून
माझ्या मनावर प्रेमाचें प्रभुत्व
प्रस्थापित केलें, त्या–
पारूबाई आणि सीताबाई
यांच्या वत्सल स्मृतींस
सविनय समर्पण

––अशोक

# लेखकाचें निवेदन

' मानपुरी-पदावली 'च्या प्रकाशनानंतर वर्षाच्या आंतच या पुस्तकाच्या प्रकाशनाचा योग आला, याचा मला मोठा आनंद वाटतो. अनेक अडचणी आल्या. पण आज समाधान आहे. म्हणूनच अडचणींचा उल्लेख नकोसा वाटतो. फार थोड्या अवधींत हें पुस्तक पूर्ण करावें लागलें. पृष्ठसंख्येच्या बंधनामुळें कांहीं पदांचा अंतर्भाव करतां आला नाहीं. पदांचा अर्थ सहजसुबोध भावार्थ असावा याच हेतूनें लिहिला आहे.

संत रोहिदासाचा सर्वांगीण परिचय घडवून देण्याचा हा प्रयत्न श्री. ए. पं. कदम यांच्या रोहिदास-प्रीतीमुळें आज सिद्धीस जात आहे. त्यांची या थोर संतावरील निष्ठा आणि त्याच्या वाङ्मयाच्या प्रकाशनाची जिद्द अशी जबरदस्त कीं, अत्यंत अल्पकाळांतच या ग्रंथाची कल्पना समूर्त होऊं शकली.

माझ्या या संतपूजनाचें सारें श्रेय माझे बंधुतुल्य स्नेही आणि मराठी संतसाहित्याचे व्यासंगी विद्वान् श्री. रा. चिं. ढेरे यांना द्यावयास हवें. मला लेखक-संशोधक बनविण्याची आणि प्रकाशांत आणण्याची त्यांची मनापासूनची हौस. अत्यंत आपुलकीनें ते मला मार्गदर्शन करीत राहिले, म्हणूनच हें पुस्तक तयार होऊं शकलें. यांतील चांगल्याचें सर्व श्रेय त्यांनाच आहे.

भा. सं. कोश मंडळ, श्री. ढेरे संग्रह, राष्ट्रभाषा ग्रंथालय, जयकर ग्रंथालय आणि आमच्या शाहू मंदिराचें ग्रंथालय यांचा मला मुक्तपणानें वापर करतां आला. प्राचार्य डॉ. मंगुडकर यांच्या चिरतरुण व्यक्तित्वाचा आणि बहुजन-प्रीतीचा आमच्या शाहू महाविद्यालयास आधार लाभलेला आहे. त्यांच्या उदार सौजन्यामुळें आणि सहकाऱ्यांच्या स्नेहपूर्ण वृत्तीमुळेंच मला लेखन-वाचनास अवसर मिळतो, याचीहि येथें नोंद करावयास हवी. तसेंच माझी सुविद्य पत्नी सौ. मंगला हिचा माझ्या उद्योगांत मदतीचा हात असल्याचेंहि अभिमानानें सांगायला हवें.

पदांचा भावार्थ लिहितांना पुणें विद्यापीठाच्या हिंदी विभागांतील प्रा. डॉ. जोगळेकर यांची मदत झाली. रोहिदासाच्या प्रामाणिक चित्रासाठीं मित्रवर डॉ. प्र. ल. सासवडकर आणि चित्रकार श्री. जि. भि. दीक्षित यांची अमोल मदत झाली. प्रिंटेक्स्टचे श्री. सर्जेराव घोरपडे यांनीं नेटकें मुद्रण केलें. या सर्वांच्या ऋणांत राहून हें अल्पसें निवेदन पूर्ण करतों.

' तुकारामबीज ' : १६।३।६८
१२६ नारायण पेठ
न. चिं. केळकर रस्ता, पुणें २.

अशोक प्रभाकर कामत

# अनुक्रमणिका

## भाग पहिला : जीवन


| | |
|---|---|
| दंतकथांनीं भरलेलें चरित्र | १– २४ |
| चरित्राची ऐतिहासिकता | २५– ४४ |
| गुरु, गुरुबंधु आणि संतसांगाती | ४५– ७० |
| संतमताचा वारसा | ७१– ८६ |
| रचनेचें स्वरूप | ८७–१०४ |


## भाग दुसरा : वाङ्मय


| | |
|---|---|
| रोहिदासाचे दोहे | १०७–१०८ |
| प्रल्हाद-लीला | १०९–११४ |
| रोहिदास-पदावली | ११५–२३२ |
| कबीर-रोहिदास-संवाद | २३३–२३६ |


## भाग तिसरा : परिशिष्टें


| | |
|---|---|
| रोहिदासाचा चर्मकार-समाज | २३९–२५४ |
| पुणें विद्यापीठांतील रोहिदास-पदावली | २५५ |
| रोहिदासाचें प्रामाणिक चित्र | २५६–२५७ |
| रोहिदासाची भाव-पूजा | २५८–२६१ |
| सहाय्यक ग्रंथांची सूची | २६२–२६४ |

४९२१९९ चरित्र
१९।६।६८
१४२६९

# श्री संत रोहिदास

## भाग पहिला : जीवन

सकल कुटुंबी मित्रजन, प्रेममग्न नर नारि ।
प्रेम करें रविदाससे, मनमें मोद अपार ।।

# दंतकथांनीं भरलेलें चरित्र

१६०३३

## जाति न पूछो साधुकी !

इसवी सनाच्या नवव्या शतकापासून बाराव्या-तेराव्या शतकापर्यंत सिद्धांनीं आणि नाथांनीं आपल्या प्रभावी चारित्र्यानें आणि तेजस्वी वाणीनें भारतीय जनमानसावर विलक्षण प्रभाव गाजविला आणि जडमूढ बनलेल्या लोकजीवनांत उदार विचारांचें चैतन्य ओतलें. सिद्धांचा आणि नाथांचा वारसा संतांनीं उचलला आणि तो आपल्या तपोबलानें अनंत पटींनीं वाढवलाहि. तेराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रांत ज्ञानदेवांनीं नाथ-परंपरेंतून प्राप्त झालेलें आध्यात्मिक धन मुक्तपणानें सामान्य जनांना वांटलें आणि संस्कृत भाषेंत अडकून पडलेलें ज्ञान मराठीच्या पात्रांतून प्रवाही बनवून सर्व महाराष्ट्र परमार्थ-विचारांच्या फुलाफळांनीं बहरून टाकला. ज्ञानदेवांनीं ज्ञानाची पाणपोई उघडल्यामुळें महाराष्ट्रांतील सर्व जन-जाती मुक्तपणानें ज्ञानाची लूट करूं लागल्या; परमार्थाचा अनुभव घेऊं लागल्या आणि अत्यंत आत्मविश्वासानें आपल्या भावनांना नि विचारांना शब्दांतून व्यक्त करूं लागल्या. परमार्थाच्या क्षेत्रांत जातिविचार तुच्छ असून, शुद्ध भक्तीचेंच तिथें महत्त्व आहे, हें आश्वासन ज्ञानदेवांसारख्या ज्ञानियांच्या राजाकडून प्राप्त झाल्यावर, दीर्घ काळपर्यंत अज्ञानाच्या कुशींत झोपून राहिलेला महाराष्ट्र खडबडून जागा झाला. शुद्ध भावाच्या बळावर चोखा महार चोख झाला आणि–

चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।

असें छातीठोकपणें लब्धप्रतिष्ठितांना विचारूं लागला. दासी जनी भक्तीचीं उपनिषदें गाऊं लागली. सेना न्हावी दंभाचें मुंडन करूं लागला. गोरा कुंभार

ज्ञानाच्या रसरसलेल्या आव्यांत अज्ञानाचीं कच्चीं मडकीं भाजून काढूं लागला. सावता माळी भक्तीचा मळा फुलवून—

कांदा मुळा भाजी ।
अवघी विठाबाई माझी ॥

असा व्यापक अनुभव घेऊं शकला. कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या आणि पद-दलित बनलेल्या जातीजमातींतून उन्नत बनलेले हे सारे साधुसंत ज्ञानदेवांचें नेतृत्व स्वीकारून भावबळानें निर्भय बनले आणि कळिकाळाला आव्हान देऊं लागले—

नामाचिया बळें न भिऊं सर्वथा ।
कळिकाळाच्या माथां सोटे हाणूं ॥

या सर्व संतांच्या दृष्टींत भेदभावांना वाव नव्हता. त्यांच्या ठायीं समत्व-बुद्धि बाणली होती. माणूस जन्मानें श्रेष्ठकनिष्ठ ठरत नसून, कर्मानेंच श्रेष्ठकनिष्ठ ठरतो; कर्मचांडाळाहून जातिचांडाळ केव्हांहि श्रेष्ठच, हा विचार त्यांनीं निर्भयपणें मांडला आहे. कारण त्यांना शुद्ध भावाचें नि शुद्ध चारित्र्याचें मोल विशेष वाटत असे. 'जें जें देखे भूत । तें तें मानिजे भगवंत ॥' ही त्यांची भक्तीची व्याख्या. 'पृथ्वीमाजी जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताची घरें ।' ही त्यांची प्रामाणिक श्रद्धा. त्याचमुळें त्यांनीं लोकमंगलासाठीं, लोककल्याणासाठीं आपलें सर्वस्व वेचलें. जनीं जनार्दनाचा अनुभव घेतल्यामुळें सर्व विश्वावर प्रेम करणें, हा त्यांचा स्व-भाव बनला होता. संतांची ही मांदियाळी पुढें सर्व भारतांत निर्माण झाली आणि गंगाप्रवाहाप्रमाणें जनजीवनाचें भरणपोषण करूं लागली.

प्रांत, भाषा आणि जाती यांचीं आम्हींच निर्माण केलेलीं खोटीं बंधनें तोडून जीं संतचरित्रें दिव्यत्वास पात्र झालीं, त्यांत संत रोहिदासांचें नांव प्रामुख्यानें घ्यायला हवें.

मेलेल्या गुराढोरांचीं कातडीं कमावण्यासाठीं नियतीनें चांभार कुळांत जन्मास घातलें. पण संतत्व जातपात पहात नाहीं. माणूस कोणत्या कुळांत जन्मास यावा, हें जरी नशिबाच्या हातचें असलें, तरी चरित्र-चारित्र्याचा विकास करणें हें आपल्या हातीं असतें. आपल्या श्रेष्ठ चारित्र्यबळानें चांभाराचा रोहिदास संतशिरोमणि रोहिदास झाला.

सुदूर दक्षिणेंतून भक्तीच्या ध्वजा हातीं वागवीत आचार्य रामानंद उत्तरेंत प्रकटले आणि मध्ययुगांत त्या भेदाभेदांनीं भग्न झालेल्या भयग्रस्त समाज-मनास भक्तीचा आधार लाभला. रामानंदांच्या उदार वृत्तींत सारा समाज संघटित करायचें सामर्थ्य होतें. त्यांच्या कालदर्शी नेतृत्वानें सारा मोहराच बदलून जाणार होता.

उच्चनीचतेच्या कृत्रिम बंधनांना झुगारून स्वामी रामानंदांचे संतसांगाती आत्मविश्वासानें पुढें सरले. कोष्टयाचा कबीर दुर्दम्य आत्मबलानें बोलूं लागला. कसायाघरचा सदन टाळमृदंगांच्या गजरांत रंगून गेला. धना जाटाची ब्रह्मानंदीं टाळी लागली आणि चांभाराघरचा रोहिदासहि भक्तीची बानी म्हणूं लागला. त्याची भक्तिभावना पाहून सारा समाज त्याचा जयजयकार करूं लागला. श्रेष्ठ शील, कर्तृत्व आणि भक्तिभावना यांनीं रोहिदास संतत्व पावला.

सकल कुटुंबी मित्रजन, प्रेममग्न नर नारि ।
प्रेम करैं रविदाससे, मनमें मोद अपार ।।

घरींदारीं सारे साथीसोबती ईश्वरीय प्रेमांत रमून गेले. संत रोहिदासाविषयीं त्यांच्या मनीं अपार स्नेह निर्माण झाला. तो त्यांना हवाहवासा वाटूं लागला.

—आणि त्या थोर संताचें जीवन अद्भुत दंतकथांनीं भरून गेलें.

## प्रपंच आणि परमार्थ

सदैव ईश्वराचा विचार करणारा रोहिदास स्वतःच्या घरींहि फारसा सुखी नव्हता. बालपणापासूनच त्याचा ईश्वर-सेवेकडे असलेला कल पाहून आईबापांना मोठी काळजी वाटायची. हा मुलगा असा सदान् कदा देव देव करूं लागला, तर याचा प्रपंच कसा व्हायचा? नुसतें देवाचें नांव घेऊन दोन वेळच्या अन्नाचा प्रश्न सुटत नाहीं. तेव्हां या मुलाचे हे वेडे चाळे ताबडतोब बंद करून टाकले पाहिजेत. देवबिव कांहीं नाहीं. आधीं पोटोबा मग विठोबा. असा सरळ सरळ व्यवहाराचा विचार करून रोहिदासाचे आईवडील मुलाला परोपरीनें समजावूं लागले. पण तो कांहीं ऐकेना. त्याला आईवडिलांचा व्यवहार पटत का नव्हता? पण अंतरीं कुठें तरी दूरवरची ओढ लागली होती. ईश्वराची केवळ आठवण झाली, तरी तो आनंदानें हरखून जायचा. आईवडिलांचा व्यवहार-विचार वारंवार ऐकूनहि तो विसरून जायचा.

असेंच कितीतरी दिवस चाललें. रोजचें भांडण. शेवटीं वडिलांनीं एक युक्ति शोधून काढली. मुलाचा परमार्थ पार बंद करून टाकायला एकच उपाय. लग्नाची बेडी ठोकून दिली कीं, येईल आपोआप ताळ्यावर! झालें. सारें जुळून आलें. रोहिदास कुठें तरी देवाच्या द्वारीं उभा होता. संतसमागमाचा ध्यास घेतलेला. सत्यधर्माचा विचार मनांत रुंजी घालीत होता. आपण कांहीं तरी अद्भुत मिळवायचें, अशी जिद्द. पण तें सारें सोडून चार लोक करतात, तसा संसार कर, म्हणून घरच्यांनीं त्याला बोहोल्यावर चढवलें. देवाब्राम्हणांदेखत लग्न लागलें. आतां आपला मुलगा सुखाचा संसार करील, प्रपंचाची त्याला गोडी लागेल, अशी आईवडिलांची समजूत. पण आईबापांची निराशा झाली. रोहिदासाची ईश्वरनिष्ठा अधिकच तीव्र होऊं लागली. शेवटीं आईबापांनीं शेवटचा उपाय म्हणून मुलाला घरीं राहूं न देण्याची धमकी दिली. तरीहि तेंच. आतां काय करावें? व्यवहाराच्या नांवानें शून्य असलेल्या या चिरंजीवांना अखेर मागल्या दारीं स्वतंत्र बिऱ्हाड थाटून मिळालें. करा आतां संसार. न करून सांगतां कुणाला?

त्या दारिद्र्याच्या आणि मायेची सावली नसलेल्या वैराण जीवनांत कृपाळू ईश्वरानें मात्र भक्ताची सोबत केली. साधुसंत मित्रांच्या रूपानें रोहिदासाच्या घरीं ईश्वराचा पाहुणचार सुरू झाला. गरीबी सुखाची झाली. प्रापंचिक अडचणींवर नामस्मरणाचा उतारा सांपडला. रोजच्या मीठ-मिरचीचा प्रश्न कधीं भेडसावीत नसे. जें कांहीं मिळे, त्यांत रोहिदासाचा संसार सुखासमाधानानें नांदूं लागला. सुखदु:खांच्या पार पलिकडे गेलेल्या त्या पुण्यात्म्याबरोबर संसार करण्यांत अपूर्व आनंद आहे, या जाणिवेनें कारभारीणहि संतुष्ट असे.

सुखी संसार अन् सारा वेळ ईश्वरानुरागांत लीन राहायचें. प्रपंचांत असून परमार्थ करायचा ... संताच्या सुखी जीवनाला सीमा राहिली नाहीं.

'भक्तविजयकार' महीपतिबोवांनीं संत रोहिदासाच्या सुखी प्रपंचाचें सुंदर वर्णन केलें आहे. ते म्हणतात–

ऐका श्रोते हो सावकाश । परमवैष्णव रोहिदास ।
हरिभजन रात्रंदिवस । प्रेमभावें करीतसे ।।
मनें दुराशा सांडोन । भावें करीतसें हरिकीर्तन ।
नित्यनेमें स्नान करून । विष्णुपूजन करीतसे ।। भ. २५.१-२

## बादशहा बदलला !

एकदा कृपावंत भगवंतांनीं आपल्या भक्ताच्या पुण्यकृत्यावर संतुष्ट होऊन त्याला कांहीं मोहरांचा प्रसाद आणून द्यावयाचें ठरविलें. आणि एका प्रवासी साधूचें रूप घेऊन प्रत्यक्ष भगवंत रोहिदासाच्या झोपडींत आला. रोहिदास आल्यागेल्यांचें स्वागत मोठ्या तत्परतेनें करीत असे. साधुमहाराजहि संताघरचा पाहुणचार घेऊं लागले.

एके दिवशीं साधूनें भगवंताचा प्रसाद म्हणून कांहीं मोहरा रोहिदासाच्या हातीं दिल्या. आणि साधु अदृश्य झाला. रोहिदासापुढें मोठा प्रश्न पडला कीं, आतां या मोहरांचें करायचें काय? त्यानें ईश्वरापुढें सांगणें सुरू केलें– 'बाबा, ह्या मोहरा तुझ्या तूं घेऊन जा. मला ही संपत्ति घेऊन काय करायचें आहे?' भाबड्या स्वभावाच्या भक्तासमोर भगवंत प्रकट होऊन त्याला विनवूं लागला, ' भक्ता, हा माझा प्रसाद तूं घ्यायलाच हवास. पैशावांचून तुझें होणार कसें? ' ईश्वरानें समजूत काढल्यावर रोहिदासानें त्याचें ऐकायचें ठरविलें. पण तें थोडेंसेंच. प्रसादाचें सारें धन एकत्र करून त्यानें एक मंदिर बांधलें आणि ब्राह्मण पुजारी ठेवून त्या मंदिरांत पूजा-अर्चा सुरू झाली. दुष्ट बुद्धीच्या दांभिक पंडितांना हें कसें आवडावें? चांभाराच्या देवालयांत ब्राह्मण पुजारी ? हा तर अधःपात ! धर्माचा नाश ! अशा मूर्ख विचारांनीं पछाडलेले पंडित लोक रोहिदासावर रुष्ट झाले. त्यांनीं संताचा छळ सुरू केला. पण संत विचलित झाला नाहीं. तो आपला नित्य ईश्वराची सेवा करण्यांत रंगून गेलेला होता. ज्ञानाचा प्रकाश दिसत असतां अज्ञानास कां डरावें ?

पंडितांनीं बादशहाकडे गाऱ्हाणें नेलें. त्याला तेंच हवें होतें. लगेंच फर्मान सुटलें –'रोहिदास चांभाराला असेल तसा पकडून आणा.' बिचारा रोहिदास कधीं नव्हे तो आणि अपराधाविना अपराधी बनून बादशहाच्या लहरी हुकुमाचा ताबेदार झाला. शांत चित्तानें तो बादशहापुढें उभा होता. चेहऱ्यावर विलक्षण तेज. संताच्या स्वच्छ मनांत भगवंताच्या भक्तीचा आधार होता. त्याचें तें विलक्षण रूप पाहून निरपराधी संतास काय बोलावें, म्हणून बादशहाहि सचिंत झाला. आरोपांना उत्तरें देणारा रोहिदास आपल्या दिव्य चारित्र्यानें विजयी ठरला. संताच्या अमृतमय वाणीनें बादशहा सुद्धां बदलला. राजदरबार नम्र झाला. बादशहा रोहिदासाचा शिष्य बनला.

करी प्रतिज्ञा भूपनें, अब नहीं भक्त सताऊँ ।
सच्चा बंदा ईशका, भक्तकथा नित गाऊँ ।।

बादशहानें मग अशी प्रतिज्ञाच केली कीं, आतां मी भगवद्भक्तांना त्रास देणार नाहीं; ईश्वराचा सच्चा सेवक होऊन राहीन आणि नित्य भक्तांच्या कथेचें गायन करीन.

## तिथ भक्ति गा एक सरे

वाराणसीच्या पुण्यक्षेत्रीं निवास करणाऱ्या संत रोहिदासाची गंगामाईवर विलक्षण श्रद्धा होती. पुण्यतोया भागीरथीच्या निर्मल जलाचें सदैव दर्शन घ्यावें अन् कृतार्थ व्हावें असें त्यास वाटे.

गंगा गुन गायन किये । विविध क्लेश नशन्त ।

गंगामातेचें गुणगान केल्यानें सारे त्रिविध ताप नष्ट होतात, अशी त्या भाबडया भक्ताची समजूत होती. पण पोटापाण्याच्या उद्योगांत इतका वेळ जाई कीं, गंगामाईचें दर्शन घेऊन तिला नमन करणें, त्याला कित्येकदां अशक्य होत असे. अशाच एका कामाच्या धांदलीच्या दिवशींचा प्रसंग.

एक ब्राम्हण गंगास्नानाला चालला होता. कामांत असलेल्या रोहिदासानें त्यास थांबवून सांगितलें– 'महाराज, आपण गंगामाईच्या दर्शनासाठीं निघाला आहांत. आपणांस मी वंदन करतों, आपण कृपा करून माझें एक काम करावें. माझी अल्पशी भेट म्हणून ही सुपारी गंगामाऊलीस अर्पण करावी. ती तिचा प्रेमानें स्वीकार करील !' रोहिदासाचे हे भाबडे बोल ऐकून आपल्या ज्ञानाचा दंभ असलेले ब्राह्मण महाराज मनांतल्या मनांत हंसले. पुढें गंगा-स्नान आटोपल्यावर सहज उभे होते तों कोण चमत्कार ! गंगामाता त्यांचेसमोर हात करून रोहिदारानें भेट म्हणून दिलेली सुपारी ग्रहण करीत आहे आणि रोहिदासाला प्रतिभेट म्हणून आपलें कंकण देत आहे ! ब्राम्हणाच्या आश्चर्यास सीमा राहिली नाहीं. तो तिथून धावत-पळत निघाला. रोहिदासापुढें येऊन तो विचारूं लागला– 'अरे बाबा ! तूं असें काय पुण्य केलेंस म्हणून तुझ्यावर गंगामाईची एवढी कृपा व्हावी ?' रोहिदासापाशीं काय उत्तर होतें ! त्यानें आपल्या कटोऱ्याकडे बोट दाखविलें. त्यांत कामासाठीं पाणी ठेवलेलें होतें. संतानें जणू सुचविलें.–

'मन चंगा तो कठौतीमें गंगा !'

मनाचें पवित्र्य असेल तर कटोऱ्यांत सुद्धां गंगाजल निर्माण होईल.

जातीपातीचा हा प्रश्न नव्हे. भक्तिभावानें प्रसन्न होणारा भगवंत जातपातीचें बंधन मानीत नाहीं.

संताची ही अमृतवाणी ऐकूण ब्राह्मणाचा खोटा गर्व गळून गेला. जातपातीचे वेडे विचार विरून गेले.

भक्ति प्रभाव देखि मनमाहीं ।
ब्राह्मणदेव बहुत सकुचाही ।।

भक्तिभावाचा विजय प्रत्यक्ष अनुभवून ब्राह्मण फार खजील झाला.

## सत्यज्ञानाची सत्त्वपरीक्षा

रोहिदासाच्या कीर्तीचा सुगंध दरवळत होता. काशीनिवासी त्याच्या कीर्तनांत रंगून जात असत. सारा गांव संताच्या विशुध्द वृत्तीनें मोहून गेला होता. सामान्य जन आतां आपणास विचारींत नाहींत, असें पाहून काशीचे पण्डे संतप्त झाले. रोहिदासाची कीर्ति त्यांना साहवेना. दुष्टबुद्धीनें ते यावर उपाय करण्यासाठीं एकत्र आले. त्या काळचा राजा मोठा न्यायप्रिय होता. पंडितांची तक्रार शांतपणें ऐकून घेऊन त्यानें न्याय करण्यासाठीं शास्त्रार्थसभा आयोजित केली. रोहिदासांना आपलें ईश्वरविषयक तत्त्वज्ञान मांडण्याची विनंती करण्यांत आली. पंडितांच्या प्रश्नास त्यांनीं उत्तरें द्यावींत, असेंहि ठरलें. आणि शेवटीं न्यायनिर्णय म्हणून भगवंताच्या मूर्तीस दोन्ही पक्षांनीं आवाहन करायचें निश्चित झालें. सिंहासनावर विराजमान असलेली ईश्वराची मूर्ति ज्याचेपाशीं जाईल त्याची सरशी होणार होती. गर्विष्ठ पंडितांनीं फाजील आत्मविश्वासानें या साऱ्या अटी मान्य केल्या. आपलाच विजय होणार, अशी त्यांना घमेंड होती. देव शूद्राजवळ जाईल कसा, असा त्यांचा दंभ. त्यांची अज्ञानी वृत्ति पाहून संत रोहिदास मात्र ईश्वराची करुणा भाकूं लागला. त्याचेकडे फक्त सच्च्या भक्तिभावाचें बळ होतें. भगवंत जर भावाचा भुकेला असेल, तर संताचा जय होणार होता.

शास्त्रार्थ सुरू झाला. सृष्टीचें रहस्य काय, ईश्वराचें स्वरूप कसें, समाजांत ज्ञानोपासना कुणी करावी, जन्मानें हीन असलेल्यानें भक्ति करावी का–असे एक ना दोन, अनेक प्रश्न. रोहिदासावर भडिमार होऊं लागला. सारे पंडित एका बाजूस होते. रोहिदास एकटा होता. समोर न्यायप्रिय राजा सभेचें नियंत्रण करीत होता. हजारो संतप्रेमी जन आतां काय होतें म्हणून

औत्सुक्यानें पाहत होते... ब्राह्मण पंडितांकडून प्रश्नांची सरबत्ती सुरू होती. भगवंताचें नित्य स्मरण करणारा संत रोहिदास शांत चित्तानें आपल्या भावभक्तीचें बळ एकवटून ईश्वराची प्रार्थना करीत होता–' मला आत्म-विश्वास प्रदान कर. मला सत्य समजावून सांगतां येऊं दे.'

इकडे स्तब्ध असलेल्या रोहिदासास पाहून पंडित तावातावानें आपलें अज्ञान सांगत सुटले होते. आणि एवढ्यांत रोहिदासाची विमल वाणी वदूं लागली –

**बिरलै जानै कोई मुनीशा । सो मोहिं दियो परमगुरु ईशा ।**

कोणी एखादाच ऋषिमुनि जें जाणतो तें माझ्या परम गुरूंनीं म्हणजे साक्षात् ईश्वरानें मला सांगितलें आहे.

**कर्मवासना जैसी करता । तैसी देह देय जग भर्ता ।**
**सत रज तम गुण तीन प्रकारा । इनके वश्य जीव जग सारा ।**

कृति आणि वासना जशी कराल, त्यानुसार ईश्वर तुम्हांला देह प्रदान करून जगांत पाठवितो. सत्त्व, रज आणि तम हे तीन प्रकृतीचे गुण आहेत आणि त्यांतच सारे जीव आणि जगत् अधीन आहे.

**आत्म व्यष्टि समष्टिमें होई । जग महँ जीव कहावे सोई ।**

सकल व्यष्टिसमष्टींत आत्मरूप पहाणारा जीवच धन्य समजला जातो.

**ईश्वर जीव मध्य अति भेदा । समुझें वही भक्त निर्भेदा ।**
**काया मध्य बसत दस प्राना । इनमें जीवहंस करि माना ।**
**आत्म अधार वही करतारा । सो तुम मनमें लेहु बिचारा ।**
**सबमें व्यापक सबसे न्यारा । काहे पंडित संशय धारा ।**

'ईश्वर आणि जीव यांच्यामध्यें खूप अंतर आहे ( असें अज्ञ जन समजतात. ) ईश्वर आणि जीवांत भेद नाहीं असें भक्त समजतो. कायेच्या रूपांत दहा प्राण वास करतात. यांत जीव हंसाप्रमाणें रहातो. आत्माच खरा आधार आहे. तोच कर्ता आहे. हें तुम्ही ध्यानीं घ्या.

सर्व भूतांस व्यापून असूनहि सर्वांहून निराळा असा तो ईश्वर आहे; मग पंडिता ! तूं कसले संशय मनीं बाळगून बसला आहेस ?'

रोहिदासाच्या अस्खलित वाग्धारेनें सारा श्रोतृवृंद मुग्ध झाला. काशी-

नरेश परम आनंदानें डोलूं लागला. सारी सभा रोहिदासाच्या नांवाचा जय-जयकार गाऊं लागली. भजनाचा रंग उसळला. भगवंत आणि भक्त यांच्या महिम्यांचा एकच उद्घोष सुरू झाला. अज्ञानानें अंध बदलेले पंडित आपल्या अपराधीपणाविषयीं खंत करू लागले. आणि सिंहासनाधिष्ठित भगवंताची मूर्ति संताच्या समोर येऊन तिष्ठत राहिली. भावभक्तीचा तो प्रत्यक्ष चमत्कार पाहून सारा समुदाय धन्य झाला. रोहिदासाचा विजय झाला. काशी-नरेश आणि पंडित-जनहि संताच्या धवल चारित्र्याविषयीं आणि ज्ञानक्षेत्रांतील श्रेष्ठ अधिकाराविषयीं ग्वाही देऊं लागले. रोहिदास धन्य झाला.

## शाळिग्राम तरून गेला !

एका कुंभमेळ्याच्या वेळची कहाणी आहे. पवित्र प्रयागतीर्थावर भाविकांची गर्दी उडाली होती. गंगा, यमुना व सरस्वती यांच्या त्रिवेणीसंगमांत स्नान करण्यासाठीं भक्तजन एकत्र आले होते. रोहिदासहि आपल्या सत्शिष्यांसह त्या विराट यात्रेंत सहभागी झाला होता. ईश्वराच्या स्मरणांत दंग झालेल्या आणि जनमनांत स्थान पावलेल्या संत रोहिदासाविषयीं खोट्या ज्ञानाच्या गर्वानें पछाडलेल्या पंडितांना वैषम्य वाटत होतेंच. कुंभमेळ्यांत सामील झालेल्या संतास पाहून त्यांची दुष्ट कामना पुन्हा जागी झाली. त्यांनीं भोळ्या जनतेस ललकारून रोहिदासाची निंदा करण्याचा चंग बांधला. रोहिदास विचलित झाला नाहीं. पण सारा ज्ञानी म्हणविणारा समाज हाकाटी करतो आहे, असें पाहून भोळेभाबडे भक्त विचलित झाले. खऱ्याखोट्याची परीक्षा पुन्हा सुरू झाली.

धूर्त पंडितांनीं काष्ठापासून तयार करविलेले शाळिग्राम हातीं ठेवले होते. आणि त्यांनीं पेच टाकला—'जर रोहिदास खरा भक्त असेल, तर त्याच्या पूजेंतील शाळिग्राम गंगामाई उचलून धरील.' संताचा शाळिग्राम खरा होता, काष्ठाचा नव्हता. त्याला हें सारें समजत होतें. पण वाऱ्यासंगें भांडायचें कसें? त्या तुफानाशीं सामना द्यायलाच हवा होता. संतानें भगवंताचें एकाग्र भावानें चिंतन सुरू केलें. त्याचें मन आक्रंदून उठलें—

सत्य सनातन धर्म है। कहत वेद श्रुति सार।
तौ फिरि तरैं शालिग्रामजी। होय धर्म जयकार॥

वेदश्रुतींचें सार म्हणून प्रसिद्ध असलेला सत्यधर्म जर खराखुरा असेल, तर हें

भगवंता! हा शाळिग्राम तरला जाऊं दे. सत्यधर्माचा पुन्हा एकवार जयजयकार होऊं दे!

आणि भगवंत धांवून आला. शाळिग्राम गंगामातेवर तरंगूं लागला. सारी सभा स्तिमित झाली.

जनु समुदाय देखि यह लीला । धन्य भक्त रवि गुणशीला ।
तुम्हरो ज्ञान सत्य जगमाई । साक्षी दियो स्वयं प्रभु आई ।।

ती अद्‌भुत लीला पाहून सारा समुदाय म्हणूं लागला, गुण-शीलानें युक्त असलेला भक्त रोहिदास धन्य होय. त्याचें ज्ञान सत्य स्वरूपाचें आहे. प्रत्यक्ष भगवंतानें प्रकट होऊन याची साक्ष दिली आहे. भक्तजन गाऊं नाचूं लागले.

जय रविदास परम शुभ ज्ञानी । तुमसम कोउ नहीं हम मानी ।

परम शुभज्ञानी अशा संत रोहिदासाचा जयजयकार असो. तुमच्यासारखा ज्ञानी संत अन्य कोणी नाहीं असें आम्ही मानतों. तुमचा त्रिवार जयकार असो.

हा जयघोष ऐकून अपमानित झालेले पंडे संकोचानें अधोमुख झाले. मनांत कपट असल्यावर खरेंखुरें ज्ञान प्राप्त होत नाहीं, याचा त्यांना अनुभव आला. त्यांचा दंभ जळून गेला.

मुख नीचा अभिमानका । मिलै जगतमें हार ।
परम भक्त रविदासकी । लाज रखी करतार ।।

अभिमानाचें-गर्वाचें घर खालीं होत असतें. परमभक्त रोहिदासाची प्रतिष्ठा राखण्यासाठीं प्रत्यक्ष ईश्वर प्रकट झाला.

## मीराबाई आनंदली

रोहिदासाची सुकीर्ति ऐकून हरिभजनीं रंगून गेलेली मीराबाई सुखावली. तिला सद्‌गुरु लाभल्याचा आनंद झाला. आणि ती गुरुजींच्या दर्शनासाठीं त्यांची प्रार्थना करूं लागली. वाराणसींत राहणाऱ्या संत रोहिदासांना भक्तिवेडच्या मीरेची हाक ऐकूं गेली. आणि हेंहि दिसूं लागलें कीं, हीनकुलोत्पन्न गुरु केला, म्हणून मीराबाईला यातना सहन कराव्या लागतील. आणि तसेंच झालें होतें. आधींच श्रीकृष्णाच्या मंदिरांत भजनगायनांत सदैव दंग असते म्हणून मीरेवर रुष्ट असलेलें चितोडचें राजघराणें मीरेला हे नवें वेड लागलें, म्हणून संतप्त झालें. त्यांनीं तिचा छळ मांडला. राजसभाहि राजाच्या बाजूची झाली. मीरेला अधःपातापासून वांचविलेंच पाहिजे, म्हणून सर्व जण

प्रयत्न करूं लागले. इकडे सद्गुरु आणि त्यांची सत्शिष्या दूर राहूनहि लोक-क्रोधामुळें अकारण छळ साहूं लागलीं. रोहिदासांनीं आपल्या शिष्येची संकटांतून मुक्ति करायचें ठरविलें. आणि तिच्याच निमंत्रणावरून ते तिच्या घरीं जेवायला निघाले.

बुद्धिहीन ये रानि है करती गुरु चमार ।
और इसे दीखा नहीं ढूंढा दुष्ट गँवार ॥

या निर्बुद्ध राणीला काय म्हणावें ? चांभार गुरु केला आहे. अन्य कोणी हिला कसा भेटला नाहीं ? म्हणून असा दुष्ट ग्रामीण गुरु शोधला आहे.

जनकोपाला उधाण आलें. सारा गांव मीरेविरुद्ध काव काव करूं लागला. राजघराण्यांतल्या मीरेच्या घरीं पंक्तीला चांभार ! म्हणजे धर्माचा नाश ! कोण हा अधःपात ! सारे लोक संतापाने क्रुद्ध झाले. मीरेनें गुरुजींना सारें सांगितलें. पण तें त्यांना आधींच ठाऊक होतें. शेवटीं गुरुजींची एकट्याची पंगत असावी आणि बाकीचे तथाकथित श्रेष्ठ-जन स्वतंत्र जेवावयास बसावेत, अशी तडजोड झाली. मीरेस फार वाईट वाटलें. पण रोहिदासांना कसलीच खंत वाटली नाहीं. आणि जेवायच्या वेळीं मोठी गंमत उडून गेली. सारा समाज आश्चर्यानें आ वासून उभा राहिला. ... साऱ्या पाटांवर रोहिदास जेवायला बसलेले पाहिले आणि आपल्या जन्मजात श्रेष्ठत्वाचा वृथा अभिमान सांगणारे श्रेष्ठ जन शरमेनें चूर होऊन गेले. वर्णाभिमान गळून पडला. जातपातीचा कोता विचार खोटा ठरला. मीरेनें ही सारी लीला पाहून गुरुजींच्या थोरवीचीं पदें गायला सुरुवात केली. तिच्या आर्त स्वरांनीं सारें वातावरण भक्त-भक्तिमय होऊन गेलें. आपापसांतील भेदाभेद विसरून सकल जन गाऊं लागले. मीरेच्या मधुर स्वरांत अनेक स्वर मिसळले गेले. तहानभूक विसरून सारा समुदाय ईश्वराच्या पावन नाम-घोषानें दिव्य सुखाचा उपभोग घेऊं लागला. मीरेच्या आनंदाला तर सीमाच नव्हती. साश्रु नयनांनीं ती म्हणत होती.

दासीकी बिनती सुनी, गुरुवर भये दयाल ।
सत्य हेतु चेली करी, मेटे सब भ्रमजाल ॥

दासीची प्रार्थना ऐकून सद्गुरु कृपावंत झाले. सत्यज्ञान समजावून सांगण्यासाठीं मला शिष्या केलें आहे, आतां सारा भवभ्रयाचा गुंता नष्ट होईल.

## सिकंदर लोदी शरण आला

दिल्लीचा सुलतान सिकंदर लोदी हलक्या कानाचा होता. कुणीं तरी एका बुवानें संत रोहिदासाविषयीं त्याच्या मनांत कांहीं भरवून दिलें. त्यानें कसलाहि विचार न करतां रोहिदासास पकडून आणण्याचा हुकूम ठोठावला.

बांधि मुश्क रविदासकी, बन्दीगृह पहुँचाय ।
कालकोठरीमें बंद करी, ताले दिये लगाय ।।

रोहिदासाच्या मुस्क्या बांधून त्याला बंदिगृहांत पाठविण्यांत आलें. काळाच्या कोठडींत संताला डांबण्यांत येऊन टाळें ठोकलें गेलें.

पण निरपराधी भक्ताची ही दुर्दशा प्रजेला सहन होईना. सुलतानाच्या काळ्या करणीस सारे लोक निंदूं लागले. अधर्मी शासनाविरुद्ध सारी प्रजा आक्रोश करून उठली. सुलतानाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध लोक उघड उघड बंडाची भाषा बोलूं लागले. असा सारा जनताजनार्दन जागा झाला.

सबके हृदय शोक अति भारी।
है यें कुटिल भूप अविचारी ।।

हा भूपति अत्यंत दुष्ट आणि अविचारी आहे, असें म्हणून साऱ्या लोकांचीं हृदयें शोकसंतप्त बनलीं. आणि इकडे स्थितप्रज्ञ वृत्तीच्या संतानें आपलें चित्त आलिया भोगास सादर केलें होतें. त्याच्या मनास किंचितहि विकार शिवला नाहीं. देवाजीच्या मनांत जें आलें तें झालें, असें मनीं म्हणून मुखीं ईश्वराचेंच नांव घेत तो शांत राहिला.

कारागार भक्तने पाया । पै नहीं सोच हृदयमें आया ।
आसन बांधि करें प्रभु ध्याना । लगी समाधी जगतभुलाना ।।

कारागृहांत पडूनहि भक्त जरासुद्धां डगमगला नाहीं. स्वस्थ चित्तानें आसनस्थ होऊन तो ईश्वराचें स्मरण करूं लागला आणि जगरहाटी विसरून गेला.

ईश्वरच अस्वस्थ झाला. कारण त्यानें भक्तांसाठीं प्रतिज्ञाच घेतली होती—

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

साधुसज्जनांचें रक्षण करण्यासाठीं आणि दुष्ट दुर्जनांचें निर्दालन करण्यासाठीं अन् त्यायोगें सद्धर्माच्या संस्थापनासाठीं मी जगतीतलावर अवतरित होतों.

भगवंताला ही प्रतिज्ञा आठवली. भक्ताच्या भेटीसाठीं तो आतुर झाला

आणि संत रोहिदासासमोर येऊन उभा ठाकला.

रोहिदासाला भगवान् श्रीकृष्णाचें दर्शन घडलें. कारागृहाचे दरवाजे शिथिल झाले. पण अन्यायी सुलतानाची आणि अधर्मी जनांची अजून फजिती व्हावयाची बाकी होती. दुसऱ्या दिवशीं, रोहिदासावर अन्याय करणाऱ्या सुलतानाला आणि त्याच्या साथीदारांना त्यांच्या प्रार्थनेच्या वेळीं प्रार्थनामंदिरांत सर्वत्र रोहिदास दिसूं लागला आणि ते सारे घाबरून गेले.

देखि हकीकत भक्तकी, चकित भये सब लोग।
थर थर कांपे भूप अति, मानौ व्यापा रोग।।

भगवंत-भक्तांची ही अद्भुत लीला पाहून सारे जण चकित झाले. भयानें ते थर थर कांपूं लागले. जणूं त्यांना भानयक रोगानें ग्रासून टाकलें.

सुलतान संताच्या चरणीं मस्तक ठेवून दहा वेळां क्षमेची भीक मागूं लागला. रोहिदासानें उदार अंत:करणानें त्यास क्षमा करून सन्मार्गाचा उपदेश केला. सुलतान पुन्हा अविचारानें वागला नाहीं.

## कुंभश्यामाच्या मंदिरांत

संत रोहिदासांकडून गुरूपदेश घेतल्यानंतर आणि चितौडच्या जनतेचा क्षोम नष्ट होऊन गेल्यानंतर तेथील सारें वातावरणच रोहिदासमय होऊन गेलें. मीराबाईनें संत रोहिदासांचें सुंदर मंदिर असावें, अशी इच्छा व्यक्त केली. सगळ्यांनाच ही कल्पना आवडली. चितौडांत कुंभश्यामाचें मंदिर उभें राहिलें. याच मंदिरांत मीराबाई आपल्या आराध्याची नित्यपूजा करूं लागली. गुरुदेवहि तिथेंच येऊन राहूं लागले. आजहि हें मंदिर उभें आहे. श्रद्धाळू लोकांना हें मदिर कुंभश्यामाबरोबरच संत रोहिदासाचेंहि वाटतें. याच ठिकाणाहून संत निजधामाला गेले, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या महानिर्वाणाचीहि एक कथा सांगतात–

नित्यपूजेंत लीन झालेल्या संत मीराबाईसमवेत संत रोहिदासहि कुंभश्यामाच्या देवालयांत राहायचे. असाच खूप काळ लोटला. एके दिवशीं पूजाअर्चा करून परतत असलेल्या रोहिदासांस अंधविश्वासी जनांनीं छेडलें. त्यांच्या खांद्यावर यज्ञोपवीत म्हणजे जानवें नाहीं म्हणून त्यांची संभावना केली. संतांस या संभावनेचें वैषम्य वाटलें आणि त्यांनीं त्या मूर्ख ब्राह्मणांस

अंग चीर रविदासने, दिया जनेउ दिखाय।
जय जय जय सब करै, पंडित गये लजाय।।

चामड्याच्या आंतील तें यज्ञोपवीत पाहून सारा ज्ञानी वर्ग विस्मित झाला. त्या यज्ञोपवीताच्या प्रखर तेजस्वितेनें त्यांचे डोळे दिपून गेले. ती ज्योति इतकी प्रकाशमयी होती कीं, अखेर तो प्रकाश दांभिक पंडितांना सहन होईना,...त्यांनीं पश्चात्ताप पावून आपले नेत्र मिटून घेतले, आणि त्याच वेळीं संत रोहिदासांनीं आपली इहलोकींची यात्रा समाप्त केली. संताचें तेजस्वी जीवन अमृततत्त्वांत विलीन झालें. ती जीवनज्योत निमाली का? नाहीं. पुण्यपुरुषाची जीवनज्योति विझून जात नाहीं, ती सदैव तेवत राहते. आजहि कुंभश्यामाच्या मंदिरांत संत रोहिदासांच्या अखेरच्या जीवनप्रसंगाची स्मृति सांगितली जाते, तेथेंच त्यांच्या पाऊलखुणा उमटलेल्या आहेत. 'संत रविदासकी छतरी' या नांवानें ती जागा पावन झालेली आहे

संताची जीवनज्योति त्यानें दाखविलेल्या ज्ञानप्रकाशाच्या योगानें आजहि अखंड तेवत राहिली आहे. कुंभश्यामाच्या मंदिरांतच नाहीं तर घराघरांतून ती ज्योति जागी आहे.

## रोहिदास-रामायण

अशा किती कथा सांगाव्या? या संताच्या अद्‌भुत जीवनाच्या या कहाण्या म्हणजेच रविदास-रामायण. रोहिदासाच्या दिव्य चमत्कारांचें वर्णन करण्यासाठीं एक रामायणच रचण्यांत आलें. या रामायणांत रोहिदासांना लाभलेल्या जनप्रियतेचा सुरेख आविष्कार झाला आहे. कधीं संत कबीरदासाशीं संत रोहिदास हरिगुणरूपाची चर्चा करीत बसले आहेत; तर कधीं आचार्य रामानंदांचे सत्‌शिष्य बनून त्यांच्या दिव्य वाणीचें श्रवण करीत आहेत. कुठें आपल्या समाजबांधवांचें सांत्वन करण्यासाठीं नाना प्रकारच्या चमत्कारांचें कर्तृत्व प्रकट करीत आहेत, तर कधीं वाट चुकलेल्या अज्ञानी जनांस सत्यमार्गाची श्रेष्ठता समजावून देत आहेत. केव्हां ते क्रुद्ध पंडितांच्या आवाहनाचा स्वीकार करून त्यांचा खोटा गर्व काढून टाकण्यासाठीं कांहीं अद्‌भुत करून जातात, तर केव्हां बादशहाच्या लहरी हुकुमाचे ताबेदार होऊन त्याला कळावें, म्हणून भगवंताचें माहात्म्य स्पष्ट करून सांगतात. राजाच्या हट्टीपणाला कधीं शासनहि करतात, तर कधीं चितौडच्या राजघराण्याला मीरेची श्रेष्ठता सिद्ध करून दाखविण्यासाठीं काशीहून राजस्थानीं येऊन प्रकट होतात.

त्यांच्या अपार भक्तिभावापुढें सारा ' समाज विनम्र झाला आहे, त्यांच्या–

संगें हरिगुणसंकीर्तनांत स्वतःस हरवून बसला आहे. आणि संताच्या ह्या साऱ्या अद्भुत करणीचें वर्णन करतांना 'रविदासरामायणा'चा लेखक स्थलकालबंधनाच्या साऱ्या मर्यादा विसरून गेला आहे, पण त्याची श्रद्धा-भावना अपूर्व आहे. लोकपुरुषानें आवडीनें ध्यानीं ठेविलेलें रोहिदासाचे जीवन-प्रसंग रोहिदासरामायणानें शब्दबद्ध केले आहेत.

## लोकपुरुषाची विलक्षण कल्पनाशक्ति

अशा या साऱ्या कथांतून रोहिदासांचें चरित्र सांगितलें गेलें आहे. या साऱ्याच कथा खऱ्या आहेत असें नाहीं आणि सर्व कथा खोटचा आहेत असेंहि नाहीं. या सर्व दंतकथांचा आशय त्या थोर महात्म्याच्या महात्मतेचें वर्णन करण्याचाच आहे. संताची दिव्य अनुभवानें नटलेली वाणी जरी ध्यानीं राहिली नाहीं, तरी ही सारी अद्भुत करणी आम्ही ध्यानीं ठेविली.

ज्यानें आपल्या उक्तीनें आणि कृतीनें आडम्बराचा अन् बुवाबाजीचा सतत विरोध केला, त्या संत रोहिदासाचें असें हें दंतकथांनीं भरलेलें जीवन पाहिलें कीं, मन विषण्ण होतें. त्यानें आपल्या जीवनांत नेमक्या याच गोष्टीस म्हणजे अंधविश्वासास विरोध केला. आणि त्याचेंच जीवन म्हणजे चमत्कारांचें भांडार बनवून आम्ही त्या महात्म्यावर अन्यायच केला म्हणायचा.

परंतु या साऱ्या लोककथांचें अगदींच महत्त्व नाहीं असें तरी कसें म्हणायचें? याहि कथा बोलक्या आहेत. आमच्या समाजानें वर्षानुवर्षें त्या रचल्या. ध्यानीं ठेवल्या. मोठ्या आवडीनें एकानें दुसऱ्यास सांगितल्या. यांतून रोहिदासाचें दिव्य चरित्र आणि चारित्र्य अद्भुत स्वरूपांत कां होईना, पण समाजांत सदैव राहिलें. रोहिदास खेडोपाडीं पोहोंचला. घराघरांतून माहीत झाला. सानथोरांना परिचित वाटूं लागला. उत्तर भारतांत आणि इकडे आपल्या महाराष्ट्रांतहि. म्हणूनच लोकपुरुषाच्या अफाट कल्पनाशक्तीला आपण धन्यवाद द्यायला हवेत.

## रविदास आणि रोहिदास एकच

उत्तर भारतांत सर्वत्र प्रसिद्ध असलेले, आचार्य रामानंदांचें शिष्यत्व लाभलेले आणि कबीरदासांचे संतसांगाती असलेले हे संत रोहिदास कीं रविदास ? या प्रश्नाचें उत्तर सोपें आहे. रैदास, रविदास आणि रोहिदास हीं सारीं एकाच संत महात्म्याचीं नांवें आहेत.

रविदास अथवा रैदासाला महाराष्ट्रानें खास मराठी वळणाचें–रोहिदास चांभार– असें नांव देऊन टाकलें आहे आणि हें इतक्या सहजतेनें घडलें आहे कीं, रविदास आणि रोहिदास दोन नव्हेत, असें सांगतांच आश्चर्य वाटावें. परंतु ही सत्य गोष्ट आहे. संत रोहिदास हें रविदासाचेंच पर्याय-नाम आहे. त्याची हिंदी रचनाच उपलब्ध आहे. त्याचें हिंदी चरित्रहि सर्वश्रुत आहे. हेंच हिंदी चरित्र सर्व मराठी ग्रंथांतून आढळतें. रोहिदासाचें मराठी काव्य नाहीं. पण हा असा हिंदी आणि मराठी काव्याचा अलग विचार करावा का? रोहिदासाची हिंदी रचना आहे आणि मराठी नाहीं म्हणून आम्ही नाराज व्हावें का? कबीरदासानें सांगितलें आहे–

भाव अनूठो चाहिए, भाषा कैसीहू होय !

भाषा कोणतीहि असो, कशीहि असो, भाव उत्तम असावयास हवा. रोहिदासाच्या रचनेंत भक्तिभावाचें माधुर्य आहे.

रोहिदासाला आम्ही कबीर-तुलसीदासाप्रमाणेंच आमचा संत समजतों. कबीराच्या अक्खड व्यक्तिमत्त्वावर महाराष्ट्रानें विशेष प्रेम केलें. त्याच्या स्पष्टवक्तेपणाची आम्हांस विशेष जवळीक वाटली. कबीरदासाविषयीं मराठी संतांना कमालीचा स्नेहभाव. कित्येक मराठी संतांनीं त्याला आपला गुरु मानलें आहे. कबीराला प्रिय असणारा त्याचा मित्र रोहिदास मराठी जनांनाहि प्रिय आहे. रोहिदास महाराष्ट्राला आपला संत वाटतो. त्याच्या चरित्राची मोहिनी मराठी मनावर अनावर आहे.

खरें सांगायचें तर संतांचें थोर व्यक्तिमत्त्व बंधनाच्या पलिकडचें असतें. त्यांना प्रदेश, भाषा आणि जाति यांचीं कृत्रिम बंधनें बांधून ठेवूं शकत नाहींत. उच्च विचारसरणीनें आणि विपुल कर्तृत्वशक्तीनें नीच कुळावर मात करणारा रोहिदास हा आम्हांला सदैव आदरणीय वाटत राहिला आणि यापुढेंहि राहील. आमच्या संतांनीं, संतचरित्रकारांनीं आणि सत्प्रवृत्त जनांनीं पूर्वसूरींच्या नामावळ्या गातांना रविदासास किंवा रोहिदासास मोठ्या आदरभावानें नमन केलें आहे.

● ● ●

**टीप** : या प्रकरणांतील अवतरणें ‘ रविदासरामायण ’ ( संपादक राजाराम मिश्र, प्रकाशक लाला श्यामलाल हीरालाल, मथुरा) या ग्रंथांतील आहेत.

जडजीव उद्धराया आले भूवरि धरूनि अवतार ।
कंठमणी श्रीहरिचे हीन कुळीं रोहिदास चांभार ।।

# चरित्राची ऐतिहासिकता

## रोहिदासकालीन परिस्थिति

इसवी सनाच्या चौदाव्या आणि पंधराव्या शतकाचा इतिहास म्हणजे मध्ययुगाच्या दुर्दैवाची कहाणी आहे. हा साराच काळ भारताच्या दुर्दशेचा होता कीं काय कोण जाणे. विशेषेंकरून उत्तर भारताचें सारें जनजीवन या कालांत पतनोन्मुख बनलेलें होतें. आक्रमणांनीं देशाची संपन्नता अन् सुव्यवस्था नष्टभ्रष्ट झाली होती. तैमूरलंगाच्या स्वारीनें तर दिल्लीची उरली-सुरली शानच गळून पडली ( सन १३३८ ) आणि नंतर एकामागून एक येणारे शाह-बादशाह यांचा दिल्लीच्या तक्ताशीं लपंडाव सुरू झाला. राज-कारणाच्या त्या साऱ्या उलथापालथी राजधानीच्या गांवांतून चालू असल्या, तरी देशाच्या सर्व भागांतून एक प्रकारचें भीषण तुफान गर्जून उठे. लढाई आणि मारकाट हें या युगाचें वैशिष्टयच होतें. सन १३२५ पासून सन १५२६ पर्यंत दिल्लीस एकूण सोळा वेळां सुलतानांची अदलाबदल घडली. या साऱ्या काळांत समाजास स्थैर्य असें फार कमी काळ लाभलें. तें लाभलें नाहीं म्हटलें तरी चालेल.

आकाशांत कटलेल्या पतंगानें गोते खात, वारा नेईल त्या दिशेची वाट धरावी, तसा त्या काळच्या राजकारणाचा रंग होता. नीतीचा आणि राज-नीतीचा नांवापुरताहि संबंध नव्हता. समाजाचें दौर्बल्य ' मुकीं बिचारीं कुणी हाका ' अशा प्रकारचें होतें. या औदासीन्यांतून ' राजा कुणीहि असला, तरी आम्हांस काय त्याचें, ' अशी निराशेची भावना जनमानसांत निर्माण झालेली होती.

धर्मांच्या क्षेत्रांतहि शांति नांदत होती, असें नाहीं. आमच्या-आमच्यांतील मतभेद विकृतावस्थेंत परिणत झाले होते. उच्चवर्णीयांनीं आणि तथाकथित

पंडित-पुजाऱ्यांनीं देवाधर्माच्या नांवाआड बाह्यावडम्बराच्या मार्गें लागून धर्मनाश ओढवून घेतला होता. भेदाभेदांनीं ग्रासून गेलेला भारतीय समाज क्षीणातिक्षीण होत चालला होता. त्यांतच मुसलमानांच्या धर्मवेडेपणाची भर पडली. त्यांच्या शासनकाळांत यामुळेंच संघर्षाला तोंड लागलें आणि हिंदु-मुस्लिम संघर्ष हा आपल्या सामाजिक जीवनांत नवा विकार उद्‌भवला.

कबीरानें त्या काळाचें एकाच वाक्यांत मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. समाज किती भयानक अवस्थेप्रत पोहोचला होता, त्याची कल्पनाच करवत नाहीं.—

> को है लरिका बेचई लरिकी बेचै कोई ।
> साझा करै कबीर सिउ, हरि सँगि बनजि करेइ ।।

कोणी स्वतःचा पुत्र विकीत असे, तर कोणी स्वतःची कन्या विकून टाकावयास मागेंपुढें पहात नसे. शिव आणि हरि यांचें तरी पावित्र्य राहावें ! पण तेथेंहि त्यांची भागीदारी आणि सौदेबाजी चालते.

अशा प्रकारें मध्ययुगीन समाजाचें तारूं अनिश्चिततेच्या वातावरणांत भरकटत चाललें होतें. राजकारण दूषित होतें. समाजकारणास स्वतःचा असा रंग उरला नव्हता. धर्मकारण विभेदांनीं डागाळलें होतें आणि या साऱ्या दुःस्थितीच्या फेऱ्यांत पडलेला सामान्य माणूस दिशाभ्रष्ट होऊन निराशेच्या गडद अंधारांत स्वतःस कोंडून घेत होता.

अशा या आपत्तीच्या काळांत आचार्य रामानंदांचा आणि त्यांच्या संत-शिष्यांचा उदय झाला. या सर्व संतसज्जनांच्या मांदियाळीमध्यें चर्मकार ज्ञातींत जन्मलेल्या संत रोहिदासालाहि महनीय स्थान लाभलें होतें. या संताचें चरित्र-चारित्र्य लोकमानसावर प्रभाव गाजवून गेलें, हें खरें; परंतु त्याचें ऐतिहासिक स्वरूप निश्चित करण्यास पुरेशीं साधनें उपलब्ध नाहींत. केवळ जनश्रुतींच्या लहरींवर तरंगणारा त्याचा कीर्तिगंध आपण प्रारंभींच अनुभवला आहे. परंतु चिकित्सक जिज्ञासेची तेवढ्यानें तृप्ति कशी व्हावी? तो सुगंध ज्या फुलांतून दरवळत राहिला, त्याची पाकळीन् पाकळी आपल्याला पहायला मिळावी, असें चिकित्सकांना वाटतें; परंतु अमानित्वामुळें संतांचीं जीवन-पुष्पें अज्ञाताच्या पानांआडच दडून राहतात.

## धन्य ते मायतात

संत रोहिदासाच्या पारिवारिक जीवनाविषयीं सुनिश्चित स्वरूपाची माहिती उपलब्ध होत नाहीं. यासंबंधीं सर्वांत मोठी अडचण अशी आहे कीं, स्वतः या संतानें आपल्या काव्यांत स्वतःच्या जीवनचरित्राविषयीं मौनच स्वीकारलें आहे. पण यांतहि अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. बहुतेक सर्व संतांनीं असेंच स्वतःबद्दल मौन स्वीकारलें आहे. स्वतःचा स्वतःच परिचय करून द्यावयाचा म्हणजे आत्मगौरव होय, अशी भक्तिकालांतील संतांची प्रामाणिक भावना होती. पण यामुळें आपण या थोर महात्म्यांच्या जीवनचरित्रांना पारखे होऊन जातों. रोहिदासाच्या मातापित्यांच्या नांवाच्या बाबतींत आपल्याला पारंपरिक समजुतींवरच विश्वास ठेवावा लागतो.

रूढ समजुतीनुसार रोहिदासाच्या वडिलांचें नांव रघू आणि आईचें नांव करमा असें होतें. आईचें नांव क्वचित् घुरबनिया असेंहि सांगितलें जातें. घुरबनिया हें भ्रष्ट रूप असावें. रघुबनिया असें नांव असायला हवें. रैदासपुराणामध्यें हेंच नांव भगवती असें सांगितलें आहे. भविष्यपुराणांत वडिलांच्या नांवांत ' मानदास ' असा बदल आहे.

मानदासस्य तनयो रैदास इति विश्रुतः ।।

'भविष्यपुराण', चौथा खंड, १७. १८

( मानदासाचा पुत्र रैदास म्हणून प्रसिद्ध होता.)

गुजरातेंत जी रोहिदासाची कथा प्रचलित आहे, तींतूहि रोहिदासाच्या मातापित्यांचीं नांवें भगवती आणि मानदास ( माणदास ) अशीं सांगितलीं जातात. पण रविदास सांप्रदायिकांत मात्र रघू हें पित्याचें नांव आणि करमा हें मातेचें नांव समजलें जातें.

अशा अनेक समजुतींच्या आड कुठें तरी सत्य दडून राहिलें आहे. भविष्यपुराणकारांची कल्पना खरीहि असेल. गुजराती समाजानें तीच कल्पना खरी मानली. पण पारंपरिक श्रद्धाहि कमी महत्त्वाची नाहीं. म्हणून या संताच्या मातापित्यांच्या नांवाविषयीं मतभेद निर्माण झाला. पण एका बाबतींत मात्र सर्वांचें मतैक्य होईल कीं, रोहिदासास जन्म देऊन तीं मातापिता कृतार्थ झालीं.

भक्त बक्शीदासानें रोहिदासाच्या पूर्वजांची कांहीं माहिती दिली आहे. त्यानें रोहिदासाच्या वडिलांचें नांव रघूऐवजीं राहू किंवा राऊ असें दिलें आहे. त्यानें सांगितलेली वंशपरंपरा अशी दाखवितां येईल—

हरिनंद----चतरकौर ( पत्नी )

|

पुत्र

राहू अथवा राऊ---करमा ( पत्नी )

|

पुत्र

रैदास अथवा रविदास ( रोहिदास )

--'रैदास रामायण' ( बक्शीदास )

संत रोहिदासाचें खरें नांव काय होतें, यासंबंधीं फारसे मतभेद नाहींत. रविदास, रायदास, रैदास, रुईदास आणि रोहिदास अशा पांच नांवांनीं या संतास प्रसिद्धि लाभली. यांपैकीं पहिलें नांव 'रविदास' हेंच या संताचें खरें नांव होय. रायदास, रुईदास आणि रैदास हीं 'रविदास' या शब्दाचींच अपभ्रष्ट रूपें आहेत. क्वचित् रमादास असें नांव सांगण्यांत येतें. रोहिदास हें नांव हिंदी-भाषिक प्रदेशांत फारसें प्रचलित नाहीं. आपल्या महाराष्ट्रांतच 'संत रोहिदास' असें नांव रूढ झालेलें दिसतें.

रोहिदासाच्या आणि त्याच्याविषयींच्या काव्यांत रैदास हें नांव प्रयुक्त झालेलें आहे. 'भक्तमाल' रचणाऱ्या नाभादासजींनीं म्हटलें आहे--

वर्णाश्रम अभिमान तजि पदरज बन्दहि जासुकी ।
संदेहग्रंथिखंडननिपुन, बानी बिमल रैदासकी ।।

बर्णाश्रमधर्माचा दंभ सोडून देऊन ज्याच्या पदधूलीस वंदन करावें, अशा संतश्रेष्ठ रोहिदासाची विमल वाणी मनांतील संशयग्रंथीचें खंडन करण्यांत निपुण आहे. -- या ठिकाणीं नाभाजींनीं या संताचें नांव रैदास असें सांगितलें आहे. स्पष्टच आहे कीं, रैदास हा शब्द रविदास या मूळ शब्दाचें सोपें रूप होय.

मीराबाईच्या पदावलींत गुरु म्हणून संत रोहिदासाचा अनेकदां उल्लेख आला आहे.[1] यासंबंधीं विद्वानांचीं मतमतान्तरें आहेत. परंतु जेथें जेथें हा उल्लेख आला आहे, तेथें तेथें तो रैदास म्हणून आला आहे--

---

१. मीराबाईचा काल सन १४९८ ते १५४६ असा आ. परशुराम चतुर्वेदीजींनीं मानला आहे.

खोजत फिरों भेद वा घरको, कोई न करत बखानी ।
रैदास संत मिले मोहि सतगुर दीन्हा सुख सहदानी ।।

किंवा,–

मेरो मन लागो हरि सूँ, अब न रहूँगी अटकी ।
गुरु मिलिया रैदासजी, दीन्ही ग्यानकी गुटकी ।।[२]

प्रत्यक्ष रोहिदासाच्या काव्यांत येणारे नामोल्लेख सर्वाधिक प्रामाणिक मानायला हवेत. कवि स्वतःस रैदास, जन रैदास, रविदास, जन रविदास, रैदासा असें म्हणवितो. पण त्याच्या बहुतेक सर्व पदांच्या समाप्तिमुद्रांतून 'रैदास' असेंच नांव आलें आहे.[३]

– कहै 'रैदास' कृष्ण करुणामय, जै जै जगत-अधारा ।
– कह 'रैदास' थकित भयो जब, तबहिं परमनिधी पाई ।
– हम सरनागति राम-राइको, कहै रैदास चमारा ।
– कहै 'रैदास' रामजप रसना, माया कैसे संग रहै रे ।

या सर्व उल्लेखांवरून या संताचें मूळ नांव रविदास असें असून 'रैदास' हें त्या नांवाचें सुलभीकरणच समाजांत अधिक रूढ झालें, असा निष्कर्ष निघतो. तो स्वतःहि 'रैदास' हें सर्वसामान्य जनांस सोपें, सुटसुटीत वाटणारें नांवच आपल्या काव्यांतून प्रयुक्त करतो.

महाराष्ट्रानें मात्र रविदास अथवा रैदास या दोन्ही नांवांचा वापर न करतां रोहिदास म्हणून या संतास ध्यानीं ठेवलें. आतां हें नांव इतकें रूढ झालें आहे कीं, तेंच आम्हांस सुलभ वाटावें.

## मेरी जाति विख्यात चमार

संत रोहिदासानें चर्मकार समाजांत जन्म ग्रहण केला, ही गोष्ट वादातीत आहे. मराठींत जें त्याचें चरित्र प्रसिद्ध आहे, तें 'संत रोहिदास चांभार'

२. मीरांबाईकी पदावली : आ. परशुराम चतुर्वेदी. हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग.

३. संत रविदास और उनका काव्य : रामानंद शास्त्री, वीरेंद्र पांडेय. भा. र. सेवा संघ, ज्वालापुर. पृ. ६७.

याच नांवानें प्रसिद्धि पावलेलें आहे. आपल्या पदावलींत मोठ्या अभिमानानें तो आपल्या कुलाचा उच्चार करतो. आपण विख्यात चांभार कुळींत जन्म घेतला आणि आपल्या हृदयीं राम अन् गोविंद भरून राहिला आहे, असें संत रोहिदास मोकळेपणानें सांगतो –

ऐसी मेरी जाति विख्यात चमार ।
हृदय राम गोविंद गुन सार ।।

दैवानें ज्या घरीं जन्माला घातलें, त्या घराचा सार्थ अभिमान वाटायलाच हवा. आणि पेशा हलका असला म्हणून कां डरायचें ? समाजांत सर्व कार्यांचा उचित गौरव व्हावयास हवा. रोहिदासाच्या मनीं अशी भावना सदैव जागी होती.

संत ज्या व्यावसायिकांच्या वर्गांत अथवा जातींत जन्म घेतात, त्या वर्गाची परिभाषा स्वाभाविकपणेंच त्यांच्या वाणींत प्रकटते. जन्मापासून ज्या वातावरणाचे संस्कार घडतात, जो व्यवसाय करावा लागतो, जी जीवनसरणी अवलंबावी लागते, तिचा ठसा अनुभवाच्या व्यक्तीकरणांत अभावितपणें उमटतो. याचें प्रत्यंतर आपल्याला संतवाङ्मयांतून वारंवार घडतें. नरहरी सोनारासारखा संत देहांत वास करणाऱ्या आत्म्याचा विचार मांडतांना अगदीं सहजपणानें ‘ देह बागेसरी जाण । अंतरात्मा नाम सोनें ।। ’ अशी सोनारकीची भाषा वापरतो; तर सावता माळ्यासारखा माळीसमाजांतील संत ‘ कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।। ’ या शब्दांत परमेश्वराच्या व्यापकतेचा अनुभव प्रकट करतो. सेना न्हाव्यानेंहि अनेकांना विवेकदर्पण दाखवून त्यांच्या अहंकाराची शेंडी पिळली आहे. रोहिदासहि याला अपवाद नाहीं. त्यानें एका पदांत आपला गुरुबंधु संत कबीर यास उद्देशून आपल्या व्यवसायाच्या परिभाषेंत म्हटलें आहे–

ज्यांहा देखो वांहा चामही चाम ।
चामके मंदिर बोलत राम ।। १ ।।
चामकी गऊ चामका बचडा ।
चामही घुनें चामही ठाडा ।। २ ।।

चामका हाती चामका राजा ।
चामके उंटपर चामका बाजा ॥ ३ ॥
कहत रोहिदास सुनो कबीर भाई ।
चामबिना देह किनकी बनाई ॥ ४ ॥ [४]

आपल्या जातीस नीच म्हणतात, आपल्या कर्मासहि हीन समजतात. परंतु ईश्वराची कृपा झाल्यानें आपण हीनकुलीन राहिलों नाहीं– 'उच्च'-कुलीन झालों आहों, असा आत्मविश्वास या संताच्या मनीं वसत होता. एका पदांत त्यानें ही भावना व्यक्त केली आहे–

जाति भी ओछी करम भी ओछा,
ओछा कसब हमार ।
नीचसे प्रभु ऊँच कियो है,
कह रैदास चमार ॥

आमची जातिहि हीन आहे. आमचा पेशा सुद्धां कमी दर्जाचा आणि आमचें सारें कार्यच हीन दर्जाचें. परंतु अशा या नीचतेवर प्रभुकृपेनें आम्ही मात करूं शकलों, असें रोहिदास चांभार सांगतो.

हा आत्मविश्वास अपूर्व आहे. या जिवंत आत्मसन्मानानेंच चांभारा-घरचा रोहिदास संत रोहिदास झाला. जन्मानें प्राप्त झालेली जात आणि बापजाद्यांनीं दिलेला व्यवसाय कोणताहि असला, तरी मानवाची प्रतिष्ठा शेवटीं त्याच्या प्रत्यक्ष कर्तृत्वानेंच सिद्ध व्हावी, ही कर्णाच्या काळापासूनची कहाणी आहे.

दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।

जन्म कुठल्या कुळांत घ्यावा, हें दैवाच्या हातीं असलें, तरी पौरुष माझ्या हातीं आहे, असा कर्णाचा आत्मविश्वास. या उचित आत्मविश्वासामुळेंच 'जाके कुटुंबके ढेढ सब ढोर ढोवंत' – ज्याच्या परिवारांतील सारे धेड मेलेल्या गुरांचीं कातडीं कमावीत असत, अशा परिवारांतील रोहिदास संतत्व पावला. भक्तमालकारांनीं यासाठींच रोहिदासाचा गौरव गायिला आहे.

४. कबीराचा गाथा : प्रकाशक वि. ना. गोडबोले, पंढरपूर. पृ. १२४.

भगवत कृपा प्रसाद परम गति इहि तन पाई।
राजसिंहासन बैठि ज्ञाति परतीति दिखाई ॥

( त्याच्या कृतित्वामुळें ) त्यानें याचि देहीं भगवत्कृपाप्रसादानें परम गति प्राप्त केली. आणि त्यामुळें त्याची ज्ञाति राजसिंहासनाधिष्ठित झाली. त्यानें अशी प्रतीति प्रकट केली.

अशा प्रकारें 'भक्तमाल', पारंपरिक श्रद्धा आणि प्रत्यक्ष रोहिदासाची वाणी यांत जरी त्याची जाति चांभार असल्याची खात्री होते, तरीहि कांहीं ग्रंथांतून एक वेगळी कथा सांगण्यांत आली आहे. 'रैदासपरची' या ग्रंथांत अनंतदासानें म्हटलें आहे कीं, रोहिदास पूर्वजन्मीं ब्राह्मण होता. 'रैदासरामायण' या ग्रंथाच्या आरंभीहि अशाच प्रकारची कथा वर्णन करण्यांत आली आहे. नाभादासाच्या 'भक्तमाल'ची टीका रचणारे प्रियादास यांनींहि रोहिदासाच्या पूर्वजन्मींच्या ब्राह्मणत्वाचा उल्लेख केला आहे. अशा प्रकारच्या उल्लेखांत 'भविष्यपुराणां'तील नोंदीचीहि भर पडली आहे.

या साऱ्या उल्लेखांत रोहिदासाच्या पूर्वजन्माचाच काय तो अंदाज व्यक्त केलेला आहे. पूर्वजन्म मानणाऱ्यांनीं यास खरें मानावें अथवा मानूं नये; पण एक मात्र स्पष्ट आहे कीं, हे सारे अंदाज रोहिदासास संतत्व प्राप्त झाल्यानंतरचे आहेत. समाजांत ज्या चरित्राला विशेष मान्यता प्राप्त झाली, त्याचा कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत आपल्या जातीजमातीशीं संबंध जोडायचा, ही वृत्ति स्वाभाविकच म्हणायला हवी. रोहिदासाच्या बाबतींत नेमकें हेंच घडलेलें आहे. सर्वांना आपलें वाटावें, असें हें व्यक्तित्व आहे.

## रोहिदासाचें जन्मस्थान कोणतें ?

संत रोहिदासाच्या जन्मस्थानाविषयीं निश्चित निर्णय झालेला नाहीं. कांहींच्या मतें याचा जन्म राजस्थानांत झाला, तर कांहीं जण त्यानें गुजरातेंत अवतार ग्रहण केला, असें मानतात. रोहिदासाविषयीं श्रद्धाभाव असणारे कांहीं पंजाबी भक्त त्याचा जन्म पंजाबांत झाला असल्याचेंहि मानतात. मध्यप्रदेशांतील धार संस्थानांत असलेल्या मांडवगड या गांवीं त्याचा जन्म झाला आणि सत्संगासाठीं तो काशीस गेला, अशीहि एक समजूत त्या भागांत रूढ आहे. चितोडच्या कुंभश्यामाच्या देवळाशेजारीं रविदास कुंड आणि

रविदास कुटी आहे. हें स्थानहि त्याचें जन्मस्थान म्हणून दाखविलें जातें. या सर्व समजुतींमागें श्रद्धावंतांच्या स्नेहाचाच भाग अधिक आहे. संत रोहिदास आपल्या भागांतील आहे, असें भाविकांच्या श्रद्धायुक्त अंतःकरणांना वाटतें. वास्तविक वरीलपैकीं कोणत्याहि स्थानाशीं संबंधित 'अंतःसाक्ष' म्हणजे या संताच्या काव्यांतील पुरावा उपलब्ध नाहीं. संत स्वतःच्या जीवनाविषयीं लिहीतच नाहींत म्हणून या बाबतींत अंतरंगसाक्षीचा मुद्दा सोडून जरी दिला, तरी दंतकथांतूनहि वरील सर्व ठिकाणांचा फारसा उल्लेख सांपडत नाहीं. संतासंबंधींच्या बहुतेक सर्व दंतकथांतून वाराणसी अथवा काशीचा उल्लेख येतो. त्याचा जीवनकाल प्रामुख्यानें काशींतच घडला, असें मानावयास हवें. काशीच्या गोपालमंदिराजवळ रोहिदासाचा आश्रम होता, असें म्हणतात. या मंदिराच्या तळघरास 'तुलसी गुंफा' म्हणतात. तेथें रोहिदासाच्या स्पर्शानें पवित्र झालेल्या वस्तु आहेत, अशीहि माहिती मिळते.

आपण काशीच्या आसपास रहाणारे आहोंत आणि आपलें घराणेंच काशीचें आहे, अशा प्रकारचा एक उल्लेख 'गुरुग्रंथसाहेबा'मधील रोहिदासाच्या पदांतून येतो --

मेरी जाति कुटवाँढला ।
ढोर ढोवंत नितहि ।
बनारसो आसपासा ।।

## जन्मस्थान 'मडुआडीह'

असा काशी नगरीचा उल्लेख जरी रोहिदासाच्या काव्यांत आलेला असला, तरी केवळ त्यावरून त्याचें जन्मस्थान काशीच असावें, असा निष्कर्ष काढणें योग्य होणार नाहीं. परंतु बऱ्याचशा दंतकथांतून काशी नगरीचाच सतत उल्लेख येतो, म्हणून याच नगरींत तो अधिकाधिक काल राहिला, एवढें मानणें योग्य होईल.

काशीपासून जवळच दोन मैलांवर मंडूर नांवाचें एक खेडें आहे. काशी कॅम्पपासून पश्चिमेकडे ग्रँट ट्रंक रोडनें जातांना हें गांव लागतें. या गांवाचें पूर्व-नांव 'मडुआ डीह' असें होतें. प्राचीन काळीं येथें चर्मकारांची फार मोठी वस्ती होती. आज ही वस्ती जवळच्याच लहरतारा या गांवीं आहे. मंडूर गांवींच रोहिदासाचे पूर्वज राहत असत आणि याच गांवांत रोहिदासाचा जन्म

झाला,अशी गांवकऱ्यांची आणि पंचक्रोशींतील लोकांची दृढ श्रद्धा आहे. कांहीं प्रचलित दंतकथांतूनहि या समजुतीस बळकटी येते. 'काशीमाहात्म्य' नामक ग्रंथांत शंकराचार्यांनीं एका शूद्राशीं शास्त्रार्थ केला, अशी नोंद आहे. हा शास्त्रार्थ मडुआडीह् येथेंच घडला हेंहि निश्चित आहे. यावरून श्री. रामानंद शास्त्री यांनीं रोहिदासाचें जन्मस्थान मंडूर असावें, असें मानलें आहे.

'भविष्यपुराणा'मध्येंहि या शास्त्रार्थाचे उल्लेख आहेत. मंडूर ग्रामीं या संताचा जन्म झाला, या गोष्टीस रैदासरामायणांतहि पुष्टि मिळते –

काशी ढिग मांडुर स्थाना, शूद्र वरण करत गुजराणा ।
मांडुर नगर लीन अवतारा, रविदास शुभ नाम हमारा ।।

काशीमध्येंच मांडुर हें स्थान आहे. येथें शूद्रवर्णीय लोक चरितार्थ चालवितात. याच मांडुर नगरींत शुभ नांव असलेल्या रोहिदासानें जन्म ग्रहण केला.

मंडूरच्या लोकांची समजूत खरी मानायला खूपच जागा आहे. या गांवीं असलेला एक मोठा तलाव आपल्याला संत रोहिदासाची स्मृति सांगतो. येथील मंदिर आतां काळाच्या उदरांत गडप झालें आहे. परंतु जनश्रुति, प्राप्त उल्लेखांची एकवाक्यता आणि काशीचें सान्निध्य या गोष्टींचा विचार करतां मंडूर हेंच रोहिदासाचें जन्मगांव मानावयास प्रत्यवाय दिसत नाहीं.

## रोहिदासाचें शिक्षण

संत रोहिदासाची वाणी वाचल्यानंतर तो अशिक्षित होता, असें म्हणतां येणार नाहीं. पण त्याचें शिक्षण झालेलें होतें, असें म्हणणें तर इतिहासाला सोडून होईल. आजच्यासारखी शिक्षणाची सोय त्या कालीं उपलब्ध नव्हती. शिवाय उच्चनीचतेच्या चुकीच्या कल्पना समाजपुरुषानें खऱ्या मानलेल्या होत्या. शिक्षण ही सुसंस्कारांत वाढणाऱ्या उच्चकुलीन लोकांची मिरासदारी बनलेली होती. परंतु तरीहि आपणांस असें दिसून येतें कीं, नाना जाती-जमातींत दिव्य संतचरित्रें उदय पावलीं. त्यांच्या काव्यानें समाजाला ज्ञानाचा पवित्र प्रकाश लाभला. त्या दिव्य वाणीनें आजहि आपण पावन व्हावें, अशी अलौकिक जादू तिच्यांत भरलेली आहे. मग असा प्रश्न येतो कीं, अज्ञ समजल्या जाणाऱ्या जनांनीं हे ज्ञानाचे कुंभ भरून आणले कुठून ?

संतांचें शिक्षण हें त्यांच्या हृदयाच्या शाळेंत झालें. स्वतःच्या जीवनाविषयीं कोणत्याहि प्रकारें आसक्ति धरावयाची नाहीं. सारा समाज आपला म्हणायचा. सारें जग हें ईश्वरत्वाच्या दिव्य स्पर्शानें पवित्र झालेलें आहे, असा विशुद्ध विश्वास मनीं वागवायचा—हे सारे या अलौकिक शाळेचे नियम होते.

रोहिदास अशा भगवद्भक्तीच्या शाळेंत दाखल झालेला होता. त्याचे अनेक संतसांगाती त्याच्यासारख्याच असामान्य देवनिष्ठेनें अन् समाजप्रीतीनें धुंद झालेले होते. या संतवृत्तीस स्वाध्यायाची तपस्या लाभलेली होती. स्वतः पूर्वसूरींची वाणी वाचावी, संतश्रेष्ठांच्या चरित्रकथांचें श्रवण करावें. त्यांतून चांगल्याचा स्वीकार करावा. जें जें चांगलें तें सदैव उच्चारावें. मनीं मुखीं घोळवावें. आपल्या अनुभवांशीं त्याची सांगड घालावी. अशी ही स्वाध्यायाची साधना होती. रोहिदास अशा श्रेष्ठ शाळेचा विद्यार्थी होता. येथें स्वतःच स्वतःस उन्नत करावें, असा ध्येयमंत्र होता. रोहिदास अशा स्वसंस्कारांतून थोर झाला. सुंदर संस्कारांनीं स्वतःस समृद्ध बनवून मोठा झाला. सत्संगाच्या परिसस्पर्शानें पुनीत झाला. प्रत्यक्ष अनुभवाच्या आलोकानें त्याचा मार्ग उजळून निघाला आणि ईश्वरनिष्ठेच्या अद्भुत शक्तीनें त्याचा हा सारा स्वाध्याय सुफलित झाला. अज्ञ रोहिदास आत्मज्ञानानें धन्य झाला.

## परमार्थमय प्रपंच

रोहिदास विवाहित होता. त्याच्याविषयींच्या जनश्रुतींतूनहि ही गोष्ट स्पष्ट होते. त्याच्या पत्नीचें नांव लोना असें होतें, असा 'रैदासरामायणां'त उल्लेख आहे. उत्तर प्रदेशांतील चर्मकार समाजाच्या स्त्रियांमध्यें लोनाविषयीं अतीव आदरभाव दिसून येतो. अनेक ठिकाणीं लोनाची देवी म्हणून पूजा सुद्धां होते. अडीअडचणींच्या प्रसंगीं स्त्रिया लोना देवीची करुणा भाकतात आणि ती कृपावंत होऊन संकटांतून मुक्त करते, अशी स्त्रियांची निष्ठा दिसून येते. लोनादेवीस माहात्म्य प्राप्त होण्याचें एक कारण ती संत रोहिदासांची पत्नी असण्यांत आहे.

संत रोहिदासानें जरी प्रपंच केला, तरी त्यांना मुलेंबाळें नव्हतीं, अशी समजूत आहे. सर्व प्रचलित कथांतूनहि हा संत प्रपंचांत राहूनहि अलिप्त असल्याचेंच दिसून येतें.

रोहिदासाच्या काव्याचें वाचन केल्यानंतर त्याची विरक्ति स्पष्ट होऊं शकते. प्रपंचांत राहूनहि सदैव परमार्थनिष्ठ असावें, असा त्याचा विचार आहे. या उक्तीचा प्रत्यय स्वजीवनांतील वैराग्यानें त्यानें आणून दिला. त्याची धर्मपत्नीहि धर्मप्रवण झाली असावी. तिला समाजांत त्यामुळेंच देवीत्व लाभलें.

## केल्यानें देशाटन

संत रोहिदासाच्या अनुयायांची संख्या फार मोठी आहे. भारतांतील अनेक प्रांतांत त्याला मान्यता प्राप्त झाली. महाराष्ट्रानें तर आपलाच संत म्हणून त्याची भाव-पूजा बांधली. राजस्थानांतील जनताहि या संताविषयीं अत्यंत श्रद्धा बाळगून आहे. उत्तरेंत हिंदी प्रदेशांत आणि पंजाबांत तर प्रसिद्धि आहेच, परंतु दक्षिणेंत मद्रासच्या तिरुपति तीर्थस्थानीं बालाजीच्या डोंगराखालीं वैकुंठकील या ठिकाणीं संत रोहिदासाचें स्मृति-स्थळ दाखविलें जातें.[५] राजस्थानांतील मांडवगड येथें आणि चितोडच्या कुंभश्यामाच्या मंदिरांत 'रविदासकी छतरी' या नांवानें या संताचें स्मृतिस्थान विख्यात आहे. राजस्थानांत आजहि फार मोठ्या प्रमाणांत प्रचलित असलेल्या दादू पंथामध्यें रोहिदासाच्या काव्यास मोठी प्रतिष्ठा आहे. ... या अशा अनेक गोष्टींतून रोहिदासाच्या प्रभावी व्यक्तित्वाची साक्ष पटते. आपल्या जीवनकालांत संत रोहिदासानें खूप प्रवास केला असला पाहिजे. इतक्या दूरवरच्या प्रदेशांत जी त्याची प्रसिद्धि आणि स्मृतिस्थानें सुद्धां आहेत, त्यावरून त्याचें देशाटन स्पष्ट होतें. राजस्थान आणि पंजाबांत तर त्यानें प्रवास केला असलाच पाहिजे. अन्य प्रांतांत जरी रोहिदास स्वतः गेला नसला, तरी त्याचे शिष्य फार पूर्वीपासून दूरवरच्या प्रदेशांत जाऊन स्थायिक झाले असतील. म्हणूनच सर्वत्र त्याच्याविषयींच्या अनेक कथा लोकपुरुषानें निर्माण केल्या.

## रोहिदासाचा काल: मतें आणि मतभेद

रोहिदासाच्या कालाविषयीं कोणत्याहि प्रकारचा निश्चित निर्णय करतां येऊं शकलेला नाहीं. याचें एक प्रमुख कारण असें कीं, त्याच्या काव्यांत कालविषयक स्पष्ट उल्लेख मुळींच प्राप्त होत नाहींत. परंतु समकालीन

५. 'भगवान रविदासकी सत्यकथा' : रामचरन कुरील.

संतसांगातींच्या काव्यांतून रोहिदासविषयक जे उल्लेख आलेले आहेत, त्यांवरून अनुमानतः त्याचा काळ आपल्याला स्थूलपणें कळूं शकतो.

संत कबीर, संत मीराबाई, संत धना, संत पीपा आणि दिल्लीचा सुलतान सिकंदर लोदी या व्यक्तींचा रोहिदासाच्या काल-निर्णयाशीं संबंध पोहोचतो. रोहिदासविषयक दंतकथांतून या व्यक्तींचा वेळोवेळीं निर्देश आलेला आहे. या सर्व इतिहास घडविणाऱ्या व्यक्तिहि इतिहासानें नीट ध्यानीं ठेवलेल्या नाहींत. त्यांच्याहि काळाबद्दल पूर्ण निश्चिति नाहीं. स्वतःकडे अतीव नम्रतेची भूमिका घेऊन आपलें चरित्र प्रकट न करतां समाजाची सदैव चिंता वाहणारी साधु-सज्जनांची जाति इतिहासापुढें प्रश्नच निर्माण करून ठेवते. समकालीनहि त्या पुण्यात्म्यांचें महत्त्व पुरेसें जाणत नाहींत, असें म्हणावें लागतें. कारण त्यांच्या हातूनहि या महात्म्यांचें चरित्र नीट जतन करून ठेवलें जात नाहीं.

संत-महात्म्यांचीं दिव्य चरित्रें गाऊन समाजांत तीं सदैव गाजवीत ठेवणारा संत नाभादास धन्य होय. त्यानें वि. सं. १६८० (इ. स. १६२३) मध्यें रचलेल्या ' भक्तमाल 'मध्यें रोहिदासाविषयीं सांगितलेली माहिती अशी आहे --

सदाचार श्रुति शास्त्र बचन अविरुद्ध उचाऱ्यो ।
नीर खीर बिबरन परम हंसनि उर धाऱ्यो ।।
भगवत कृपा प्रसाद परम गति इहि तन पाई ।
राजसिंहासन बैठि ज्ञाति परतीति दिखाई ।।
वर्णाश्रम अभिमान तजि पदरज बंदहि जासुकी ।
संदेह ग्रंथि खंडन निपुन, बानि विमल रैदासकी ।।

अर्थात् रोहिदासानें जें जें सांगितलें, तें तें सदाचार, श्रुति आणि शास्त्रप्रणीत वचनांशीं सुसंवादी होतें. नीरक्षीरविवेक जसा हंसापाशीं असतो, तसा सत्यासत्यतेचा निर्णय करण्याचा श्रेष्ठ गुण त्याच्यापाशीं होता. भगवंताच्या कृपाप्रसादानें त्याला याचि देहीं मुक्ति प्राप्त झाली. ईश्वरत्वाची प्रचीति दाखविणाऱ्या थोर संतानें राजसिंहासनीं प्रतिष्ठित होऊन दाखवून आपण उच्चकुलीन असल्याचें सिद्ध केलें होतें. वर्णाश्रमादींचे भेदभाव

विसरून लोक त्याची चरणधूलि घेऊं लागले. रोहिदासाची पवित्र वाणी संदेहरूपी ग्रंथीचें छेदन करणारी आहे.

पण या श्रेष्ठ जीवनाचा काल कोणता ? संत नाभाजींनीं यासंबंधीं निश्चित कांहींच म्हटलेलें नाहीं. कदाचित् त्याहि कालीं या संताच्या जीवन-चरित्राविषयीं मतमतान्तरें प्रचलित असतील. शिष्यगण त्याच्या जन्मस्थाना-संबंधीं, निर्याणस्थानासंबंधीं आपापले आग्रह सांगत असतील. आणि खरें सांगायचें तर संत नाभाजींनींहि आपल्या संतपूजनांत तिथिवारांना अधिक महत्त्व दिलेलें नाहीं. त्यांनीं केवळ कालावर मात करणाऱ्या महात्म्यांच्या दिव्यत्वाची पूजा बांधली आहे. तरीहि 'भक्तमाल' मधील खालील उल्लेखाचें कालनिर्णयाच्या दृष्टीनें महत्त्व आहे --

श्रीरामानंद रघुनाथ ज्यों दुतिय सेतु जगतरन कियो ।
अनंतानंद, कबीर, सुखा सुरसुरी, पद्मावति, नरहरि ।।
पीपा, भवानंद, रैदास, धना, सेन सुरसुरकी धरहरि ।।

अर्थात् आचार्य रामानंदांनीं आपल्या कर्तृत्वानें श्रीरघुनाथाप्रमाणें जणूं दुसरा सेतु निर्माण करून जगतीतलाचें रक्षण केलें. अनंतानंद, कबीर, सुखानंद, सुरसुरानंद, पद्मावती, नरहर्यानंद, इत्यादि बारा जण आचार्य रामानंदांचे प्रमुख शिष्य आहेत.

'भक्तमाल' हा ग्रंथ रामानंद आणि त्यांचा संप्रदाय यांची माहिती देणाऱ्या साधनांत सर्वाधिक महत्त्वाचा आहे. वरील उल्लेखांत रामानंदांच्या बारा प्रमुख शिष्यांपैकीं एक शिष्य रोहिदास आहे, हें पाहिल्यानंतर आपण आचार्य रामानंदांचा काळ पाहूं या.

मध्ययुगाच्या धकाधकीच्या परिस्थितींत आचार्य रामानंदांचें व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी ठरलें. अनेक संतसज्जनांना त्यांनीं ज्ञानाचा प्रकाश दाखविला, परंतु त्यांच्या कालाविषयींहि निश्चिति होऊं शकत नाहीं. त्यांचें अधिकांश जीवन यात्रेंत गेल्यानें चरित्रनिर्णयाचीं निश्चित स्वरूपाचीं साधनें उपलब्ध नाहींत. 'अगस्त्यसंहिता' हा एकच ग्रंथ त्यांच्या जीवनवृत्तावर थोडाफार प्रकाश टाकूं शकतो. त्या ग्रंथानुसार रामानंदांचा काळ विक्रम संवत् १३५६ (इ. स. १२९९) ते वि. सं. १४६७ (इ. स. १४१०) असा मानला

जातो.[६] यावरून या काळांतच केव्हां तरी संत रोहिदास अवतीर्ण झाला, असा निष्कर्ष निघूं शकतो.

रामानंदांचा एक शिष्य धना जाट होता, यासंबंधीं विद्वानांचें एकमत होतें. धनाचा जन्मकाळहि निश्चित करण्यांत आला आहे ( सन् १४१५ ). धना जाटानें आपल्या काव्यांत रोहिदासाचा सादर उल्लेख केलेला आहे : ' रविदास ढुंवता ढोरनी तिनी तिआगी माइया । परगटु होआ साध संगि हरिदरसनु पाइआ ॥ '[७] म्हणून त्याच्या कालांत म्हणजे पंधराव्या शतकांत किंवा त्यापूर्वीं रोहिदास झाला, असें अनुमान निघतें.

दिल्लीचा सुलतान म्हणून प्रसिद्ध असलेला आणि ज्याचा रोहिदासाविषयींच्या लोककथांतून उल्लेख येतो, त्या सिकंदर लोदीचा काल सन् १४८८ ते १५१२ असा आहे.[८] या काळांतहि रोहिदास होता, असें गृहीत धरलें, तर त्याची आयुर्मर्यादा सुमारें दीडशें वर्षें मानावी लागते.

संत पीपाचा जन्मकाल इ. स. १४१५ च्या सुमारास मानला जातो.[९] म्हणजे तोहि पंधराव्या शतकांतील संत आहे. रोहिदास आणि पीपा यांचे उल्लेख प्रचलित संतचरित्रांतून एकत्र स्वरूपांत मिळतात. यावरून रोहिदास पंधराव्या शतकांतील आहे, हेंच अनुमान करतां येतें.

संत कबीरदासांच्या कालाविषयीं खूपच मतभेद आहेत. परंतु आचार्य परशुराम चतुर्वेदी यांनीं सिद्ध केलेला काल इ. स. १३६८ ते इ. स. १४४८ असा आहे.[१०] या कालास अधिकांश विद्वानांची मान्यता लाभली आहे. कबीर रोहिदासाचा स्नेहादरपूर्वक उल्लेख करतात—

६. रामानंद संप्रदाय तथा हिंदी साहित्यपर उसका प्रभाव : डॉ. बदरीनारायण श्रीवास्तव, हिंदी परिषद, प्रयाग विश्वविद्यालय, प्रथम संस्करण १९५७. पृ. ३२.

७. श्रीगुरुग्रंथसाहेब, आसा. २. पृ. ४८७–४८८.

८. रामानंद संप्रदाय : डॉ. श्रीवास्तव. पृ. ७१.

९. रामानंद संप्रदाय, पृ. १७१.

१०. उत्तरी भारतकी संतपरंपरा : आ. परशुराम चतुर्वेदी. भारती भंडार, प्रयाग, प्रथम संस्करण सं. २००८ पृ. १६९.

संतनमें रविदास संत है, सुपच ऋषी सो मानिया ।
हिंदू तुरक दुई दीन बने हैं, कछू नहीं पहिचानिया ।

—— हा उल्लेख जर प्रामाणिक असेल, तर रोहिदासाला कबीरांचा पूर्वकालीन संत मानावयास हवें; किंवा निदान पक्षीं तो कबीरांहून वयानें वडील होता, असा तर्क करतां येतो. कबीर आणि रोहिदास यांच्या संवादासंबंधींच्या अनेक कथा प्रचारांत आहेत. सेना न्हाव्याच्या नांवावर असा एक संवादपर ग्रंथहि रचलेला आहे. यावरूनहि कबीर-रोहिदास यांच्या समकालीनत्वाची शक्यता स्पष्ट होऊं शकते. रोहिदासानें केलेले कबीरविषयक उल्लेखहि ध्यानांत घेण्यासारखे आहेत——

जाकै बाप वैसी करी पूत ऐसी सरी ।
तिहुरे लोंक परसिद्ध कबीरा ।।

आणि——

निरगुनको गुन देखौं आई ।
देही सहित कबीर सिधाई ।।

या उल्लेखांतील भाव ध्यानीं घेतां रोहिदास कबीरापेक्षां कांहींसा वडील असावा, असेंच जाणवतें. गुरुग्रंथसाहेबांतील एका पदामध्यें रोहिदासानें संत नामदेव, कबीर, त्रिलोचन, सदन कसाई, सेना न्हावी यांना मोक्ष प्राप्त झाला, असा उल्लेख केला आहे ——

नामदेव, कबीर, त्रिलोचन, सधना, सैन तरै ।।
कह रविदास, सुनहु रे संतहु ! हरि जिउ ते सबहि सरै ।।

यावरून संत रोहिदास या संतांच्या निर्याणानंतर निजधामाला गेला, असा बोध होतो.

अग्रदासाच्या परंपरेंत झालेल्या अनंतदास या संतानें संतांच्या जीवन-चरित्राचा परिचय देणारा ‘परिचई’ नामक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत कबीर, पीपा, धना, आदि संतांसमवेत रोहिदासाचाहि परिचय आहे. या ग्रंथाचा रचनाकाल सन १५८९ असा आहे. यावरूनहि रोहिदास या सना-पूर्वी कित्येक वर्षें होऊन गेल्याचें स्पष्ट होतें.

डॉ. रामकुमार वर्मा यांना उपलब्ध असलेल्या दुसऱ्या एका ' परचई ' ग्रंथांत रोहिदासाचें चरित्र आहे. या ग्रंथाचा काळ सन १६०० आहे.[११]

मीराबाईचा काळ सन् १४९८ ते १५४६ असा मानला जातो. निश्चित पुरावा उपलब्ध नाहीं आणि काव्य-साम्य नाहीं म्हणून–रोहिदास आणि मीरा यांचा गुरु-शिष्य-संबंध अनेकांना अमान्य आहे. मीराबाई आणि रोहिदास यांच्या काळांत पर्याप्त अंतर आहे. परंतु राजस्थानांतील चितोड-च्याच झाली राणीनें रोहिदासाचें शिष्यत्व स्वीकारलें असावें, असा विद्वानांचा तर्क आहे. झाली राणी ही महाराणा सांगाची धर्मपत्नी. सांगाचा काळ इ. स. १४८२ ते १५२७ असा आहे. मीरेऐवजीं झाली राणीनें रोहिदासाचें शिष्यत्व पत्करलें असावें, असें विद्वानांचें मत आहे. त्यावरून रोहिदासाचा काळ सोळाव्या शतकापूर्वीचा निश्चित होतो. या सर्व गोष्टींचा विचार करून प्रा. तारकनाथ अग्रवाल यांनीं रोहिदासाचा मृत्यु सन १५१९ ठरविला आहे.

अयोध्येच्या रविदासी सांप्रदायिकांची अशी श्रद्धा आहे कीं, रोहिदासाचा जन्म संवत् १४७१ (इ. स. १४१४) मध्यें झाला[१२]. निर्याणाविषयीं सांप्रदायिकांत खूप मतभेद आहेत.

' भगवान रविदास की सत्यकथा ' या ग्रंथांत संत रोहिदासाच्या मृत्यूचा काल वि. संवत् १५९७ असा दिलेला आहे. प्रा. तारकानाथ अग्रवाल यांनीं हा काल वि. संवत् १५७६ मानला आहे. श्री. रामानंद शास्त्री यांच्या मतें हा काळ वि. सं. १५७७ ते वि. सं. १५९५ च्या दरम्यान आहे.[१३] या सर्व अंदाजांमागें निश्चित स्वरूपाची कोणतीहि कारणमीमांसा दिसून येत नाहीं.

रविदासी सांप्रदायिकांचें मतहि या बाबतींत विचारांत घ्यायला हवें. त्यांचा असा विश्वास आहे कीं, चैत्र वद्य चतुर्दशीस महात्मा रोहिदास

११. हिंदी साहित्यका आलोचनात्मक इतिहास : डॉ. रामकुमार वर्मा. चतुर्थ आवृत्ति, १९५८. पृ. २२९.

१२. संत रविदास और उनका काव्य, पृ. ८३.

१३. संत रविदास और उनका काव्य, पृ. ८५.

. . . ३

स्वर्गस्थ झाला. प्रतिवर्षी चैत्र वद्य चतुर्दशीस निर्याणतिथि मानणाऱ्या सांप्रदायिकांच्या कल्पनेस परंपरेचा आधार आहे.

या सर्व चर्चेवरून असें निष्पन्न होतें कीं, निश्चित स्वरूपाच्या अंत:साक्षींच्या म्हणजे काव्यांतर्गत पुराव्यांच्या अभावामुळें रोहिदासाच्या जीवनकालाचा निर्णय करणें कठीण होऊन बसलें आहे. त्याचें व्यक्तित्व इतकें प्रसिद्धि पावलें कीं, अनेक साधुसंतांशीं आणि तत्कालीन प्रसिद्ध व्यक्ति व स्थानें यांच्याशीं त्याचा संबंध सांगितला गेला. भाविकांनीं विणलेल्या लोककथांच्या जाळ्यांत या संताचें जीवन असें कांहीं गुरफटून गेलें आहे कीं, सत्यस्थितीचा निर्णयच अशक्य होऊन बसावा.

परंतु कांहीं सर्वमान्य दंतकथांच्या आधारें आपण यासंबंधीं निर्णय घेऊं या. संत रोहिदास हा संत कबीर, धना जाट, पीपा, आदि निर्गुणी संतांच्या समकालीन होता. त्याला आचार्य रामानंदांकडून उपदेश लाभलेला होता आणि रामानंदांच्या प्रभावकालांत म्हणजे इ. स. १३०० ते १५०० या काळांत केव्हां तरी तो होऊन गेला.

श्री. वियोगी हरि यांनीं संपादित केलेल्या 'संतसुधासार' या सुंदर ग्रंथांत रोहिदासाच्या वाणीचा समावेश आहे. रोहिदासाचा परिचय त्यांनीं खालीलप्रमाणें दिला आहे—

" जन्मसंवत् – कबीरके समसामयिक
जन्मस्थान – काशी
जाति – चमार
पिता – रग्घू
माता – घुरबिनिया
गुरु – स्वामी रामानंद
आश्रम – गृहस्थ

इतिवृत्त केवल इतना ही ज्ञात होता है, कि रैदासजी जातिके चमार थे और काशीके रहनेवाले !"[१४] वास्तविक संत रोहिदासाविषयीं इतकीच

१४. संत-सुधा-सार : संपादक वियोगी हरि. सस्ता साहित्य मण्डल, दिल्ली. प्रथम संस्करण, १९५३. पृ. १७७.

माहिती निश्चित स्वरूपांत उपलब्ध आहे. त्याचा जन्मसंवत् किंवा मृत्यु-संवत् केवल कल्पनेनें ठरविण्यापेक्षां त्याला कबीरकालीन संत असें समजणेंच उचित होय.

## महानिर्याण

संत रोहिदासाचें जन्मस्थान, निवासस्थान यांचा जसा निश्चित निर्णय करणें अवघड आहे, त्याचप्रमाणें त्याच्या निर्याणस्थानासंबंधींहि नक्की कांहीं सांगणें कठिण आहे.

रविदासी पंथाच्या अनुयायांमध्यें वेगवेगळ्या समजुती प्रचलित आहेत. कोणी चितोड हेंच त्याचें निर्याणाचें गांव मानतात, कांहीं जण चितोडच्या कुंभश्यामाच्या देवळांतील 'रविदासजी की छतरी' या जागेस पवित्र मानून तेथूनच हा संत निजधामाला गेला, अशी कल्पना करतात. कांहीं जण संत रोहिदास सदेह गुप्त झाला, असें सुद्धां मानतात. 'रविदासरामायणां'तून एक वेगळाच अंदाज व्यक्त होतो —

निरप्रति ज्ञान देय रविदासा, अंतिम काल आय मन भासा ।।
करि अस्नान गंगकी पूजा, मनमें प्रभुहिं धारि नहिं दूजा ।।
दृढ करि चित्त बैठि पद्मासन, जापै ओम् नाम प्रति स्वाँसन ।
प्राण अपानहि जाय मिलाया, वायु खींच तिरवेनि नहाया ।।
सत्य समाधि भक्तकी लागी, सब जग झंझट छोडि विरागी ।
फोडि प्रकाश ब्रह्ममें लीना, त्यागि शरीर वस्त्र इमि दीना ।। [१५]

संत रोहिदास नित्य ज्ञानदान करीत असे. अगदीं अंतकाळपर्यंत त्याचा हा उपक्रम सुरू होता. तो नित्य गंगास्नान, गंगापूजन आणि ध्यानीं मनीं प्रभूचें स्मरण करीत असे. त्यानें अंतिम दिनीं चित्त दृढ करून पद्मासन केलें. ओंकाराचा पवित्र ध्वनि प्रत्येक श्वासागणिक उच्चारूं लागला. योगाची प्रक्रिया साधून त्यानें परमानुभव प्राप्त केला. भक्ताची सत्य-समाधि लागली.

१५. 'रविदासरामायण' : संपादक राजाराम मिश्र. श्यामकाशी प्रेस, मथुरा (द्वि. सं.).

जगताची सारी गुंतागुंत विसरून जाऊन तो विरक्त झाला आणि शरीररूपी वस्त्राचा त्याग करून तो ब्रह्मप्रकाशाशीं एकरूप बनला.

रोहिदासाचें निर्याणस्थान निश्चित ठाऊक नसल्यामुळें तो काशीच्या पुण्यक्षेत्रींच वृद्धापकाळीं सुखासमाधानानें सदेह स्वर्गस्थ झाला, अशी कल्पना करण्यांत आली आहे. या कल्पनेंतहि थोडेंबहुत सत्य आहेच.

रामानंदांसारख्या उदारशील महापुरुषाचा शिष्य आणि कबीरासारख्या मुक्तचिंतकाचा गुरुबंधु असलेला रोहिदास आपल्या निखळ साधुत्वामुळें जनमानसांत अढळ स्थान पावला हें खरें असलें, तरी त्याच्या जीविता-विषयींचा कसलाहि तपशील निरपवाद सत्याच्या स्वरूपांत सुरक्षित राखला गेला नाहीं. लोकांनीं आपल्या हृदयाच्या कुपींत केवळ त्याचा गौरवगंध साठविला. तो अनुभवण्यांत त्यांना शांतिसुख लाभत होतें. स्थलकालाच्या तपशिलाची त्या सुखानुभवाला गरज नव्हती. भावी विज्ञानयुगांतील चिकित्सक जिज्ञासूंची जिज्ञासापूर्ति व्हावी, यासाठीं कांहीं राखण्याचें भान त्यांना असण्याचें कारण नव्हतें. संत परमार्थ जगतात आणि परमार्थच बोलतात. त्यांचें जीवन परमार्थाला सगुणसाकार करण्यासाठीं असतें. हें त्यांचें जीवितकार्य त्यांच्या वाणींतून संक्रमित होत राहतें. याहून अधिक त्यांना अपेक्षित नसतें. आज आपल्या हातीं रोहिदासाची वाणी आहे. याचा अर्थ आपल्यापुढें रोहिदासाची वाङ्मयी श्रीमूर्ति आहे. या श्रीमूर्तीचें दर्शन घेतांना त्या महात्म्याच्या परमार्थ-जीवनाचें सर्व अंतरंगसौंदर्य आपल्याला प्रतीत होऊं शकतें. पारमार्थिक दृष्टीनेंच विचार करायचा झाला, तर ही प्रतीति आपल्याला रोहिदासाचा साक्षात्कार घडविण्यास पुरेशी आहे. त्या दृष्टीनें त्याच्या जीवनाचा भौतिक तपशील उपलब्ध होत नसल्याची खंत व्यर्थ होय.

रोहिदासानें आपलें परमार्थजीवन ज्यांच्या उपदेशानें सुफलित केलें, ते त्याचे गुरु आचार्य रामानंद आणि ज्यांच्या संगतींत त्यानें परमसुखाची देवाणघेवाण केली, ते कबीरदासादि संतसांगाती यांचा परिचय आपण पुढील प्रकरणांत करून घेऊं. रोहिदास ज्या संतसंस्कृतीचा महान् प्रतिनिधि समजला जातो, तिचा परिचय यायोगें आपणांस घडूं शकेल.

• • •

संतनमें रविदास संत हैं, सुपच ऋषी सो मानिया ।
हिंदू तुरक दुई दीन बने हैं, कछू नहीं पहिचानिया ।।

# गुरु, गुरुबंधु आणि संतसांगाती

## रोहिदास-गुरु रामानंद

चर्मकार ज्ञातींत जन्म घेऊनहि आपल्या धवल चारित्र्यानें आणि विशुद्ध भक्तिभावानें संतत्व पावलेला संत रोहिदास हा आचार्य रामानंदांचा एक प्रमुख शिष्य होता. आचार्यांनीं ज्या मुख्य बारा शिष्यांना परमार्थसोपानावर स्नेहानें सोबत केली, त्या बारा भाग्यवान् शिष्यश्रेष्ठांत रोहिदासाचें नववें नांव आहे.[१] आपल्या गुरूच्या ठायीं रोहिदासाची नितांत श्रद्धा होती. नाभादासाप्रमाणेंच याची दृढ धारणा होती कीं, भक्ति, भक्त, भगवंत आणि गुरुदेव हीं एकाच श्रेष्ठ भावनेचीं भिन्न नामरूपें आहेत.

भगति भगत भगवंत गुरु नाम रूप बपु एक ।
इनके पद वंदन किये, नासै बिघन अनेक ।।

याच निष्ठेनें रोहिदासानें आपलें सर्वस्व सद्गुरूच्या चरणीं वाहिलें. रोहिदासाचे आणि कबीरादि महापुरुषांचे सद्गुरु असलेले आचार्य रामानंदहि अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे महापुरुष होते.

## रामानंदांचा जीवनप्रवाह

माघ कृष्ण सप्तमी सं. १३५६ (स. १२९९) या शुभ दिवशीं प्रयाग या पवित्र तीर्थक्षेत्रीं रामानंदांनीं जन्मग्रहण केला, ही अगस्त्य-संहितेंतील माहिती रामानंद-सांप्रदायिकांनीं प्रमाणभूत मानली आहे. विद्वानांनींहि अनेक मतें मांडलीं आहेत; परंतु निश्चित पुराव्याअभावीं हीं मतें सर्वमान्य नाहींत. म्हणून आचार्यांची सांप्रदायिक जन्मतिथि ग्राह्य धरली जाते.[२]

१. 'भक्तमाल', छप्पय ३१.
२. रामानंद संप्रदाय और उसका हिंदी साहित्यपर प्रभाव : डॉ. ब. ना. श्रीवास्तव, पृ. ७५.

अगस्त्यसंहितेंत आचार्यांच्या मातेचें नांव सुशीला आणि पित्याचें नांव पुण्यसदन असें सांगितलें आहे. ते जातीनें कान्यकुब्ज ब्राह्मण होते, अशी पारंपरिक माहिती असून ती वहुतेक विद्वानांना मान्य आहे. वैष्णव आचार्य गुरु राघवानंद यांनीं रामानंदांना दीक्षा दिली, याबद्दलहि विद्वानांचें एकमत आहे. 'भक्तमाल', 'अगस्त्यसंहिता', 'भविष्यपुराण' यांखेरीज 'श्रीरामार्चन-पद्धति' या आचार्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांतहि गुरु राघवानंदांचा उल्लेख मिळतो.

आचार्य रामानुजांच्या श्रीवैष्णव संप्रदायांत प्रविष्ट झालेल्या रामानंदांची गुरुपरंपरा अशी दाखविली जाते–

श्रीरामानुजाचार्य
|
गुरु देवाचार्य
|
स्वामी हर्यानंद
|
स्वामी राघवानंद
|
आचार्य रामानंद

गरु राघवानंदांचा विशिष्टाद्वैतावर पूर्ण विश्वास होता. आचार्य रामानंद एक पाऊल पुढें सरले. त्यांनीं विशिष्टाद्वैताचें सूत्र सांभाळूनहि भक्तीचा मार्ग अधिक प्रशस्त केला. त्यांचा दृष्टिकोन व्यापक होता. सर्व वर्ण आणि साऱ्या जातीजमातींसाठीं भक्ति खुली करून आचार्यांनीं मध्ययुगाच्या अंधकारास आव्हान दिलें.

गिरनारच्या तपोभूमींत उग्र तपाचरण करून रामानंदांनीं योग जाणला आणि सकल शास्त्रविद्यांचा गाढा व्यासंग केला. भारतीय संस्कृतीच्या सर्वसहिष्णु वृत्तीचें मर्म त्यांना समजलें होतें. मुसलमानांच्या आक्रमणानंतर विसकटलेली समाजाची घडी त्यांनीं पाहिली होती. धर्माचारीचे धिंडवडे निघालेले पाहून ते व्याकूळ झाले. तपोवलानें तेजस्वी बनलेलें त्यांचें व्यक्तिमत्त्व काळाचें आव्हान पत्करून उठलें. अनेक मेधावी भक्तांनीं आणि तत्त्वनिष्ठ सुधारकांनीं त्यांच्या पुण्यकारक प्रतिज्ञेस निष्ठेनें साथ दिली.

वाराणसीच्या पुण्यक्षेत्रीं भागीरथीच्या तीरीं पंचगंगा घाटावर स्थिर होण्यापूर्वी आचार्यांनीं साऱ्या भारतभर भ्रमण केलें होतें. त्यांच्या या भारत-दर्शन-यात्रेचें वर्णन 'रामानंददिग्विजय' नामक ग्रंथांत भगवदाचार्यांनीं केलें आहे. अशाच एका यात्रेचा प्रसंग. संत पीपाच्या निमंत्रणावरून आचार्य कबीर-रोहिदासांस सांगाती घेऊन द्वारावतीस पोहोचले होते. आधींच व्यापक विचारांनीं समृद्ध असलेलें तें अलौकिक व्यक्तिमत्त्व भारत-दर्शनानंतर अधिकच तेजानें तळपूं लागलें.

रामानुजाचार्यांच्या श्रीवैष्णव संप्रदायाचें उपास्य दैवत होतें लक्ष्मी-नारायण श्रीविष्णु आणि या देवतेचेच अवतार म्हणून क्वचित् कृष्ण, राम, नृसिंह यांचीहि पूजा केली जाई. आचार्य रामानंदांनीं मर्यादापुरुषोत्तम राम-चंद्राच्या पूजेस अग्रमान देऊन आपल्या रामावत मताचा शुभारंभ केला. त्या काळीं कृष्णभक्तीचा चांगलाच प्रसार झालेला होता. आवश्यकता होती ती प्रभु रामचंद्राच्या पुण्यप्रतापी कर्तृत्वाची आणि धवल चारित्र्याची. आचार्यांनीं काळाची गरज ओळखून रामभक्तीचा मंत्र समाजाला सांगितला.

वाराणसीच्या पंचगंगा घाटावर आजहि अवशिष्ट रूपांत असलेला 'रामानंद-मठ' हाच रामानंद संप्रदायाचा प्रमुख मठ. कदाचित् याच ठिकाणीं कबीर-रोहिदासांना गुरुमंत्र प्राप्त झाला असावा. काशीखेरीज अयोध्या, अलवर, अहमदाबाद, आबू, इटावा, अलाहाबाद, उज्जैन, करनाल, करौली, गांगरौन, ग्वाल्हेर, चित्रकूट, छपरा, जयपूर, जैसलमेर, जोधपूर, पतियाळा,. बाराबंकी, मथुरा, मिथिला, मिर्जापूर, मेवाड, सागर आणि हरद्वार इतक्या नगरांतून रामानंद संप्रदायाचीं केंद्रें आजहि उभीं आहेत.

आपल्या अमोघ कर्तृत्वानें दाही दिशांना उजळून टाकणारा हा शुभंकर व्यक्तित्वाचा सत्परायण महापुरुष हिंदीचा पहिला प्रचारक होय. कबीराला 'संस्कीरत है कूपजल, भाषा बहता नीर' या क्रांतिकारक भावनेची प्रेरणा देणारे आचार्य रामानंदच. साऱ्या उत्तर भारताचें धर्मजीवन मंगलमय करणाऱ्या गोस्वामी तुलसीदासांचें स्फूर्तिस्थानहि रामानंदच. मध्यकालीन धर्मसाधनेचा आणि हिंदी साहित्याचा इतिहास आचार्यांच्या अवतारानेंच समृद्ध झाला आहे. त्या इतिहासाची जडणघडण करून हा महापुरुष शतकाच्या सुफलित जीवनानंतर विक्रमसंवताच्या १४६७ च्या वैशाख शुक्ल तृतीयेच्या दिवशीं ( सन १४१० ) श्रीरामरूपीं लीन झाला.

## सत्यव्रत आचार्यांची महात्मता

श्रीरामानंद रघुनाथ ज्यों दुतिय सेतु जग तरन कियो ।

आचार्य श्रीरामानंदांनीं मर्यादापुरुषोत्तम प्रभु श्रीरामचंद्राप्रमाणें जणुं कांहीं पुनश्च सेतु बांधून जगतीतलाचा उद्धार केला, असा आचार्यांचा यथार्थ गौरव करून 'भक्तमाल'चा कर्ता नाभादास त्यांच्या संतसांगातींचा परिचय करून देण्यास आरंभ करतो. आचार्यांच्या चरित्रासंबंधीं अधिक माहिती नाभादासानें दिली नाहीं. त्यांच्याकडून भक्तीची प्रशस्त वाट ज्यांना लाभली, त्या रामानंद-शिष्यांचें चरित्र म्हणजेच रामानंदांचें जीवनचरित्र, अशी तर नाभादासाची कल्पना नसेल ? . . . वस्तुत: रामानंदांना स्वत:चें असें जीवनच नव्हतें. दक्षिणेंतल्या भक्तीची ध्वजा हातीं वागवीत आलेला हा वैष्णवमतानुयायी अत्यंत उदार वृत्तीचा, थोर अंत:करणाचा अन्‌ तेजस्वी प्रज्ञेचा अलौकिक पुरुष होता. त्याच्या पुण्यप्रतापानें साऱ्या वैष्णवमताचें रूपच पालटलें. आद्य शंकराचार्यांनंतर हिंदु धर्माचें नवें उदात्त रूप जर प्रथम कुणीं दिग्दर्शित केलें असेल, तर तें आचार्य रामानंदांनीं !

इसवी सनापूर्वींच वैष्णव मताचा उगम झालेला होता. बौद्ध-जैन आदि अवैदिक मतांना तोंड देण्यासाठीं, गतानुगतिकता टाकून वैष्णव धर्म नव्या जोमानें उफाळला. या भक्तिगंगेच्या पावन प्रवाहाचे पुढें, राम आणि कृष्ण यांच्या उपासनेचे असे, दोन विभाग झाले. आठव्या शतकांत आद्य शंकराचार्यांनीं आपल्या दिव्य प्रज्ञेनें साऱ्या हिंदु तत्त्वज्ञानासच नवी गति प्रदान केली. पुढें इसवी सनाच्या अकराव्या शतकांत आचार्य रामानुजांनीं श्रीवैष्णव संप्रदायाची स्थापना करून भक्तांच्या भक्तिभावनेस सुनिश्चित दिशा दाखवून दिली.

विशिष्टाद्वैताचा पुरस्कार करणाऱ्या रामानुजाचार्यांचा श्रीसंप्रदाय, द्वैतमताचा स्वीकार करणाऱ्या मध्वाचार्यांचा ब्रह्मसंप्रदाय, शुद्धाद्वैताचा प्रचार करणाऱ्या विष्णुस्वामींचा रुद्र संप्रदाय आणि द्वैताद्वैताचा विचार मानणाऱ्या निम्बार्कस्वामींचा सनकादि संप्रदाय ह्या चार मतप्रणालींनीं हिंदु वेदान्तदर्शनाचा बहुमुखी विकास झाला. पुढें मध्ययुगाच्या अंधकारांत धर्मकारणास प्रकाशाची वाट दाखविणारे चैतन्य महाप्रभु, वल्लभाचार्य आणि

आचार्य रामानंद हे कर्ते प्रचारक लाभले आणि धर्मकारणानें खऱ्याखुऱ्या अर्थानें सत्यस्वरूप धारण केलें.

रामानुजाचार्यांच्या श्रीसंप्रदायाचा स्वीकार करून आचार्य रामानंद आत्मविश्वासानें पुढें आले– मध्ययुगीन विचारजागृतीचे अग्रदूत होऊन रामानंद-कबीर धन्य झाले.

भक्ति द्राविड ऊपजी, लाये रामानंद ।
परगट किया कबीरने सप्तदीप नवखंड ।।

उत्तर भारतांत रामानंदांनीं नवा मनूच निर्माण केला. आपल्या उदार वृत्तीनें त्यांनीं सर्व जातीजमातींना अन् समाजाच्या सर्व वर्गांना सामावून घ्यायचें योजिलें. ईश्वराच्या दरबारीं उच्चनीच भेद नाहीं, याची आचार्यांना खात्री होती. धर्माचरणाचें आडम्बराशीं नातें नाहीं, असा त्यांना भरंवसा होता. भगवंताची भक्ति करण्याचा अधिकार ज्ञानोपासक ब्राह्मण, शक्त्युपासक क्षत्रिय, वाणिज्योपासक वैश्य आणि मानवाची सेवा करणारे शूद्र या सर्वांनाच सारखा आहे, असे आचार्यांचे तर्कशुद्ध पण त्या काळांत क्रांतिकारक वाटतील असे विचार होते. समाजाच्या सोयीसाठीं निर्माण झालेली वर्णव्यवस्था जर युगधर्म ओळखणार नसेल, तर तिला प्रसंगीं मोडून पुनश्च नवी धारणा बनविली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. आणि त्यांचें व्यक्तिमत्त्वहि तसेंच आकर्षक होतें. त्यांच्या या क्रांतिकारक कर्तृत्वामागें तें भव्य व्यक्तिमत्त्व होतें. समाज त्या व्यक्तिमत्त्वानें भारावून गेला. कसाया-घरचा सदन त्यांच्या भक्तिगंगेंत पोहूं लागला. कोष्टयाघरचा कबीर भगव-न्नामाचें वस्त्र विणूं लागला. जाटाघरीं मोठा झालेला धना भजनरंगीं दंग होऊन गेला. न्हाव्याचा सेनाहि त्यांत पुढें सामील केला गला. या साऱ्या हरि-जनांत नरहरि, अनंत, भवानंद हेहि मिसळले. पद्मावती आणि सुरसुरी या भक्तिवेडया अबलाहि सबल बनल्या. संत रोहिदासहि या ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळींत स्वतः समाविष्ट झाला. रामानंदांचा समतेचा यज्ञ सुफल झाला. सारा उत्तर भारत भक्तिभागीरथीच्या अथांग प्रवाहानें पावन झाला. लोकमंगलाची नवी पहाट उगवतीच्या क्षितिजावर आशेचे किरण प्रकाशूं लागली.

## नाभाजींनीं सांगितलेली भक्तमालिका

रामानंद आणि त्यांच्या संप्रदायाचा अधिकाधिक परिचय करून देणारा ग्रंथ म्हणजे नाभादासानें रचलेली 'भक्तमाल' या भक्तचरित्रगायनांत आचार्यांच्या शिष्यमंडळाविषयीं नाभाजी म्हणतात–

अनंतानंद कबीर सुखा सुरसुरी पद्मावति नरहरि
पीपा भवानंद रैदास धना सेन सुरसुरकी घरहरि ।।
औरो शिष्य प्रशिष्य एकसे एक उजागर ।
विश्वमंगल आधार सर्वानंद दशधा के आगर ।।
बहुत काल वपु धारिकै प्रणत जनको पार दियो ।
श्रीरामानंद रघुनाथ ज्यों दुतिय सेतु जगतरन कियो ।।

'भक्तमाल', छप्पय ३१

अर्थात् अनंतानंद, कबीरदास, सुखानंद, पद्मावती, नरहरिदास, पीपा, भवानंद, रोहिदास, धना जाट, सेना न्हावी आणि सुरसुरानंदांची पत्नी असे आचार्यांचे बारा प्रमुख शिष्य होते, तर योग्यतेंत एकाहून एक सरस असे आणखीहि अनेक शिष्य प्रशिष्य होते.

## रोहिदासाचे गुरुबंधु

अनंतानंद : आचार्य रामानंदांच्या शिष्यपरिवारांत वयानें ज्येष्ठ म्हणून अनंतानंदांना मान्यता आहे. नाभादास त्यांना आचार्यांचे सर्वप्रमुख शिष्य समजतो. त्यांनीं रचलेला 'हरिभक्ति-सिंधु-वेला' नामक ग्रंथ सुविख्यात आहे.

रामानंदांनीं भक्तिसरितेला गंगेचा महिमा प्राप्त करून दिला. अनंतानंदांनीं सर्वप्रथम आचार्यांच्या पुण्यकार्यांत सहभागी होऊन भक्तिभागीरथीचें पावित्र्य अनुभविलें. त्यांच्या धवल चारित्र्याचा प्रभाव विलक्षण होता. अल्ह, पयहारी, गयेश, श्रीरंग, नरहरिदास, इत्यादि साधु-पुरुषांनीं अनंतानंदांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वानें प्रेरित होऊन जनजागृतीचें व्रत घेतलें होतें. भक्तीच्या माधुर्याचा आस्वाद चाखतांना हा भक्त सारें देहभान हरखन जात असे. नाभादास वर्णन करतो–

आंसू चलत समाधिमें अद्भुत गतिविरही लहे ।
शिष्य किये यहु विरति रति तिनके गुनगन को कहे ।।

'भक्तमाल', पृ. २९९

96033

भगवंताच्या ठायीं समाधि लागल्यानंतर विरहाकुल व्यक्तीप्रमाणें अश्रूंना वाट मोकळी करून द्यायचे. अशा या विरक्त अन् विरही भक्तश्रेष्ठानें अनेकांना भक्तीचा लळा लावला. त्याचें गुणगान कसें करावें ?

**सुखानंद** : आचार्यांच्या भक्तमालिकेंतील दुसरे प्रमुख संत सुखानंद होत. त्यांची पदावली उपलब्ध नसली, तरी त्यांच्या काव्यकर्तृत्वाची नोंद प्राप्त होते. नाभादासांनीं त्यांचें सुंदर वर्णन केलेलें आहे. स्वतः 'सुखसागर' असें नांव धारण करून कवि भक्तिरसानें नटलेलीं भजनें गौरी रागांत गात असे. ज्याप्रमाणें डोंगर-दऱ्यांतून उड्या घेत निर्झर रात्रंदिन बागडत रहावा, तसा हा कवि साश्रु नयनांनीं भक्तीचा पावन राग आळवीत राहायचा—

> निसिदिन प्रेम प्रवाह द्रवत भूधर ज्यों निर्झर ।
> हरिगुन कथा अगाध भाल राजत लीलाभर ॥
> संत-कंज-पोषन विमल, अति पियूष सरसी सरस ।
> भक्तिदान भै हरन भुज, सुखानंद पारसपरस ॥

'भक्तमाल', पृ. ५२७

रात्रंदिन हरिस्मरणांत आणि भजनरंगांत रंगून गेलेला तो कवि हरिकथा-रूपी पवित्र अमृतानें युक्त अशा संतजनरूपी कमलपुष्पांस पोषक अशा सुंदर सरोवरासमान भासत असे. ईश्वराच्या कथेचें निरूपण करीत असतांना त्याचा तेजस्वी भालप्रदेश दीप्तिमान् होऊन जाई. भगवंताच्या शक्तिशाली बाहूंप्रमाणें तो भक्तिभावाचें दान अन् प्राणिमात्राचें कल्याण करण्यांत मग्न असे. सांसारिक मोहपाशांत जखडून राहिलेल्या जड-जीवांसाठीं तर तो भक्त साक्षात् पारसमणि होता.

**धना जाट** : राजस्थानांतील टांक जिल्ह्यामध्यें धुआन नांवाचें एक छोटेंसें खेडें आहे. त्या गांवचा हा जाट धना मोठा भगवद्भक्त होऊन गेला.

संत नामदेव, कबीरदास, रोहिदास आणि सेना न्हावी यांच्या भजनांच्या श्रवणानें धनाच्या हृदयांतील मुमुक्षुतेची ज्योति प्रज्वलित झाली. परमार्थ-सोपानावरील या दीपस्तंभांच्या प्रकाशानें त्याला भक्तीची वाट गवसली. रोहिदासाविषयीं तर धनाच्या मनीं अत्यंत आदर वसत होता. त्याचें वर्णन करून तो सांगतो—

रविदास ढुवंता ढोरनी, तितिनी तिआगी माइआ ।
परगटु होआ साध संगि, हरिदरसन पाइआ ।।
इतिविधि सुनिकै जाटरौ, उठि भगति लागा ।
मिले प्रतषि गुसाइआ, धन्ना बड़ भागा ।।

—'ग्रंथसाहेब,' पद क्र. २, पृ. ४८७

गुराढोरांचीं कातडीं वाहणाऱ्या रोहिदासानें मोहमायेचा त्याग करून हरिदर्शन प्राप्त करून घेतलें, हें ऐकून धना जाट उठून भक्ति करूं लागला. आणि धना मोठा भाग्यवान् आहे, कारण त्याला प्रतापी सद्गुरूचा कृपाशीर्वाद लाभला आहे.

धनाचा विदेशी अभ्यासक मॅकॉलिफ त्याचा जन्मकाल सन १४१५ असनिश्चित करतो. आचार्य परशुराम चतुर्वेदी यांनीं या संतास रामानंदांचा समकालीन मानलें नाहीं. त्यांच्या मतें हा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धाइतका पुढें होऊन गेला. परंतु 'भक्तमाल', 'अगस्त्यसंहिता', अग्रस्वामीकृत 'रहस्यत्रय-टीका' आणि रामानंद संप्रदायाच्या उपलब्ध सर्व ग्रंथांतून याविरुद्ध पुरावा उपलब्ध होतो. धना हा रामानंदांचाच शिष्य असून तो रोहिदास-कबीराचा संतसांगाती आहे, असें मत डॉ. श्रीवास्तव यांनीं प्रतिपादन केलें आहे.[3] धनानें कबीर, रोहिदास, सेना यांचा जो गौरवपूर्ण उल्लेख केला आहे, त्यावरून तो या सर्व संतांहून वयानें लहान असला पाहिजे, असें श्रीवास्तवजी सांगतात. धनाच्या उल्लेखावरून रोहिदासाच्या कालांतहि त्याचा कीर्तिगंध कसा सर्वत्र पसरला होता आणि संतसज्जनांच्या लेखीं त्याला केवढी प्रतिष्ठा लाभली होती, तें सिद्ध होतें.

धनाचीं चार पदें गुरुग्रंथसाहेबांत सुरक्षित आहेत. त्याची कहाणी नाभाजींनीं लिहून ठेवली आहे. त्याचा गौरव गातांना नाभादास म्हणतात—

घर आए हरिदास तिनहिं गोधूम खवाये ।
तात मात डर खेत थोथ लांगूल चळाये ।।

३. 'रामानंद संप्रदाय तथा हिंदी साहित्यपर उसका प्रभाव'—डॉ. बदरीनारायण श्रीवास्तव. पृष्ठ १७९.

आसपास कृषिकार खेतकी करत बड़ाई ।
भक्तभजेकी रीति प्रगट परतीति जु पाई ।।
अचरज मानत जगतमें कहुँ निपज्यौ कहुँ वै बयों ।
धन्य धनाके भजनको बिनहिं बीज अंकुर भयो ।।

भक्तमाल, पृष्ठ ५२१

घरीं आलेल्या भक्तमित्रांना वेळप्रसंगीं बीजांसाठीं ठेवलेले गव्हाचे दाणेहि खाऊं घातले. आप्तेष्टांच्या समजुतीसाठीं शेतांत तसेंच बैल फिरविले. आजूबाजूचे शेतकरी साऱ्या प्रसंगाचें हंसूं करूं लागले. परंतु भक्तीचा प्रभाव असा कीं, बीजाविनाहि अंकुर फुटले. धनाचें शेत डोलूं लागलें. भक्तीचा हा महिमा पाहून सारे जण विस्मित झाले.

**नरहर्यानंद** : आचार्यांच्या शिष्यमंडळांत नरहर्यानंदांची त्यांच्या उदार वृत्तीमुळें मोठी ख्याति आहे. त्यांचें संत-प्रेम अपूर्व होतें. संतसज्जनांचा सहवास लाभावा, म्हणून ते सदैव प्रयत्न करीत. सज्जनांची सेवा करण्यांत त्यांना धन्यता वाटे. त्यांच्यासाठीं सर्व प्रकारें कष्ट घ्यायचे आणि अशा प्रकारें संतसेवा हीच ईश्वरसेवा मानायची. नरहर्यानंदांच्या या सुस्वभावाचें सुंदर वर्णन करून नाभादास त्यांना स्थानाधिपति, परमशूर, धीर, भक्त-पालक अशा गौरव-नामांनीं संबोधितात.

**सुरसुरानंद आणि सुरसुरी** : आचार्य रामानंदांच्या शिष्यपरिवारांत सुर-सुरानंदजी सपरिवार सामील झाले, ही घटनाच अद्‌भुत म्हटली पाहिजे. पति-पत्नी दोघेहि एका गुरूचे शिष्य बनून समाजजागरणाच्या यज्ञांत सहभागी झाले, हें पाहून मोठा अभिमान वाटतो. अलौकिकाच्या ओढीनें आणि समाजजागृतीच्या कर्तव्यप्रद प्रेरणेनें ही दंपती आपली सुखाची कल्प-नाच बदलून टाकते. परंतु त्याहि संन्यस्त संसारांत एके दिवशीं सैतानी वृत्तीची काळी छाया डोकावलीच. नाभाजी वर्णन करतात–

अति उदार दम्पती त्यागि गृह बनको गवनें ।
अचरज भयो तहं एक संत सुन जिन हो विमने ।।
बैठे हुते एकांत आय असुरनि दुख दीयौ ।
सुमिरे सारंगपानि रूप नरहरि कौ कीयौ ।।

सुरसुरानंदकी घरनि की सत राख्यौ नरसिंह जहृचों ।
महासती सत ऊपमा त्यों सत्त सुरसुरीको रहृचों ।।

अत्यंत उदार अंतःकरणानें साऱ्या धनदौलतीचा त्याग करून ती पतिपत्नी वनांत गेलीं. संताची विरक्ति आणि त्याच्या धर्मपत्नीचें सौंदर्य पाहून यवनांचें दुष्टत्व जागें झालें. त्यांच्या मनांत पापाचा विचार आला. तोंच भगवंतानें नरसिंहाच्या रूपानें प्रकट होऊन यवनांचा नाश केला. आणि महासतीप्रमाणें सुरसुरीचेंहि सतीत्व अबाधित राहिलें.

सुरसुरानंद आणि सुरसुरी यांनीं आचार्यांच्या संदेशाचा प्रसार केला. त्यांना उदंड कीर्ति लाभली. सुरसुरानंदांची मोठी परंपरा निर्माण झाली. त्यांत संत धरणीदासाचें नांव महशूर आहे.

पद्मावती, भवानंद किंवा भावानंद यांच्याविषयीं अधिक माहिती उपलब्ध होत नाहीं. त्यांचा आचार्य रामानंदांच्या शिष्यपरिवारांत समावेश निश्चित आहे. नाभादासांच्या 'भक्तमाल'प्रमाणेंच रामानंद संप्रदायाच्या अन्य पारंपारिक ग्रंथांतूनहि या संतांचीं नांवें आलीं आहेत. गालवानंद नामक आणखी एक रामानंदशिष्य सांगितला जातो. त्याचीहि नांवाशिवाय कांहीं माहिती उपलब्ध नाहीं.[४]

**सेना न्हावी** : रामानंदांच्या प्रमुख शिष्यांत सेना न्हाव्याचीहि गणना केली जाते. त्याचें ऐतिहासिक जीवन मतमतान्तरांच्या जाळ्यांत गुरफटून गेलेलें आहे. सेनाचें रामानंदांचें शिष्यत्व सिद्ध केलें जातें, तें त्याच्या खालील ओळीवरून—

उत्तम दियरा निरमल बाती । तुम्हीं निरंजन कमलापति ।।
रामभगति रामानंदु जानै । पूरन परमानंद बखानै ।।
मदनमूरति मय तमी गुविंदे । सैन भणय भजु परमानंदे ।।

डॉ. बदरीनारायण श्रीवास्तव यांनीं आपल्या ग्रंथांत या पंक्तींचा पूर्ण संदर्भ दिलेला नाहीं. सेनाचें हिंदी काव्य फारसें उपलब्ध नाहीं.[५] 'कबीर-रोहिदास-

४. रामानंद संप्रदाय तथा हिं. सा. पर प्रभाव : श्रीवास्तव, पृ. १८५.
५. रामानंद संप्रदाय तथा हिंदी साहित्यपर उसका प्रभाव – ब. ना. श्रीवास्तव. पृ. १७७.

संवाद ' असा एक ग्रंथ त्याच्या नांवावर आहे. बहुतेक हिंदी विद्वान् सेना न्हावी मराठी कवी नाहीं, असें म्हणतात. सेनाचें मराठी असणें आम्हांस निर्विवाद वाटतें.[६]

सेनाच्या उपलब्ध मराठी अभंगांवरून त्याचें मराठीपण सिद्ध होतें. मराठी मुलखांत कांहीं काळ राहिल्यानंतर सेना न्हावी नंतर उत्तरेंत गेला असण्याची शक्यता आहे. शिवाय बांधवगड हें त्याचें सर्वमान्य निवासस्थान मराठी-हिंदी प्रदेशाच्या सीमेवरचेंच आहे. सेना उत्तरेंत गेल्यामुळें त्याची रामानंदांच्या शिष्यपरिवारांत उत्तरकालीं गणना झाली असावी. सेनाच्या काळासंबंधींच्या सर्व हिंदी मतमतांतरांचा विचार करून पं. रूपनारायण पांडेय यांनीं त्याचा काळ पंधराव्या शतकाच्या आरंभीचा मानला आहे.[७] गुरुदेव रानडे यांनीं सेनाचा काल १४४८ च्या सुमाराचा मानला आहे.

सेनाची फारशी हिंदी रचना उपलब्ध नसतांनाहि त्याला उत्तर भारतांत सर्वश्रुतता लाभली, तिचें रहस्य ध्यानीं घ्यायला हवें. सेना मराठी होता कीं हिंदी होता, त्यानें मराठींत काव्य केलें कीं हिंदींत केलें, तो महाराष्ट्रांतच राहिला कीं उत्तरेंतच राहिला, असा कसलाच संभ्रम आमच्या समाजपुरुषास पडला नाहीं. नाभादास आणि महीपतिबोवांबरोबर आमचा सारा समाज सेनाच्या संतत्वाचे पोवाडे गाऊं लागला. वारिक कुलांत जन्म मिळून स्वकर्तृत्वानें सेना श्रेष्ठ संत झाला. त्याच्या उज्ज्वल भक्तिभावानें साक्षात् ईश्वर त्याच्याशीं समरूप झाला . . . . समाजानें त्याचें माहात्म्य ध्यानीं ठेवलें. रामानंदांच्या भक्तभारतींत त्याची गणना करून समाजानें त्याचें कौतुक केलें. उत्तर भारतांत आणि दक्षिणदेशींहि सेनाला आपुलकी लाभली.

सेना न्हाव्याचें जीवनचरित्र रोहिदासांप्रमाणेंच सर्वांना हवेंहवेंसें वाटणारें आहे. एकानें उत्तरेंत राहून दक्षिणेवर मोहिनी गाजविली; दुसऱ्यानें दक्षिणेंतून उत्तरेंतील समाजमनावर प्रेमाचें राज्य केलें.

---

६. पाहा : 'सेना न्हावी ', अशोक प्रभाकर कामत, 'प्रसाद ', फेब्रुवारी–मार्च १९६८.

७. शिवसिंहसरोज, परिशिष्टांश.

**पीपा** : रामानंदांच्या प्रमुख शिष्यांत पीपाचें मोठें महत्त्व आहे. हा गांगरौन संस्थानचा राजा. कनिंगहॅम या इंग्रज पुरातत्त्ववेत्त्यानें त्या संस्थानची वंशावळ निश्चित करून त्याचा काळ सन १३६० ते १३८५ चा सुमार असा सांगितला आहे.[८] फर्कुहर या संशोधकास ही कालधारणा मान्य नाहीं. त्यानें पीपाचा जन्मकाल सन १४२५ असा ठरविला आहे.

राजसिंहासन आणि सारें राजवैभव सोडून पीपा भक्तीच्या मार्गावर आला. आचार्य रामानंद आणि कबीरदास यांचा त्याच्या मनावर एवढा परिणाम झाला कीं, सारें राजैश्वर्य त्याला तुच्छ वाटूं लागलें. संतसेवा हेंच त्याचें जीवितकार्य बनलें. नाभादास आणि प्रियादास यांनीं आपल्या संत-चरित्रवर्णनांत पीपाचा मोठा गुणगौरव केला आहे. त्यांनीं सांगितलेलें पीपाचरित्र अद्भुत कथांनीं भरून गेलेलें आहे.

द्वारकावती नगरी पीपाजींना खूप प्रिय होती. याच नगरींत त्यांनीं साधुसंतांचा सदैव पाहुणचार केला. प्रियादासानें एक कथा सांगितली आहे.[९] एकदां आचार्य रामानंद, कबीर, रोहिदास आणि त्यांचे चाळीस संतसांगाती, पीपाजिच्या निमंत्रणावरून गांगरौन गांवीं आले. पीपानें आपल्या पूज्य गुरूचा आणि गुरुबंधूंचा मोठा सत्कार केला. चार दिवस आनंदाचे गेले. ज्या वेळीं स्वामीजी आणि त्यांच्या बरोबरची मंडळीं परत निघाली, तेव्हां पीपा आणि त्यांची पत्नी सीतादेवीहि त्या सर्वांबरोबर निघालीं. येथून पुढचें चरित्र प्रियादासानें अत्यंत अद्भुत असें दाखविलें आहे.

परंतु द्वारकापुरीच्या यात्रेचा प्रसंग श्रद्धाळू लोकांना खरा वाटतो. आजहि खरा वाटतो. अट्ठ आणि सिंध नामक नद्यांच्या संगमावर संत पीपाजींचें स्मृतिस्थान दाखविलें जातें. नित्यप्रति तेथें भाविकांची गर्दी होते. द्वारकापुरीचा पीपाजीच्या शिष्यांनीं चालविलेला पीपा-मठ सुविख्यात आहे. आजहि तेथें आल्यागेल्याचें मनापासून आगतस्वागत होतें...रोहिदासाचेंहि स्वागत पीपानें केलें होतें. पीपा आणि रोहिदास यांचा स्नेहबंध अधिक स्पष्ट झाला, तर संत रोहिदासाच्या जीवनाचा अधिक उलगडा होऊं शकेल.

८. आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट (भा. ३), पृ. १११.

९. उत्तरी भारतकी संतपरंपरा : आ. परशुराम चतुर्वेदी, या ग्रंथावरून.

## कबीरदास आणि रोहिदास

साऱ्या पंधराव्या आणि सोळाव्या शतकांस ज्या एका विलक्षण व्यक्तित्वानें समृद्ध करून सोडलें, तें व्यक्तित्व म्हणजे कबीर. जन्मापासूनच दैवानें सारी प्रतिकूलता लिहून ठेवलेली. पण कोष्टयाघरीं वाढणारा कबीर उदात्त विचारांनीं भारून गेला. आचार्य रामानंदांच्या पावन स्पर्शानें त्याचा आत्मविश्वास उदंड झाला. कबीरवाणी म्हणजे सत्याचा सुंदर आविष्कार. समाजास सत्य समजावून सांगण्यासाठीं कबीरानें सारें जीवन वाहिलें. त्याच्या नसानसांतून अन्यायाविरुद्ध रक्त प्रवाहित होत होतें. हिंदु-मुसलमानांच्या गुण-दोषांचें त्याला भान होतें. समाजपुरुषाची नाडीच त्यानें ओळखली होती. म्हणून कुणाचाहि मुलाहिजा न ठेवतां कबीर आपल्या फटकळ शब्दांनीं समाजांतील विषमता, अज्ञान आणि आडंबर यांवर तुटून पडला. त्याच्या ठायीं जननायकाला आवश्यक असणारें सहानुभूतीचें बळ होतें आणि त्याच्या रोमरोमांतून युगांतरकारी कर्तृत्वाला साजेसा विश्वास भरलेला होता. ' काशीमें हम प्रगट भए हैं रामानंद चेताए ' असें गर्वानें गाणारा कबीर हा आचार्य रामानंदांच्या युगावतारी कार्याचा सर्वश्रेष्ठ प्रचारक आहे.

कबीराच्या काळाविषयींहि मतमतान्तरें आहेत.[१०] पण कबीराचा प्रभाव इतका प्रचंड आहे कीं, त्या तेजःपुंज व्यक्तित्वानें साऱ्या हिंदीतर प्रांतांतूनहि कबीर नवखा राहिला नाहीं. महाराष्ट्र तर संत कबीराला आपला संत मानतो. आम्ही कबीराची आठवण सदैव ठेवली आहे–घरीं, दारीं, मंदिरीं, कथा-कीर्तनांतून आणि संतांच्या अमृतवाणींतूनहि. . . . असा हा महात्मा कबीर रोहिदासाचा गुरुबंधु आहे, समकालीन आहे आणि जिवाभावाचा सखाहि आहे. आपल्या प्रिय मित्राच्या प्रतिकूल परिस्थितीचा आणि अलौकिक कर्तृत्वाचा संत रोहिदासानें मोठ्या गौरवयुक्त भाषेंत उल्लेख केला आहे.

> जाके बाप वैसी करी पूत ऐसी करी ।
> तिहुरे लोक परसीध कबीरा ।।

१०. कबीर-काल : सन् १३६८-१४४८–आ. परशुराम चतुर्वेदी.

तिहीं लोकीं ज्याच्या दिव्यत्वाचा दरारा पसरला, त्या कबीरानें ईश्वरनिष्ठेनें जन्मजन्मांचा फेंरा नष्ट केला होता—

हरीके न।म कबीर उजागर ।
जनम जनम के काटे कागर ।।

संत कबीरदासांनाहि रोहिदासाविषयीं आपुलकी होती. त्या उदार महात्म्याच्या ठायीं विनम्रता एवढी कीं, तो रोहिदासाचें गुणवर्णन करतांना म्हणून गेला—

संतनमें रविदास संत है सुपच ऋषी सो मानिया ।
हिंदू तुर्क दुई दीन बने हैं, कछू नहीं पहिचानिया ।।''

संतमंडळांत रोहिदासाचें फार मोठें स्थान आहे. त्याला श्वपच (चंडाल) समाजांत जन्मलेला ऋषीच मानायला हवें. हिंदू आणि मुसलमान हे इतके करंटे आहेत कीं, कोणीहि या थोर महात्म्याची महातमता जाणून घेतली नाहीं.

रोहिदासाच्या जीवन-कालांतच कबीराचें महानिर्याण झालें असावें. कारण रोहिदासानें अशा अर्थाच्या ओळी लिहिल्या आहेत. तो म्हणतो, —

नामदेव कबीर तिलोचना सधना सैन तरे ।

आणि——

निरगुन को गुन देखो भाई देहीसहित कबीर सिधाई ।

कबीर आणि रोहिदास यांच्या वाणींतहि थोडेंसें साम्य दिसून येतें. क्वचित् कांहीं शब्द सारखेच उतरले आहेत. हा केवळ योगायोगहि असूं शकेल. एकदोन उदाहरणें अशीं—

अब हम जाना हो, हरिबाजी को खेल ।
बाजी झूठ सांच बाजीगर, साधुनकी मति ऐसी ।।

या कबीराच्या शब्दांशीं रोहिदासाचें हें म्हणणें चांगलेंच जुळतें—

बाजीगर सों राँचि रहा, बाजीकी मरम न जाना ।
बाजी झूठ, साँच बाजीगर, जाना तब पतियाना ।।

---

११. 'कबीर-वाणी', पद क्र. २.

राम-रहीमाची किंवा कृष्ण-करीमाची एकता समजावून सांगतांना दोघेहि सांगतात तो विचार आणि भाषा एकच आहे. कबीर म्हणतो--

रामरहीमा करीम केशव अल्लह राम सति सोई।
बेद कुरान विसंभर ऐके अउर न दूजा कोई॥

रोहिदास सांगून जातो-

कृष्ण करीम रहीम राम हरि, जब लग एक न देखा।
बेद कतेब कुरान पुराननि, तब लगि भ्रमही देखा॥

कबीर-रोहिदासांचें हें भावसाम्य त्यांचें समकालीनत्व पुन्हा एकदां सिद्ध करतें. 'दिलमें कपट नमाज पढेका क्या हज काबे जाया?'-अरे, मनांत तुझ्या कपट भरलेलें असतांना तुझ्या प्रार्थनामंदिरीं जाण्याचा तरी काय उपयोग आणि हाज-काब्याची यात्रा करून तरी तूं काय मिळविणार?- अशी पृच्छा करणारा कबीर आणि, -

जिसके इश्क आसरा नाहीं
क्या निमाज क्या पूजा?

ज्याला ईश्वरप्रेमाचें नि सहानुभूतीचें अंगच नाहीं, त्याची कसली नमाज आणि कसली पूजा?- असा रोखठोक सवाल करणारा रोहिदास यांची जातकुळी एकच आहे. रामानंदांचे हे महान् शिष्य खरेखुरे गुरुबंधु आहेत.

## कबीर-रोहिदास-संवाद

काव्यांतर्गत उल्लेखांवरून आणि पारंपरिक माहितींतील एकवाक्यतेवरून रोहिदास आणि कबीर हे समकालीन असून आचार्य रामानंदांचें शिष्यत्व त्यांना लाभलेलें होतें, हें निश्चित होतें. त्यांनीं एकमेकांविषयीं जे स्नेहाचे उद्‌गार काढले आहेत, त्यांवरून त्यांचा परस्पर परिचय असावा, असेंहि अनुमान करतां येतें. दोहोंना मोठी शिष्यपरंपराहि लाभली. या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीवर 'कबीर-रोहिदास-संवादा'ची रचना झाली. या काव्याचा कर्ता सेन कवी आहे, अशी समजूत आहे. सेन म्हणजेच सेना न्हावी. हा मूळचा मराठी कवीच आहे.[१२] त्याचे सुमारे १६५ मराठी अभंग उपलब्ध असून त्यांत

१२. मराठी कवि सेना न्हावी : अशोक प्रभाकर कामत. 'प्रसाद', फेब्रुवारी-मार्च १९६८.

गुरु ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वर मंडळ यांविषयीं स्पष्ट उल्लेख आहेत. सेनाचें हिंदी काव्य हिंदी प्रदेशांतून फारसें उपलब्ध नाहीं. फक्त त्याच्या नांवावर 'कबीर-रोहिदास-संवाद'च काय तो प्रसिद्ध आहे. त्याचा रचनाकाल सुमारें सन १४४५ असा मानला जातो. वास्तविक सेना हा याहिपूर्वीं होऊन गेला असला पाहिजे आणि त्याला लाभलेलें रामानंदांचें शिष्यत्व आणि त्याच्या नांवावर सांगितल्या जाणाऱ्या 'कबीर-रोहिदास-संवादा' चें कर्तृत्व यांचा काळमेळ जमत नाहीं, असें मराठी सामग्रीवरून आम्हांस वाटतें. हा संवाद मराठी मुलखांतील सेना न्हाव्याच्या नांवावरहि प्रचलित आहे. आणि 'शेणा न्हाऊ' अशा अस्सल मराठी नांवानें तो सुरक्षित आहे.[१३]

डॉ. रामकुमार वर्मा यांनीं या संवादाचें महत्त्व सांगितलें आहे.[१४] परंतु हा संवाद सुमारें सवाशें वर्षांपूर्वींच महाराष्ट्रांत शिलायंत्रांत छापून प्रसिद्ध झाला आहे.

सेना न्हावी मराठी कवि असून ज्ञानेश्वरकालीन आहे, असें जरी सिद्ध होत असलें, तरी त्यावरून 'कबीर-रोहिदास-संवादा'चें महत्त्व कमी होत नाहीं. एखाद्या सेनपंथीय साधूनें हा संवाद लिहिला असेल.

या संवादांत रोहिदास आणि कबीर यांच्यांत झालेली आध्यात्मिक विचारांची देवाणघेवाण स्पष्ट करून सांगितली आहे. दोघेहि रामानंदांचे शिष्य असूनहि त्यांच्या भक्तिपद्धतींत थोडासा फरक आहे आणि तरीहि त्यांनीं एकमेकांविषयीं अनुदार भूमिका घेतलेली नाहीं, असें कवीनें मोठ्या कौशल्यानें व्यक्त केलें आहे.

## दयाशील दादू आणि रोहिदास

अकबराच्या काळांत आपल्या आवेशयुक्त वाणीनें समाजास जागविणारा दादूदास संत कबीराच्या तेजस्वी विचारांनीं प्रभावित झालेला होता. परंपरेनें तो कबीरदासांशीं संबंधित आहे. त्याच्या जीवनचरित्राविषयीं अनेक प्रकारचे मतप्रवाह असले, तरी त्याच्या पंथाच्या प्रसारावर त्या

१३ श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळें. बाडांक १० : शेना न्हाऊ-कृत 'रोहिदास-कबीर-स्तवन' आणि बाडांक १४५० : सेना न्हावीकृत 'संवाद'.

१४. हिंदी साहित्यका आलोचनात्मक इतिहास.

मतमतांतरांचा कांहींच परिणाम झालेला नाहीं. त्याचे अगणित अनुयायी मोठ्या भक्तिभावानें दयाशील दादूदासाची–दादूदयालची पूजा करतात. दादू पंथाची बावन्न सिद्धपीठें आहेत. त्यांतून या संताचीं सुमारें ५००० पदें प्रचलित राहिलीं आहेत. मूर्तिपूजा, जातिभेद, आडंबर, आदि सामाजिक प्रश्नांची चर्चा करणारीं हीं पदें आहेत.

दादूपंथीय दोन प्रकारचे आहेत. जे गृहस्थाश्रम स्वीकारून दादूदासांची भक्ति करतात, त्यांना 'सेवक' म्हणतात. जे विरक्ति पत्करून राहतात त्यांना 'दादूपंथी' म्हणतात. त्यांच्या पूजास्थानास 'दादूद्वार' असें म्हणतात. या दादूद्वारीं संत दादूच्या पदांची मूर्तीप्रमाणें पूजा केली जाते.

दादूदास हे कबीरदासांच्या सहाव्या पिढींत अवतरले, त्यावरून ते रोहिदासांच्या खूपच पुढील काळांतील होत. परंतु त्यांच्या अनुयायांनीं आपल्या गुरूबरोबर रोहिदासाचीहि वाणी पूज्य मानली, हें विशेष ध्यानीं घेण्यासारखें आहे. यावरून रोहिदासास सोळाव्या शतकांत किती कीर्ति आणि महात्मता लाभली होती, तें सिद्ध होतें.

राजस्थानमध्यें आजहि या संत दादूदयालच्या पंथाचा मोठा प्रसार आढळून येतो. या पंथाचा उपास्य ग्रंथ आहे 'पंचवाणी'. या ग्रंथांत पांच संत-महात्म्यांच्या वाणीचा अंतर्भाव आहे. संत दादू, संत कबीर, संत नामदेव, संत रोहिदास आणि संत हरिदास. या काव्यसंपदेची नित्यपूजा करण्यांत दादूपंथीयांना मोठा आनंद वाटतो.[१५]

## गरीबदास आणि रोहिदास

कबीरदासांच्या स्पष्टवक्तेपणानें प्रेरित होऊन जाट संत गरीबदास कवन करूं लागला. रोहतक जिल्ह्यांतील छुडानी हें त्याचें गांव. सन १७१७ च्या सुमारास त्याचा जन्म झाला होता. त्यानें पंजाबांत मोठा प्रभाव गाजविला. आजहि पंजाबांत त्याच्या साख्या आणि पदें भक्तिभावानें गायिलीं जातात. त्याचा पंथ–'गरीब पंथ'–पंजाबच्या आसपास अजूनहि प्रचारांत आहे.[१६]

१५. कबीर : डॉ. पारसनाथ तिवारी. नॅशनल बुक ट्रस्ट. पृ. ४३.

१६. हिंदी साहित्यका आलोचनात्मक इतिहास –डॉ. रामकुमार वर्मा : चौथी आवृत्ति, १९५८. पृ. २८७.

गरीबदासाच्या मनीं पूर्वसूरींच्या विषयीं अत्यंत कृतज्ञता वसत होती. कबीरदासांना तर तो गुरुस्थानींच मानतो, पण अन्य रामानंदशिष्यांना प्रमाण करून त्यानें रोहिदासाला आदरभावानें गौरविलें आहे. त्याच्या जीवनांतील एका प्रसंगाचा निर्देश करून गरीबदास लिहितो–

रैदास रगीला रंग है दिये जनेऊ तोड ।
जग्य ज्योनार चौहे धरे इक रैदास इक गौड ।।

–गरीबदासाजीकी बानी, पृ. ३२.

रोहिदासानें मोठी हिंमत करून जानव्याचें आडंवर मानलें नव्हतें, आणि जेव्हां बाह्याडंबरावर विश्वास ठेवणाऱ्या पंडितांनीं त्याचा जानव्यावरून अवमान केला, तेव्हां तर रोहिदासानें चमत्कारच करून दाखविला. यज्ञानंतर झालेल्या त्या पंक्तीला पहावें तो एक रोहिदास आणि एक ब्राह्मण असे आसनस्थ झालेले,––या कथेचा अंतर्भाव 'रविदासरामायणां'तहि आहेच. गरीबदासाची वाणी निश्चितपणें २५० वर्षांपूर्वीची आहे. त्या वाणींत रोहिदासाविषयींच्या या कथेचा समावेश आहे, हें विशेष विचारांत घेण्यासारखें आहे.

## रोहिदास आणि सिकंदर सुलतान

मध्यकालीन संतांच्या नांवाशीं दिल्लीपति सिकंदर सुलतानाचें नांव त्याच्या लहरी आणि अन्यायी वृत्तीमुळें कायमचें निगडित झालें आहे. या सुलतानाचा काळहि इतिहासज्ञांना निश्चित करतां आलेला नाहीं, हें इतिहासविषयाचेंच मोठें दुर्दैव मानावें लागेल. फर्कुहरनें त्याचा राज्यकाल सन् १४८९ ते सन १५१७ असा दिला आहे. डॉ. ईश्वरीप्रसाद यांचीहि या कालनिश्चितीस मान्यता दिसते. जॉन ब्रिग्स याचेंहि मत वरील दोहोंशीं जुळतें आहे. परंतु या सिकंदर लोदीसंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. कबीर आणि रोहिदास या दोहोंचाहि या सुलतानाशीं संबंध आला असावा. या दोन महान् संतांच्या विषयीं बरेंवाईट ऐकल्यानंतर या सुलतानानें त्यांना कैद करण्याचा हुकूम सोडला, पुढें संत रोहिदासाची प्रत्यक्ष भेट घडल्यावर हा सुलतान त्याच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वानें आणि आध्यात्मिक ज्ञानानें भारावून गेला. त्याला पश्चात्ताप होऊन त्यानें या संताचें शिष्यत्वहि पत्करलें, अशा प्रकारच्या कथा जनमनानें वर्षानुवर्षें जतन केल्या आहेत.

या दंतकथांतून संत रोहिदासाचा प्रभावच सांगायचा आहे. सिकंदर कदाचित् नमलाहि नसेल. पण संत रोहिदासाचें चरित्रबळ एवढें मोठ होतें कीं, तो सुलतानास डरला नाहीं. त्याच्या शिकवणुकींतहि जबरदस्त मनोबल वागविण्याचें असें सामर्थ्य होतें कीं, त्या शिकवणुकीनें समाजहि सुलतानाच्या अन्यायाविरुद्ध उभा ठाकला..... सिकंदराशीं संबंधित दंतकथांतून आपण हा अर्थ जाणून घ्यायला हवा; नव्हे यासाठींच त्या दंतकथा समाजपुरुषानें जुळविल्या.

रोहिदासाची विस्तृत माहिती देणारे श्री. रामानंद शास्त्री हे त्याचा काळ वि. संवत् १४४१–५५ ते संवत् १५७७–९५ असा सिद्ध करतात. डॉ. ईश्वरीप्रसाद आदींनीं निश्चित केलेला सिकंदर लोदीचा काल मान्य करून ते या सुलतानाबरोबर संत रोहिदासाची भेट झाली असली पाहिजे, असें सांगतात.[१७] संत रोहिदासानें सिकंदरास कांहीं चमत्कार करून दाखवून त्याचें मन आपल्याविषयीं चांगलें करून घेतलें असेल, असाहि अंदाज त्यांनीं व्यक्त केला आहे.

सिकंदर लोदीच्या शासनकालाविषयीं विस्तृत स्वरूपाची विश्वसनीय माहिती मिळाली आणि तत्कालीन घटनांचा तपशील स्पष्ट झाला, तर रामानंदांच्या संतसांगातींचें आणि अर्थात् संत रोहिदासाचेंहि जीवन-चरित्र सुस्पष्ट होऊं शकेल.

## रोहिदास आणि विठ्ठलदास

'भक्तमाल' गाणाऱ्या नाभादासानें विठ्ठलदासाचें वर्णन केलें आहे. तो विठ्ठलदासाला 'रैदासी' म्हणजे संत रोहिदासांच्या संप्रदायांत दीक्षा घेतलेला संत मानतो.

मीराबाईचा गुरु संत रोहिदास नसून संत विठ्ठलदास आहे असें एक मत मांडलें म्हणजे प्रत्यक्ष रोहिदासाचें शिष्यत्व न पत्करतां संत मीराबाईनें रोहिदासाच्या शिष्याचें शिष्यत्व पत्करलें. परंतु विठ्ठलदासाबद्दलची अधिक माहिती उपलब्ध नाहीं. त्यांचा काळ निश्चित करण्याचा प्रयत्नहि झालेला दिसत नाहीं.

---

१७. 'संत रविदास और उनका काव्य' : रामानंद शास्त्री, वीरेंद्र पाण्डेय. १६९.

ज्या अर्थी विठ्ठलदासाचा गौरव भक्तमालेंत 'रैदासी' म्हणून झाला आहे, त्या अर्थी त्यानेंहि संत रोहिदासाच्या संप्रदायांत प्रवेश केलेला होता. मीराबाईच्या काळांतील हा रोहिदास-भक्त मोठा श्रेष्ठ साधु असला पाहिजे.

वास्तविक विठ्ठलदास किंवा विठ्ठलनाथाचें सारेंच चरित्र विवादास्पद आहे. तुलसीदासाशींहि त्याचा संबंध जोडला जातो. तिकडे कबीर शिष्य आणि मलूकपंथाचे प्रणेते मलूकदास यांच्याबरोबरहि विठ्ठलदासाचा गुरु-शिष्य-संबंध सांगितला जातो. आचार्य वल्लभाचार्यांचे सुपुत्र आणि पुष्टिमार्गीचे श्रेष्ठ प्रचारकहि विठ्ठलनाथ किंवा विठ्ठलदासच आहेत. अशा एका इतिहासप्रसिद्ध परंतु ज्याच्या जीवनचरित्रासंबंधीं खूप मतभेद आहेत अशा साधुपुरुषानें रोहिदास संप्रदायाची दीक्षा घेतली आहे, हा 'भक्तमाल'-काराचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो.

भक्तिरसाचें सुंदर विवेचन करणारे आचार्य जीव गोस्वामी यांना वल्लभ संप्रदायांत मोठा मान आहे. ते वल्लभ संप्रदायाच्या गौडीय वैष्णव शाखेचे महान् आचार्य होत.

जनश्रुति अशी सांगतात कीं, आपल्या वृंदावनयात्रेच्या वेळीं मीराबाईनें जीव गोस्वामीजींची भेट घेतली. कांहीं विद्वान् जीव गोस्वामी हेच मीराबाईचे गुरु असावेत, असें मानतात. परंतु मीराबाईच्या पदावलींत गुरु म्हणून रोहिदासाचा जसा स्पष्ट उल्लेख येतो, तसा या जीव गोस्वामींचा येत नाहीं. डॉ. पद्मावती शबनम यांनीं आपल्या ग्रंथांत[१८] संत रोहिदास आणि मीराबाई यांच्या काळासंबंधीं बरीच चर्चा केली आहे. त्यांनीं असें साधार दाखवून दिलें आहे कीं, आ. जीव गोस्वामी हे वयानें मीरेहून बरेंच लहान होते. कदाचित् ते स्वतःच मीराबाईचे शिष्य असूं शकतील.

मीराबाईचे गुरु म्हणून संत रोहिदास, संत विठ्ठलदास किंवा विठ्ठलनाथ, आणि आचार्य जीव गोस्वामी यांचीं नांवें घेतलीं जातात. परंतु विद्वानांनीं केलेल्या चर्चेवरून विठ्ठलनाथ आणि जीव गोस्वामी हे मीराबाईचे गुरु असूं शकणार नाहींत, हें सिद्ध होतें. उलट ते स्वतः रोहिदासाच्या प्रभावानें न्हाऊन निघाले होते आणि जीव गोस्वामी मीराबाईला वडीलकीचा मान देऊं शक-

१८. मीरा . एक अध्ययन—डॉ. पद्मावती शबनम. परंतु डॉ. शबनम यांनीं रोहिदासांनाहि मीराबाईचे गुरु मानलेलें नाहीं.

तील, असें मानायला जागा आहे. संत रोहिदासच मीराबाईचे गुरु होते, असें अंतर्बाह्य पुराव्यावरून सिद्ध होऊं शकतें. आपण त्याचा अधिक विस्तारानें विचार करूं या.

## संत रोहिदासाची दुर्दैवी शिष्या मीरा

राजघराण्यांत जन्म ग्रहण केलेली मीराबाईसुद्धां इतिहासाला पक्की आठवणींत ठेवतां आली नाहीं. तिच्या जन्ममृत्यूचें वर्षच काय, पण तिचें राजकुलहि निश्चितपणें सांगण्यांत इतिहाससमोर पेच पडला आहे. आचार्य परशुराम चतुर्वेदी, डॉ. श्रीकृष्ण लाल, डॉ. पद्मावती शबनम्, श्री. वियोगी हरि, इत्यादि मीराबाईच्या अभ्यासकांनीं आपलीं विभिन्न मतें सिद्ध करून दाखविण्याचा यत्न केला आहे. डॉ. श्रीकृष्ण लाल मीरेचा काळ सन १४९८ ते १५९३ असा देतात. डॉ. पद्मावती शबनम तो सन १५०० ते १५७३ असा मानतात.[१९] मीरेचा विदेशी अभ्यासक टॉड यानें ह्याच काल सन १४९८ ते १५४६ असा सिद्ध केला होता.

विद्वानांनीं व्यक्त केलेल्या या मतमतांतरांतील सत्य अजून निश्चत झालेलें नाहीं. मीरेचा काळ सोळाव्या शतकाच्या पूर्वी जर सिद्ध होऊं शकत नाहीं, तर मग मीरा संत रोहिदासाची शिष्या कशी असूं शकेल ?–असा प्रश्न उपस्थित होऊन अनेक विद्वानांनीं, विशेषतः आ. परशुराम चतुर्वेदी यांनीं या बाबतींत आपला मतभेद नोंदविला आहे.[२०] आचार्यांनीं आपलें सारें विवेचन इतकें तर्कशुद्ध मांडलें आहे कीं, मीराबाई संत रोहिदासाच्या काळांतच होऊन गेली, असें सिद्ध करणें आतां अवघडच. मग प्रश्न उरतो तो एवढाच कीं, मीराबाई संत रोहिदासाला गुरुस्थानीं मानत होती कीं नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर मात्र खचित असें द्यावें लागेल कीं, मीरा संत रोहिदासाला अत्यंत आदरणीय मानीत असे. आपल्या पदावलींत अनेक वेळां तिनें असे स्पष्ट उल्लेख केले आहेत.

---

१९. मीरा : एक अध्ययन–डॉ. पद्मावती शबनम, लोकसेवक प्रकाशन, बनारस, सं. २००७. पृ. २३ आणि ९०.

२०. मीराबाईकी पदावली : हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग. परिशिष्ट पहा.

हा एक उल्लेख पहा–

मीरा म्हाने संत हैं मैं संत री दास।
चेतन सत्ता सैनिये दिसत गुरु रैदास ।।

विद्वानांनीं मीरेचा आणि रोहिदासाचा काळ एक नाहीं, असें पाहून 'तिच्या पदांतील रोहिदास कोणी दुसरा असावा', अशी चर्चा सुरू केली· रामानंदशिष्य संतशिरोमणि रोहिदास एक तर मीरेचे समकालीन नव्हेत, शिवाय ते निर्गुणमार्गी, मग ते मीरेचे गुरु कसे ? .. असा त्यांचा चर्चेसाठीं प्रश्न. मीरेनें उल्लेखिलेला रोहिदास कोणी रोहिदास संप्रदायांतील साधुपुरुष असेल, असें मत मांडलें गेलें. पण हें युक्तिसंगत नाहीं. कारण एके ठिकाणीं मीराबाई स्पष्ट म्हणते–

झाँझ पखावज वेणु, बजावत झालर नौ झंकार ।
काशी नगर का चौकमां गुरु मिला रोहिदास ।।

(मीराँ स्मृतिग्रंथ : पृ. ५६.)

येथें काशी नगरींतील संत रोहिदास गुरु म्हणून लाभले, असा स्पष्ट उल्लेख आहे. यावर 'रोहिदास' हें रैदास किंवा रविदासाचें नांव आहे का, म्हणून चर्चा झाली. मराठी वाचकांना रोहिदास हें रैदासाचेंच नांव आहे, असें पुनश्च सांगण्याची गरज नाहीं.

मीराबाईनें रोहिदासाचा जवळ जवळ आठ वेळां उल्लेख केलेला आहे. शिवाय सर्व जनश्रुति मीरा-रोहिदासाचें गुरुशिष्येचें नातें सांगतात. म्हणून हें नातेंच मान्य नाहीं असें म्हणणें विद्वानांना खरें पाहतां फार अवघड होऊन बसलें आहे. हे अन्य उल्लेख असे–

रैदास संत मिले मोहि सत्गुरु दीन्हीं सुरत सहदानी ।
मैं मिली जाय परम प्रिय आपण, तब मेरी पीर बुझानी ।।

संत रोहिदासच मला सद्‌गुरु म्हणून लाभले आणि परमप्रिय ईश्वराशीं माझें आतां नातें जडलें. माझी विरहवेदना मिटून गेली.

मीरा सत्गुरु देवकी करै वंदना आस ।
जिन चेतन आतम कह्या, धन भगवन रैदास ।।

मीराबाई भक्तिभावानें सद्‌गुरूंना वंदना करते आहे. त्यांनीं चैतन्याची

आणि आत्म्याची खरी ओळख पटवून दिली. भगवान्सदृश संत रोहिदास धन्य होत.

मेरो मन लागो हरि सू अब न रहूंगी अटकी ।
गुरु मिला रैदासजी दीन्ही ज्ञानकी गुटकी ।।

—आतां माझें मन हरिचरणीं रंगून गेलें आहे. आतां मी परमार्थमार्गावर चांचपडणार नाहीं. कारण मला गुरुदेव लाभले संत रोहिदास. त्यांनींच मला ईश्वरीय ज्ञानाचा मंत्र समजावून सांगितला—

खोजत फिरौं भेद वा घरको कोई न करत बखानी ।
रैदास संत मिले मोहि सत्गुरु, दीन्ही सुतर सहदानी ।।

मी त्या ईश्वराच्या घरींचें रहस्य जाणून घेण्यासाठीं खूप खूप भटकलें. मला कुणींच त्याचें वर्णन करून सांगितलें नाहीं. पण मला संत रोहिदास सद्गुरु लाभले. त्यांनीं मला स्वरूपाचा सहज प्रत्यय घडविला.

गुरु रैदास मिले मोहि पूरे धुरसे कलम मिली ।
सत् गुरु सैन दई जब आके, ज्योतिसे ज्योति मिली ।।
मेरे तो गिरधर गुपाल दूसरा न कोई ।
गुरु हमारे रैदासजी सरनन चित सोई ।।

माझी तर अनन्य निष्ठा गिरिधर गोपालाच्या ठायीं आहे, अन्यत्र कुठें माझें मन रमत नाहीं. पण माझे गुरु रोहिदास आहेत. त्यांच्या चरणीं माझें चित्त लागून राहतें.

हे सारे उल्लेख सूर्यप्रकाशवत् स्पष्ट आहेत. मीराबाईच्या गीतांतील ह सर्वच उल्लेख प्रक्षिप्त कसे आणि कां मानायचे? या उल्लेखांतून[२१] अन्यान्य प्रकारें मीराबाईनेंच स्वतः सांगितलें आहे कीं, माझे सद्गुरु रोहिदास आहेत आणि त्यांच्याशीं ती अत्यंत कृतज्ञ आहे.

२१. मीराबाईचीं वरील सर्व अवतरणें अलाहाबादच्या हिंदी साहित्य संमेलनानें प्रकाशित केलेल्या आणि प्रमाणभूत मानल्या जाणाऱ्या 'मीराबाई की पदावली' मधील आहेत.

विठ्ठलदास किंवा विठ्ठलनाथ, जीव गोस्वामी आदि मीराबाईचे गुरु असण्याची शक्यता विद्वान् बोलून दाखवितात. पण तें कसें फोल आहे, हें आपण मागें पाहिलेंच आहे. स्वत: मीरा जें सांगतें आहे, त्यावर अविश्वास कां ठेवायचा, हें विचार करूनहि समजूं शकत नाहीं.

मीराबाई जर रोहिदासाच्या नंतर सोळाव्या शतकांत अवतरली असेल, तर तिच्या परमार्थसाधनेच्या प्रारंभींच्या काळींच तिला संत रोहिदासाची कृपा लाभली असेल. किंवा रोहिदासांनीं स्वप्नदृष्टान्त देऊन तिला शिष्य केलें असेल... केवळ मीरा ही सगुण ईश्वराची पूजिका आहे आणि रोहिदास संतमताचा वारसा सांगतात, म्हणून दोहोंत गुरु-शिष्येचें नातें नसावें, हेंहि म्हणणें योग्य नाहीं. रोहिदासाचें काव्य जरी ज्ञान-मार्गाचा पुरस्कार करणारें असलें आणि त्यानें जरी आचार्य रामानंदांचें शिष्यत्व स्वीकारलें होतें, तरी त्याचें काव्य एकांतिक वाटत नाहीं. त्यानें निर्गुणाचा पुरस्कार करतांना सगुणमतावर बहिष्कार टाकलेला नाहीं. त्यांची दृष्टि समन्वयाची आहे, त्याच्या ईश्वरनिष्ठेंत एक प्रकारचा समतोल आहे. आणि मीराबाईची भक्ति सगुणमताचा पुरस्कार करणारी आहे, म्हणजे तरी काय ? 'गगनमंडलपे सेज हमारी' या शब्दांत आपल्या भक्तीची अभिव्यक्ति करणारी मीरा निर्गुणबोधापासून दूर आहे, हें म्हणणें अन्यायाचें ठरेल.

मीरा आपल्या व्यक्तिगत जीवनांत दु:खीकष्टी झाली. तिची 'दरदभरी कहानी' पदापदांतून आजहि वाचकांच्या मनाचा ठाव घेते. त्याहि काळांत तिच्या म्हणण्याची उपेक्षा झाली. तिच्या ईश्वरानुरागाचें हसें झालें. तिच्या प्रत्येक कृत्यावर अविश्वासाच्या नजरा रोखल्या गेल्या. तिचें जीवन सतत मृत्यूचें भय दाखवून होरपळून काढण्यांत आलें.... मीरेवर तिच्या घरानें आणि दरबारानेंहि सदैव अविश्वास ठेवला... आज आम्हीहि तिच्या कथनावर पुन्हा अविश्वास ठेवून तिला 'दरददिवाणी' करीत आहोंत.

## रोहिदास आणि झाली राणी

चितोडगडच्या राणा कुंभाची ( सन १४३३–६८ ) पत्नी झाली. ही संत रोहिदासाच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें दिपून गेली आणि तिनें त्याचें शिष्यत्व पत्करलें, अशी एक कहाणी सेनाच्या 'कबीर-रोहिदास-संवाद' ग्रंथांत आहे. या ग्रंथाचा रचनाकाळ सन् १४४५ असा निश्चत झाला आहे.

म्हणजे रोहिदासाबद्दलची या ग्रंथांतील माहिती जर ग्राह्य धरली, तर ती सर्वाधिक प्राचीन उपलब्ध माहिती होय. ' भक्तमाल 'ची टीका लिहिणाऱ्या प्रियादासानेंहि झाली राणीच्या प्रसंगाची नोंद केली आहे. रोहिदासपंथीयांची आणि जनश्रुतींचीहि या घटनेस मान्यता दिसून येते. पण ही झाली राणी कोण, याविषयीं मात्र नाना प्रकारचीं मतें मांडलीं गेलीं आहेत. कोणी तिला राणा सांगाची पत्नी म्हणतात, तर पद्‌मावती शबनम या तिला राणा सांगाची माताच मानतात.[२२] कांहीं जण तिला राणा उदयसिंहाची पत्नी मानतात. आचार्य परशुराम चतुर्वेदींनीं स्वतःचें निश्चित मत दिलेलें नाहीं; परंतु ते या राणीला रोहिदासाची शिष्या मानतात. मीरा आणि झाली राणी यांच्यासंबंधीं कांहीं गफलत झाली असावी आणि मीरा रोहिदास-शिष्या नसून झाली राणीच त्याची शिष्या असेल, असें चतुर्वेदीजींनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

एक गोष्ट मात्र सर्व जण मान्य करतात कीं, झाली नामक कुणी चितोडची राणी रोहिदासाची शिष्या बनलेली होती. झाली राणी कोणीहि असली, तरी ती मीरा नाहीं, हें सूर्यप्रकाशवत् स्पष्ट आहे. झालीप्रमाणेंच मीरा हीहि रोहिदासाची शिष्या आहे.

श्री. रामानंद शास्त्री यांनीं आपल्या रोहिदासावरील ग्रंथांत झाली राणी-संबंधींची सर्व ऐतिहासिक माहिती देऊन त्या आधारें या सर्व घटनेची सत्यासत्यता स्पष्ट करून सांगितली आहे. त्यांचें म्हणणें त्यांनीं चांगल्या प्रकारें पटवून दिलें आहे—झाली नामक चितोडची राणी राणा कुंभाची पत्नी होती आणि ती आपल्या काशी-यात्रेच्या वेळीं संत रोहिदासाची शिष्या बनली. राणी झाली आणि मीरा या दोन स्त्रिया एकच आहेत, असें म्हणण्यास कसलाहि आधार नाहीं.[२३]

झाली राणीच्या रोहिदास-शिष्यत्वास असलेली ही सर्व मान्यता पाहिली कीं, तिच्या ऐतिहासिक व्यक्तित्वाची निश्चित स्वरूपाची आणि सांगोपांग

---

२२. मीरा : एक अध्ययन—पद्‌मावती शबनम्, पृष्ठ १०६.

२३. संत रविदास और उनका काव्य : रामानंद शास्त्री वीरेंद्र पाण्डेय पृ. १६२–१६८.

माहिती उपलब्ध झाली पाहिज, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. कारण त्या ऐतिहासिक व्यक्तित्वाच्या मिणमिणत्या प्रकाशांत तरी संत रोहिदासांचें तेजस्वी व्यक्तिच आमच्यासमोर स्पष्ट उभ राहील.

-- एवंच, रोहिदासाच्या चरित्राप्रमाणेंच त्याच्या चरित्राशीं कमीअधिक प्रमाणांत निगडित असलेल्या व्यक्तींचीं चरित्रेंहि संदिग्धतेनें ढगाळलेलीं आहेत.

• • •

थोथी काया थोथी माया, थोथा हरिबिन जनम गँवाया ।
थोथा पंडित थोथी बानी, थोथी हरिबिन सबै कहानी ।।

# संतमताचा वारसा

## वादळानंतरची शांतता

दहाव्या शतकानंतर उत्तर भारतांतील जनजीवनाला आक्रमकांची काळी छाया भेडसावूं लागली होती. राजकीय गुलामगिरीच्या जोडीलाच सामाजिक विषमतेची भर पडलेली. त्यांतून समाजाचें सारें स्वास्थ्यच हरवून बसलें.

दोन शतकें लोटलीं, तेराव्या शतकापर्यंत दुर्दैवाचे दशावतार पाहत राहिलेला समाज कांहींसा सावरलाहि, पण या सावरण्याला वादळानंतरच्या शांततेचीं उपमा देतां येईल. पराधीनत्वाच्या दुःखांतून एक प्रकारें समजूतदार-पणानें निर्माण झालेली ही शांति म्हणजे औदासीन्याचें दुसरें नांव होतें.

याच काळांत महाराष्ट्रांतून भक्तीची ध्वजा हातीं घेऊन संत नामदेव पंजाबांत पोहोचले. नामदेवासंगें मराठी संतसांगाती होते. त्यांनीं महाराष्ट्र देशांतून भक्तिरसाचा ओलावा आणला होता. त्याची गोडी अवीट होती. महाराष्ट्रानें या कालापर्यंत भक्तिभावानें कलिकालावर मात केलेली होती. ज्ञानियांचा राणा येथें अवतरला होता. ज्ञानेश्वरमंडळाच्या दिव्य प्रभेनें सारा मराठी समाज उजळून निघाला होता. साऱ्या तत्त्वज्ञानाचें सार असलेली गीता ज्ञानेशांच्या भावार्थदीपिकेच्या रूपानें मराठी समाजाला लाभली होती. गुरु गोरक्षनाथाच्या योगमताचा वारसा लाभलेले ज्ञाननाथ आणि त्यांच्या प्रभावळींतील संतमंडळीं यांनीं मराठी समाजमनाला भक्तीची एक शिस्तच लावली होती.

देव देऊळ परिवारू । कौजे कोरूनि डोंगरू ।
तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न व्हावा ? ।।

भक्तीचा व्यवहार एकरस आहे; अद्वैताच्या सिद्धान्ताशीं भक्तिसाधना सुसंगत आहे, अशी ज्ञानदेवांची श्रद्धा. नामदेव या श्रद्धेनें भारला होता.

सगुण-निर्गुणाचा वाद त्याच्या ठायीं उरला नव्हता. तो हरिनामाचीं वस्त्रें शिवणारा शिंपी नामदेव उत्तरेंत येऊन भावुक सुरांत गाऊं नाचूं लागला—

का करौ जाती का करौ पांती।
राजा राम सेऊं दिन राती ॥
मन मेरी गज जिभ्या मेरी काती।
राम रमे काढौं जमकी फांसी ॥

साऱ्या वादविवादांपासून मुक्त होऊन हरिरूपी निधि लुटावा, असा त्याचा सांगावा आहे—

वाद छांडि रे भगता भाई ! हरि सीं तै निधी पाई।
राम तजि मेरो मन अनत न जाई ॥

समन्वयाच्या सुंदर अधिष्ठानावर नामयाची अभंगवाणी आधारली आहे. सुदूर उत्तरेंत गेलेला नामा भावभक्तीची ही समजूतदार कहाणी सांगून एक नवेंच चैतन्य प्रकट करून गेला, हें मध्ययुगाचें महद्‌भाग्य म्हणावयास हवें.

## संतांचें बंड

तेराव्या शतकाच्या समाप्तीनंतर भारताचें हें भाग्य जागें राहिलें. सत्यनिष्ठ रामानंदांचा अवतार होऊन भक्तिगंगेचा प्रवाह अखण्ड वाहत राहिला. इतकेंच नव्हे, तर त्या प्रवाहाची व्याप्तिहि वाढली. रामानंदांनीं धार्मिक विषमतेविरुद्ध बण्डाचा झेंडाच उभारला. वर्णभेदानें जर्जर झालेला आणि अंधश्रद्धांनीं अवनत झालेला भारतीय समाज रामानंदांच्या चैतन्ययुक्त स्वरांनीं खडबडून जागा झाला. मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्राच्या पावन नामानें समाजाच्या कर्तृत्वाला चालना लाभली. समाजाचे सारे थर आंदोळून निघाले.

रामानंदांच्या समतेच्या यज्ञामध्यें कितीकांची साथ लाभली. त्यांच्या उदार आश्रयानें ईश्वरनिष्ठांची मांदियाळी बंडच पुकारून उठली. हें बण्ड होतें असत्याविरुद्ध, ही चळवळ होती अन्यायाविरुद्ध. हें आंदोलन पेटलें होतें तें खुळचा अंधश्रद्धा आणि खोटचा रूढी यांच्या बंधनाविरुद्ध.

हें बण्ड म्हणजेच संतमत. सगुणनिर्गुणाचा झगडा त्याला अभिप्रेत नव्हता. हठयोगाचा हट्टाग्रहहि त्यानें धरलेला नव्हता. सर्वसमावेशक दृष्टिकोन घेऊन प्रखर सत्यनिष्ठा आणि अनुभवप्रामाण्य यांच्या आधारें मनाची मशागत करून मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचें उन्नयन करणें हें या संतमताचें ब्रीद होतें. सहजसाधनेवर त्याचा विश्वास होता. बाह्याडंबरास बडवून काढून, खऱ्या-खुऱ्या सत्यधर्माची उभारणी करून, परस्पर प्रेमभावानें व्यक्तीचा विकास घडविण्यावर संतमताचा जोर होता...संतमत सुनिश्चित अशा भूमिकेवर आधारलेलें होतें. त्याचा विजय झाला... संतांचें बंड सर्वार्थानें यशस्वी झालें.

## सर्वसमावेशक उदार दृष्टिकोन

नामदेव, रामानंद आणि त्यांचें संतमण्डळ यांचें औदार्य साऱ्या समाजास सामावून घेणारें होतें. किंबहुना, संत-साहित्याचा हाच सर्वांत मोठा विशेष होय. ब्राह्मण-महार, मराठा-मांग, राव-रंक...असा कसलाहि जातीजमातींचा आणि वर्गभेदाचा विचार त्यांना मान्य नव्हता. आमच्या समाजाला जडलेल्या या रोगापासून मुक्ति दिली ती संतांनीं. त्यांची हाक होती–

जाति न पूछो साधुकी, पूछि लीजिए ज्ञान।
मोल करो तलवार का पडा रहन दो म्यान ।।

हरीचें नामचिंतन करणारा भक्त तो हरिजन, असा त्यांचा सुबोध विचार. हरिजन हे प्रत्यक्ष हरीच देऊं शकतात, असा त्यांचा आत्मविश्वास. जाति-भेदांच्या कुविचारांत गुरफटून गेलेल्या पंडितांना त्यांचा सवाल आहे.

पंडित देखहुं मनमहँ जानी !
कहु धौं छूति कहाँ ते उपजी,
तबहि छूति तुम जानी ।।

या स्पृश्यास्पृश्यतेचा खुळा समज पसरविला तरी कुणी ? पंडिता ! तूं कधीं शांतचित्तानें या गोष्टीचा विचार केला आहेस काय ? दादूदयाल म्हणतात–

दादू संगति साधकी राम रह्या भरपूर !

पलटूदास समजावतो–

'साईं सरीखे संत हैं यामें मीन न मेख ।

कबीराची भाषा जरा स्पष्टपणाची. त्यानें असा पुकाराच केला, " अरे पंडित-मौलवींनो ! आम्ही मुळीं तुमच्या या भेदग्रस्त जगाचे रहिवासीच नाहीं. आम्ही परब्रह्माच्या प्रदेशांतील माणसें ! तुमचा हा संकोचाचा पसारा आम्हांस सांगू नका. जातिवर्णाचा विचारच आम्हांला ठाऊक नाहीं–

'हम वासी वा देशके, जहाँ जाति बरन कुल नाहिं ।'

## प्रखर सत्यनिष्ठा

संतांची सत्यावरची निष्ठा अढळ होती. या सत्यरूपी सूर्याचा प्रकाश अत्यंत प्रखर असा न भासला तरच नवल ! संतवाणी या सत्यव्रतापायीं खंडनप्रचुर बनली, असा आक्षेप घेण्यांत येतो. हे कवि अत्यंत कडक शब्दांत सत्य समजावून सांगतात, हें म्हणणें योग्यच आहे. कारण त्यांचा अढळ विश्वास आहे––

साच बराबर तप नहीं, झूट बराबर पाप !

सत्यापरतें दुसरें तप नाहीं आणि असत्याएवढें दुसरें थोर पाप नाहीं. अनुभवास पटतें तें सांगणें म्हणजे सत्य, अनुभवाच्या बळावर एखादी गोष्ट सांगतांना भयाचा लवलेशहि शिवत नाहीं.

जहँ अनभव तहँ भै नहीं, जहँ भउ तहँ हरि नाहीं ।

जेथें खराखुरा अनुभव आहे, तेथें भयाला जागाच नाहीं. जेथें भयाचें अस्तित्व आहे, तेथें ईश्वराचें अस्तित्व नाहीं, अशी संतांची श्रद्धा होती.

परब्रह्माचें तेज कसें आहे, याचें अनुमान कसें करावें ? ती तर प्रत्यक्ष पाहण्याची वस्तु, पाहिल्याविना बोलण्यांत कांहीं प्रयोजनच नाहीं, इतका त्यांचा अनुभवावरचा विश्वास विशुद्ध होता. प्रखर सत्यनिष्ठेमागें आणि अनुभवप्रामाण्यामागें त्यांचा जबरदस्त आत्मविश्वास उभा असे. म्हणूनच कबीर छातीठोकपणें सांगतो––

तू कहता कागज़की लेखी !
मैं कहता आँखिनकी देखी !
मेरा तेरा मनुआ कैसे इक होई रे ! !

अरे, तूं तर कागदावरच्या कथा सांगत बसतोस. मी जें माझ्या डोळ्यांना दिसतें तें सांगतों. तुझें-माझें जुळायचें तरी कसें ?

संतांच्या 'साखी' मध्यें असें अनुभवाचें बळ आहे. साखी म्हणजे साक्षी–प्रत्यक्ष पाहून, अनुभवून सांगितलेली गोष्ट.

## व्यक्तित्वाचा विकास

सत्याचें व्रत घेऊन निघालेले संत समाजाला आपल्या साक्षीयुक्त कथनांनीं जागरूक करीत होते, त्यांच्या ह्या साऱ्या प्रयत्नांमागें मानवास व्यक्तित्वसंपन्न करण्याची तळमळ होती. माणूस जर चरित्रबळानें उन्नत होईल, तर आमचा समाज साऱ्या अडीअडचणींवर मात करून सुखा-समाधानानें नांदूं लागेल, असा संतांना विश्वास वाटत होता.

**मैं कहता सुरझावनहारी, तू कहता अरुझाइ रे !**

आम्ही समजण्यासारखेंच सांगतों आहोंत आणि तुम्ही म्हणजे धर्माच्या नांवावर मिथ्याचार करणारी मंडळी मात्र न पटण्यासारख्या गोष्टी करीत आहांत. अडाणी माणसाला स्वर्गसुद्धां नरकाप्रमाणें वाटेल. वास्तविक ज्ञानानें तो जर उन्नत झाला, तर त्याला हें जगच स्वर्गाप्रमाणें भासेल. संत म्हणतात.

**अनजानेको सरग नरक है, हरिजानेको नाहीं !**

संतांनीं आमच्या समाजाचें दौर्बल्य बरोबर जाणलें होतें. अज्ञान आणि अंधश्रद्धा हे या समाजाला मिळालेले शाप होते. त्यावरच विजय मिळवून व्यक्तित्वाचा विकास घडविला, तर समाजाची विसकटलेली घडी पुन्हां एकदां सावरली जाईल. व्यक्तीव्यक्तीच्या विकसनांतून समष्ठि श्रेष्ठत्वाप्रत जाईल, असें संतांचें तर्कशुद्ध तत्त्वज्ञान होतें. त्यासाठीं त्यांनीं अनेकविध मार्गांनीं प्रयत्नांची शिकस्त केली.

## एकेश्वरवाद

भेदाभेदांनीं भग्न झालेल्या धर्मकारणास सावरण्यासाठीं संतांनीं एके-श्वरवादाचा सिद्धान्त मांडला. कबीरानें घोषणा केली--

**कृष्ण करीम एक है भाई !**

ईश्वराच्या दरबारीं केवळ जातीजमातींचाच वाकुडेपणा अमान्य नसून हिंदु-मुसलमान असा धर्माधर्मांचाहि भेद तेथें नाहीं. महंमद काय आणि महादेव काय, हीं एकाच सर्वशक्तिमानाचीं दोन नांवें–

वही मुहमद महादेव वही ब्रह्मा आदम कहिये !

हिंदुधर्मीयांनीं सृष्टीचा कर्ता ब्रह्मा मानला, इस्लामनें त्याला आदम म्हटलें आहे. तो सारा शब्दांचा फरक. संतांचा प्रश्न आहे–

भाई रे, दुई जगदीस कहाँ ते आया, कहुं कौन भरमाया ?

'तुझ्यांत हा भ्रम कुणीं भरविला ? दोन दोन जगदीश्वर येतील कुठून ?' आणि जरा हा जगताचा पसारा पहा बघूं डोळे उघडून, तुला स्पष्ट दिसेल–

गहना एक कनक ते गढ़ना, इनि महँ भाव न दूजा !

सोन्याचे तऱ्हेतऱ्हेचे दागिने बनवितोस, पण सोनें शेवटीं एकच, असाच हा प्रकार. अधिक सोप्या भाषेंत सांगायचें तर—

माटी एक अनेक भाँती करि, साजी साजनहारें !

अरे, माती सारी इथून तिथून एक. तूं तुझ्या सोयीसाठीं तऱ्हेतऱ्हेचे आकार दिलेस, अजूनहि देतच राहिला आहेस. या साऱ्या खेळांत सत्य हरवून बसलास कीं काय ? ही भ्रमाची स्थिति पाहून दादूदयाल म्हणतो–

दादू सिरजनहारके केते नाउ अनंत ।
चित आवइ सो लीजिये, यों साधू सुमिरहिं संत ।।

सृजनकर्त्या ईश्वराचीं नांवें अगणित आहेत. जें तुझ्या मनाला रुचेल तें घे. साधुसंतहि नामस्मरण असेंच करतात.

संतांनीं ही अशी खलिकखालिकाची, आत्म्या-परमात्म्याची, ब्रह्मा-आदमची एकी समजावून सांगितली. अनेकविध नांवरूपें धारण केलेल्या त्या ईश्वराचें रहस्य उलगडून दाखविलें. मतामतांचा गलबला शमला, कृष्ण-करीमाचा नि रामरहीमाचा खुळा संघर्ष थबकला, धर्मकारणास लागलेलें भेदाचें ग्रहण सुटलें, संतांनीं आमच्या समाजास ईश्वराचें सत्य स्वरूप समजाविलें. समाज मानसिक पातळीवर समर्थ बनला.

## पाहन पूजें हरि मिलै, तो मैं पूजूं पहार !

मध्ययुगाच्या धार्मिक दुर्दशेमागें धर्मवेडाबरोबरच दांभिक पण्डित-मोलवींचे अनाचार ठाण मांडून बसले होते. ईश्वराच्या दरबारांत प्रविष्ट

होण्यासाठीं या खोटया दलालांकडून लुटून घेण्यांत कांहीं वावगें आहे, हेंहि सामान्यांना नीटपणें उमगत नव्हतें. खुशाल ते विकले जात. त्यांच्या भोळेपणाचा भरपूर फायदा घेऊन मुल्ला-पंडितांनीं बाह्याडंबराचा पसारा पसरला. तीर्थ-व्रत-वैकल्यें वाढलीं. पूजे-अर्चेचे हृदयशून्य कर्मकांड माजलें, आणि या साऱ्या वेडेपणांतून धर्माची ठेकेदारी सुरू झाली. म्हणून शेवटीं कबीरादि संतांनीं उपहासाचें शस्त्र उपसलें. समाजाच्या या बालिशपणावर दुसरा तरी कोणता उपाय चालणार होता ! म्हणून कबीर थट्टा करून म्हणतो–

पाहन पूजै हरि मिलै, तो मैं पूजूं पहार।
इनतें चाकी भली, पीस खाय संसार ।।

अरे ! दगडागोटयांची पूजा करून जर तुला ईश्वर लाभणार असेल, तर मी भल्यामोठया डोंगराचीच पूजा करतो. पण त्यापेक्षां मग पिठाची गिरणी बरी नव्हे का ? ती भाकरीसाठीं पीठ तरी देते. तिची पूजा करूं या.

आणि तूं हें जें मुंडन-कर्म करतोस, त्याचें प्रयोजन काय ? अशानें जर वैकुंठाला पोहोंचणार असतास, तर मग भादरलेल्या मेंढया तुझ्या आधीं नकोत का वैकुंठीं जायला ?–

मुंड मुंडाये हरि मिले, तो मैं मुंडूं सौ बार।
बार बार ते मुंडई, भेड न बैकुंठे जाय ।।

तुझ्या या साऱ्या तीर्थयात्रा म्हणजे व्यर्थचा खटाटोप आहे. संतांचें तुला स्पष्ट सांगणें आहे–

देव पूजि पूजि हिंदु मुए। तुरक मुए हज जाई ।।

ही हाज आणि काब्याची यात्रा असो कीं काशीची.–हें भटकणें स्वतःच्या नाभींत असलेल्या कस्तुरीची जाण नसलेल्या वेडया हरणाचें आहे. तुझें स्वतःस त्रास देऊन घेणें तर निव्वळ मूर्खपणाचेंच–

जटा बाँधि बाँधि योगी मुए, इनमें किनहूँ न पाई !

हा हट्टाचा प्रकार झाला; साधना ही नव्हे. स्वतःचें चारित्र्य उंचावणें ही खरी साधना. मशिदींत उभें राहून ओरडण्यानें किंवा नदींत उभें राहून आकाशांतल्या ईश्वराला आळवण्यानें तूं काय मिळविणार, अशी पृच्छा संत करतो–

मसजिदमें मुल्ला बांग दे, क्या तेरा साहिब बहरा है !

संतांनीं केलेल्या या उपहासगर्भ विनोदांत कडू आवरणांतील दिव्य औषधांचें सामर्थ्य होतें. त्याचा परिणाम फार चांगला झाला. धर्माच्या नांवावर दलाली करणाऱ्या पंडित-पुजारी मंडळींस आणि मुल्ला-मौलवींसहि, पायाखालचें जग हलतें आहे, असा भास झाला. संतांच्या सवालांनीं समाजाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें, बाह्याडंबराचें स्तोम कमी झालें. संतांच्या क्रांतिकारक कार्याचा हा विशेष विसरून चालरणार नाहीं !

## साधो, सहज समाधि भली ?

संत म्हणजे हठयोगी, अशी एक चुकीची धारणा बनलेली आहे. संतांनीं योगाचा स्वीकारच केला नाहीं, असें नव्हे, परंतु योगी बनून समाजापासून विन्मुख व्हा, असें संतांना कधींच अभिप्रेत नव्हतें. त्यांच्या विचारसरणींत सामान्यांसाठीं आणि असामान्यांसाठीं असे दोन स्वतंत्र मार्ग सांगितलेले दिसतात. असामान्यांनीं व्यक्तिगत साधनेंत शक्य ती सर्व प्रगति करावी. परंतु सामान्य जनांनीं सदाचाराच्या मार्गानें जावें, विवेकाची कास सोडूं नये; परंतु अकारण स्वत:स कष्टहि देऊं नयेत. कायामारणापेक्षां मनोमारणच श्रेयस्कर. तेंच सहजस्वाभाविक म्हणून श्रेष्ठ. कबीरानें यालाच सहजसमाधि म्हटलें आहे. सहजसाधना म्हणणे नित्य कर्मांत दक्ष राहून स्वत:च्या मनाचा विकास करणें. षड्विकारांवर विजय मिळवून व्यक्तित्व संपन्न करणें म्हणजे सहजसमाधि. असें झाल्यानें सारें जीवनच आनंदमय होऊन जातें. कृतीकृतींतून आनंद ओसंडूं लागतो. कबीराच्याच शब्दांत सांगायचें तर--

साधो, सहज समाधि भली ।
गुरुप्रताप जा दिनसे उपजी, दिन दिन अधिक चली ।
जहँ तहँ डोलों सोई परिकरमा, जो कछु करों सो सेवा ।
जब सोवों तब करों दण्डवत, पूजों और न देवा ।
कहों सो नाम सुनों सो सुमिरन, खांवपियों सो पूजा ।
गिरह-उजाड एकसम लेखों, भाव न राखौं दूजा ।
आंख न मूंदो कान न रुँधों, तनिक कष्ट नहिं धारों ।
खुले नैन पहिचानौं हँसि हँसि, सुंदर रूप निहारों ।

## मनाची मशागत

संतांनीं मनाचें नियमन आणि संवर्धन करण्यावर भर दिला, सामान्यांस असामान्यत्व मिळवायचें असेल, तर प्रथम मनावर विजय मिळवावयास हवा, मन सुस्थिर करून त्याची मशागत करायला हवी. षड्विकारांनीं ग्रासलेल्या मनाची त्यांच्या तावडींतून सुटका करणें म्हणजे सफल जीवनाची तयारी करणें. यासाठीं संतांनीं परोपरीनें उपदेश केला आहे. कधीं ते नामस्मरणाच्या रसायनाचें रहस्य समजावून सांगतात, तर कधीं गुरु आणि गोविंद यांचें ऐक्य स्पष्ट करून दाखवितात. साधुसज्जनांच्या संगतीचा महिमा वर्णन करून हरिजनांचा बडिवार सिद्ध करतात, तर केव्हां प्रेमाचीं 'अडीच' अक्षरें शिकण्याची शिकवण देतात. असा सारा हा संतांचा मारग आम्हांला सदाचाराच्या वाटेनें नेतो. त्याचा स्वीकार करून सामान्य माणूस त्या छोटयाशा पण अत्यंत शक्तिसम्पन्न असलेल्या मनावर सत्ता चालवितो .... ही मनाची मशागत संतांनीं स्वतः केली. आधीं केलें, मग सांगितलें – या न्यायानें त्यांनीं ती समाजास समजावून सांगितली. संतांनीं हा मूलाघातच केला – अगदीं मर्मावर बोट ठेवलें. त्यांची खात्री होती कीं, अनेकानेक तीर्थयात्रांनीं आणि मुंडनांनीं जें साधणार नाहीं, तें मनाच्या नियंत्रणानें साधणार आहे. त्या साऱ्या यात्रा खरें तर मनाच्या ठायींच प्रथम करायला हव्यात, त्या छोटयाशा मनांत 'सत्तर काबे किंवा काशी' आहेत, त्यांची ओळख करून घ्यायला हवी–

सत्तर काबे इक दिल भीतर जे करि जानैं कोई !

आणि म्हणून प्रश्न–

मनको काहे ना मूंडिये जामें विखै विचार।

त्या मनासच कां आपण काबूंत ठेवूं नये – ज्यांत नाना विषारी विकार ठाण मांडून बसले आहेत ?

## नामस्मरणाचें रसायन

हरिनामाचें स्मरण करून मन एकाग्र करावें, हा केवढा सुंदर विचार ! निर्गुण निराकार परब्रह्माचें 'नांव' घेऊन चित्त शुद्ध करायचें, मनांत दुसरा-तिसरा कोणता विचारच डोकावूं द्यायचा नाहीं. ही साधना साधी पण

परिणामीं अद्भुत अशी आहे. नामस्मरणामागें 'नामिन्' चें-तें नांव ज्याचें आहे, त्या परमात्म्याचें-सारें महिमान उभें असावें लागतें, त्याची जाण असावी लागते. म्हणून संतांनीं आपल्या मनाला पुनः पुन्हा म्हटलें--

मन रे ! हरि भज हरि भज
हरि भज भाई !

ह्या मनरूपी सख्यानें ही एक गोष्ट ऐकायलाच हवी, त्याविना दुसरा पर्याय नाहीं. कारण,-

जा दिन तेरो कोई नाहीं, ता दिन नाम सहाई !

ज्या दिवशीं अन्य कुणी तुझा नाहीं, त्या दिवशीं तें रामनाम तुझी साथसोवत करणार आहे. कबीरदासांना तर या नाम-सुमिरनाचा इतका आत्मविश्वास होता कीं, त्यांनीं आपला अनुभवच मांडला आहे -

सभी रसायन हम करी, नहीं नाम सम कोय !

## सद्गुरु गोबिंदो एकसमान

साधनापथावर वाटचाल करावयाची असेल, तर सद्गुरुविना मार्ग गवसणार नाहीं. ह्या विषारी विकारांतून वांचण्यासाठीं गुरु अमृत तत्त्वाची खाणच आहे. चारहि वेद, ब्रह्मा, विष्णु आणि महेश हेहि या सद्गुरूपुढें कमी महत्त्वाचे ठरतात, अशी संत धरमदासाची प्रचीति आहे —

गुरुपद अहै सबनसे भारी ।
चारौ वेद तुलै नहिं गुरुपद, ब्रह्माविष्णुब्रह्मचारी ।

संत कबीराचाहि अनुभव असाच आहे--

सत्गुरुकी महिमा अनंत । अनंत किया उपगार ।
लोचन अनंत उघाडिया । अनंत दिखावणहार ।।

सद्गुरूच्या ठायीं अनंत दिखावनहाराची शक्ति आहे. तो सर्वज्ञ आहे त्याचे उपकार अनंत आहेत, त्याच्याच कृपेनें आम्ही सारें ज्ञान प्राप्त करतों.

आणि गुरूच्या ठिकाणची ही श्रद्धा डोळस आहे. सद्गुरु कसा असावा, हेंहि स्पष्ट सांगायला संत मागेंपुढें पाहत नाहींत. सद्गुरूचें हें स्वरूप पहा-

गुरु कुम्हार सिष कुंभ है, गढ़ गढ़ काढै खोट।
अंतर हात सहार दे, बहार बाहै चोट ॥

सद्गुरु हा कुंभारासारखा असायला हवा. तो कुंभार घडा घडवितांना बाहेरून सारखा फटके लगावीत असतो. त्याचा एक हात मात्र हळुवारपणें घडा फुटूं नये, याची खबरदारी घेत असतो आणि अशा रीतीनें घडा निर्दोष होऊन जातो. गुरु शिष्याला आंतरिक प्रेमाची साथ देतो, पण अत्यंत करारीपणानें शिष्याचे सारे दोषहि दूर करतो. कबीरानें एके ठिकाणीं या कृत्यास दुसरा एक सुंदर दृष्टान्त दिला आहे–

सतगुर ऐसा चाहिए, जैसा सिकलीगर होइ।
सबद मसकला फेरि करि, देह द्रपन करै सोइ ॥

कात्रीला धार लावणाऱ्या सिकलगाराप्रमाणें गुरु असतो. 'शब्द'–रूपी चक्र फिरवून फिरवून तो शिष्याचा देह दर्पणाइतका पारदर्शी बनवितो.

अशा या सद्गुरुमाहात्म्याचे पोवाडे गातांना संत देहभान हरवून बसतात. जनसामान्यांना गुरुकृपेची महती समजावून देतांना कबीर सद्गदित होऊन म्हणाला होता—

गुरु गोविंद होऊ खडे, काके लागौ पाय।
बलिहारी गुरु आपणे, गोबिंद दियौ बताय ॥

गुरु आणि गोविंद यांमध्यें कोणाची निवड मी करूं? .. धन्य धन्य गुरुमहाराज! आपणच मला हवे आहांत, कारण आपणच मला गोविंद दाखविला.

दादूदयाल गुरूच्या अद्भुत सामर्थ्यावर प्रकाश टाकतांना सुबोध शब्दांत सांगतात–

दादू देव दयालको गुरु दिखाई बाट।
ताला कूंची लाइ करि, खोले सबै कपाट ॥

## सत्संगमहिमा

संतांची वृत्ति जशी खंडनात्मक होती, तशीच ती विधायकहि होती, हें वरवर पाहणाऱ्यालासुद्धां जाणवून गेल्याशिवाय राहत नाहीं. धर्मकारणांतील कुप्रथांविरुद्ध त्यांनीं आवाज उठविला, पण त्याचबरोबर व्यक्तीच्या

विकासाच्या नव्या दिशाहि सूचित केल्या. सत्संग ही संतांच्या आवडीची वाट. त्यांची अशी प्रतिज्ञाच आहे–

मेरे संगी दोइ जगां एक वैष्णो एक राम !

हा वैष्णव म्हणजे टिळे आणि माळा यांमध्यें फसून गेलेला धर्मभोळा नव्हे, हा वैष्णव म्हणजे सदाचारी साधु. त्याची बरोबरी रामचंद्राशीं करता येईल. त्याच्या संगतींत साऱ्या व्याधि नष्ट होऊन जातात.

कबिरा संगत साधकी हरै औरकी व्याधि !

हें जगत् नाना प्रकारच्या दु:खांनीं भरलेलें आहे. विकार माणसाला सदैव व्यथित करतात; त्याला पथभ्रष्ट करतात. संतांना त्याची जाण आहे–

काजल केरी कोठरी तैसा यहु संसार !

अशा या जगांत विशुद्ध चरित्र राखून जगणें जरा अवघडच. काजळीनें भरलेल्या खोलींत शिरायचें, म्हणजे परततांना काजळीचा एक डाग तरी उठणार. पण हेंच तर होऊं द्यायचें नाहीं. शिवाय, मानवाचा जन्म साधासुधा नाहीं–

मानुख जनम दुर्लभ है, होई न बारंबार !

माणसाचा जन्म दुर्लभ आहे. आपल्या वांटचाला आलें तें जीवन ऊर्ध्वगामी करा,–केवढा थोर विचार हा !

जीवन सुफलित करण्याचें साधें नि सोपें साधन म्हणजे सत्संग. विवेकशीलतेनें सार ग्रहण करून स्वत:चें जीवन-चरित्र उज्ज्वल करणाऱ्या साधूंचा संगति-लाभ घ्यावा, त्यांच्यापासून खूप शिकावें, त्यांस दर्पणाप्रमाणें मानावें. गंगेच्या पवित्र जलासारखा त्यांचा महिमा आहे–

जाइ मलै जब गंगमें तब सब गंगो दकहोई !

गंगाजलांत मिसळून जाणारा थेंबन् थेंब पवित्र होऊन जातो. सत्संगानें मानवास सफलत्वाचा परिसस्पर्श होतो.

## सदाचाराची शिकवण

संतांनीं सदैव सदाचाराची सुंदर शिकवण दिली. समतेच्या तत्त्वावर त्यांनीं नव्या समाजाची उभारणी करण्याचा यत्न केला. वेडयावाकुडया रूढि–प्रथांना मूठमाती देऊन अनुभवप्रामाण्याचा महिमा सांगितला; चरित्रचारित्र्या-

च्या विमलत्वाचा आग्रह धरून माणसास सुसंस्कृत बनविण्याचा विराट् प्रयत्न केला. मायामोहाच्या पसाऱ्यांतून मनुष्याची सुटका व्हावी म्हणून त्यांनीं सतत पुकारा केला–

माया मुई न मन मुआ, मरि मरि गया सरीर।
आसा तृष्णा नां मुई, यों कहि गया कबीर॥

कबीर म्हणून गेला कीं, माया सरली नाहीं, मन संयमित केलें नाहीं, आशा तृष्णा विरली नाहीं आणि जीवन समाप्त झालें–यासारखी दुःखाची दुसरी गोष्ट कोणती ? आणि समजा तुम्ही केवळ मायेवरच विजय मिळविला, तर भागण्यासारखें आहे का ?..

माया तजी तौ का भया मानि तजा नहिं जाइ।
मानि बडे मुनिवर मिले, मानि सबनको खाया॥

मायेइतकाच दंभ खोटा, त्याचा त्याग प्रथम करायचा. गर्वापोटीं किती ऋषिमुनि तपभ्रष्ट ठरले. गर्व सर्व गुणांस खाऊन टाकतो. गर्वासारखा शत्रु नाहीं. तशीच काळासारखी बिनभरंवशाची वस्तु नाहीं–

कबीर गरब न कीजिए काल गहे कर केस।
ना जानौं कहं मारि है कै घर कै परदेस॥

काळ कधीं केसानें गळा कापील, तें सांगतां येणार नाहीं. त्याचा भरंवसाच कुणी देऊं नये. कुठें तो मनुष्यास चिरनिद्रा घेण्यास भाग पाडील, सांगतां येत नाहीं. पहाटेच्या ताऱ्याकडे पाहा. आणि मग तुला जीवनमरणाचें रहस्य कळून आल्याशिवाय राहणार नाहीं–

पानी केरा बुदबुदा अस मानुसकी जात।
देखत में छिप जायगा ज्यों तारा परभाता॥

जीवन क्षणभंगुर आहे. त्याचा आपण स्वीकार करायलाहि हवा. इथें कुठें कायमचें राहावें लागणार आहे ? म्हणून जेवढे दिवस राहायचें, तें सदाचाराच्या वाटेनें चालत राहायचें. सतत दुसऱ्याची जाणीव ठेवायची. कबीर सांगतो–

कबिरा सोई पीर है जो जानैं पर पीर।
जो पर पीर न जानई, सो काफिर बेपीर॥

जो दुसऱ्याची जाणीव ठेवीत नाहीं, तो केवळ अधार्मिकच नाहीं, तर दुर्जन होय.

असें विवेकाचें, जाणिवेचें, सदाचाराचें जीवन समाधानाचें झाल्याखेरीज राहणार नाहीं. आणि संतोषधन हें तर सर्व धनांत सर्वोपरि आहे–

गोधन गजधन बाजिधन, और रतन धनखान
जब आवे संतोष धन, सब धन धूरि समान ।।

## ढाई अच्छर पीवका

सत्संगाचा महिमा गाऊन आणि मनोबलाचा विकास करण्याची शिकवण सांगूनच संत थांबले नाहींत. त्यांच्यासमोर तत्कालीन भारतीय समाज होता. त्यांनीं मांडलेल्या समतेच्या यज्ञामागें तत्कालीन श्रेष्ठींविषयीं दुष्टाव्याची भावना नव्हती. भेदाभेद मनुष्याच्या अविवेकी वागण्यामुळें होतात. त्यासाठीं विवेकाला हाक द्यायला हवी, एवढीच संतांची भूमिका होती. भारतीय समाजांत जशी त्यांना समता हवी होती, तशीच समता त्यांना येथें मागाहून आलेल्या परकीयांत आणि स्वकीयांतहि निर्माण करायची होती. संतांचा हा उदात्त प्रयत्न भारतीय साधनेंतील सर्वसहिष्णु वृत्तींतून विकसित झाला होता.

सारा समाज–मग तो विभिन्न वर्णांचा, जातिजमातींचा, भिन्न भिन्न धर्मांचा जसा कसा आहे, तसा तो परस्परस्नेहानें एक व्हावा, असा संतांचा प्रयत्न होता. त्यासाठीं त्यांनीं मध्यममार्गाची निवड केली. भारतीय साधनेच्या अनेकानेक प्रवाहांतून त्यांनीं चांगलें तें घेऊन आपलें प्रेमाचें दर्शन सिद्ध केलें. हाच कबीराचा प्रेममार्ग किंवा साधनेंतील मध्यममार्ग. कबीरानें पुस्तकी पांडित्याचा निषेध करून प्रेमाचीं अडीच अक्षरें शिकण्याचा आग्रह धरला आहे––

पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ, पंडित भया न कोय।
ढाई आछर पीवका पढ़ै सु पंडित होय ।।

पोथ्या-पुराणें वाचून आणि महाकाव्यांचें पठन–पाठन करून जर परस्परांविषयींचा प्रेमभाव जागृत होणार नसेल, तर त्यांचा काय उपयोग ? मनुष्यानें अशी वाणी वदावयास हवी कीं, जिच्यायोगें मनाचा सारा गर्व जळून जाईल, अन्यांना आनंद वाटेल आणि स्वतःसहि आल्हाद वाटेल.

ऐसी बानी बोलिए मनका आपा खोय।
औरनको सीतल करै, आपहुं सीतल हौय ।।

ही गोष्ट खचितच सोपी नाहीं. कारण—

नेंह निभावन एकरस महाकठिन ब्यौहार।

परंतु त्या कठिण वाटणाऱ्या व्यवहाराची अत्यंत आवश्यकता होती. एक तर संतांची श्रद्धा अशी—

घट घटमें वह साई रमता कटुक वचन मत बोल रे !

आणि त्यांना असें स्पष्ट दिसून येत होतें—

अरे इन दोऊ न राह न पाई !

हिंदु आणि मुसलमान—मग ते पंडित असोत कीं मौलवी, दोघेहि निष्फळ प्रयत्न करीत आहेत. प्रेममार्गावरील विश्वास नसल्यानें त्यांची सारी साधना व्यर्थ आहे. वास्तविक महादेव आणि महंमद किंवा कृष्ण आणि करीम यांचें ऐक्य जाणायला हवें. म्हणजे ईश्वराचें ईश्वरत्व नांवांत किंवा बाह्याचारांत नाहीं, हें समजायला हवें. हिंदु-मुसलमान जर हा विवेक करतील, तर आमचा समाज एकसंघ होईल. म्हणून दादूदयाल शरीराच्या अवयवांची उपमा देऊन म्हणतात—

दोनों भाई हात पग, दोनों भाई कान।
दोनों भाई नैन है, हिंदु मूसलमान ।।

अशा रीतीनें संतांनीं तत्कालीन समाजाचें सारथ्य केलें. त्याला विवेकाची आणि सत्यनिष्ठेची नवी जाणीव करून दिली, भेदाभेद विसरून एकसंघ होण्यास प्रवृत्त केलें. संतांचें मत म्हणजे समाजानें सदैव समोर ठेवावें असे विवेकनिष्ठेचें आणि सत्यावर अधिष्ठित असलेलें प्रेममय तत्त्वज्ञान होय.

संतांनीं त्यांच्यापूर्वींच प्रतिष्ठित झालेला योगमार्ग व्यवहारतः स्वीकारला, पण त्यांतील जटिलता दूर केली. योगमार्ग हा सामान्य जनांसाठीं आत्मशुद्धीचा मार्ग न मानतां त्यांनीं त्याचें महत्त्व योगी आणि साधक यांच्यापुरतें मर्यादित मानलें. उपनिषत्कालापासून प्रचलित असलेला ज्ञानमार्ग त्यांनीं स्वीकारला; इस्लामी एकेश्वरदास त्यांनीं मान्यता दिली, पण महं-

मदाचें देवत्व स्वीकारलें नाहीं. सूफी साधकांचा प्रेममार्ग त्यांना आवडला, पण 'अल्ला' आणि माशूका (प्रियतमा) असें प्रेमाचें दैवत न मानतां आत्मा-परमात्मा हें भारतीय रूप त्यांनीं आपल्यासमोर ठेवलें. संतस्वतःस प्रियकर न मानतां रामकी 'बहुरिया' समजतात. वैष्णवमताचा सर्वाधिक प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर दिसून येतो.

संतांचें तत्त्वज्ञान म्हणजे मध्ययुगाला ठाऊक असलेल्या सर्व साधना-प्रणालींचा सुंदर समन्वय. रोहिदासानें या मार्गास आपल्या वाङ्मयानें प्रतिष्ठा कशी मिळवून दिली, तें आतां पुढील प्रकरणांत पाहावयाचें आहे.

• • •

वर्णाश्रम अभिमान तजि, पदरज बंदहि जासुकी।
संदेह ग्रंथि खंडन निपुन, वानि विमल रैदासकी ॥

# रचनेचें स्वरूप

## रोहिदासाची विमल वाणी

आचार्य गुरु रामानंद आणि कबीरदास यांच्यासारख्या संतश्रेष्ठांच्या सांगातीं राहिलेला रोहिदास संतमताचा वारसा घेऊन भक्तिभावनेनें भरलेलीं भजनें म्हणूं लागला. त्याची ती वाङ्मयी श्रीमूर्ति साधीसुधी पण नीटस आहे. त्यानें संतमताचा आध्यात्मिक वारसा घेतला; पण त्याची प्रवृत्ति खंडनाकडे नाहीं. ती श्रद्धावान् आहे. निर्गुणनिराकार परब्रह्मास तो राम, कृष्ण, माधव अशा विविध नामरूपांत साठवूं पाहतो.

संतसाहित्याचे सारे गुणविशेष रोहिदासाच्या काव्यांत दिसून येतात. त्यानें विवेकनिष्ठेची महती वर्णन केली आहे; अनुभवप्रामाण्याचें महत्त्व प्रतिपादन केलें आहे; सत्यधर्माचें स्वरूप समजावून दिलें आहे; शुद्ध भावभक्तीचा मंत्र सांगितला आहे; बाह्याचाराची व्यर्थता स्पष्ट करून सदाचाराची शिकवण सांगितली आहे. त्याच्यापाशीं कबीराची प्रखर बुद्धिमत्ता नसली, तरी त्याची कळकळ स्पष्ट आहे. दादूदयालाची सुगमता त्यानें घेतली आहे. नामदेवाचा शुद्ध भक्तिभावहि त्याला हवासा वाटला आहे. संतसंस्कृतीच्या सर्वसमावेशक उदारतेला साजेशी त्याची विचारसरणी आहे. अनाग्रही वृत्ति हा त्याचा मोठा विशेष आहे. साधेपणा आणि सुबोधता असल्यानें त्याची वाणी जनसामान्यांस जवळची वाटते. नाभादासानें तिचा जो गौरव केला आहे, तो अत्यंत सार्थ आहे.

## रोहिदासाचें वाङ्मय

रोहिदासाची रचना फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत नाहीं. गुजरात, राजस्थान या प्रदेशांत प्राप्त झालेल्या हस्तलिखित पोथ्यांतून स्फुट

पदांच्या स्वरूपांत ही रचना उपलब्ध होते. मौखिक परंपरेनें टिकून राहिलेली रचनाहि बरीच आहे. या सर्व रचनेचें एकत्रीकरण अजून झालेलें नाहीं. विशेषतः मौखिक परंपरेंतून प्राप्त होणाऱ्या भजनांचें अनुशीलन-परिशीलन होणें आवश्यक आहे. परंतु या गोष्टीकडे संशोधकांचें दुर्लक्ष आहे.

कबीरदासाप्रमाणें रोहिदास ' मसि कागज़ छुयो नहीं, कलम गह्यो नहीं हाथ '–असे निरक्षर होते. म्हणून त्यांची रचना पुढें शिष्यांनीं अथवा भाविकांनीं जी लिहून ठेविली किंवा ध्यानांत ठेविली, तेवढीच उपलब्ध होते. परंतु रोहिदासाच्या नांवावर एखादा मोठा ग्रंथ दिसून येत नाहीं. ' प्रल्हाद-लीला ' ह्या छोटचाशा कथाकाव्याव्यतिरिक्त त्याची सारी कविता स्फुट स्वरूपाची आहे. संतकाव्य हें प्राधान्येंकरून स्फुट स्वरूपांतच आहे. पदें आणि साखी या दोन काव्यप्रकारांत त्याचा अधिकांश पसारा आहे. रोहिदासाचीं सुमारें शंभर पदें प्राप्त होतात. साख्या फक्त सात-आठच मिळतात.

रोहिदासाच्या पदांचा एकत्रित संग्रह सर्वप्रथम प्रकाशांत आणण्याचें श्रेय अलाहाबादच्या वेलवेडियर प्रेसला आहे.[१] या प्रेसनें जी ' संतबानी ' पुस्तकमाला प्रकाशित केली, तिच्यामध्यें रोहिदासाची वाणी त्याच्या चरित्रासह छापली आहे. या पुस्तकांत संत रोहिदासाच्या सहा साख्या आणि ८७ पदें एकत्र आहेत. याच पद-संग्रहावरून रोहिदासाची वाणी अन्य पुस्तकांतून समाविष्ट करण्यासाठीं घेण्यांत आली. पण हें करतांना त्या वाणींत नवे नवे बदल केले गेले आहेत. याचें एक उदाहरण म्हणून 'संत रविदास और उनका काव्य ' हें पुस्तक सांगतां येईल. [२] या पुस्तकांत रोहिदासाच्या सहा साख्या आणि सत्त्याण्णव पदें देण्यांत आलीं आहेत. यांपैकीं क्रमानें साख्या व एक ते सत्त्यायशींपर्यंतचीं पदें वेलवेडियर प्रेसच्या पुस्तकाशीं जुळतात. ८८ ते ९७ हीं दहा पदें संपादकांनीं ग्रंथसाहेबावरून घेतल्याचा उल्लेख केला आहे; परंतु पहिल्या ८७ पदांमध्यें बरेंच नूतनीकरण केलेलें आहे.

१. रैदासजीकी बानी (जीवनचरित्रसहित) : मुद्रक, प्रकाशक-वेलडियर प्रेस, प्रयाग. मूल्य एक रुपाया (उपलब्ध सहावी आवृत्ति १९४८).

२. संत रविदास और उनका काव्य : संपादक रामानंद शास्त्री, वीरेंद्र पांडेय. ' रविदास आश्रम ', ज्वालापुर, हरिद्वार.

वेलवेडियर प्रेसच्या प्रकाशनांतील कांहीं पदांचा अंतर्भाव करून गोरखपूरच्या गीता प्रेसनेंहि आपले भजनसंग्रह सजविले आहेत.[3]

पतियाळाच्या सेंट्रल पब्लिक लायब्ररीमध्यें जी 'दादूदयालजीकी अनभै वाणी'ची पोथी सुरक्षित आहे, तिच्यामध्यें रोहिदासाचीं कांहीं पदें उपलब्ध होतात. पुणें विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयांत 'संतबानी संग्रह' या नांवाची श्रीहरिदास यानें नकलेली पोथी आहे. या पोथींतहि रोहिदासाचीं पदें आढळतात.

या सर्व मुद्रित सामग्रीशिवाय अनेक भक्तहृदयी सज्जनांच्या मनीं-मुखीं खेळत असलेलीं रोहिदासाचीं मधुर भजनें संख्येनें खूप असतील. महाराष्ट्रांतहि जी अगणित हिंदी रचना प्राप्त होते, तिचा धांडोळा घेतांना रोहिदासाच्या काव्याचे मंजूळ स्वर थकल्याभागल्या संशोधकाला कधींमधीं विसावा देऊन जातात.

गुरुग्रंथसाहेबांत रोहिदासाचीं जीं पदें आहेत, त्यांचें विशेष महत्त्व आहे. शिख बांधवांचा हा पवित्र ग्रंथ गुरु अर्जुनदेवानें तयार करविला, असें म्हणतात. या ग्रंथांत नानक, नामदेव, कबीर, आदि सोळा संतांचें काव्य संकलित केलेलें आहे. या संकलनांत रोहिदासांच्या वाणीस स्थान लाभलें, हें विशेष आहे. हीं सुमारें चाळीस पदें आहेत. त्यांचा अंतर्भाव या पुस्तकांत केलेला आहे.

'प्रल्हादलीला' नांवाचें एक छोटेंसें आख्यानकाव्य रोहिदासानें लिहिलें आहे. याची हस्तलिखित प्रत आगरा येथील सांप्रदायिकांकडे सुरक्षित आहे.

दादूदयाल यांच्या दादूपंथांत रोहिदासांच्या वाणीस पूजनीयता लाभली असल्यानें या पंथाच्या 'पंचवाणी' आणि 'सर्वांगी' या नित्यपाठाच्या ग्रंथांमध्यें रोहिदासाचीं पदें आढळून येतात.

अशा प्रकारें विविध ग्रंथांतून प्राप्त होणारी रोहिदासाची ही पदावली आहे. या सर्व पदांचें एकत्रीकरण आणि अनुशीलन-परिशीलन झालेलें नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

३. भजनसंग्रह, भाग २ : गीताप्रेस, गोरखपूर. संकलक–वियोगी हरि. बाइसावी आवृत्ति, संवत् २०२१.

## परम्परेविषयीं रास्त अभिमान

जन्मानें कुणीहि श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसतो. जातीजमातीवरून कोणींहि कुणाची योग्यता ठरवूं नये. वर्णाश्रमपद्धति किंवा पुढें निर्माण झालेल्या विशिष्ट जाती या समाजानेंच समाजाच्या सोयीसाठीं निर्माण केल्या. जशीं वर्षे लोटलीं, तशी या गोष्टींतहि विकृति आली. जातपात हा तत्कालीन उच्चवर्णीयांनीं अन्यायाचा विषय बनविला. संत रोहिदासांना हें सारें दिसत होतें. त्यांची वृत्ति समतोल होती. त्यांनीं समाजाच्या या विकृतीविरुद्ध रागाची भाषा केली नाहीं किंवा सूडाचाहि शब्द उच्चारला नाहीं. कारण त्या अन्यायास जबाबदार एकच जात किंवा एकच वर्ग नव्हता. म्हणून जातपात मानून एकानें दुसऱ्यावर अन्याय करण्याच्या प्रवृत्तीचा रोहिदासांनीं समजावणीच्या सुरांत निषेध केला.

ज्याला जो चरितार्थाचा उद्योग लाभला किंवा ज्यानें जो उद्योग स्वीकारला आणि निष्ठेनें आचरला, त्याचें महत्त्व समाजानें मान्य करावयास हवें. कोणताहि उद्योग हीन नाहीं. रोहिदासास आपण चांभार आहोंत, याबद्दल लाज वाटत नसे —

> ऐसी मेरी जाति विख्यात चमार।
> हृदय राम गोविंद गुन सार ।।

आणि याच ईश्वरनिष्ठेमुळें आपण तरून गेलों, असा त्याचा विश्वास आहे. 'नीचेसे प्रभु ऊँचो किया है, कह रविदास चमारा।' असा त्याचा आनंदाचा स्वर आहे.

स्वजाति आणि स्वकर्म यांविषयींचा रोहिदासाचा हा उचित अभिमान त्यानें ठायीं ठायीं व्यक्त केला आहे. सत्यधर्माचें आणि सत्यरूप परमेश्वराचें स्वरूप स्पष्ट करून सांगतांना त्यानें आपल्या नित्य व्यवसायाचाच दाखला दिला. सेना न्हावी ज्याप्रमाणें—

> विवेकदर्पण दावूं । वैराग्यचिमटा हालवूं ।
> उदकशांति डोई घोळूं । अहंकाराची शेंडी पिळूं ।।

असें स्वकर्माच्या परिभाषेंत बोलतो किंवा सावता माळी जसा कांदा-मुळा-भाजी विकतांना अवघी विठाबाई त्याची आहे असें गर्वानें सांगतो, त्याच-

प्रमाणें रोहिदास चर्मकाराचा व्यवसाय करीत असतां भजनरंगीं डोलून म्हणतो–जेथें पहावें तेथें मला चर्म दिसतें आहे. चर्माच्याच मंदिरांत जणूं प्रभू राम बोलतो आहे. सारा सृष्टीचा पसाराच चर्मानें बनलेला आहे. चर्मच सर्वत्र व्यापून राहिलें आहे. त्याचे शब्द आहेत–

ज्यांहा देखो वांहा चामही चाम ।
चामके मंदिर बोलत राम ॥ १ ॥
चामकी गऊ चामका बचडा ।
चामही घुने चामही ठाडा ॥ २ ॥
चामका हाती चामका राजा ।
चामके ऊँटपर चामका बाजा ॥ ३ ॥
कहत रोहिदास सुनो कबीर भाई ।
चाम बिना देह किनकी बनाई ॥ ४ ॥

## विरही साधक

रोहिदासाची वाणी विनम्र भक्तिभावानें नटलेली आहे. त्यानें साधनेचें महत्त्व प्रतिपादन केलें आहे आणि साधकाचा परमानंदहि व्यक्त केला आहे. पण त्याची कविप्रकृति विरहाचें चित्रण करण्यांत फारशी रमलेली दिसून येत नाहीं. किंवा असें म्हणावें लागेल कीं, उपलब्ध रोहिदास-पदावलींत विरहाकुल भावना प्रकट करणारीं पदें संख्येनें अधिक नाहींत. पण यावरून रोहिदासाला साधनेंतील ती अटळ वेदना जाणवलीच नव्हती, असें मात्र नाहीं. एका पदांत अत्यंत मार्मिक शब्दांत त्यानें साधकांची व्यथा व्यक्त केली आहे. अशीच एकदां साधकाला त्याच्या प्रिय परमेशाची स्मृति अस्वस्थ करूं लागली. भगवंताचें तत्क्षणीं दर्शन झालें पाहिजे म्हणून तो साधक आकुल झाला. त्यानें ईश्वराची सकरुण नेत्रांनीं मार्गप्रतीक्षा आरंभिली. त्यानें त्वरित यावें आणि साधकाच्या स्नेहास प्रतिसाद द्यावा, म्हणून तो विनवणीच्या सुरांत धावा करूं लागला. चंद्रमा पाहून दृष्टि परितृप्त करण्या-साठीं झुरणारा चकोर तो प्रियतमास दाखवूं लागला. विरहिणीची प्रतीक्षा रात्र उलटून गेली तरी संपतच नाहीं, म्हणून तो कष्टी झाला. एक एक क्षण

युगायुगासारखा भासूं लागला. रोहिदास विरहव्यथित अंतःकरणानें आळवं लागला–

प्रिति सुधारन आव।
तेज सरूपी सकल सिरोमनि, सकल निरंजनराव ॥
पिउ संग प्रेम कबहुँ नहिं पायो, करनी कवन बिसारी।
चक को ध्यान दधिसुत सी हेत हैं, यों तुम ते मैं न्यारी।
भवसागर मोहिं इक टक जोवत, तलफत रजनी जाई।

सारें जग मला सतत पाहतें आहे. माझी ही स्थिति जगाच्या थट्टेचा विषय बनली आहे. रात्र उलटून जाते आहे. माझ्या अंतःकरणाची तडफड सरत नाहीं. रात्र त्या तडफडीनें व्यापिली आहे. प्रियकराच्या ताटातुटीनें माझी कायाच भक्षण करण्यास आरंभ केला आहे. तुझें फक्त एकच वेळ दर्शन होऊं दे, म्हणजे ही साधकरूपी पतिव्रता जन्मोजन्मीं सुखी होईल. आतां अंत पाहूं नकोस. क्षणाचा विलंब युगायुगाचा ठरतो आहे–

पिय बिन सेजइ क्यों सुख सोऊँ, विरह बिथा तन खाई।
मेटि दुहाग सुहागिन कीजै, अपने अंग लगाई।
कह रैदास स्वामी क्यों बिछोहे, एक पलक जुग जाई ॥

या पदांतील साधक कवीची आर्तता रसिकाला मुग्ध करणारी आहे.

## निर्गुण-तत्त्वाचें सुबोध स्पष्टीकरण

निर्गुण मताचें सुबोध स्पष्टीकरण करण्याचा संतांनीं प्रयत्न केला. रोहिदासाला यांत चांगलें यश मिळालें आहे. त्याच्या भजनांतून या तत्त्वज्ञानाचें सोप्या पद्धतीनें विश्लेषण केलेलें आढळून येतें. तो म्हणतो–

ऐसो कछु अनुभव कहत न आवै। साहिब मिलै तो को बिलगावै ॥
सबमें हरि है हरिमें सब है, हरि अपनो जिन जाना ॥
साखी नहीं और कोइ दूसर, जाननहार सयाना ॥

ईश्वराच्या सर्वव्यापक अस्तित्वाचा अनुभव असा कांहीं असतो कीं, तो वर्णन करून सांगतां येत नाहीं. तो ईश्वर जर प्राप्त झाला, तर कोण त्याच्या-

पासून दूर राहील ? खरें तर ईश्वर सर्वांच्या ठायीं आहे आणि ईश्वराच्या ठायीं सर्व आहेत. असा तो ईश्वर ज्यांनीं आपला म्हटला, त्यांनीं त्याच्या अस्तित्वाची साक्ष आणखी कोणती द्यावी ? त्या अस्तित्वाची खरीखुरी जाणीव जाणकारालाच व्हायची अन् तोच तो अनुभव समजूं शकायचा.

--' घटघटमें वह साई रमता ! ' प्रत्येक प्राणिमात्राच्या ठायीं त्या ईश्वराचें अस्तित्व आहे. म्हणून परोपरीनें सांगणाऱ्या कबीराचाच हा विचार. त्या विचाराचें स्पष्टीकरण करतांना ' खलिकमें खालिक खालिकमें खलिक ! ' (सृष्टींत सृष्टीचा कर्ता आहे आणि त्या सृष्टिनिर्मात्याचे ठायीं सृष्टि आहे; ) किंवा ' फूटा कुंभ जल जलहिं समाना । यह तत कथौ जियानी ' (पाण्यांत असलेला कुंभ फुटला तर त्यांतील पाणी आणि बाहेरचें पाणी एक होतें, असें ब्रह्मविचाराचें तत्त्व ज्ञानी जन सांगतात. कबीरदासानें अशा प्रकारें त्या श्रेष्ठ विचारांना कांहींसें निगूढ बनविलें. रोहिदासानें हेच सारे विचार सोपे करून सांगितले आहेत.

कबीरदासांनीं निर्गुणनिराकार परब्रह्माचें स्वरूप केवळ अनाकलनीयच म्हणून म्हटलें होतें–

पारब्रह्मके तेजका कैसा है उनमान ?
कहिबेकू सोभा नहीं देख्यांहि प्रमान ।।

परब्रह्माच्या परमतेजस्वितेचें अनुमान कसें करावें ? खरें तर तें सांगण्यांत कांहीं मौज नाहीं. तें तत्त्व स्वसंवेद्य आहे. त्याच्याशीं एकरूप होऊन अनुभवल्याखेरीज तें कळायचें नाहीं. हेंच तत्त्व रोहिदासानें इतक्याच सुंदर रीतीनें परंतु सोप्या शब्दांत सांगितलें आहे

जस हरि कहिये तस हरि नाहीं, है अस जस कछु तैसा ।

जसा हरि आहे म्हणून सांगतां, तसा तो नाहीं, जसा कसा आहे तसा तो आहे. अर्थात् सांगतां येण्यासारखा तो नाहीं.

परमेश्वराचें वर्णन करतांना ' नेति नेति' ( असा नव्हे, असा नव्हे ! ) म्हणून अवाक् बनणाऱ्या श्रुतीच्या उद्गाराचा हा सहजसुलभ आविष्कार अनुभवांतून उमललेला आहे.

## उदय अस्त दोउ नाहीं

ईश्वर निर्गुणनिराकार आहे म्हणजे तरी कसा आहे ?

> विमल एक रस ऊपजै, ना विनसै, उदय अस्त दोउ नाही ।
> विगता विगत घटै नहि कबहूँ, बसत बसै सब माँहीं ?

—तो निश्चल आहे, त्याला आकार नसला, तरी तें परमतत्त्व पवित्र अन् सर्वत्र सारखें भरून राहिलेलें आहे.—'एकरस' आहे, तें कधींहि विनाश पावत नाहीं. त्याला उदय किंवा अस्त असतच नाहीं. नाहीं. तें तत्त्व संपतां संपत नाहीं. कलिकालाचें बंधन त्याच्यासाठीं नाहीं. सदैव सर्वांच्या ठायीं व्यापून राहिलेलें असतें.——ईश्वराच्या सत्यस्वरूपाचें हें सुबोध स्पष्टीकरण अनेक पदांतून आलेलें आहे. दृष्टान्तांचा कुठेंहि अतिरेक झालेला नाहीं. सर्वत्र सुगम अभिव्यक्ति आहे.

## जीव-ब्रह्माचें अद्वैत

एकेश्वरवाद हा संतमताचा एक प्रमुख सिद्धान्त आहे. ब्रह्म आणि जीव हे अंततोगत्वा एकच आहेत. या दोहोंचें ऐक्य ज्याला उमगलें, तो ज्ञानी, अशी संतांची ठाम धारणा आहे. परंतु मायामोहाच्या जाळ्यांत अडकून बसलेल्या सामान्य जनांस ब्रह्म आणि जीव यांचें किंवा आत्मा आणि परमात्मा यांचें एकत्व समजत नाहीं. भ्रामक समजुतींमुळें तेथें त्याला द्वैतच दिसूं लागतें. जोंवर हा भ्रम टिकून राहतो, तोंवर साधक यशस्वी होऊंच शकत नाहीं. संत रोहिदासांनीं हा विचार परिचयांतील प्रतीकें योजून व्यक्त केला आहे. त्यांतील साधेपणा आणि सुबोधता पाहण्यासारखी आहे.——

> माधव भरम कैसेहु न बिलाई, ताते द्वैत दरसै आई ।
> कनक कुंडल सूतपट जुदा, रजु भुजंग भ्रम जैसा ।
> जलतरंग पाहन प्रतिमा ज्यों, ब्रह्म जीव द्वति ऐसा ।।

—सोन्याचें आणि अलंकाराचें, सुताचें आणि वस्त्राचें द्वैत दिसतें. कारण सुताशिवाय वस्त्र किंवा सोन्याशिवाय अलंकार अस्तित्वांत राहूं शकत नाहीं. रज्जूस सापच समजण्याचा भ्रम होतो. पाणी आणि तरंग यांत भेद दिसतो. पाषाण आणि त्यापासूनच घडलेली प्रतिमा यांतील अभेद आपण ध्यानीं घेत नाहीं. अशीच भ्रमात्मक वृत्ति आपण ब्रह्म आणि जीव यांना भिन्न समजून

दाखवितों. वास्तविक ब्रह्म हें आदि-अंत, विगत-अविगत इत्यादींच्या अतीत असतें.

विमल एकरस उपजै न विनसै, उदय अस्त दोउ नाहीं।
विगता विगत घटै नहीं कबहूँ, बसत बसै सबमाही।
अगम अगोचर अच्छर अतरक, निरगुन अंत अनंद।
सदा अतीत ज्ञान धन वर्जित, निरविकार अविनासी।
कह रैदास सहज़ सुन्न सत जीव मुक्त निधि कासी॥

## घट घट व्यापी रह्यो

रोहिदासानें आपल्या उपास्यास हरि, राम, केशव, माधव, मुकुंद, गोविंद, मुरारि अशा अनेक नांवांनीं संबोधिलें आहे. परंतु त्याचें उपास्य नामरूपातीत आहे. नांव केवळ सोयीसाठीं. वास्तविक घटाघटांतून व्यापून राहिलेला तो निर्गुणनिराकार परमात्मा असा आहे–

निश्चल निराकार अति अनुपम निरभै गति गोविंदा।
अगम अगोचर, अक्षर अतरक, निर्गुण अति आनंदा॥

त्या विराट् ब्रह्मस्वरूपाची तुलना भगवान् श्रीकृष्णानें दाखविलेल्या विराट विश्वरूपाशीं करून संतानें म्हटलें आहे–

चरण पताल सीस असमाना, सो ठाकुर कस संपुट-समान॥
शिवसनकादि अंत न पाया, ब्रह्मा खोजत जनम गँवाया॥
नख परस्वेद जाके सुरसरि धारा, रोमावली अठ्ठारह भारा॥
चार वेद जाके सुमिरत साँसा, भक्ति हेतु गावत रैदासा॥

शिव-अशिवाची कल्पना या विराट् विश्वरूपाला शिवत नाहीं. साधु-असाधु असा भेद तेथें नाहीं. सेव्य-सेवक असा फरक तेथें नाहीं. स्थावर-जंगम, अगदीं कीट-कीटाणू सुद्धां त्याच्याशीं संबद्ध आहेत, तो त्या सर्वांना व्यापून उरला आहे, अथपासून इतिपर्यंत 'एकरस' असलेला हा निर्गुणनिराकार परमात्मा अनुपम आहे. रोहिदास सुगम शब्दावलींत हें तत्त्वज्ञान असें सांगतो–

आदिअंत औसान एक रस, एक तार ही भाई।
स्थावर जंगम कीट पतिंगा, पूरि रह्यो हरिराई।
सर्वेश्वर, सर्वांगी सब गति, कर्ता हर्ता सोई।
सिव न असिव न साध अरु सेवक, उनै भाव नहिं होई॥

खंडनापेक्षां मंडनाचा पक्षच रोहिदासाला प्रिय दिसतो. सत्य भक्तीचें स्वरूप समजावून सांगणें त्याला इष्ट वाटतें. तसें करतांना बाह्याचारावर विश्वास ठेवणाऱ्यांवर तो कोरडे ओढीत नाहीं. संत कबीरदासांच्या भजनांतून अशा स्वरूपाची आक्रमक मांडणी आढळून येते. पण रोहिदासानें विरोध टाळून शक्य तेवढ्या आर्जवाच्या भाषेंत भक्तीचा वास्तविक मार्ग उलगडन सांगितला. तो म्हणतो–

ऐसी भगति न होइ रे भाई !
राम नाम बिनु जो कछु कहिये जाँ सत भरम कहाई।
भगति न रसदान, भगति न कथै ज्ञान।
भगति न ऐसी हाँसी, भगति न आसापासी।
भगति न यह सब कुछ कानि गँवाई।

बाह्याडम्बराच्या खोट्या मार्गानें जाणारे अंधश्रद्ध भाविक पाहून सत्यधर्माची जाण असलेला रोहिदास खिन्न होऊन जातो. लोकांचे हे खोटे विश्वास आणि मिथ्याचार कसे थांबवूं, म्हणून तो अस्वस्थ होतो. मग अत्यंत हळुवार शब्दांत भाविकाच्या अंतःकरणांत सद्‌बुद्धीचा अंकुर फुटावा म्हणून त्याची वाणी म्हणूं लागते–

भगति न इंद्री बाँधा, भगति न जोग साधा।
भगति न अहार घटाई, ये सब करम कहाई।
भगति न इंद्री साधे, भगति न बैराग बाँधे।
भगति न ये सब वेद बड़ाई।

या साऱ्या गतानुगतिकतेला गुणीजनांची मान्यता नाहीं. हा तर सारा अनावश्यक आचाराचा पसारा. खरी भक्ति यापासून कितीतरी दूर राहिली. तिची वास्तविकता जाणून घेऊन माणसानें आपल्या कर्तव्यकर्मावर सारें लक्ष केंद्रित करायला हवें. बाह्याडंबरापेक्षां तें सहस्रपटीनें चांगलें–

भगति न मूंड मुड़ाए, भगति न माला दिखाए।
भगति न चरन धुवाए, ये सब गुणी जन कहाई।
भगति न तौ लो जाना, आपको आप बखाना।
जोइ जोइ करै सो करम बड़ाई।

## ऐसी भगति करै रैदासा

रोहिदासाचें सारें जीवनच त्या निर्गुणनिराकार परमतत्त्वाच्या भक्तीनें न्हाऊन निघालेलें होतें. त्याची सारी करणी ईश्वराच्या चरणीं समर्पित झालेली होती. म्हणून जळीं-स्थळीं-पाषाणीं सर्वत्र त्याला तें उदात्त तत्त्व व्यापून राहिलें असल्याचें सदैव जाणवत असें. साधनेच्या यशस्वितेमुळें झालेली साधकाची आगळी स्थिति त्याच्याच शब्दांत पाहूं या.

अब कैसे छुटै राम रट लगी !
प्रभुजी तुम चंदन हम पानी ।
झाकी अँग अँग बास समानी ।। १ ।।
प्रभुजी तुम धन बन हम मोरा ।
जैसे चितवत चंद चकोरा ।। २ ।।
प्रभुजी तुम दीपक हम बाती ।
जाकि जोति बरै दिन राती ।। ३ ।।
प्रभुजी तुम मोती हम धागा ।
जैसे सोनहि मिलत सुहागा ।। ४ ।।
प्रभुजी तुम स्वामी हम दासा ।
ऐसी भगति करै रैदासा ।। ५ ।।

अत्यंत साध्या आणि सुगम शब्दांतील ही भक्तिभावाची रंगत केवळ अवीट अशी आहे. रोहिदासाचीं भजनें गातांना भक्तगण भक्तिरसांत धुंद होऊन जातात, त्याचें रहस्य अशा सुबोध अन् सुमधुर पदांत आहे.

आत्माभिमानाचा निरास करून परब्रह्माविषयींची एकात्मता बाणविणें, हीच रोहिदासानें सांगितलेली 'प्रेम-भगति' आहे. त्याचा सिद्धान्त आहे–

आप खोए भगति होत.हे, तब रहे अंतर उरझाई ।

'आपा' (मीपण) विसरून 'अहिनिशि' (रात्रंदिवस) भक्ति करावी आणि कृतार्थ व्हावें, अशीं त्याची इच्छा आहे. म्हणून तो सांगतो–

जब लग नदी न समुंद समावै । तब लग बढ़ै अहंकारा ।।
जब मन मिल्यो राम-सागर सों । तब यह मिटी पुकारा ।।

## जीवनाची क्षणिकता

संतांनीं जीवनाची क्षणभंगुरता वारंवार स्पष्ट करून सांगितली आहे. एका पदांत रोहिदासानें जीवनाचें हें चंचल स्वरूप मोठ्या मार्मिक शब्दांत चित्रित केलें आहे... आला दिवस गेला म्हणजे सुटकेचा श्वास टाकूं नकोस. एके दिवशीं तुला येथून कच करायचेंच आहे. पण त्याआधीं तुला खूप लांबवरचा प्रवास करायचा आहे. म्हणून प्राप्त झालेल्या जीवनरूपी धनाचा सदुपयोग करावयास याच क्षणीं आरंभ कर–

जो दिन आवहि सो दिन जाही। करना कूच रहन थिरु नाही॥
संगु चलत हैं हम भी चलना। दूरि गवनु सिर-ऊपरी मरना॥
क्या तू सोया जाग अयाना। तै जीवन जगि सचु करि जाना॥

ज्यानें तुला जन्म दिला तो तुझ्या जीविकेची सोय केल्याशिवाय राहणार नाहीं. त्यानेंच हा सारा दुनियेचा व्यवहार चालविला आहे, हें तूं जाण आणि 'मी-माझें' ही अहंभावनाच सोडून दे–

जिनि दिया सु रिजकु अंबरावै। सभ घट भीतरि हाटु चलावै॥
करि बँदिगी छाँडि मैं मोरा। हिरदै नामु सम्हारि सवेरा॥

मनुष्यजीवनाची क्षणभंगुरता मान्य करूनहि त्याचें महत्त्व कमी होत नाहीं. रोहिदास वास्तवाचा विचार करतो. त्याबरोबरच त्याला मानवजन्मासंबंधीं आंतरिक आस्थाहि आहे. मनुष्ययोनि सर्वश्रेष्ठ आहे, असेंच मत आहे. तुलसीदासानें म्हटलें आहे–

बड़े भाग मानुस तन पावा। सुर दुर्लभ, सब ग्रंथनि गावा॥

रोहिदास हाच भाव स्पष्ट करतांना सांगून गेला आहे–

त्रिगुण योनि अचेत संभव, पाप पुण्य असोच।
मानुषावतार दुर्लभ, तिहूँ संगति पोंच॥

–निसर्गाची रीति अद्‌भुत आहे. मनुष्याला मनुष्यजन्मापूर्वीं असंख्य योनींतून जावें लागतें. आणि मानव ही तरी अखेरची स्थिति कुठें आहे ? या मानवजन्मांत तो जी साधना करतो, जें संचित पदरीं बांधतो, त्यावर त्याची मोक्षप्राप्ति अवलंबून असतें. सन्मार्गानें तो तरून जातो. आवागमनाच्या

चक्रांतून मुक्ति प्राप्त करून घेणें हें त्याच्याच हातीं असतें म्हणून क्षणभंगुर असलेलें मानवजीवन केवळ महत्त्वाचेंच नव्हे, तर तें अत्यंत जबाबदारीचें आहे. या जीवनांत अविवेक मायेमुळें निर्माण होतो, असें अत्यंत सोप्या पद्धतींनें पटवून देऊन कवि मायेचा निरास करण्याचें आवाहन करतो. ही माया मोठी सैतानी वृत्तीची असते. सूफी साधक मायेला 'सैतान' असेंच संबोधितात. रोहिदासाचें वचन आहे–

वरजि वरजि बीठले, माया जग खाया।
महा प्रबल सबही सन, ये सुरु-नरु-मुनि भरमाया ॥

या मायेची शक्ति फारच संहारक आहे. तिच्यापुढें भले भले निष्प्रभ होतात. मनुष्याचेंच काय, पण ईश्वराचेंहि मायेपुढें कांहीं चालत नाहीं, असें थोडें अतिशयोक्तीनें म्हणून कवि त्याच ईश्वरास विनवणी करतो आहे कीं, आतां तूंच प्रत्यक्ष या तुझ्या विकट मायेपासून माझें रक्षण कर–

केशव ! विकट माया तोर, ताथै निकट गतिमति मोरी।
सविष, उष्ण कराल अहिमुख, ग्रसत सुटल सुभेष ॥

## बाह्याचारास विरोध

संतांनीं बाह्याडंबराचा तीव्र सुरांत निषेध केला. धर्माच्या नांवावर मिथ्या आचारांचें प्रस्थ माजलें होतें. मुसलमान मौलवी आणि हिंदु पुजारी भोळ्याभाबड्या सामान्य जनांस बाह्याचाराच्या निमित्तानें भरपूर लुटीत असत. त्यांच्या या करणीस इतकें विकृत स्वरूप आलेलें होतें कीं, संतांनीं त्याविरुद्ध एक आंदोलन उभारलें. कबीरदास या आंदोलनाचा प्रवर्तक होय. रोहिदासहि ह्या आंदोलनांत सहभागी झाला. त्याचें सांगणें होतें–

थोथी काया, थोथी माया, थोथा हरिबिन जनम गँवाया।
थोथा पंडित, थोथी बानी, थोथी हरिबिन सबै कहानी ॥

–ईश्वराचें सत्यस्वरूप जाणणें महत्त्वाचें आहे. पोथी आणि पंडित दोन्हीहि व्यर्थ होत. शरीरहि व्यर्थ, मायाहि खोटी. सत्यस्वरूप ईश्वराशिवाय बाकी सारें तुच्छ आहे.

निर्गुणनिराकार परब्रह्मस्वरूप 'रामा' व्यतिरिक्त सर्व कांहीं मिथ्या आहे. त्याच्या स्मरणाशिवाय अन्य सर्व व्यर्थ आहे. वनांत जाण्यानें किंवा गुहेंत बसून तपस्या करण्यानें काय साधतें ?

भगति न रसदान भगति न कथै ज्ञान ।
भगति न बनमें गुफा खुदाई ।।

आहार, निद्रा आदि प्राणिमात्राचे निसर्गदत्त स्वभाव सोडून कायामारण करण्यानें भक्ति साध्य होत नाहीं. इंद्रियांशीं झगडा करून काय मिळणार आहे? रोहिदासाच्या शब्दांत सांगायचें तर–

भगति न इंद्री बाँधा, भगति न जोग-साधा ।
भगति न आहार घटाई, ये सब कर्म कहाई ।।

केवळ वैराग्य प्राप्त करून भक्ति सफल होते, असें नव्हे. वेदादि शास्त्रांचें केवळ महात्म्य गाऊनहि भक्ति यशाची होत नाहीं.

भगति न निद्रा साधे, भगति न वैराग बाँधे ।
भगति नहीं सब बेद बड़ाई ।।

कबीरदासांनीं मुंडनाचा निषेध करून म्हटलें होतें कीं, अशासारख्या कर्मकांडानें जर ईश्वर लाभणार असता, तर भादरलेल्या मेंढ्या केव्हांच मोक्षाप्रत पोहोचल्या असत्या. रोहिदासाच्या अभिव्यक्तींत कबीरासारखा उपहास किंवा फटकळपणाहि नाहीं. त्यानें साध्या शब्दांत म्हटलें आहे–

भगति न मूड मुड़ाए, भगति न माल दिखाए ।
भगति न चरन धुवाए, भगति न गुनी कहाए ।।

## क्या निमाज क्या पूजा ?

गोरगरिबांची भोळीभाबडी श्रद्धा आणि विश्वास हे धूर्त मौलवी-पुरोहितांच्या अमानुष स्वार्थाचे विषय झालेले पाहून रोहिदास खिन्न होऊन जातो. त्याचें संवेदनाशील मन संतांनीं आरंभलेल्या समाजसुधारणेच्या पवित्र यज्ञांत आपल्या विमल वाणीच्या समिधा घेऊन पौरोहित्य करावयास निघतें. त्यानें कळकळीनें म्हटलें–

तीरथ बरत न करौं अँदेसा, तुम्हरे चरनकमलका भरोसा ।
जहँ जहँ जाओ तुम्हरी पूजा, तुमसा देव और नहिं दूजा ।।

तीर्थव्रत आदींची चिंताच मी करींत नाहीं. मला तुझ्या चरणकमलांचा भरंवसा आहे. जिथें जिथें मी जातों, तिथें तिथें मी तुझी पूजा करतों. तुझ्यासारखा दुसरा तरणोपाय नाहीं.

९८०३३

कबीराप्रमाणेंच रोहिदासानें हिंदू व मुसलमान दोहोंच्या कल्याणाचा विचार केला आहे. जो जेथें चुकला आहे तेथें त्याला सांगण्याचें सर्व संतांप्रमाणें त्याचेंहि व्रतच होतें. मुसलमानांच्या 'सुभान अल्लाह' म्हणण्याच्या तसबीहची म्हणज जपमाळेची निरुपयोगिता स्पष्ट सांगून तो म्हणतो–

तसबी फेरो प्रेमकी दिलमें करो निमाज ।
फिरो सगल दीदारको उसी सनमके काज ।।

दोनशें मण्यांची ती निरर्थक जपमाळ जपत बसूं नकोस. प्रेमाची माळ जपायला सुरुवात कर. तुझ्या मनांतच तुला नमाजाची प्रार्थना करतां येऊं दे. त्याच ईश्वररूपी प्रियकरासाठीं तुझ्या दृष्टिसंपन्नतेचें सारें प्रयोजन सिद्ध होवो !

कबीरानें या प्रेममार्गाचें अत्यंत सुंदर शब्दांत विश्लेषण केलें आहे. ईश्वरप्राप्तीचा सर्वसुलभ मार्ग म्हणजे प्रेममार्ग. साऱ्यांनीं स्नेहरज्जूंनीं समरूप होऊन जाऊन त्या सर्वशक्तिमानाचें स्वरूप न्याहाळणें म्हणजे प्रेममार्ग. रोहिदासाला ईश्वरप्राप्तीचा हाच मार्ग सुकर वाटला. त्याचें विचारणें आहे–

जिसके इश्क आसरा नाहीं, क्या निमाज क्या पूजा ?

ज्यानें प्रेमाचा आश्रय घेतलेला नाहीं, त्यानें पूजा करणें कसलें आणि त्याचें नमाज पढणें तरी कसलें ?

संत-काव्याचें हें दालन विशेष प्रसिद्ध आहे, असें म्हटलें जातें. संत बाह्याडंबराचा निषेध करतांना अत्यंत कटु शब्दांत समाजाची कानउघाडणी करतात. पण संत रोहिदासाची वृत्ति खंडणांत रमणारी दिसत नाहीं. त्यानें अत्यंत हळुवार शब्दांत मिथ्याचारांतील व्यर्थता समजावून सांगितली आहे. त्याचा संयम आणि नम्रता हीं ध्यानांत घेण्यासारखीं आहेत.

## वेदविद्येविषयीं आस्था

रोहिदासाच्या काळांतील समाज उच्चवर्णीयांच्या अन्याय्य वागणुकीमुळें त्रस्त झालेला होता. धर्मकारण प्राधान्येंकरून ब्राह्मणवर्गाच्या हातीं असे. पारंपरिक ज्ञान ब्राह्मणांनींच प्राप्त करीत राहावें, असा अन्याय्य संकेत रूढ झालेला होता. संतांनीं याविरुद्ध आवाज उठविला. कबीरांनीं तर या बौद्धिक गळचेपीविरुद्ध आपल्या तीक्ष्ण वाणीचें हत्यार उपसलें. पण

रोहिदासाचें मत संतुलित दिसतें. त्यानें तत्कालीन सुशिक्षित ब्राह्मण-वर्गास सामावून घेतलें आहे. पारंपरिक ज्ञानाविषयीं, विशेषेंकरून वेदविद्येविषयीं तो अत्यंत आदरानें बोलतो. ईश्वराचें स्वरूप समजावून देतांना–

चार वेद जाके सुमिरत साँसा,
भक्ति हेतु गावै 'रैदासा'।

असा तो चार वेदांचा गौरवपूर्ण उल्लेख करून जातो.

## पूर्वसूरींचा प्रभाव

रोहिदासाच्या काव्यावर त्याच्या संतसांगातींचा किती प्रभाव पडला आहे, हें सांगणें अवघड आहे. कबीराखेरीज त्याच्या अन्य संतमित्रांचें काव्य अजून पुरेसें प्रकाशित झालेलें नाहीं.

कबीरदासाचा स्पष्ट प्रभाव रोहिदासावर फारसा आढळत नाहीं. शब्द-साम्याचीं कांहीं उदाहरणें आढळून येतात, परंतु कबीराची स्पष्ट आणि परखड बोलण्याची रीत, प्रसंगीं टाकून बोलण्याची पद्धति आणि अनेक मतांचा एकत्र आविष्कार रोहिदासाच्या काव्यांत आढळून येत नाहीं. त्यामुळें तें काव्य कबीरवाणीपेक्षां खूपच साधें नि सोपें झालेलें आहे. कबीराचा त्यानें गौरवानें उल्लेख केलेला आहे. ईश्वरकृपेनें गणिका जशी तरून गेली, तसेच कबीरादि संतहि तरून गेले, असा हा उल्लेख आहे–

निरगुन को गुन देखौं आई,
देहिसहित कबीर सिधाई ॥

याच पदांत नामदेवाचाहि उल्लेख आहे. निम्न समजल्या जातींत जन्म घेऊन नामदेव स्वकर्माच्या बळावर विठ्ठलकृपेनें वैकुंठास गेले, असें रोहिदास सांगतो–

नामदेव केहि जाति कै ओछ,
जाको जस गावै तीन लोक ।

आणखी एका पदांत कबीर-नामदेवाच्या थोर व्यक्तित्वास प्रणिपात करतांना रोहिदासानें म्हटलें आहे कीं, हरिनामाच्या उदार कृपेनें कबीर जन्ममृत्यूच्या शृंखलेंतून मुक्त झाले. नामदेवांच्या भावभक्तीमुळें प्रसन्न होऊन

ईश्वर त्यांच्या हातचें दूध प्याला. आणि नामदेवांचें जीवन ईश्वरानें संकट-मुक्त केलें.

हरिके नाम कबीर उजागर । जनम जनम के काटे कागर ।।
नमत नामदेव दूध पिआया । तौ जग-जन्म संकट नहिं आया ।।

एका पदांत नामदेव-कबीराबरोबरच त्रिलोचन, सदन कसाई आणि सेना न्हावी यांच्याहि पुण्याईचा उल्लेख आहे. हे सारे संत-जन हरिकृपेनें कृतकृत्य झाले—

नामदेव, कबीर, तिलोचन, सधना, सैनु तरै ।
कहि रविदास सुनहु रे संतो, हरि-जीउ ते सभै सरे ।।

## हम तो एक राम कहि छूटचो

हा संतकवि कांहीं ओळी अशा लिहून जातो कीं, त्या पुनः पुन्हा आठवाव्या. त्यांतील साधेपणा आणि मनाशीं जवळीक साधण्याचें सामर्थ्य वर्णनापलिकडचें असतें. संताचा तो उद्‌गार सहजपणें प्रकटलेला असतो; परंतु त्यांत त्याच्या थोर व्यक्तित्वाची छाप इतकी प्रभावी असते कीं, तो उद्‌गार वाचकाच्या जिव्हेवर रुंजी घालूं लागतो. असाच हा एक समर्थ उद्‌गार—

ऊँचे मंदिर शाल रसोई, एक घरी पुनि रहन न होई ।
यहु तन ऐसा जैसे घासकी टाटी, जल गयो घास रलि गई माटी ।
भाई-बंधु कुटुंब सहेरा, ओइ बी लाग काढु सबेरा ।
घरकी नारि उरहि तिन लागी, वह तो भूत भूत करी भागी ।
कहि रविदास सबै जग लूटचो, हम तो एक राम कहि छूटचो ।।

एका पदामध्यें संतकवि सामान्य माणसाच्या मनाचें मोठें सुंदर वर्णन करतो. मन मायामोहाच्या पाशांत असें कांहीं गुरफटून गेलें आहे कीं, त्याची त्यांतून सुटका होत नाहीं. त्या षड्‌विकाराच्या जगांत मन असें कांहीं रमून बसलें आहे कीं, ज्याप्रमाणें बेडूक कूपामध्यें दंग असतो. त्याला बाहेरच्या जगाची कल्पनाच असत नाहीं—

कूप पऱ्यो जैसे दादिरा, कछु देसु विदेसु न बूझ ।
ऐसे मेरा मनु बिख्या बिमोहचा, कछु आरापारु न सूझ ।।

## फारसी शब्दांचा प्रभाव

रोहिदासाची रचना साधी आणि सुबोध आहे. तत्सम शब्दांचा अतिरिक्त प्रयोग तो करीत नाहीं. पण एखादद्सुऱ्या पदावर मात्र फारसीची दाट छाया पडलेली दिसते. एखाद्या ओळींत फारसी-अरबी शब्द विपुल दिसून येतात–

खालिक दरदमन्द दर आया, बहुत उमेद ज्वाब नहिं पाया।

एक पद तर फारसी शब्दांनीं किचकट होऊन बसलें आहे–

खालिक सिकस्ता मैं तेरा, दे दीदार,
उमेदगार-बेकरार जिउ मेरा ॥ धृ० ॥
औवल आखिर इल्लिलाह् आदम, मौज़ फरिस्ता बन्दा।
जिसकी पनाह् पीर पैगंबर, क्या गरीब क्या गंदा ॥
तू हाज़रा हजूर जोग एक और नहीं है दूजा।
जिसके इश्क़ आसरा नाहीं, क्या निवाज़ क्या पूजा ॥
नालीदोज हनोज़ बेबखत, किमि खिदमतगार तुमारा।
दर मादा, दर ज्वाब न दावै, कह 'रैदास' विचारा ॥

रोहिदासानें विचारपूर्वक सांगितलेल्या या सर्व गोष्टी फारसी-अरबीच्या अवघड शब्दांनीं अनाकलनीय होऊन बसल्या आहेत. परंतु असें हें एखादेंच पद दिसतें. अन्य रोहिदास-वाणी सुबोधच आहे.

––अशी ही परतत्त्वाच्या स्पर्शानें उजळलेली आणि आंतरिक जिव्हाळ्यानें सुगम-सुबध बनलेली रोहिदासाची वाणी संतसाहित्यांतली अमोल ठेव आहे. समाजांतील कनिष्ठतम आणि उपेक्षित कुळांत जन्म घेऊनहि विवेक वैराग्याच्या नि भावभक्तीच्या बळावर रोहिदासानें संतत्व प्राप्त केलें आणि ईश्वरी तेजाच्या साक्षात्कारानें उजळलेल्या वाणींतून सद्विचारांची पेरणी केली. त्याचें वाङ्मय भारतीय परंपरेच्या अभिमानाचा नि आस्थेचा विषय बनला आहे. संतसंस्कृतीनें आपणांला दिलेली ही मोलाची ठेव आपण आपल्या हृदयकोशांत सांभाळली पाहिजे आणि तिचा सुयोग्य विनियोग करून आपलें जीवन प्रतिक्षणीं उजळीत राहिलें पाहिजे.

• • •

# श्री संत रोहिदास

## भाग दुसरा : वाङमय

५९२९८९
१०२८ २९।६।६८

# दोहे

अंतर गति राँचै नहीं, बाहर कथै उदास ।
ते नर जमपुर जाहिंगे सत् भाषै रैदास ।। १ ।।

रोहिदास हें सत्य सांगत आहे कीं, जे नर आत्मज्ञानावांचून वैराग्याच्या कथा सांगतात, ते नरकांत जातात.

हरि सा हीरा छाँडि कर, करै आन की आस ।
ते नर जमपुर जाहिंगे, सत् भाषै रैदास ।। २ ।।

ईश्वरासारख्या अमूल्य रत्नाचा त्याग करून अन्य गोष्टींत रमणारे लोक यमलोकांत जातील, असें रोहिदासाचें सत्य-कथन आहे.

✓ रैदास कहै जाके रिदै, रहै रैंनि दिन रांम ।
सो भगता भगवंत समि, क्रोध न व्यापै कांम ।। ३ ।।

ज्याचे हृदयीं रात्रंदिन प्रभु रामाची स्मृति असते आणि ज्याला क्रोध अन् वासना शिवत नाहीं, तो भक्त भगवंतासमान होय, असें संत रोहिदास म्हणतो.

जा देख्या घिन ऊपजै, नरक-कुंडमें वास ।
प्रेमभक्ति सूं ऊधरे, प्रगटत जन–रैदास ।। ४ ।।

नरक-कुंडांत राहणाऱ्या ज्या प्राण्यास पाहून घृणा उत्पन्न होते, अशा प्राण्यानें जरी प्रेमभक्ति आचरली, तरी त्याचा उद्धार होतो, असें संत रोहिदास म्हणतो.

तसबी फेरो प्रेमकी दिलमें करो निमाज ।
फिरो सगल दीदारको उसी सनमके काज ॥ ५ ॥

प्रेमाचीच जपमाळ जपावी. मनांतच नमाज करावा. त्याच ईश्वररूपी प्रियकरास प्राप्त करून घेण्यासाठीं सर्व दृष्टीचा उपयोग करावा.

सब सुख पावें जासुतें, सो हरिजू को दास ।
कोउ दुख पावै जासुतें, सो न दास हरिदास ॥ ६ ॥

ज्याच्यापासून सर्वांना सुख प्राप्त होतें, तोच खरा हरिदास किंवा भक्त होय. ज्याच्यापासून कोणासहि त्रास होतो, तो ईश्वराचा सेवक नव्हे, भक्त नव्हे.

'रैदास' रात न सोइये, दिवस न करिये स्वाद ।
अह-निस हरिजी सुमिरिये, छाँडि सकल प्रतिवाद ॥ ७ ॥

रोहिदास म्हणतो, रात्र झोपण्यांत दवडूं नकोस, दिवस उपभोगांत घालवूं नकोस. अहर्निश ईश्वराचें स्मरण कर. त्यासाठीं सारे वादप्रतिवाद, विकल्प विसरून जा.

• • •

# प्र ल्हा द ली ला

शहर बडो मुलतान, जहाँ एक कुलवंत राजा ॥
तहँ जन्मे प्रहलाद, सरे सुरमुनि के काजा ॥

पूछो विप्र बुलाई कै–" जनम्यो राजकुमार ।
या धौरे प्रल्हादको गुण तैं पढैये ॥ "

" मैं पढचौं राम को नाम और दूजा नहि जानौ ।
ररी मंमा छाड़ि तीसरो अंत न आनौं ॥

कहा पढावै बावरे और सकल जंजार ।
भौसागर जमलोक ते मोहि कौन उतारै पार ॥ "

तब राजा परचरयौं रोस अति मनमें कीन्हों ।
" मेरो बैरी राम सोई तै चित धर लीन्हो ॥

या पढ़िबो तू छाडि दे, कहचो हमारो मान ।
टूक टूक करि डारि हौ जब रे सुणो हरि कान ॥

जो बर्‌जयो सौ बार कह्यो तेरो नहिं मानौ ।
. . . . . . . . . ख्याल मन कबहु न आनौ ॥

पूर्ण ब्रह्म है सकलमें, जाकै यह विस्तार ।
जाके राम सहाय हैं, कौण सकैगो मार ॥

राजा सभा बुलाय बैठ एक मंत्र विचारो ।
लै देखी परतीत जाई गिरवर ते डारो ॥

सकल इति मिलि लै चले दीन्हो सैल चढाय ।
जहँ पंछीकी गंध नहीं, तहँ तै दियो गिराय ॥

बसुधा भई अधीन दीन ह्वै दरसनकूं आई।
मस्तक चरन छुआय लियो हृदै सो लाई॥

कहा भक्तकी त्रास है आदि अंत नहिं औरे।
अबकी सेवा चूक है, तौ तीन लोक नहि ढौर॥

मूरति अधिक अनूप देख माता मुख हेरै।
देख करमके जोग आज प्रहलादहि टेरै॥

हाथ जोर विनती सुण मेरे राजकुमार।
एक घडी हरि छाडि दै उबरै अबकी बार॥

माता मेरी लाग, प्रीति अब तोरी नहिं टूटै।
अंतर रही समाय, अंतर ही अंत न छूटै॥

माली सींचै केवडा, बिन सींचे कुम्हलाय।
एक घडी हरि छाडि़ दूं तडपि तडपि मर जाय॥

असुर भयो मति हीन जबै ले पावक दीन्हो।
अगति क्षालपर जरै, तहाँ डिढ़ आषण कीन्हो॥

सकल देव रक्षा करैं, तहाँ पावक नहिं जाई।
बैठी सीत समंदमै, जानो मीन-मकर जल न्हाई॥

ना जानै प्रहलाद कहा कछु चेटक कीन्हो।
असुर भयो मति-अंध, जबै जल कूपहि दीन्हो॥

सकल संत रिच्छा करैं, ध्रुव नारदसे साख।
जाके राम सहाय है, तहाँ भावे कहा राख॥

हस्त हस्त प्रहलाद तबै, चटसाल पधारे।
ररां मंमा दोउ अंक औसर पर जाई उचारे॥

लै परतीत परचै भयों उपज्यो मन विश्वास।
और सकल संसार ते राजा भयो उदास॥

हाथ जोर प्रह्लाद जबै देवत में आये।
खोजत खोजत असुर वहाँ ही जाय सताये ।।

" जो तोहि राखै सो कहां, मैं तोहि छांडचो नाहि।"
कोमल बचन कुंअर उठि बोले, " मों पति खंभा माहि ।।"

करि गहि लीन्हो खड्ग बांधि सन्मुख है ठाडचो।
" जो तेरो है राम यहाँ क्यों नहि छड़ावहि तोहि।"

" राजा गरब न बोल राम है गरब-प्रहारी।
पूर्ण ब्रह्म हैं सकलमें वेई मनके ईस।
मोंमें तोंमें, खड्ग खंभमें, पूरि रहे जगदीस ।। "

निसिवासर नहि भेद बुद्धि बल करो उपाई।
मारी सोई मारि जो रन सो बाहर माई ।।

अंदर बाहर न मेरे, क्यों कर आवै हाथ।
मति ब्रह्माकी का कह्यो सो तो दीनानाथ ।।

नरसिंह उठे पाल जग, गरब सबही मिटि जाई।
घरि घरि रहे समाय, ठौर खाली नहीं काई ।।

वह पूरण सकलमें कहा बताऊ दूर।
तिल धरिबे को ठौर नहीं रह्यो सकल भरपूर

अस्त भयो है भान उदै रजनीकर कीन्हा।
खंभामें ते निकस जांघ जोधा को लीन्हा ।।

नख सों उदर बिडारिया तिलक दिया महराज।
सप्तदीप नवखण्डमें तीन लोक भई गाज ।।

जहाँ जगतको भीर, तहां सब कारज सारे।
हमसे अधम उधारि किये नरकन से न्यारे ।।

सुर नर मुनि गंधर्व पढै ब्रह्मनिवास।
मनसा वाचा कर्मणा, गावै जन रैदास ।।

# भावार्थ

एका मोठ्या सुंदर शहरीं एक कुलीन राजा राज्य करीत होता. तेथें प्रल्हादाचा जन्म झाला. ऋषिमुनींच्या कार्यास्तव प्रल्हादानें अवतार ग्रहण केला. राजानें ज्ञानी ब्राह्मणास पाचारण करून सांगितलें—"राजकुमार जन्मास आलेला आहे. या सुस्वरूप प्रल्हाद राजकुमारास तुम्ही विद्या शिकवा."

राजानें अशी व्यवस्था केल्यावर भक्त प्रल्हाद म्हणाला, "मी रामाचें नांव जाणतों. तेवढेंच मी शिकलों आहें. अन्य कांहीं मला येत नाहीं. 'रा' आणि 'म' खेरीज तिसरें अक्षर मला येणार नाहीं. हे पंडिता ! तूं मला आणखी काय शिकविणार आहेस ? या मृत्युलोकांतून आणि भवसागरापार मला दुसरें कोण बरें नेऊं शकेल ?" हें ऐकून राजा अत्यंत क्रुद्ध झाला. संतप्त स्वरांत तो म्हणतो, "तुझ्या चित्तीं तूं जतन करीत असलेला तो राम माझा शत्रु होय ! तूं जर हें निमित्त सांगून शिक्षण सोडलेंस, तर याद राख. मी तुला बजावून ठेवतों--हरीचें नांव तूं घेतलेलें कानीं आलें तर तुझे तुकडे तुकडे करून टाकून देईन !"

त्यावर प्रल्हादानेंहि ठामपणें उत्तर दिलें, "हे राजा ! तूं कितीहि वेळां मला रामनामाचा त्याग करायला सांगितलेंस, तरी मी तुझें सांगणें ऐकणार नाहीं. तेव्हां तूं या भ्रमांत राहूंच नकोस कीं, मी तुझें ऐकेन. सर्वत्र पूर्ण ब्रह्माचा विस्तार आहे. हें सारें जगच ब्रह्ममय आहे, आणि ज्याला देव तारतो, त्याला कोण बरें मारूं शकेल ?"

उद्विग्न होऊन राजानें राजसभा बोलाविली आणि तेथें एक विचार पक्का ठरला. या प्रल्हादाला नेऊन डोंगरदऱ्यांतून सोडून द्या आणि मग पाहूं याला काय अनुभव येतो तो ! सगळ्यांनीं अशा प्रकारें कट रचून त्याला एका पर्वतावर नेऊन सोडून दिलें, जेथें पक्ष्यांचें सुद्धां वास्तव्य नव्हतें. सारा शुकशुकाट होता. अशा भयाण पर्वतावरून त्याला लोटून दिलें.

प्रल्हादाचा अनन्वित छळ पाहून त्याची माता अत्यंत कष्टी झाली आणि त्याच्या भेटीला आली. त्यानें आईच्या चरणांवर मस्तक ठेवलें. आईनें त्याला पोटाशीं धरलें. ती म्हणाली, "भक्ताचा हा जो छळ चालू आहे, त्याला

सीमा नाहीं." त्याचें सुंदर मुखमंडल ती निरखूं लागली. आणि इतक्या सुंदर मुलाला विपरीत दैवाची पीडा सहन करावी लागत आहे, या विचारानें दुःखी झाली. तिनें प्रल्हादाला हात जोडून विनंती केली कीं, "हे राजकुमारा, तूं क्षणभर हरीचें नांव सोडून देऊन या छळांतून आतां आपली सुटका करून घे !'

प्रल्हाद यावर उत्तरला, "तूं माझी माता आहेस. तुझा स्नेह अजोड आहे. तुझें प्रेम अनन्य आहे. परंतु माळ्यानें जर केवड्याच्या रोपास पाणी घातलें नाहीं, तर तें ज्याप्रमाणें कोमेजून जाईल, त्याप्रमाणेंच मी जरी एक क्षणभर ईश्वराच्या नामाचा त्याग केला तर मी तडफडून मरेन."

प्रल्हादाचा हा निश्चय पाहून तो राक्षस राजा हिरण्यकश्यपु मतिहीन बनला. त्याची मति अधिकच क्रुद्ध झाली. त्यानें मोठ्या कढईंत तेल उकळत ठेवलें आणि राजकुमारास त्यांत बसावयास लावलें, परंतु याहि दुर्धर प्रसंगीं सकल देवादिकांनीं प्रल्हादाची रक्षा केली. त्या अग्निदिव्याच्या वेळीं त्या राजकुमारास जणूं शीतल अशा सागरांत मत्स्यमगरानें विहार करावा, तद्वत् आल्हाददायक वाटूं लागलें.

असा नाना प्रकारें छळ करूनहि प्रल्हाद आपली ईश्वरनिष्ठा सोडीत नाहीं, असें पाहून तो राक्षस राजा दिङ्मूढ झाला. प्रल्हादानें हें काय चेटुक चालविलें आहे, असें वाटून त्याची दुष्ट बुद्धि अधिकच क्रुद्ध बनली आणि त्यानें राजकुमारास विहिरींत लोटून दिलें. याहि प्रसंगीं सकल संतांची, ध्रुव-नारदांची रक्षा करणाऱ्या परमेशानें प्रल्हादाचा उद्धार केला. ज्याला श्रीरामाची कृपा लाभली आहे, त्यास कोण काय करूं शकेल ?

पुन्हा हंसत हंसत प्रल्हाद शाळेंत येऊन पोहोंचला. 'रा' आणि 'म' हीं दोनच अक्षरें उच्चारूं लागला. त्याची दिव्य लीला पाहून सर्वांस आतां त्याच्या भक्तिभावाची प्रचीति आलेली होती. सर्वांस विश्वास उत्पन्न झाला होता. आणि इकडे राजा मात्र अधिकच कष्टी बनला होता.

देवालयाच्या द्वारीं कर जोडून उभा असलेल्या प्रल्हादास शोधीत शोधीत तो राक्षस राजा तेथें आला. आणि त्याचा छळ करण्याच्या हेतूनें म्हणाला, "जो तुला तारतो तो कुठें आहे सांग ! मी त्यालाहि सोडणार नाहीं."

यावर अत्यंत मृदुमधुर शब्दांत राजकुमार म्हणाला, " माझा रक्षणकर्ता र या खांबामध्यें सुद्धां आहे. " हें ऐकतांच राजानें प्रल्हादास मारण्याच्या उद्देशानें खड्ग हातीं घेतलें आणि त्याच्यासमोर तो उभा ठाकून म्हणाला– " जर तुझा तो राम कुठें असेलच, तर कां मग अजून तुला सोडवायला येत नाहीं; सांग ! "

यावर प्रल्हाद उद्गारला, " राजा ! गर्वानें बोलूं नकोस. माझा राम गर्वहरण करणारा आहे. तो पूर्ण-ब्रह्म आहे. तो सर्वत्र व्याप्त आहे. तोच माझ्या मनांतील भगवंत आहे. माझ्यांत, तुझ्यांत, या तलवारींत आणि खांबांत सुद्धां तो जगदीश सामावलेला आहे. तूं रात्रंदिन उपाय केलेस आणि बुद्धि लढवून कितीहि प्रयत्न केलेस, तरी तो मरणार नाहीं. जो मारायला जाईल तोच मरेल. तो तुझ्या हातीं येईल कसा ? तूं त्यास मारणार कसा ? ब्रह्मस्वरूपाचें वर्णन कसें करूं ? तो तर साक्षात् दीनांचा नाथ आहे, त्राता आहे. जगद्रक्षणासाठीं नरसिंह प्रकट झाला, तर तुम्हां विरोधकांचा सर्व गर्वच मावळून जाईल. त्यानें सर्व विश्व व्यापलेलें आहे. त्याच्यावांचून अणूहि रिता नाहीं. तो सर्वत्र भरलेला असल्यानें तो कुठें दूर असल्याचें कसें सांगूं ? त्याच्या-वांचून तिळभरहि जागा रिती नाहीं. तो सर्वत्र भरून उरलेला आहे " (प्रल्हाद असें म्हणतो आहे तोंच) स्तंभांतून नरसिंह प्रकट झाला. आणि सूर्यास्त झाला आहे आणि चंद्रोदयाची वेळ आहे अशा वेळीं त्यानें हिरण्यकश्यपूला (ठार मारण्यासाठीं) आपल्या मांडीवर ओढलें.

आणि त्या नरसिंहावतारी देवानें नखाग्रांनीं त्या राक्षस राजाचें पोट फाडून टाकलें आणि एका परीनें त्याचा उद्धारच केला. सप्तद्वीप-नवखंडां-मध्यें आणि तिन्ही लोकीं त्याची कीर्ति झाली. जेव्हां जेव्हां जगतीतलावर संकट येतें, तेव्हां तेव्हां तो परमात्मा स्वत: प्रकट होतो. आमच्यासारख्या नीचांचा त्यानेंच नरकापासून बचाव केला. ...सुर, नर, मुनि, गंधर्व, सारे जण ब्रह्माची ही कीर्ति गातात. मनसा, वाचा, कर्मणा संत रोहिदासहि त्या अलौकिक शक्तीची कीर्ति गातो आहे.

• • •

# पदावली

॥ १ ॥

॥ गौरी पुरबी ॥

कूप पऱ्यो जैसे दादिरा कछु देसु बिदेसु न बूझ ।
ऐसे मेरा मनु बिख्या बिमोह्या कछु आरापारु न सूझ ।
सगल भवनके नायक इकु छिनु दरस दिखाइ ।
मलिन भई मति माधवा तेरी गति लखी न जाइ ।
करहु कृपा भ्रम चूकई मैं, सुमति देहु समझाय ।
जोगीसुर पावहिं नहीं तुअ गुण कथनु अपार ।
प्रेम-भगति कै कारणै कहि रविदास चमार ॥

---

विहिरीच्या सीमेंत सांपडलेल्या बेडकास ज्याप्रमाणें देशविदेशाची कांहींच जाणीव नसते, तशी माझी अवस्था झाली आहे. माझें मन विषयविकारांच्या आहारीं गेलें आहे. मला मागचें पुढचें कांहीं कळूं शकत नाहीं. हे सकल सृष्टीच्या नायका, माधवा, मला एक क्षणभर तरी दर्शन दे. माझी मति मलिन बनली आहे, म्हणून तिला तुझी गति कळत नाहीं. तूं मजवर कृपावंत होऊन माझा भ्रम दूर कर, मला सद्बुद्धि दे, मला समजुतीच्या गोष्टी सांग. योगीश्वर तपस्वी सुद्धां तुझें गुणवर्णन नीटसें करूं शकत नाहींत, एवढे तुझे गुण अगाध आहेत. परंतु प्रेमभक्तीचा मार्ग अनुसरणारा रोहिदास चांभार मात्र (आत्मविश्वासानें) हें कथन करीत आहे.

॥ २ ॥

॥ गौरी ॥

मेरी संगति पोच सोच दिनु राती ।
मेरी करम-कुटिलता जनमु कुभाँती ॥
राम गुसइयाँ जीउ के जीवना ।
मोहि न बिसारहु मैं जनु तेरा ॥
हरहु बिपति जन करहु सुभाई ।
चरण न छाडौं सरीर कल जाई ॥
कहि रविदास परौं तेरी साभा ।
बेगि मिलहु जन करि न बिलाँबा ॥

---

माझी संगतसोबत म्हणजे रात्रंदिवस पीडेचा नि चिंतेचाच विषय. पूर्वजन्मींच्या कुकर्मांचें फळ म्हणून नीच कुळांत मी जन्म घेतलेला....पण हे स्वामी श्रीरामा, माझ्या जीवाच्या जीवना, मला अव्हेरूं नकोस रे ! मी तुझा आहें, मला असा दूर लोटूं नकोस ! मजवर दया कर आणि माझी विपदा दूर कर. शरीर जरी मला सोडून गेलें, तरी मी आतां तुझे चरण सोडणार नाहीं. तूं माझी आस पुरविलीच पाहिजे. रोहिदास म्हणतो, हे श्याम ! मी तुला शरण आलों आहें, मला त्वरेनें दर्शन दे. मजसारख्या सामान्य जनास दर्शन देण्यास विलंब लावूं नकोस.

॥ ३ ॥

॥ जैतिश्री ॥

नाथ कछुवै न जानउ ।
मनु मायाकै हाथि बिकानउ ॥
तुम कहियत हौ जगतगुर स्वामी ।
हम कहियत कलिजुगके कामी ॥
इन पंचन मेरो यन जु बिगाऱ्यो ।
पलु पलु हरिजी ते अंतरु पाऱ्यो ॥
जित देखौ तित दुखकी रासी ।
अजौं न पत्याइ निगम भये साखी ॥
इन दूतन खलु बध करि माऱ्यो ।
बडो निलाजु अजहु नहिं हाऱ्यो ॥
कहि रविदास कहा कैसे कीजै ।
बिनु रघुनाथ सरनि काकी लीजै ॥

---

हे नाथ ! मला कांहीं समजेनासें होऊन गेलें आहे. या मायेच्या हातीं मी पुरता विकला गेलों आहें. तूं स्वतःस जगदीश्वर अन् जगाचा स्वामी म्हणवितोस, अन् मी मात्र या कलियुगांत कामी बनून गेलों आहे. पंचेंद्रियांच्या विकारांनीं माझें मनच बिघडवून टाकलें आहे. क्षणोक्षणीं ईश्वरांतील नि माझ्यांतील अंतर वाढत चाललें आहे. जेथें पाहावें तेथें दुःखाची राशि दिसते आहे. प्रत्यक्ष वेदहि तुझें स्वरूप अजून जाणूं शकले नाहींत. या पंचेंद्रिय-विकारांनीं खरोखरीच वेध करून मला घायाळ केलें आहे. पण मीहि किती निलाजरा आहे पहा ! अजून मी हार म्हणून खाल्ली नाहीं. रोहिदास म्हणतो, कसें करूं नि कुठें जाऊं ? रघुनाथाशिवाय दुसऱ्या कोणास शरण जावें ?

॥ ४ ॥

॥ धनाश्री ॥

चित सिमरन करो नैन अवलोकनो ।
स्रवन बानी सुजसु पूरि राखौं ॥
मनु सु मधुकरु करौं चरण हिरदें धरौं ।
रसन अमृत रामनाम भाखौं ॥
मेरी प्रीति गोविंद सिउ जनि घटै ।
मैं तौ मौलि महँगी लई जीउ सटै ॥
साध संगति बिना भाव नहिं ऊपजै ।
भाव बिन भगति नहिं होय तेरी ॥
कहै रविदास एक बेनती हरि सिउ ॥
पैज राखहु राजाराम मेरी ॥

---

माझें चित्त सदैव तुझें स्मरण करो. माझे नयन सदैव तुझें अवलोकन करीत राहोत. तुझ्या सुयशाचें नित्य श्रवण घडो, आणि वाणी त्या सुयशाचाच नित्य उच्चार करो. मधुकराच्या आतुरतेनें माझें हृदय तुझे चरणारविंद आपल्यांत सांठवून ठेवो. माझी जिव्हा नित्य अमृतमय रामनाम भजत राहो. माझी गोविंदाठायींची प्रीति कधींहि कमी न होवो. मी तर प्रसंगीं प्राणांचें मोल देऊन ही प्रीति करीत राहीन. साधुसज्जनांच्या संगतिविना ईश्वरप्रीतीचा भाव चित्तीं उमटत नाहीं आणि असा भाव उमटल्याशिवाय ईश्वराची भक्तिहि साकार होत नाहीं. म्हणून संत रोहिदास म्हणतो, माझी तुझ्या चरणीं एक विनंती आहे कीं, हे राजारामा, तूं माझा उद्धार करून आपल्या ब्रीदाला जाग.

॥ ५ ॥

॥ सूही ॥

जो दिन आवहि सो दिन जाही । करना कूच रहन थिरु नाहीं ॥
संगु चलत हैं हम भी चलना । दूरि गवनु सिर ऊपरि मरना ॥
क्या तू सोया जाग अयाना । तैं जीवन जागी सचु करि जाना ॥
जिनि दिया सु दिजकु अंबरावै । सभ घट भीतरि हाटु चलावै ॥
करि बँदिगी छाँडि मैं मेरा । हिरदै नामु सम्हारि सवेरा ॥
जनमु सिरानो पंथु न सँवारा । साँझ परी दह दिसि अँधियारा ॥
कह रविदास नदान दिवाने । चेतसि नाही दुनिया फनखाने ॥

---

हे मानवा जागा हो ! आला दिवस निघून जातो. आणि तुला इथें कायमचें थोडेंच राहायचें आहे ! इथें तुझें राहणें कायमचें नाहीं. एक दिवस तुला येथून 'कूच' करायचें आहे. खरें तर आपल्या जीवनप्रवासाबरोबरच हें येथून जाण्याचें कार्य होत राहतं. दूर जायचें असतें आपल्याला, पण सदैव मृत्यु आपली सोबत करीत असतो. ही मानवजीवनाची अनित्यता तूं जाणून घे आणि जागा हो. तुला या जीवनांत कांहीं तरी शाश्वत स्वरूपाचें करून जायचें आहे. ज्यानें तुला जन्मास घातलें, तोच तुझी जीविकाहि उपलब्ध करून देत असतो, तोच साऱ्या जीवित प्राण्यांचे परस्पर व्यवहार चालवीत असतो. हें जाणून तूं त्याला वंदन कर. 'मी-माझें' ही अहंमन्यता सोडून दे. आणि लवकर तुझ्या हृदयीं त्या अलौकिकाचें नांव स्मरूं लाग....तुला लवकर जागें व्हायलाच हवें. जन्म सारा संपत चालला आहे. तुझा (मोक्षप्राप्तीचा) पथहि अजून प्रशस्त झालेला नाहीं. सायंकाळ दाटून आली आहे. दाही दिशा अंधारूं लागल्या आहेत. रोहिदास म्हणतो, हे नादान मानवा ! अजून जागा हो. जागा झाला नाहींस, तर हें पक्कें ध्यानीं ठेव कीं, हें जग नाशिवंत आहे.

॥ ६ ॥

॥ सूही ॥

सहकी सार सुहागिनी जानै । तज अभिमान सुख रलिया मानै ॥
तनु मनु देइ न सुनै न अंतर राखै । अबरा देखि न सुनै न माखै ॥
सो कत जानै पीर पराई । जाके अंतर दरद न पाई ॥
दुखी दुहागिनि दुइ पखहीनी । जिनि नाह निरंतरि भगति न कीनी ॥
रामप्रीतिका पंथ दुहेला । संगि न साथी गवन अकेला ॥
दुखिया दरदमंद दरि आया । बहुतै प्यास जबाब न पाया ॥
कहि रविदास सरनि प्रभु तेरी । ज्यु जानहु त्यूँ करु गति मेरी ॥

---

पतिव्रतेच्या समर्पणशीलतेचा आणि मीलनानुभवाचा उल्लेख करून कवि म्हणतो–खरें तर मीलनाचें रहस्य केवळ पतिव्रताच जाणू शकते. आपल्या साऱ्या अहंतेची जाणीव दूर सारून तो परमानुभव प्राप्त करतांना ती सर्वस्वानें आपल्या सख्याशीं एकरूप होऊन जातें. तिनें तनामनाचें समर्पण केल्यामुळें आपल्या सख्याशीं ती कसलेंच अंतर राखत नाहीं. दुसऱ्या कुणाचा विचारच तिला शिवत नाहीं. त्याचा क्षणाचा विरहहि तिला मरणाहून अधिक भयानक वाटतो. परमविरहाची ही व्यथा ज्यानें अनुभवलीच नाहीं, त्याला इतरांची तसली व्यथा कशी समजू शकणार ? जिनें आपल्या नाथाच्या ठायीं निरंतर भक्तीचा ध्यास घेतला नाहीं, ती अभागिनी दोन्ही पंखांना मुकलेल्या अगतिक पक्षिणीप्रमाणें दुःखीच राहणार. रामप्रीतीचा पंथ हा असा दुष्कर आहे. त्यावर सोबतीवांचून एकाकीपणेंच वाटचाल करावी लागते. रोहिदास म्हणतो आहे कीं, हे प्रभो, वाटचालीनें त्रस्त झालेला आणि तुझ्या साक्षात्कारासाठीं तहानलेला मी–मला दिसते आहे कीं, कृपेचा सागर समोर हेलावतो आहे, पण अजून माझी तृषा शमली नाहीं. हे प्रभो, मी तुला सर्वस्वानें शरण आलों आहें. तुला माझें जें भलेंबुरें करायचें असेल, तें कर.

## ॥ ७ ॥

### ॥ बिलावल ॥

जिही कुल साधु बैसनौ होइ ।
बरन अबरन रंक ईश्वर, बिमल बासु जानिये जग सोइ ।
बाँभन बैस सूद अरु ख्यत्री, डोम चंडाल मलेच्छ किन सोइ ।
होइ पुनीत भगवंत भजन ते, आपु तारि तारै कुल दोइ ॥
धनि सु गाउँ धनि धनि सो ठाऊँ, धनि पुनीत कुटँब सभ लोइ ।
जिनि पिया साररस तजे आन रस, होइ रसमगन डारे बिषु खोइ ॥
पंडित सूर छत्रपति राजा, भगत बराबरि औरु न कोइ ।
जैसे पुरैन-पात जल रहै समीप, भनि रविदास जनमे जगि ओइ ॥

---

साधु, मग तो कोणत्याहि कुळांत जन्मलेला असो, वैष्णव म्हणजे हरिभक्त होऊं शकतो. वर्ण-अवर्ण, राजा आणि रंक असा भेद (खरा नाहीं.) हें जग (अशा मतभेदांनीं कलुषित नसून) पवित्र आहे, असें तो मानतो. तो ब्राह्मण असो, वैश्य असो, शूद्र असो, आणि क्षत्रिय, डोम, चांडाळ, म्लेंछ कां असेना! भगवंताचें भजन-गायन करून तो पुनीत होतो अन् स्वतः तर उद्धरून जातोच, पण स्वतःच्या कुळाचाहि उद्धार करतो. त्याचें गांव, त्याचें राहण्याचें स्थान, त्याचें कुटुंब, त्याचे आप्तइष्ट सारेच धन्य होऊन जातात—पावन होऊन जातात. ज्यांनीं अन्य सर्व प्रलोभनांचा त्याग करून भक्तिरूप रसाचें पान केलें, ते त्या अद्भुत रसामध्यें रममाण होऊन जातात. त्यांचे सारे विषय-विकार नष्ट होऊन जातात. ज्ञानी, वीरपुरुष, राजा-महाराजा यांची भक्तांशीं तुलना करतां येणार नाहीं. ज्याप्रमाणें जळांत राहूनहि कमलपत्र त्यापासून सदैव अलिप्तच राहतें, त्याचप्रमाणें रोहिदास म्हणतो, (संसारांत राहून अलिप्त असणारा) भक्त जगांत श्रेष्ठ होय.

. . . ८

॥ ८ ॥

ज्यांहा देखो वांहा चामही चाम ।
चामके मंदिर बोलत राम ॥ १ ॥
चामकी गऊ चामका बचडा ।
चामही धुने चामही ठाडा ॥ २ ॥
चामका हाती चामका राजा ।
चामके ऊँटपर चामका बाजा ॥ ३ ॥
कहत रोहिदास सुनो कबीर भाई ।
चाम बिना देह किनकी बनाई ॥ ४ ॥ *

---

चर्मकाराच्या व्यवसायांत नित्य राहून ईश्वरार्पणबुद्धीनें कर्तव्य करणारा साधक रोहिदास सांगतो, जेथें पाहावें तेथें चामडेंच चामडें दिसून येईल. चर्माच्याच शरीररूपी मंदिरांत राम विराजित झाला आहे. गायहि चामड्याची, वासरूहि चामड्याचें. चामडेंच सर्वत्र पसरलेलें. चामडेंच सर्वत्र व्यापून राहिलेलें. चामड्याचा राजा आणि चामड्याचाच हत्ती. उंटहि चामड्याचाच आणि त्याच्यावर ठेवलेलें वाद्यहि चामड्यांनींच मढवलेलें. रोहिदास कबीरदासांना संबोधून सांगत आहे, चर्माशिवाय देह अन्य कशाचा बनवला आहे ?

* कबीराचा गाथा : प्रकाशक वि. ना. गोडबोले, पंढरपूर. पृ. १२४.

॥ ९ ॥

ऐसी लाल तुझ बिन कौन करै ।
गरीब-निवाजु गुसैयां मेरे माथे छत्र धरै ॥ टेक ॥
जा की छूत जगत कौं लागै तापर तू ही ढरै ।
नीचहिं ऊँच करै मेरा गोविंदु काहू तैं न डरै ॥
नामदेव कबीर तिलोचन सधना सैनु तरै ।
कहि 'रविदास' सुनहु रे संतहु हरि जीउ ते सभै सरै ॥

---

हे परमेशा ! तुझ्याविना कृपावंत असा दुसरा कोण आहे बरें ? दीनांचा नाथ आणि चराचराचें पालन करणारा असा तो परमेश्वर माझे शिरीं कृपेचें छत्र धरीत आहे. जग ज्याला अस्पृश्य मानतें, त्यावर तूं कृपेचा वर्षाव करतोस. माझा गोविंद पतितास पावन करणारा आहे. त्याचा सर्वांस आधार वाटतो.

संत नामदेव, संत कबीर, संत त्रिलोचन, संत सेना न्हावी अन् संत सदन कसाई या सर्वांचा प्रेमळ ईश्वरानें उद्धार केला. म्हणून संत रोहिदास म्हणतो, हे संतजन हो, विश्वास ठेवा, ईश्वरकृपा ज्यांना प्राप्त झाली, त्यांचें सारें भय दूर झालें.

॥ १० ॥

हम सरि दीन, दयालु न तुम सरि,
अब पतियाय कहा कीजै ।
बचनी तोर मोर मन मानै
जन कौ पूरन दीजै ॥ १ ॥
हौं बलि बलि जाऊँ रमैय्या कारने,
और कौन अबोल ॥ टेक ॥
बहुत जनम बिछुरे थे माधव,
इहु जनम तुम्हारे लेखे ।
कहि 'रविदास' आस लगि जीवौं,
चिर भयो दर्शन देखे ॥ २ ॥

---

ईश्वराला उद्देशून रोहिदास म्हणतो.—हे परमेशा ! तुझ्यासारखा दीनांवर कृपेची सावली करणारा दयाळू आणि माझ्यासारखा दीन तरी दुसरा कोण असेल ? आतां तूंच सांग, मी या प्रकाराचें वर्णन कसा करूं ? तुझेच शब्द माझें मन सदैव ऐकत असतें. जगाच्या व्यवहाराशीं माझें नातें कुठें राहिलें आहे ? हे माझ्या अनन्यनिष्ठेच्या आराध्यदेवा, तुझ्या कृपेसाठीं मी सदैव तुला शरण येत राहीन. त्यासाठीं सर्व प्रकारें यत्न करीन, मग कुणी कांहीहि म्हणोत. . . . किती किती जन्म होऊन गेले कुणास ठाऊक ! आपली दीर्घ काल ताटातूट झाली आहे. हे माधवा ! या जन्मीं तुला भेटूं शकतों आहें. रोहिदास म्हणतो, माझ्या जीवास तुझ्याच भेटीची सदैव ओढ लागलेली असते. तुला दीर्घ विरहानंतर पाहून कृतकृत्य झालों आहे.

॥ ११ ॥

माटीका पुतरा कैसे नाचतु है ?
देखै, सुनै, बोलै दोन्यो फिरतु है ॥ टेक ॥

जब कछु पावै तो गर्व करतु है ।
माया गई तो रोवन लगतु है ॥ १ ॥

मन, बच, कर्म रस कसहिं लुभाना ।
विनसि कया जाय कहूँ सयाना ॥ २ ॥

कहि 'रविदास' बाजी जगु भाई ।
बाजीगर से मोहिं प्रीत बनि आई ॥ ३ ॥

---

हा मानवरूपी मातीचा चालता बोलता पुतळा पहा कसा नाचतो आहे! तो पाहूं शकतो, ऐकतो, बोलतो, धांवतो, फिरत राहतो. जेव्हां त्याला कांहीं प्राप्त होतें, तेव्हां तो गर्वानें वागतो आणि जेव्हां प्राप्त झालेलें हरवून बसतो, तेव्हां दुःख करूं लागतो. मनसा-वाचा-कर्मणा जगाच्या मोहजालांत तो फसतो. काया नाशवंत आहे असें अनुभवी जन सांगतात, याचें त्याला भान नाहीं. रोहिदास म्हणतो– मानवा! हें जग म्हणजे जणूं जादूगाराची नगरी आहे आणि मी त्या जादूगारावर मोहित होऊन त्याच्याशीं प्रीतीचें नातें जडवलें आहे.

॥ १२ ॥

राम बिन संसय गाँठि न छूटै ।
काम किरोध लोभ दया माया,
इन पंचन मिली लूटै ॥ टेक ॥
हम बड कबि कुलीन हम पंडित,
हम जोगी संयासी ।
ज्ञानी गुनी सूर हम दाता,
याहु कहे मति नासी ॥ १ ॥
पढे गुने कछु समुझि न परई,
जौं लौं भाव न दरसै ।
लोहा हिरन होइ धौं कैसे,
जौं पारस नहिं परसै ॥ २ ॥
कह रैदास और असमुझ सी,
चलि परे भ्रम भोरे ।
एक अधार नाम नरहरि को,
जिवन प्रान धन मोरे ॥ ३ ॥

---

रामाविना जीवाचा भ्रम दूर होऊं शकत नाहीं. काम, क्रोध, मद, लोभ अन् माया या पांच लुटारूंनीं जीवास त्रस्त केलें आहे. आम्ही मोठे कवि, कुलीन, पंडित अथवा थोर योगी संन्यासी आहोंत; आम्ही ज्ञानी, गुणी, शूर आहोंत; आम्ही दानी महात्मा आहोंत, असें अहंमन्यतेनें म्हणत राहिल्यानें मति भ्रष्ट होते. केवळ पुस्तकी शिकण्यानें सर्व कांहीं समजतें असें नव्हे. जोंवर भक्तिभाव निर्माण होत नाहीं तोंवर विद्वत्ता व्यर्थ आहे. लोखंडाचें लोखंडपण परिस-स्पर्शाशिवाय नष्ट होत नाहीं. म्हणून संत रोहिदास म्हणतो, मला केवळ नरहरीच्या नामाचाच आधार आहे. तोच माझें जीवन, तोच माझें धन आहे.

॥ १३ ॥

नरहरि चंचल है मति मेरी।
कैसे भगति करूँ मैं तेरी ॥ टेक ॥
तू मोहिँ देखै हौं तोहि देखूँ,
प्रीति परस्पर होई ॥ १ ॥
तू मोहिँ देखै तोहि न देखूँ,
यह मति सब बुधि खोई ॥ २ ॥
सब घट अंतर रमसि निरंतर,
मैं नहिँ देखन जाना।
गुन सब तोर मोर सब औगुन,
कृत उपकार न माना ॥ ३ ॥
मैं तैं तोरि मोरि असमझिसौं,
कैसे करि निस्तारा।
कह रैदास कृस्न करुनामय,
जै जै जगत अधारा ॥ ४ ॥

---

हे नरहरी ! माझी बुद्धि चंचल आहे. मी तुझी भक्ति कशी करूं, असा मला प्रश्न पडला आहे. तूं जर मला पाहशील आणि मीहि तुला पाहूं शकेन, तरच आपलें परस्पर प्रेम निर्माण होईल. पण तूं मला पाहशील, तेव्हां मीच तुला पाहूं शकणार नाहीं, अशा विचारानें माझी मति विषम होऊन जाते. पण खरें तर प्रत्येकाच्या शरीरांत तूं निरंतर वास करतोस. पण मीं तें पाहायला अजून शिकलोंच नाहीं. तूं मजवर आजवर अनंत उपकार केले आहेस, पण मी त्या उपकारांची जाणीव ठेवली आहे कोठें ? माझ्यांत जे गुण आहेत, त्याचें सारें श्रेय तुला आहे. माझे जे अवगुण आहेत, त्या सर्वांस मी जबाबदार आहे. मी-माझें, तूं-तुझें अशा भ्रमांत आम्ही पडलों आहोंत, आमचा उद्धार तरी कसा व्हावा ? रोहिदास करुणामय कृष्ण परमेशास उद्देशून म्हणतो, तुझा जयजयकार असो. तूं जगदाधार आहेस !

॥ १४ ॥

आयौं हो आयौं देव तुम सरन।
जानि कृपा कीजे अपनौ जन ॥ टेक ॥

त्रिविध जोनि बास जम को अगम त्रास,
तुम्हरे भजन बिन भ्रमत फिरौं।

ममता अहं विषै मद मातौ,
यह सुख कबहुँ न दुतर तिरौं ॥ १ ॥

तुम्हरे नाँव बिसास, छाडी है आन की आस,
संसार धरम मेरो मन न धीजै।

रैदास दास की सेवा मानि हो देव बिधि देव,
पतितपावन नाम प्रगट कीजै ॥ २ ॥

---

भक्त रोहिदास ईश्वराची करुणा भाकीत आहे. तो म्हणतो--हे परमेश्वरा ! मी तुला शरण आलों आहें. मी तुझाच आहे, असें समजून माझ्यावर कृपेचा वर्षाव कर. तिन्ही योनींमध्यें यमाचा असह्य त्रास चुकत नाहीं. आणि मी तुझ्या भजन-चिंतनाविना जन्ममरणाच्या फेऱ्यांत गुरफटून बसलों. ममत्व, अहंता, मद यांनीं मी मातलों आहे. हा दुस्तर मोहसागर तरून गेलों नाहीं, तर मला परमसुख कसें लाभणार? मी तुझ्या नामावर विसंबून आहे. मला अन्य कुणाच्याहि सहाय्याची आशा नाहीं. मी सांसारिक मोहपाशांत अडकल्यानें माझें मन दुर्बल बनलें आहे. झाली ती सेवा गोड मानून या दासास तूं कृपा प्रदान कर, असें सांगून रोहिदास म्हणतो, तसें केल्यानें तुझें ‘पतितपावन’ नांव सार्थ होणार आहे.

## ॥ १५ ॥

भाई रे भरम भगति सुजान।
जौ लौं साँच सौं नहिँ पहिचान ॥ टेक ॥

भरम नाचन भरम गायन, भरम जप तप ध्यान।
भरम सेवा भरम पूजा, भरम सो पहिचान ॥ १ ॥

भरम षटक्रम सकल सहता, भरम गृहबन जानि।
भरम करि करि करम कीये, भरम की यह बानि ॥२॥

भरम इंद्री निग्रह कीया, भरम गुफा में बास।
भरम तौ लौ जानिये, सुन्न की करै आस ॥ ३ ॥

भरम सुद्ध सरीर तौ लौं, भरम नावँ बिनावँ।
भरम भनि रैदास तौ लौं, जौ लौं चाहै ठावँ ॥ ४ ॥

---

हे साधक बंधो, परमसत्याच्या साक्षात्काराविना भक्ति हा केवळ भ्रमच आहे. जोंवर सत्याचा साक्षात्कार नाहीं, तोंवर तुझें गायन, नर्तन, जप, तप, ध्यान, सेवा, पूजा हें भ्रमपूर्णच होय. तुला गृहीं काय किंवा वनीं काय, कांहींच गवसणार नाहीं. षट्कर्में करूनहि तूं कांहीं साधूं शकणार नाहींस. इंद्रियांचा निग्रह करून किंवा गुंफेंत बसून कांहीं साधणार नाहीं. रोहिदास म्हणतो, जोंवर तूं प्रापंचिक मोहांनीं ग्रस्त आहेस, तोंवर तुझी सर्व साधना ही भ्रांतीच ठरणार.

॥ १६ ॥

राम मैं पूजा कहा चढाऊँ ।
फल अरु फूल अनूप न पाऊँ ॥ टेक ॥
थनहर दूध जो बछरू जुठारी ।
पुहुप भँवर जल मीन बिगारी ॥ १ ॥
मलयागिर बोधियो भुअंगा ।
विष अम्रित दोउ एकै संगा ॥ २ ॥
मनही पूजा मनही धूप ।
मनही सेऊँ सहज सरूप ॥ ३ ॥
पूजा अरचा न जानूँ तेरी ।
कह रैदास कवन गति मेरी ॥ ४ ॥

---

संत रोहिदासापुढें असा प्रश्न पडला आहे कीं, परमेश्वराची पूजाअर्चा कशी करावी ? कारण त्या सर्वशक्तिमान् देवाधिदेवाची पूजा करण्यासाठीं योग्य असें कांहींच त्याच्यापाशीं नाहीं. तो म्हणतो, हे रामा ! मी तुझी पूजा कशानें करूं ? गाईचें दूधहि वासरानें उष्टावलेलें आहे. कमलपुष्पास भ्रमर, पाणी आणि मासे यांनीं भ्रष्ट केलें आहे. शुभ्र चंदनहि भुजंगानें ग्रासलें आहे, विष अन् अमृत एकत्र नांदतें आहे...अशा स्थितींत मी काय बरें करावें ?

मनामध्येंच पूजा करावी. मनांतच धूप जाळावा. आणि मनानेंच त्या दिव्य स्वरूपाची सेवा करावी. प्रभूची पूजाअर्चा कशी करावी, हें मी जाणत नाहीं. रोहिदास शेवटीं ईश्वरास पृच्छा करतो, आतां अशा स्थितींत मी काय करावें ?

॥ १७ ॥

रामा हो जग जीवन मोरा ।
तूं न बिसारि राम मैं जन तोरा ॥ टेक ॥
सकट सोच पोच दिन राती ।
करम कठिन मोरि जाति कुजाती ॥ १ ॥
हरहु बिपति भावै करहु सो भाव ।
चरन न छाडौं जाव सो जाव ॥ २ ॥
कह रैदास कछु देहु अलंबन ।
बेगि मिलो जीन करो विलंबन ॥ ३ ॥

---

आपला उद्धार करण्याची प्रार्थना करणारा संत विनम्र होऊन म्हणतो– हे प्रभु रामचंद्रा ! या जगांतील माझें जीवन तुला समर्पित असो. तूं हें विसरूं नकोस कीं, मी तुझाच सेवक आहें. येथें रात्रंदिन संकटांत सांपडलों आहें. काळजीनें बेजार झालों आहें. त्यांतून मी हलक्या जातींत जन्म घेतला, माझें कर्महि निंद्य आहे. हे ईश्वरा ! तूं माझी आपदा दूर कर. तुला जसा रुचेल तसा माझा उद्धार कर. मी तुला शरण आलों आहे. आतां तुझे हे चरण मी सोडणार नाहीं. त्यांतूनहि तूं मला सोडून जाणार असशील, तर जा. हा रोहिदास तुला विनवून सांगतों आहें कीं, मला तूं थोडासा आश्रय दे, आधार दे. सत्वर मला दर्शन दे. आतां विलंब करूं नकोस.

॥ १८ ॥

त्यों तुम कारन केसवे, लालच जिव लागा ।
निकट नाथ प्रापत नहीं, मन मोर अभागा ॥ टेक ॥
सागर, सलिल सरोदिका, जल थल अधिकाई ।
स्वाँति बुंदकी आस है, पिउ प्यास न जाई ॥ १ ॥
जौं रे सनेही चाहिये, चित्त बहु दूरी ।
पंगुल फल न पहूँच ही, कछु साध न पूरी ॥ २ ॥
कह रैदास अकथ कथा, उपनिषद सुनीजै ।
जस तूं तस तूं तस तुहीं, कस उपमा दीजै ॥ ३ ॥

---

हे केशवदेवा ! तुझ्या प्राप्तीची मला भारी ओढ लागून राहिली आहे. तूं माझ्या निकट आहेस, पण प्राप्त होत नाहींस; म्हणून मला माझ्या दुर्भाग्याबद्दल खंत वाटते.

सरोवर, नदी आणि सागर यांच्या जलामुळें सर्वत्र पाणी उपलब्ध आहे; परंतु स्वातीच्या एका थेंबासाठीं चातक भुकेलेला असतो.

मला तुझा स्नेह हवा आहे. त्याविना माझें चित्त व्याकुळ झालें आहे. पांगळ्या माणसास ज्याप्रमाणें फळ दिसूनहि त्याच्यापर्यंत पोहोंचतां येऊं नये, तसें माझें झालें आहे. तुझ्या प्राप्तीची माझी इच्छा पूर्ण होत नाहीं.

संत रोहिदास म्हणतो, त्या ईश्वराची सारी कहाणीच अकथनीय आहे. उपनिषदें सांगतात कीं, तो ईश्वर जसा आहे तसा आहे. त्याला आणखी उपमा कोणती द्यावी ? तो त्याच्यासारखाच आहे.

॥ १९ ॥

जब राम नाम कहि गावैगा,
तब भेद अभेद समावैगा ॥ टेक ॥

जे सुख है या रसके परसे,
सो सुख का कहि गावैगा ॥ १ ॥

गुरुपरसाद भई अनुभौ मति,
विष अम्रित सम धावैगा ॥ २ ॥

कह रैदास मेटि आपापर,
तब वा ठोरै हि पावैगा ॥ ३ ॥

---

हे साधका, जेव्हां तूं रामनामाचा जप करूं लागशील, तेव्हां तुझ्या मनांतील साऱ्या शंका-कुशंका दूर होतील. आत्मा-परमात्मा यांचा अभेद्य संबंध तुझ्या ध्यानीं येईल. रामनामरूपी रसाच्या सेवनानें जें सुख प्राप्त होतें, त्याचें वर्णन मी कोणत्या शब्दांत करूं ?

श्रीगुरूच्या कृपाप्रसादानें वास्तविक ज्ञानाचा अनुभव प्राप्त होतो. मग विष आणि अमृत हीं समान भासूं लागतात. संत रोहिदास म्हणतो, मग आपपरभाव नष्ट होतो अणि या सृष्टीला व्यापून उरलेली ती अलौकिकाची ईश्वरी दुनिया प्राप्त होऊन जाते.

॥ २० ॥

भगति ऐसी सुनहु रे भाई ।
आई भगति तब गई बडाई ॥ टेक ॥
कहा भयो नाचे अरु गाये,
कहा भयो तप कीन्हे ।
कहा भयो जे चरन पखारे,
जौ लौ तत्त्व न चीन्हे ॥ १ ॥
कहा भयो जे मूंड मुडायो,
कहा तीर्थ ब्रत कीन्हे ।
स्वामी दास भगत अरु सेवक,
परम तत्त्व नहिं चीन्हे ॥ २ ॥
कह रैदास तेरी भगति दूरि है,
भाग बडे सो पावै ।
तजि अभिमान मेटि आपापर,
पिपिलक ह्वै चुनि खावै ॥ ३ ॥

---

भक्तीचें वास्तविक स्वरूप समजावून देतांना संतकवि सांगतो—साधक हो, भक्ति कशी आहे हें लक्षपूर्वक ऐका. ही भक्ति जेव्हां आपण करूं लागतों, तेव्हां अहंभाव दूर होतो. जोंवर परमतत्त्वाचें ज्ञान प्राप्त केलें नाहीं, तोंवर प्रभुमूर्तीपुढचें नर्तन, गायन, पदप्रक्षाळण आणि तप यांचा काय उपयोग ? तोंवर मुंडन करून आणि व्रततीर्थें धुंडाळून तरी काय लाभ होतो ? परतत्त्वाची वास्तविक ओळख होत नाहीं, तोंवर बाह्याचार व्यर्थच होय. आणि परमतत्त्व स्वामी, दास, भक्त, सेवक असा आपपरभाव जाणतच नाहीं. भक्त रोहिदास म्हणतो, तुझी सत्यज्ञानहीन भक्ति व्यर्थ आहे. ज्यांचें भाग्य थोर, त्यांनाच सत्य गवसतें. अहंभाव सोडून द्यावा अन् आपपरभेदाच्या अतीत जाऊन सामरस्य प्राप्त करावें. मुंगी बनून साखर खावी.

॥ २१ ॥

सुखसागर सुरतरु, चिंतामनि कामधेनु बसि जाके रे।
चारि पदारथ, असट महासिधि नवनिधि करतल ताके रे।
हरि हरि हरि न जपसि रसना।
अवर सभ छाडि बचन रचना॥
नाना ख्यान पुरान बेद बिधि चौतीस अच्छर माही।
व्यास बिचारि कह्यो परमारथ रांम-नांम सरि नाही।
सहज समाधि उपाधिरहित होइ बडे भागि लिव लागी।
कहि रविदास उदास दासमति जमम-मरनभय भागी॥

---

चार पदार्थ, अष्ट महासिद्धि आणि नवनिधि ज्याच्या हाताशीं आहेत अशा त्या सुखसागर ईश्वरापाशीं कल्पवृक्ष, चिंतामणि आणि कमधेनूहि आहे. पण हे साधका! तूं रसनेनें निरंतर हरिनामाचा जप करीत नाहींस. बाकी सारें वाग्जाल आहे. तूं त्याचा त्याग कर. नाना आख्यानें, पुराणें, वेद, विधि यांचें सार चौतीस अक्षरांत सामावलेलें आहे. व्यासमुनींनीं मोठ्या विचारपूर्वक परमार्थ कथन केला, पण रामनामाशीं त्याची तुलना होऊं शकत नाहीं.

साऱ्या उपाधींचा त्याग करून जो सहज समाधि ग्रहण करतो, तो भाग्यवान् होय. रोहिदास स्वतःकडे विनयाची भूमिकाची घेऊन सांगतो, अशा मार्गाचें अनुसरण केल्यानें या हरिसेवकाचें जन्ममृत्यूचें भय दूर झालें आहे.

॥ २२ ॥

॥ मल्हार ॥

मिलत पियारो प्राननाथ कवनि भगति ।
साध-संगति पाई परम गति ॥
मैले कपरे कहाँ लउ धोवउ ।
आवैगी नींद कहाँ लउ सोवउँ ॥
जोई-जोई जोन्यो सोई-सोई फाट्यो ।
झूठै बनजि उठि ही गई हाट्यो ॥
कहि रविदास भयो जब लेख्यो ।
जोई-जोई कीन्यो सोई-सोई देख्यो ॥

---

साधकास परमावस्था प्राप्त झाली कीं, त्याचे सारे जीवन-व्यापार त्याला अर्थशून्य वाटूं लागतात. मग तो त्या अद्‌भुत स्थितींत ईश्वरमय होऊन जातो. अशी ही अवस्था--

प्राणनाथ ईश्वराची भेट झाल्यानंतर आणखी वेगळी अशी त्याची भक्ति कोणती करावी ? साधुसंतांच्या पावन संगतीनें मला अशी परमगति प्राप्त झाली आहे. मलिन झालेले हे कपडे आतां मी कुठें अन् कसे स्वच्छ करूं ? झोप जर आली तर, कुठें झोपूं ? .... नित्याचे माझे व्यवहार करण्याचें मला भानच कुठें राहिलें आहे ! ... हा सांसारिक व्यापार सारा खोटाच. येथील व्यापारहि खोटा आणि बाजारहि खोटा. जों जों आपण संचय करावा, तों तों आपण हरवून बसावें, वास्तविक कर्तव्यापासून दूर व्हावें. रोहिदास म्हणतो--जेव्हां आत्मसाक्षात्कार झाला तेव्हांपासून जें जें मी करतों आहें, तें तें सर्व दिव्य अनुभवाच्या स्पर्शानें भारलें आहे.

॥ २३ ॥

॥ राग केदार ॥

कहु मन राम नाम सँभारि ।
माया के भ्रम कहा भूल्यो, जाहुगे कर झारि ॥ टेक ॥
देखि धौं इहाँ कौन तेरो, सगा सुत नहिं नारि ।
तोरि उतँग सब दूरि करिहैं, देहिंगे तन जारि ॥ १ ॥
प्रान गये कहों कौन तेरा, देखि सोच बिचारि ।
बहुरि येहि कलि काल नहीं, जीति भावै हारि ॥ २ ॥
यहु माया सब थोथरी रे, भगति दिस प्रतिहारि ।
कह रैदास सत बचन गुरुके, सों जिव ते न बिसारि ॥३॥

---

बा मना ! रामनामाचा अवलंब कर. मायेच्या मोहपाशांत असा अडकून राहिलास तर हात झाडीत अर्थात् कांहींहि पुण्यसंचय न करतां येथून जाण्याचा प्रसंग गुदरेल. जरा तूं नीट विचार करून पहा–इथें कोण तुझें आहे ? सख्खा पुत्र सुद्धां तुझा नाहीं. पत्नीहि तुझी नाहीं. तूं येथून जायची वेळ झाली कीं यांपैकीं कुणीहि तुझ्याबरोबर येणार नाहीं. तुझें शरीर जाळून टाकण्यांत येईल. एकदां तुझे प्राण निघून गेले कीं, मग तुझें कोण राहिलें ? तेव्हां तूं याचा नीट विचार कर. योग्य तो बोध घे, हा कलिकालांतील तुझा जन्म तुला पुन्हा प्राप्त होणार नाहीं, म्हणून भावभक्तीचा स्वीकार करून जीवनाचें सार्थक कर. ही सारी माया फुकाची आहे रे ! तूं या खोटया मोहमायेचा त्याग कर आणि भक्तीच्या दिशेनें वाटचाल कर. संत रोहिदास म्हणतो–मी हें सद्‌गुरूचें सत्यकथन सांगतों आहें. हे जीवा, तें कथन विसरूं नकोस.

....९

॥ २४ ॥

चल मन हरि चटसाल पढाऊँ ॥ टेक ॥

गुरु की साटि ज्ञान का अच्छर।
बिसरै तौ सहज समाधि लगाऊँ ॥ १ ॥

प्रेम की पाटी सुरति की लेखनि।
ररौ ममौ लिखि आँक लखाऊँ ॥ २ ॥

येहि बिधि मुक्त भये सनकादिक
हृदय बिचार प्रकास दिखाऊँ ॥ ३ ॥

कागद कँवल मति मसि करि निर्मल।
बिन रसना निसदिन गुन गाऊँ ॥ ४ ॥

कह रैदास राम भजु भाई।
संत साखि दे बाहुरि न आऊँ ॥ ५ ॥

---

हे मना ! चल, आपण ईश्वराच्या पाठशाळेंत शिकण्यासाठीं जाऊं ! सद्गुरूची शिस्त पाळूं अन् मग ज्ञानाचीं अक्षरें आपोआप समजूं लागतील ! जर कां चकभूल झाली, तर आपण सहज-समाधि लावूं या. प्रेमाची पाटी हातीं घेऊं. स्मृति अथवा स्मरणाची लेखणी करूं. गिरवून गिरवून एक एक अक्षर लिहूं या. आणि तें दाखवूं या. अशाच पद्धतीनें सनकादिक ऋषिमुनि मुक्त झाले. आपण आपल्या हृदयीं ज्ञानाचा प्रकाश प्रकट करूं या. हृदयकमलाच्या पत्रावर बुद्धीच्या परिशुद्ध शाईनें रात्रंदिन हरिगुणगीतें लिहूं या. रोहिदास म्हणतो, हे साधो, रामाचें भजन कर. संत स्वानुभवानें सांगतो आहे. पुन्हा तुला कुणी सांगायला येणार नाहीं.

## ॥ २५ ॥

॥ राग कानडा ॥

माया मोहिला कान्हा,
मैं जन सेवक तेरा ॥ टेक ॥

संसार प्रपंच मैं व्याकुल परमानंदा ।
त्राहि त्राहि अनाथ गोबिंदा ॥ १ ॥

रैदास बिनवै कर जोरी ।
अबिगत नाथ कवन गति मोरी ॥ २ ॥

---

मायामोहानें ग्रासून गेलेला मी तुझा दास आहे. हे कान्हा ! मी तुझा अगदीं तुच्छ असा सेवक आहे. सांसारिक आणि प्रापंचिक अडीअडचणींनीं मी व्याकुळ झालों आहें. हे गोविंदा ! तूं या अनाथाचें रक्षण कर. रोहिदास तुला हात जोडून असें विनवीत आहे कीं, हे अविगतिनाथा ! माझें कसें होणार ?

॥ २६ ॥

॥ राग सारंग ॥

जग में वेद बैद मानीजै ।
इनमें और अकथ कछु औरै,
कहौ कोन परि कीजै ॥ टेक ॥
भौजल व्याधि असाधि प्रबल अति,
परम पंथ न गहीजै ॥ १ ॥
पढे–गुने कछु समुझि न परई,
अनुभवपद न लहीजै ॥ २ ॥
चखबिहीन कर तारि चलतु हैं,
तिनहिं न अस भुज दीजै ॥ ३ ॥
कह रैदास बिवेक तत्त बिनु,
सब मिलि नरक परीजै ॥ ४ ॥

---

जगांत वेदांनाच केवळ वैद्य मानून चाललांत, तर त्यांत जें नाहीं तें तुम्हांस कसें समजावें ? आणि मग तुमचें दुःख निवारण कसें व्हावें ? भव-सागरांतील दुःखें अत्यंत दारुण आहेत. त्यांच्यामुळें परमप्राप्तीचा मार्ग कठिण होऊन बसला आहे. खूप शिकून-सवरूनहि कांहीं समजतेंच असें नाहीं. अनुभवाविना पदप्राप्ति होत नाहीं . . . आणि आंधळा ज्याप्रमाणें हाताच्या टाळीच्या इशाऱ्यावर चालतो, त्याचप्रमाणें वेदज्ञ मंडळींची स्थिति आहे. म्हणून रोहिदास म्हणतो, विवेकतत्त्वाशिवाय जे मार्गक्रमण करतात, ते सारे जण नरकाप्रत जातात.

॥ २७ ॥

॥ राग गौड ॥

आज दिवस लेऊँ बलिहारा ।
मेरे घर आया राम का प्यारा ॥ टेक ॥

आँगन बँगला भवन भयो पावन ।
हरिजन बैठे हरिजस गावन ॥ १ ॥

करूं डंडवत चरन पखारूँ ।
तन मन धन उन ऊपरि वारूँ ॥ २ ॥

कथा कहैं अरू अर्थ बिचारैं ।
आप तरैं औरन को तारैं ॥ ३ ॥

कह रैदास मिलैं निज दास ।
जनम जनम कै काटै पास ॥ ४ ॥

---

आजचा दिवस मोठा आनंदाचा आहे. मी खूप आनंदी आहे, आज माझ्या घरीं प्रभु रामास प्रिय असलेला त्याचा भक्त पाहुणा आला आहे. माझें अंगण, घर, घराचा परिसर सारेंच पावन झालें आहे. हरिभक्तिपरायण मंडळी हरिकथेचें गायन करावयास बसली आहेत. त्यांचे चरण प्रक्षालन करावे, त्यांना साष्टांग दंडवत घालावें, असें मनीं येत आहे. सारें तनमन-धन त्यांच्यावर समर्पित करावें, असें वाटतें आहे. ते कथा सांगत आहेत, अर्थहि समजावून देत आहेत, स्वतः उद्धरून जात आहेत, अन्य जनांसहि उद्धरीत आहेत. रोहिदास म्हणतो, मजसारख्या सेवकास हें जें सुख लाभलें आहे, त्यामुळें वाटतें आहे–जन्मजन्मांतरींचे पाश तुटून गेले आहेत.

## ॥ २८ ॥

सो कहा जानै पीर पराई ।
जाके दिलमें दरद न आई ॥ टेक ॥
दुखी दुहागिनि होइ पियहीना,
नेह निरति करि सेव न कीना ।
स्याम प्रेमका पंथ दुहेला,
चलन अकेला कोइ संग न हेला ॥ १ ॥
सुख की सार सुहागिनी जानै,
तन मन देय अंतर नहिं आनै ।
आन सुनाय और नहिं भाषै,
रामरसायन रसना चाखै ॥ २ ॥
खालिक दरदमंद, दर आया,
बहुत उमेद जवाब न पाया ।
कह रैदास कवन गति मेरी,
सेवा बंदगी व जानूं तेरी ॥ ३ ॥

---

ज्याच्या मनांत करुणाच नाहीं तो दुसऱ्याचें दुःख जाणूं शकेल कसा ? प्रियकराच्या विरहानें कष्टी झालेली विरहिणी निरंतर प्रेमच करीत राहिलेली असते. तिला प्रत्यक्ष सेवेची संधीच लाभत नाहीं. ईश्वरप्रीतीचा मार्ग असाच दुर्धर आहे. या मार्गावर एकाकीच वाटचाल करायची. कोणाची संगतबोबत असत नाहीं. तनामनासह सर्वस्व समर्पित करणारी पतिव्रताच सर्वस्वसुखाचें सार समजूं शकतें.

. . . आणखी कांहीं सांगतां येत नाहीं; बोलतां येत नाहीं. रसना रामनामरूपी रसायनाचा स्वाद चाखते आहे. सृष्टिनिर्माता एखाद्या प्रिय मित्रासमान समोर आला आहे. त्यापासून खूप अपेक्षा आहे. पण प्रयत्न करूनहि त्याच्याकडून प्रश्नाचें उत्तर मिळत नाहीं. रोहिदास म्हणतो, आतां माझें कसें होणार ? मला तर तुझी सेवा आणि वंदना कशी करावी, तें कळत नाहीं.

॥ २९ ॥

गोबिंदे तुम्हारे से समाधि लागी,
उर भुअंग भस्म अंग संतत बैरागी ॥ टेक ॥

जाके तीन नैन अमृत बैन, सीस जटाधारी ।
कोटिकलप ध्यान अलप, मदन अंतकारी ॥ १ ॥

जाके नील बरन अकल ब्रह्म, गले रुंडमाला ।
प्रेम मगन फिरत नगन संग सखा बाला ॥ २ ॥

अस महेस बिकट भेस, अजहूँ दरस आसा ।
कैसे राम मिलैं तोहि, गावै रैदासा ॥ ३ ॥

---

समाधिमग्न शंभुमहादेवाचें वर्णन करतांना संतकवि म्हणतो–हे शंभो, तुझ्या ठायीं समाधि लागली आहे ! गळ्यांत सर्प आहे. साऱ्या अंगास भस्म-लेप केलेला असा हा वैराग्याचा अवतार आहे. त्याचे नेंत्र तीन आहेत, वाणी अमृतमय आहे अन् शिरावर जटा धारण केलेल्या आहेत. त्यानें मदनाचा विनाश केला आहे. त्याचा (कंठाचा) वर्ण निळा असून तो निष्कलब्रह्म आहे. त्याच्या गळ्यांत रुंडमाला आहे. तो भक्तिमग्न होऊन नग्न फिरतो आहे, आणि त्याच्यासमवेत त्याची सखीहि आहे. असा तो विकट वेषधारी महेश आज मला दिसला.

॥ ३० ॥

ज्यों तुम कारन केसवे, अंतर लवलागी।
एक अनुपम अनुभवी, किमि होइ विभागी ॥ टेक ॥

इक अभिमानी चातृगा बिचरत जग माहीँ।
यद्यपि जल पूरन मही कहूँ वा रुचि नाहीँ ॥ १ ॥

जैसे कामी देखि कामिनी, हृदय सूल उपजाई।
कोटि बैद विधि ऊचरै, वा की पिया न जाई ॥ २ ॥

जो तेहि चाहैं सो मिलै, आरत गति होई।
कह रैदास यह गोप नहिं, जानै सब कोई ॥ ३ ॥

---

हे केशवा ! तुझ्या मीलनाची ओढ जर आंतरिक असेल, तर तें मीलन झाल्याशिवाय कसें राहील ? आंतरिक स्नेहाचा जिव्हाळा जर अनुपम असेल, तर कोणी तुला प्राप्त करण्यांत अयशस्वी होणार नाहीं. . . एक तो अद्भुत निष्ठेचा चातक म्हणून पक्षी असतो ! जरी त्याच्या समोरून जळानें भरलेली नदी वाहत असेल, तरी त्यास त्या पाण्याचा मोह होत नाहीं. त्याचें चित्त स्वातीच्या थेंबासाठींच विकल राहतें.

. . . आणि इकडे कुणी कामी माणूसहि वावरत असतो. कामिनी पाहिली कीं त्याच्या मनींची पापवासना चट्कन् जागी होते. कोटि कोटि उपाय केले, तरी त्याचा उद्धार होत नाहीं. त्याची विकृति दूर होत नाहीं.

म्हणून रोहिदास म्हणतो–हें कांहीं मी रहस्य सांगतों आहे असें नव्हे. हें तर सर्व जण जाणतात कीं, जे आर्त होऊन चातकनिष्ठेनें ईश्वराच्या प्राप्तीचा यत्न करतात, त्यांना तो प्राप्त झाल्याशिवाय राहत नाहीं.

॥ ३१ ॥

अब मैं हार्‍यो रे भाई ।
थकित भयों सब हालचालते, लोक न बेद बड़ाई ॥ टेक ॥
थकित भयो गायन अरू नाचन, थाकी सेवा पूजा ।
काम क्रोध ते देह थकित भइ, कहौं कहाँ लौं दूजा ॥ १ ॥
राम जनहुँ ना भगत कहाऊँ, चरन पखारुँ न देवा ।
जोइ जोइ करौं उलटि मोहिं बांधें, ता तें निकट न भेवा ॥ २ ॥
पहिले ज्ञान क किया चाँदना, पाछे दिया बुझाई ।
सुन्न सहज मैं दोऊ त्यागे, राम न कहुँ दुखदाई ॥ ३ ॥
दूर बसे षटकर्म सकल अरु, दूरउ कीन्हे सेऊ ॥
ज्ञान ध्यान दूर दोउ कीन्हे, दुरिउ छाडे तेऊ ॥ ४ ॥
पाँचो थकित भये हैं जहँ तहँ जहाँ तहाँ थिति पाई ।
जा कारन मैं दौरो फिरतो, सो अब घटमें आई ॥ ५ ॥
पाँचो मेरी सखी सहेली, तिन निधि दई दिखाई ।
अब मन फूलि भयो जग महियाँ, आप में उलटि समाई ॥ ६ ॥
चलत चलत मेरो निज मन थाक्यो, अब मोसे चलो न जाई ।
साई सहज मिलौ सोइ सनमुख कह रैदास बड़ाई ॥ ७ ॥

---

संत रोहिदास म्हणतो, हे परमेश्वरा ! मी आतां अगदीं थकून गेलों आहें, दमलों आहें. या सर्व प्रपंचाच्या कटकटीनें मी थकलों आहें. परमेश्वरा, तुझी स्तुति गाऊन, तुझ्या रंगांत नाचून आणि पूजाअर्चा करून करून मी अगदीं दमून गेलों आहे. माझा हा देह कामक्रोधादि षड्‌विकारांनीं व्यथित झाला आहे. आणि असा हा थकलेला देह सोडून मी कोणता नवीन देह प्राप्त करूं ? हे परमेश्वरा, मी अगदीं कंटाळून गेलों आहे.

मी परमेश्वराला समजून घेतलें नाहीं. भक्त म्हणवून घेतलें नाहीं परमेश्वरा, तुझ्या चरणांची सेवा देखील मी केली नाहीं. जों जों मी तुझ्या जवळ येण्याचा प्रयत्न करतों आहें, तों तों ह्या मोहबंधनानें मी उलट अधिकच बांधला जातों आहे. प्रथम उत्साहानें मी ज्ञानाची उपासना केली. नंतर तेंहि सोडून दिलें. योगमार्ग आणि सहजमार्ग या दोहोंचाहि मी त्याग केला. हे रामा ! माझें दुःख मी तुला कसें कथन करूं ?

## ॥ ३४ ॥

भाइ रे सहज बंदो लोइ, बिन सहज सिद्धि न होई।
लौ लीन मन जो जानिये, तब कीट भृंगी होई ॥ टेक ॥
आपा पर चीन्हे नहीं रे, और को उपदेस।
कहाँ तें तुम आयो रे भाई, जाहुगे किस देस ॥ १ ॥
कहिये तो कहिये काहि कहिये, कहाँ कौन पतियाइ।
रैदास दास अजान ह्वै करि, रह्यो सहज समाइ ॥ २ ॥

---

सहज साधनेचें महत्त्व प्रतिपादन करून संत रोहिदास सांगतो, हे साधक बंधो! तूं सहज मार्गाचा अवलंब करून परतत्त्वज्योतीची आराधना कर, सहज साधनेविना सिद्धि प्राप्त होत नाहीं. ईश्वरीय ज्योतीशीं तुझें मन एकाकार झालें, तर तूं सफल होशील. ज्योतीशीं अकृत्रिम स्नेहानें एकरूप होणारा कीटक भृंगीशाचा ( शिवाचा ) प्रिय होऊं शकतो-भृंगी ( एक शिवगण ) बनतो.

. . . हें माझें, हें दुसऱ्याचें-असा भेद-भाव उरीं बाळगूं नकोस. मानापमानाचा त्याग कर. दुजाभाव सोडून दे. तुला दुसरा काय उपदेश करावा ? तूं कुठून आलास ? आणि जाणार आहेस तरी कुठें ? . . . तुला सांगायचें झालें तर काय सांगावें ? आणि कुणी कसें वर्णन करून सांगावें ? संत रोहिदास स्वतःस अनभिज्ञ समजून म्हणतो, परमेश्वर सहज साधनेनें अर्थात् अकृत्रिम भक्तिभावानें प्रसन्न होतो.

॥ ३५ ॥

इह अँदेस सोच जिय मेरे ।
निसिबासर गुन गाऊँ तोरे ॥ टेक ॥

तुम चिंतत मेरी चितहु जाई ।
तुम चितामनि हो इक साई ॥ १ ॥

भगति हेत का का नहिं कीन्हा ।
हमरी बेर भये बलहीना ॥ २ ॥

कह रैदास दास अपराधी ।
जेहि तुम द्रवौ सो भगति न साधि ॥ ३ ॥

---

तूं माझा उद्धार करशील कीं नाहीं, असा माझ्या मनीं संभ्रम उत्पन्न झाला आहे, म्हणून हे परमेश ! मी तुझें रात्रंदिन गुणगायन करतों आह.... जर माझा प्रेमानें विचार करशील, तर माझी सारी चिंता दूर होईल, कारण तूं साक्षात् चिंतामणि आहेस, ... भक्तांच्या कल्याणासाठीं तूं काय काय बरें केलें नाहींस ? आणि मग आमच्या उद्धाराच्या वेळींच रे असा उदासीन कां होतोस ? स्वतःस अपराधी समजून हा तुझा दास रोहिदास म्हणतो-ज्यायोगें तूं कृपेचा वर्षाव करावास अशी भक्तीच अजून माझ्या हातून झाली नसावी !

॥ ३६ ॥

रामराय का कहिये यह ऐसी,
जन की जानत हो जैसी तैसी ॥ टेक ॥
मीन पकरि काटचो अरू फाटचो,
बाँटि कियो बहु धानी ।
खंड खंड करि भोजन कीन्हो,
तहउँ न बिसऱ्यों पानी ॥ १ ॥
तैं हमैं बाँधे मोह फाँसीसे,
हम तोको प्रेम जेवरिया बाँधे ।
अपने छुटन कै जतन हौँ,
हम छूटे तोको आराधे ॥ २ ॥
कह रैदास भगति इक बाढी,
अब का की डर डरिये ।
जौ डरको हम तुमको सेंवौं,
सो दुख अजहुँ मरिये ॥ ३ ॥

---

हे रामराया ! तुझ्या सेवकाची काय स्थिति झाली आहे कसें सांगूं ? त्या दासाविषयींची तुला असलेली माहिती अशी तशीच आहे.

.... मासा पकडून त्याची चिरफाड करावी आणि तो अनेकांना वांटून टाकावा. तुकडे तुकडे करून त्यांनीं त्याचें भोजन करावें. पण तरीहि तो पाण्यास विसरूं शकत नाहीं ! अगदीं तसेंच तूं आम्हांला मोहमायेच्या फांसांनीं बंदिवान बनविलें, परंतु आम्ही तुला प्रेमभक्तीच्या अलंकारांनीं बांधलें आहे. या मायाजालांतून मुक्ति मिळावी, म्हणून आम्ही खूप यत्न करतों; तुझी आराधना करतों.

संत रोहिदास कृतार्थभावानें सांगतो– आतां माझी भक्ति इतकी समर्थ झाली आहे कीं, आतां भीति म्हणून कशाची वाटावी ? आणि भीति बाळगून जर आम्ही तुझी सेवा करीत असूं, तर तें दुःख सहन करण्यापेक्षां आजच मृत्यु कां न यावा ?

। ३७ ॥

जो तुम तोरो राम मैं नहिँ तोरौं ।
तुम से तोरि कवन से जोरौं ॥ टेक ॥

तीरथ बरत न करौं अँदेसा ।
तुम्हरे चरन कमल का भरोसा ॥ १ ॥

जहँ जहँ जाओं तुम्हरी पूजा ।
तुम सा देव और नहिं दूजा ॥ २ ॥

मैं अपनो मन हरि से जोर्‍यों
हरि से जोरि सबन ते तोर्‍यों ॥ ३ ॥

सबही पहर तुम्हारी आसा ।
मन क्रम बचन कहै रैदासा ॥ ४ ॥

---

हे राम प्रभो ! तूं जरी मला त्यागलेंस, तरी मी तसें करणार नाहीं. कारण तुझ्याशीं स्नेहबंध आहे, तो तोडून मी अन्य कुणाशीं जोडूं ? तीर्थव्रतांच्या भानगडींत मी पडत नाहीं. कारण मला तुझ्या चरणकमलांचा भरंवसा आहे. जेथें तेथें तूं माझा सांगाती आहेस, त्या त्या ठिकाणीं मी तुझी पूजा करीत असतों. कारण माझी अशी श्रद्धा आहे कीं, तुझ्यासारखा देव दुसरा नाही ! मी माझें मन हरीशीं जोडून टाकलें आहे. आणि आतां हरीशीं एकरस होऊन अन्य सर्वांपासून विराम झालों आहें. आतां सर्व प्रहरीं मी तुझीच अपेक्षा करीत असतों; मनसा वाचा कर्मणा तुझीच भक्ति करतों.

## ॥ ३८ ॥

थोथो जानि पछोरी रे कोई ।
जोइ रे पछौरा जा में निज कन होई ॥ टेक ॥

थोथी काया थोथी माया ।
थोथा हरि बिन जनम गँवाया ॥ १ ॥

थोथा पंडित थोथी बानी ।
थोथी हरि बिन सबै सहानी ॥ २ ॥

थोथा मंदिर भोग बिलासा ।
थोथी आन देव की आसा ॥ ३ ॥

साचा सुमिरन नाम बिसासा ।
मन बच कर्म कहै रैदासा ॥ ४ ॥

---

फोलपटें काढून टाकण्यासाठीं आपण पाखडतों. हे साधका ! तूं ही क्रिया ( सारासारविवेक ) कर. मग तुला स्वतःचें योग्य कर्तव्य गवसेल.

हें शरीर खोटें, ही माया खोटी. हरीच्या स्मरणाविना सारा जन्म वृथा गेला. पंडितहि खोटा. त्याची वाणीहि फसवी. हरिविना सारी कहाणीच अर्थशून्य. मंदिरहि खोटें, भोगविलास तर खोटेच खोटे. देवाची आशा खोटचा निष्ठेनें कशी बरे करावी ?

...एक हरिनाम सत्य होय. त्यावर विश्वास ठेवून हरिस्मरण करणें सत्य होय – असें मनसा, वाचा, कर्मणा संत रोहिदास सांगत आहे.

भारतीय ग्रंथ संग्रहालय. ... ४२१९६ दि: ... ॥ ३९ ॥ १०२६९ ... ९६।६।६८

भेष लियो पै भेद न जान्यो ।
अमृत लेइ विषै सो मान्यो ॥ टेक ॥

काम क्रोध में जनम गँवायो ।
साधु संगति मिलि राम न गायो ॥ १ ॥

तिलक दियो पै तपनि न जाई ।
माला पहिरे धनेरी लाई ॥ २ ॥

कहृ रैदास मरम जो पाऊँ ।
देव निरंजन सत कर ध्याऊँ ॥ ३ ॥

---

वेष तर तूं धारण केलास, पण ईश्वराचें रहस्य तुला समजलेंच नाहीं. अमृताचा गोडवा तुझ्यापाशीं असतांना तूं विषावरच विश्वास ठेवून बसलास ! कामक्रोधांत रमून सारा जन्म घालविलास. साधुसज्जनांची संगतसोबत तुला लाभली, पण तूं रामाचें भजनगायन केलें नाहींस. शिरावर तिलक लावलास, पण अजून तुझा कोप दूर झाला नाहीं. माला तर तूं धारण केलीस, पण तुझा लोभ सुटला नाहीं. तूं खूप संचय केलास. म्हणून रोहिदास म्हणतो– यांतून मला जें मर्म सांपडतें आहे तें असें–त्या निरंजन देवाची मी नित्य आराधना करावी; त्याचें ध्यान करावें.

...१०

॥ ४० ॥

गोविंदे भवजल व्याधि अपारा ।
ता में सूझै वार न पारा ॥ टेक ॥

अगम घर दूर उरतर,
बोलि भरोस न देहू ।
तेरी भगति अरोहन संत अरोहन,
मोहिं चढाइ न लेहू ॥ १ ॥

लोह की नाव परवा न बोझी,
सुकिरित भाव विहीना ।
लोभ तरंग मोह भयो काला,
मीन भयो मन लीना ॥ २ ॥

दीनानाथ सुनहु मम विनती,
कवने हेत विलंब करीजै ।
रैदास दास संत चरनन,
मोहिं अब अवलंबन दीजै ॥ ३ ॥

---

हे गोविंदा ! भवसागरांतील दुःखांना पारावार नाहीं. मला या भवसागरांत कांहीं कळेनासें झालें आहे. तुझें स्थान अगम बनलें आहे. आणि तूं मला तेथें पोहोंचण्याचा भरवसाहि देत नाहींस. तुझ्या भक्तीची एक एक पायरी मी चढत राहिलों, परंतु तूं मला तुझ्या गृहीं घेतच नाहींस. . . . माझी ही लोखंडाची नाव पापांच्या राशींनीं अवजड झाली आहे. माझ्या पदरीं पुण्याचा संचय नाहीं. लोभरूपी लाटांनीं आणि मोहरूपी अंधकारानें मी भयभीत झालों आहे. शिवाय माझा मनरूपी मत्स्य अतिचंचल आहे. मी भवसागर पार कसा करूं ? हे दीनानाथ ! माझी एवढी प्रार्थना ऐक. कशासाठीं आतां विलंब करतो आहेस ? हा संतांच्या चरणींचा दास रोहिदास तुला विनवितो आहे, तूं आतां मला आश्रय दे.

॥ ४१ ॥

है सब आतम सुख परकास साँचो ।
निरंतर निराहार कलपित यै पाँचो ॥ टेक ॥

आदि मध्य औसान एक रस,
तार बन्यो हो भाई ।

थावर जंगम कीट पतंगा,
पूरि रह्यो हरिराई ॥ १ ॥
सर्वेस्वर सर्वांगी सब गति,
करता हरता सोई ।

सिव न असिव न साध अस सेवक,
उनै भाव नहिं होई ॥ २ ॥

धरम अधरम मोच्छ नहिं बंधन,
जरा मरन भव नासा ।

दृष्टि अदृष्टि गेय अरू ज्ञाना,
एकमेक रैदासा ॥ ३ ॥

---

पंचविकार हे सरतेशेटीं निव्वच आहेत. निरंतर, निराहार असें आत्मज्ञानाचें सुख खरें सत्य आहे. अखिल जगांत सर्वव्यापी असें तें दिव्य तत्त्व आहे. स्थावर, जंगम, कीटक आदि सर्व प्राणिमात्रांना तें अलौकिक तत्त्व व्यापून राहिलें आहे. सर्व जनांचा वाली, सर्व जगताचा त्राता असा तोच एक परमेश्वर आहे. शिव आणि अशिव, साधु आणि सेवक असा कोणताच दुजाभाव त्याच्यापाशीं नाहीं. धर्म आणि अधार्म, मोक्ष आणि बंधन, तसेंच जरामरण, इत्यादि सर्व गोष्टींच्या अतीत असें तें तत्त्व आहे.

रोहिदास म्हणतो, तें परमतत्त्व सर्वजनांस ज्ञेय अर्थात् जाणण्यायोग्य आहे, तें ज्ञानमार्गानें होय.

॥ ४२ ॥

देवा हमन पास करंत अनंता,
पतितपावन तेरा बिरद क्यों कहंता ॥ टेक ॥

तोहिं मोहिं मोहिं तोहिं अंतर ऐसा।
कनक कटक जल तरंग जैसा ॥ १ ॥

मैं केई नर तुहिं अंतरजामी।
ठाकुर थैं जन जानिये जन थैं स्वामी ॥ २ ॥

तुम सबनमें सब तुम माहीं।
रैदास दास असमझि सी कहौं कहाँ हीं ॥ ३ ॥

---

हे अनंता, देवा! माझ्याजवळ तूं कां येत नाहींस? आणि स्वतःस पतितपावन म्हणवितोस. मग तें ब्रीद तरी कां वागवितोस? तुझ्यामाझ्यांतील स्नेहबंध अतूट आहे. सुवर्णाचा आणि त्यापासून बनविलेल्या अलंकाराचा, जळाचा आणि लहरींचा जसा अभद्य संबंध, तसेंच तुझें-माझें नातें आहे. मी हा असा सामान्य माणूस आहें. तूं अंतर्यामी आहेस. तूं माझा स्वामी आहेस. तूं माझें सर्वस्व आहेस. मी तुझा सामान्य सेवक आहें, दास आहें. रोहिदास म्हणतो—आतां तूंच सांग, यांत चुकीचें तें काय आहे? तूं सर्वांस व्यापून आहेस. सर्व तुझ्यांत अंतर्भूत आहेत.

॥ ४३ ॥

संत तुझी तन संगति प्रान,
सत् गुरु ज्ञान जानै संत देवादेव ॥ १ ॥

संत ही संगति संत कथा-रस,
संत-प्रेम मोहि दीजै देवादेव ॥ २ ॥

संत आचरण, संत सो मारग,
संत ही सो लागै लगनि ॥ ३ ॥

और इक भाव भगति चिंतामणि,
जनि लागै असंत पापी सनि ॥ ४ ॥

'रविदास' भनै जो जानै सो जान,
संत अनंतहि अंतर नाहिं ॥ ५ ॥

---

संत आणि भगवंत यांची महत्ता समान आहे, हा भाव सांगतांना रोहिदास म्हणतो– संतसज्जना, तुझी संगति माझ्या तनामनास आवडते. संतच सद्गुरु होय. संतच देवाधिदेव होत. संतसंगतींतच हरिकथेची गोडी सांठविलेली आहे. हे देवाधिदेवा, मला संतांचा स्नेह लाभूं दे.

संतांचें आचरण हेंच खरें आचरण होय. संतांचा मार्ग तो सत्य-मार्ग होय. संतांची निष्ठा ती खरी निष्ठा होय. आणि त्यांची भावभक्ति तर इच्छित पूर्ण करणाऱ्या चिंतामणीप्रमाणें श्रेष्ठ होय.

पण पापी, अभक्त जनांना हें खरेंच वाटत नाहीं.

रोहिदास म्हणतो, जो खरा जाणकार आहे, त्याला हें पक्कें ठाऊक असतें कीं, संत अन् अनंत यांत अंतर असत नाहीं.

॥ ४४ ॥

दारिद देखि सब कोइ हँसै,
ऐसी दशा हमारी ।
अष्टादस सिद्धि कर तले,
सब कृपा तुम्हारी ॥ १ ॥
तू जानत मै कछु नहीं,
भव-खण्डन है राम ।
सकल जीव शरनागती,
प्रभु से पूरन काम ॥ २ ॥
जो तेरी शरनागती,
तिन नाही कछु भार ।
ऊँच-नीच तुम ते तरे,
आलज है संसार ॥ ३ ॥
कहि ' रविदास ' अकथ कथा
बहु काह कहीजै ।
जैसा तू तैसा तुही
क्या उपमा दीजै ॥ ४ ॥

---

आमची स्थिति अशी झाली आहे कीं, आमचें दारिद्र्य पाहून सारे जण आम्हांस हंसतात. अष्टादश सिद्धि प्राप्त झाल्या असल्या, तर हे प्रभो, ती सारी तुझीच कृपा आहे. मी कुणी नाहीं, हें तूं जाणतोसच. साऱ्या जगाचा कर्ताकरविता तूंच आहेस. साऱ्या जीवांना तुझ्या चरणीं शरण आल्यानेंच आपले मनोरथ पूर्ण करून घेतां येतात. त्यांना मग कसली काळजी उरत नाहीं. उच्च-नीच सारेच तुझ्या कृपेनें तरून जातात.

संत रोहिदास म्हणतो, हे प्रभु! तुझा महिमा वर्णनातीत आहे. तो अनंत महिमा वर्णन कसा करावा? तुझ्यासारखा तूंच अहेस. तुला आणखी दुसरी उपमा कोणती द्यावी?

॥ ४५ ॥

गाइ गाइ अब का कहि गाऊँ। गावनहार को निकट बताऊँ॥टेक॥
जब लग है या तनकी आसा, तब लग करै पुकारा।
जब मन मिल्यौ आस नहि तनकी, तब को गावनहारा॥ १ ॥
जबलग नदी न समुद समावै, तब लग बढै हँकारा।
जब मन मिल्यौ रामसागर सों, तब यह मिटी पुकारा॥ २ ॥
जब लग भगति मुकति की आसा, पदमतत्त्व सुनि गावै॥
जहँ जहँ आस धरत है यह मन, तहँ तहँ कछु न पावै॥ ३ ॥
छाडै आस निरास परम पद, तब सुख सतिकर होई।
कह रैदास जासों और करत है, परम तत्त्व अब सोई॥ ४ ॥

---

आतां गावें म्हटलें तरी मी काय गाऊं? आतां गाण्यासारखी स्थितिच उरलेली नाहीं. ज्याचें भजन-गायन करायचें, तोच आतां माझ्या समीप आलेला आहे; मला भेटलेला आहे. जोंवर या देहाची आसक्ति असते, तोंवर आपण परोपरीनें ईश्वराकडे मागत राहतों. पण जेव्हां मनच त्या परतत्त्वाशीं एकरूप होऊन जातें, तेव्हां शरिराची आसक्ति शिल्लक राहत नाहीं. मग कोण गात बसेल? कोण ईश्वराकडे कांहीं मागत बसेल? ... जोंवर नदी सागराशीं सामावून जात नाहीं, तोंवर तिचा अहंकार कदाचित् उरलेला असतो. पण जेव्हां नदी सागराशीं मीलन पावते, किंवा मनरूपी नदी जेव्हां रामरूपी सागराशीं एकाकार होते, तेव्हां ही सारी ईश्वराची आराधना संपून जाते. कांहीं मागणें उरत नाहीं. जोंपर्यंत भक्तीची वा मुक्तीचीं आशा लागून राहिलेली असते, तोंपर्यंत परमतत्त्वाचा आपण शोध घेत राहतों, त्याचें स्मरण करीत राहतों... खरें तर जेव्हां जेव्हां हें मन कांहीं आशा धरून राहतें, तेव्हां तेव्हां त्याला कांहींहि लाभ होत नाहीं. कांहींहि आशेंतून निष्पन्न होत नाहीं. जेव्हां आशा-निराशा सांडून आपण त्या परम पदाची भक्ति करतो, तेव्हांच सच्चें सुख प्राप्त होतें. रोहिदास म्हणतो, परतत्त्व एकमेव आहे. जे कोणी अन्य साधना करीत आहेत, त्यांनीं हें ध्यानांत ठेवावें:

॥ ४६ ॥

॥ राग टोडी ॥

पावन जस माधो तेरा, तुम दारुन अघमोचन मेरा ॥ टेक ॥
कीरति तेरी पाप बिनासे, लोक बेद यों गावै ।
जों हम पाप करत नहिं भूधर, तौ तूं कहा नसावै ॥ १ ॥
जब लग अंक पंक नहिं परसै, तौ जल कहा पखारै ।
मन मलीन विषया रस लंपट, तौ हरि नाम सँभारै ॥ २ ॥
जो हम बिमल हृदय चित अंतर, दोष कौन पर धरि हौ ।
कह रैदास प्रभु तुम दयाल हौ, अबँध मुक्ति का करि हौ ॥३॥

---

हे माधवा ! तुझें यश पावन आहे. तुझा महिमा अनंत आहे ! तुझी कीर्ति अगाध आहे. तूं माझीं भयंकर पापें दूर करणारा आहेस. तूं दारुण दुःखापासून मुक्ति देणारा आहेस. तुझ्या उज्ज्वल कीर्तिचें भजन-गायन केलें असतां पाप नष्ट होऊन जातें. सारें जग आणि पवित्र वेद-ग्रंथहि असाच तुझा महिमा वर्णन करून सांगतात. पण जर आम्ही लोकांनीं डोंगराएवढीं पापेंच केलीं नाहींत, तर मग तूं तीं नष्ट कशीं करणार ? जोंवर अंगास चिखल लागत नाहीं, तोंवर पाणी तो दूर कसा करणार ? जर मन मलिन असेल, विषयविकारांत गुरफटून गेलें असेल, तरच ना हरिनामानें उद्धार व्हायचा !—जर आमचें हृदय निर्मळ असेल, पवित्र असेल, तर आम्हांवर दोष कोणता ठेवतां येईल ?

रोहिदास अत्यंत आत्मविश्वासपूर्वक हें सारें सांगतो आहे. त्याचें म्हणणें आहे–हे प्रभु, तूं दयाशील आहेस, पण जो अनिबद्ध आहे, मुक्त आहे, त्याला तूं आणखी कोणती मुक्ति देणार आहेस ?

॥ ४७ ॥

अब कैसे छूटै नाम रट लागी ॥ टेक ॥

प्रभुजी तुम चंदन हम पानी ।
जाकी अँग अँग बास समानी ॥ १ ॥

प्रभुजी तुम घन बन हम मोरा ।
जैसे चितवत चंद चकोरा ॥ २ ॥

प्रभुजी तुम दीपक हम बाती ।
जीकी ज्योति बरै दिनराती ॥ ३ ॥

प्रभुजी तुम मोती हम धागा ।
जैसे सोनहिं मिलत सुहागा ॥ ४ ॥

प्रभुजी तुम स्वामी हम दासा ।
ऐसी भक्ति करै रैदासा ॥ ५ ॥

---

परमेश्वराच्या अनन्य भक्तीनें कृतार्थ झालेला संत रोहिदास म्हणतो-- आतां हें प्रभूशीं जडलेलें नातें कसें खंडित होईल ? तुझ्या नामाशीं माझें आतां कायमचें नातें जुळलेलें आहे. प्रभो, तूं चंदनस्वरूप आहेस, तर मी जळाप्रमाणें आहे. आतां तुझ्यामाझ्यांत या मीलनानें सारें जीवनजल सुगंधित झालें आहे. हे प्रभो, तूं जर मेघसमूह आहेस, तर मी मयूर बनून तुझ्याशीं घनिष्ठ नातें निर्माण केलें आहे. अन् तूं जर चंद्रमा आहेस, तर मी चातकाच्या निष्ठेनें तुझ्याशीं निगडित झालों आहें. हे परमेशा ! तूं दीपक असलास, तर मी वातीचें रूप घेतलें आहें. आणि आतां ही अलौकिक स्नेहाची ज्योति रात्रंदिन प्रज्वलित राहणार आहे. मूल्यवान् मौक्तिकांमुळें धाग्याची शोभा वाढते. सुवर्णालंकारांनीं सौभाग्यवतीचें सौंदर्य वाढतें. तुझामाझा स्नेहबंध असाच आहे. तूं माझा स्वामी आहेस. मी तुझा दास आहे. असें तुझें-माझें निकटचें नातें आहे. अशी माझी तुझ्या ठायीं अनन्यभक्ति आहे.

॥ ४८ ॥

त्राहि त्राहि त्रिभुवनपति पावन ।
अतिसय सूल सकल बलि जावन ॥ टेक ॥

काम क्रोध लंपट मन मोर ।
कैसे भजन करूं मैं तोर ॥ १ ॥

बिषम बिहंगम दुंद नकारी ।
असरनसरन सरन भौहारी ॥ २ ॥

देव देव दरबार दुआरै ।
राम राम रैदास पुकारै ॥ ३ ॥

---

हें त्रिभुवनपति ! ईश्वरा ! सकलदेवाधिदेवा, माझें रक्षण कर ! माझा उद्धार कर, मला तुझ्या कृपेची पाखर दे. पतितपावना, मी अत्यंत दुःखी-कष्टी झालेलों आहे. भवतापांनीं मी अतिशय संत्रस्त झालों आहें, मी तुला शरण आलों आहें. आतां माझें रक्षण कर. माझें ओढाळ मन काम, क्रोध इत्यादि विकारांच्या आहारीं गेलेलें आहे. या षड्रिपूंचें त्या मनास फाजील आकर्षण वाटतें आहे. अशा स्थितींत मीं तुझें भजन-चिंतन कसें करूं ? माझें मन अत्यंत चंचल पक्ष्याप्रमाणें आहे. मी नीच कर्में करणारा आहें. अशा अतिचंचल आणि हीन वृत्तीच्या या दासास तूं कृपावंत होऊन आश्रय दे. तूं दीनानाथ आहेस. ज्यांना कोणी वाली नाहीं, त्यांचा तूं वाली आहेस, त्राता आहेस, अरक्षितांचा रक्षणकर्ता आहेस. भवतापापासून मुक्ति देणारा आहेस. संसारिक दुःखांचा परिहार करणारा आहेस. . . . संत रोहिदास तुझ्या द्वारीं येऊन उभा आहे. हे करुणापति, तुझ्या दरबारीं तो रामराम अशी हाक देत उभा आहे, त्यावर तुझ्या स्नेहाची कृपावृष्टि होऊं दे.

॥ ४९ ॥

तेरा जन काहे को बोलै ।
बोलि बोलि अपनी भगति को खोलै ॥ टेक ॥
बोलत बोतल बढै बियाधी, बोल अबोलै जाई ।
बोलौ बोल अबोल कोप करै, बोल बोल को खाई ॥ १ ॥
बोलै ज्ञान मान परि बोलै, बोलै बेद बड़ाई ।
उर मैं धरि जब ही बोलै, तबही मूळ गँवाई ॥ २ ॥
बोलि बोलि औरहि समजावै, तब लटि समझन भाई ।
बोलि बोलि समझी जब बूझी, काल सहित सब खाई ॥ ३ ॥
बोले गुरु अरु बोलै चेला, बोल बोल की परतिति आई ।
कहु रैदास मगन भयो जबही, तबहि परमनिधि पाई ॥ ४ ॥

---

तुझ्यावर ज्याचा पूर्ण विश्वास आहे, असा तुझा भक्त कां बरें बडबड करीत राहील ? बोलून बोलून तो आपली भक्ति जाहीर करीत राहणार नाहीं. , . . बोलून बोलून व्याधींची वृद्धि होते. म्हणून बोलणेंच अबोल होऊन जातें, कमी होतें. बोलतच राहिलें तर अबोल व्यक्तींचा, सुज्ञ जनांचा क्रोध होतो. कारण बोलणेंच बोलण्याला खाऊन टाकतें. बोलण्यानें बोलणें वाढतच राहतें. स्वतःच्या ज्ञानाविषयीं अहंतेनें लोक सांगत असतात. जेव्हां आपण मनांत कांहीं ठेवून बोलत राहतो, वरवर बडबड करीत राहतो, तेव्हां मुळीं संकटच सर्व नाहींसें होऊन जातें. मूळ गोष्टी बाजूलाच राहतात. बोलून बोलून अन्य कोणास समजावून दिलें, तरीहि त्याला समजतेंच असें नाहीं. आणि बोलत बसून कोणास समजावून देत बसल्यास काळ सुद्धां फुकट दवडल्यासारखेंच होतें, वेळ वायां जातो. जेव्हां गुरु बोलतो आणि शिष्यहि बोलतो–योग्य अशा दोन व्यक्ति बोलतात, तेव्हां बोलण्यांतून प्रतीति येते, प्रत्यय येतो. संत रोहिदास म्हणतो,–अशा प्रकारें जेव्हां आपण एकाग्र होतो; एकमार्गी होतो, स्थिरचित्त बनतो, तेव्हां परमपद प्राप्त होतें; परमतत्त्व गवसतें.

॥ ५० ॥

दरसन दीजै राम दरसन दीजै ।
दरसन दीजै विलंब न कीजै ॥ टेक ॥

दरसन तोरा जीवन मोरा ।
बिन दरसन क्यों जिवै चकोरा ॥ १ ॥

माधो सतगुरु सब जग चेला ।
अबके बिछुरे मिलन दुहेला ॥ २ ॥

धन जोबन की झूठी आसा ।
सत सत भाषै जन रैदासा ॥ ३ ॥

---

हे रामा ! तूं मला दर्शन दे रे ! मला सत्वर तुझें दर्शन दे. आतां पळाचाहि विलंब करूं नकोस. मला लवकर तुझें दर्शन दे. तुझें दर्शन हेंच माझें जीवन होय. चंद्राच्या भेटीसाठीं चकोर पक्षी सदैव उत्सुक असतो. तुझेंमाझें नातें चंद्रचकोराचें आहे. तुझ्या दर्शनाविना मी कसा जगूं ? चंद्राच्या दर्शनाशिवाय चकोरानें कसें जीवन जगावें ? माधव हाच खरा सद्‌गुरु आहे. सारें जग जणूं त्याचें शिष्यच आहे. रोहिदासास वाटतें–आत्तांचा हा जो विरह झाला आहे. तो फार असह्य झाला आहे. आतां मिलन होणें दुष्कर झालें आहे, असें वाटतें. धनयौनवाची आशाच खोटी आहे. तो एक वृथा मोह होय. याच्यामागें लागूं नये, असें संतांस वाटतें. आणि तेंच सत्यकथन संत रोहिदास करतो आहे.

॥ ५१ ॥

जन को तारि बाप रमइया
कठिन फंद पऱ्यो पंच जमइया ॥ टेक ॥

तुम बिन सकल देव मुनि ढुंढूँ ।
कहूँ न पाऊँ जमपास छुड़इया ॥ १ ॥

हम से दीन दयाल न तुमसे ।
चरन सरन रैदास चमइया ॥ २ ॥

---

ईश्वरास उद्देशून संत म्हणतो–या सामान्य सेवकास तूं आतां उद्धरून ते. या सेवकाला आतां तूं मुक्ति देच. हे सृष्टिनिर्मात्या देवा, माझी तूं या पंच-विकारांच्या तावडींतून सुटका कर. या विकारांचा कठोर असा असह्य असा फांस मला लागलेला आहे. तुझ्याखेरीज मला मुक्त कोण करील ? सारे मुनिवर, देव मी शोधून शोधून थकलों. या जन्ममृत्यूच्या फासांतून सुटका करील, असा कोणीहि मला भेटला नाहीं. मला कुठेंच मुक्तिदाता भेटला नाहीं. हे प्रभो, तूं स्वतःच येऊन माझा उद्धार कर. माझ्यासारखा दीनदुर्बल, पतित दुसरा कोणीहि नाहीं नि तुझ्यासारखा कृपानिधि, दयाशील परमेशहि दुसरा कोणी नाहीं. हा रोहिदास चांभार तुला आतां शरण आलेला आहे, तुला विनवितों आहे. त्याची विनंती ऐक, प्रार्थना ऐक. त्याची पंचविकारांच्या संकटापासून सुटका कर.

॥ ५२ ॥

मेरी प्रीति गोपाल सों जनि घटै हो ।
मैं मोलि महँगै लई तन सटै हो ॥ टेक ॥
हृदय सुमिरन करूँ नैन अवलोकनो,
स्रवनों हरि कथा पूरि राखूं ।
मन मधुकर करौं चित्त चरना धरौं,
रामरसायन रसना चाखूं ॥ १ ॥
साधुसंगत बिना भाव नहिं उपजै,
भाव भगति क्यों होइ तेरी ।
बंदत रैदास रघुनाथ सुनु बीनती,
गुरुपरसाद कृपा करौ मेरी ॥ २ ॥

---

भावभक्तीच्या आनंदांत मग्न असलेला संत ईश्वराची करुणा भाकीत आहे. तो म्हणतो, गोपालाशीं जें माझें हें भक्तीचें नातें जुळलें आहे, तें जरा सुद्धां कमी होणार नाहीं. हें प्रेम चिरंतन राहील. कारण मी मोठ्या सायासानें हें दिव्य प्रेम संपादन केलें आहे. मीं भक्तीची वाट मोठ्या कष्टानें आपलीशी केली आहे. मी भक्ति महागांत विकतच घेतली म्हणा ना ! आतां मी हृदयीं नित्य भगवंताचें स्मरण करीन. नेत्रांनीं त्याचें अवलोकन करीन. सदैव हरिकथेचेंच श्रवण करीन. माझा मनरूपी मधुकर त्याच्याचभोंवतीं भ्रमण करील. माझें चित्त सदा त्याच्याच चरणीं नम्र झालेलें असेल. जिभेनें मी सतत रामनाम-रसायनाचा आस्वाद घेत राहीन. मला हें निश्चित ठाऊक आहे कीं, साधुसज्जनांच्या संगतीशिवाय भाव उत्पन्न होत नाहीं आणि भावाविना भक्ति कशी बरें करतां येईल ? (अर्थात् मी सदैव संतजनांचा सहवास मिळवीन. )

संत रोहिदास रघुनाथवंदन करून विनवितो आहे कीं, हे देवा ! तूं मजवर कृपा कर. मला तुझा आशीर्वाद दे, प्रसाद दे.

॥ ५३ ॥

रथ को चतुर चलावनहारो ।
खिन हाँकै खिन उभटै राखै, नहीं आनको सारो ॥ टेक ॥
जब रथ थकै सारथी थाकै, तब को रथहि चलावै ।
नाद बिंद ये सबही थाके, मन मंगल नहिं गावै ॥ १ ॥
पांच तत्त को यह रथ साज्यो, अरधै उरघ निवासा ।
चरनकमल लव लाइ रह्यो है, गुन गावै रैदासा ॥ २ ॥

---

या जीवनरूपी रथाचें सारथ्य करणारा सारथी मोठा चतुर दिसतो. त्याचें रथ चालविणें मोठें गमतीचें आहे. क्षणांत तो रथ हाकीत राहतो, तर कधीं क्षणांत थांबतो – दुसऱ्याच मार्गानें चालूं लागतो. त्याच्यासारखा तोच म्हणावयास हवा. जेव्हां (जीवन–) रथ थकतो, सारथी सुद्धां श्रमून जातो, दमून जातो, तेव्हां तो रथाचें सारथ्य थांबवितो. त्याखेरीज रथ चालविणार कोण ?

त्या रथाची गतीच थांबली कीं मग तो सारथी दुःखी-कष्टीहि होतो. त्याचें मन खिन्न होतें आणि निष्प्राण अन् निश्चल अशा जीवन-रथाचा हा सारथी निष्प्रभ बनून जातो.

हा सारा जीवन-रथ पंचतत्त्वांनीं मिळून बनविलेला आहे. या तत्त्वांचा सर्वत्र निवास आहे. अंतरिक्ष अन् सारें आकाशहि या तत्त्वांनीं व्यापिलेलें आहे.

संत रोहिदास त्या दिव्य शक्तीच्या चरण-कमलांवर अनन्यनिष्ठा ठेवून आहे. त्याच्याच सर्वव्यापकत्वाचें तो गुण-गायन करीत आहे.

॥ ५४ ॥

संतो अनिन भगति यह नाहीं ।
जब लग सिरजत मन पाँचो गुन, व्यापत है या माहीं ॥ टेक ॥
सोई आन अंतर करि हरि सो, अपमारग को आनै ।
काम क्रोध मद लोभ मोह की, पल पल पूजा ठानै ॥ १ ॥
सत्य सनेह इष्ट अँग लावै, अस्थल अस्थल खेले ।
जो कछु मिलै आन आखत सो, सुत दारा सिर मेलै ॥ २ ॥
हरिजन हरिहि और ना जानै, तजै आन तन त्यागी ।
कह रैदास सोई जन निर्मल, निसि दिन जो अनुरागी ॥ ३ ॥

---

अनन्य भक्तीचें रहस्य समजावून सांगतांना संतकवि म्हणतो–जोंवर पंचविकार मनांत रुंजी घालीत असतात, तोंवर अनन्यभावें भक्ति करणें शक्य होत नाहीं–खरीखुरी भक्ति करतांच येत नाहीं. साधक अयशस्वी होत राहतो. हे विकार साधकास ईश्वरापासून दूर अंतरावर ठेवतात. इतकेंच नव्हे, तर त्याला वाममार्गाकडेहि प्रवृत्त करतात. या विकारांची शक्ति मोठी जबरदस्त आहे. हे विकार–अर्थात् काम, क्रोध, मद, मोह, लोभ क्षणोक्षणीं आपली पूजा करायला भाग पाडतात आणि साधकाची साधना भंग पावत राहते. साधक मायेच्या मोहांत गुरफटून राहतो, तो माया जोडीत बसतो. जें कांहीं त्याला प्राप्त होईल, तें आपल्या प्रपंचासाठीं सांठवीत राहतो. अक्षतीचे तांदूळ देखील तो आपल्या प्रियजनांसाठीं साठवून ठेवतो.

पण हरीची नित्य भक्ति करणारे असे हरिजन त्या एका परमतत्त्वाशिवाय अन्य कांहीं जाणीतच नाहींत. ते अन्य साऱ्या प्रलोभनांचा, मोहांचा, आकर्षणांचा त्याग करतात. संत रोहिदास म्हणतो–जे नित्यप्रति परमशक्तीच्या अनुरागांत रंगून जातात, तेच निर्मळ अथवा पवित्र जन होतात, अलौकिक आनंदाचा आस्वाद घेऊं शकतात.

॥ ५५ ॥

पार गया चाहै सब कोई,
रहि उर वार पार नहिं होई ॥ टेक ॥

पार कहै उर वार से पारा ।
बिन पद परचे भ्रमै गँवारा ॥ १ ॥

पार परम पद मंझ मुरारी ।
ता में आप रमै बनवारी ॥ २ ॥

पूरन ब्रह्म बसै सब ठाईं ।
कह रैदास मिले सुख साईं ॥ ३ ॥

---

मोक्ष-प्राप्तीची ओढ साऱ्यांनाच लागून राहिलेली असते. प्रत्येकास वाटतें कीं, आपला उद्धार व्हावा. परंतु मोक्ष मिळण्यासाठीं या जगांतील ऐहिक सुखांच्या साऱ्या सीमा ओलांडाव्या लागतात. उत्साही साधक त्या ओलांडूं शकत नाहीं. पण त्या सीमा न ओलांडतांच आपण त्या ओलांडल्या आहेत, असा त्याला भास होतो आणि तो अजाण, अनभिज्ञ साधक ईश्वराच्या वास्तविक परिचय न होऊन भ्रमामध्यें पडून राहतो. परम तत्त्वाचा साक्षात्कार न होतांच त्याला भ्रमपूर्ण स्थितींत राहावें लागतें—पण या ऐहिक सुखदु:खांच्या पलिकडे मुरारी (ईश्वरा)चें अस्तित्व आहे. तो आपल्या स्वतंत्र विश्वांत रमलेला आहे. तो श्रीकृष्ण– लौकिक जगांत रमणारा नाहीं, त्याचें अस्तित्व 'पार' आहे–पारलौकिक आहे—पण पूर्णब्रह्म अशा परमशक्तीचा निवास मात्र सर्वत्र आहे, संत रोहिदास म्हणतो, जर वास्तविक सुख प्राप्त करून घ्यावयाचें असेल, तर त्या पूर्ण ब्रह्माच्या व्यापकत्वाचा बोध करून घ्यावयास हवा.

जम दूतन बहु बिधि करि मार्‍यो ।
तऊ निलज अजहूँ नहिं हार्‍यो ॥ ८ ॥

हरिपद बिमुख आस नहिं छूटै ।
ताते तृस्ना दिन दिन लूटै ॥ ९ ॥

बहुविधि करम लिये भटकावै ।
तुम्हें दोष हरि कौन लगावै ॥ १० ॥

केवळ राम नाम नहिं लीया ।
संतति विषय स्वाद चित दीया ॥ ११ ॥

कह रैदास कहाँ लगि कहिये ।
बिन जगनाथ बहुत दुख सहिये ॥ १२ ॥

---

ज्यानें ईश्वराच्या नामस्मरणाचा सुगम मार्ग सोडून सारें आयुष्य जगरहाटीचा स्वीकार करून व्यतीत केलें, अशी सामान्य मानवाची स्थिति संत रोहिदासानें या पदांत वर्णन करून सांगितली आहे. विनीतभावानें तो म्हणतो,--मी तुला कुठें समजूं शकलों ? हे देवा, मी तुला नीटसें जाणूंच शकलों नाहीं. माझें चंचल मन मायेच्या जंजाळांत गुरफटलें; तें मायेच्या आकर्षणाला बळी पडलें, माझें हें ओढाळ मन इकडे तिकडे धावतें, तें स्थिर राहत नाहीं. माझीं पंचेंद्रियेंहि चंचल बनलीं आहेत. त्यांनाहि तुझ्या चिंतनांत एकाग्र करूं शकलों नाहीं. पण तूं तर जगदीश्वर आहेस, या जगाचा त्राता आहेस, स्वामी आहेस, आणि मी या कलियुगांतील कामी पुरुष आहे. मी विषय-वासनांच्या आहारीं गेलेला पापी माणूस आहे. लोकरूढी आणि वेदप्रामाण्य यांच्याच मागें मी लागलों आणि पुण्य-संचय केला, असें

वाटलें; पण हा माझा भ्रम होता. मी जगराहाटी मानून चाललों. सारे जण जसें करतात, तसेंच करीत राहिलों, माझ्याच्यानें चारचौघांपेक्षां वेगळें वर्तन घडलें नाहीं. वास्तविक जनांचे अंधविश्वास आणि वेदप्रामाण्य यांमुळें मी फसलों. माझें मन विकृत बनलें आणि दिवसेंदिवस मी ईश्वरापासून दूर दूर जाऊं लागलों. परमेशापासून मी कितीतरी अंतरावर पोहोंचलों! सनकादिक ऋषिमुनि आणि ज्ञानी जनांनीं आणि शुक, नारद, व्यास आदि थोर पुरुषांनीं तुझें वर्णन केलेलें आहे. सारीं शास्त्रें तुझें यशगान करतात. उमापति महदेव तुझी कीर्ति गातो. शेषाच्या सहस्रमुखाकडे पाहून तुझ्या महानतेचें रहस्य उलगडतें. (पण तुझें व्यापक स्वरूप उमजलें नाहीं.)

जेथें जेथें मी जातों, तेथें तेथें मला दुःखाचे पर्वत आढळतात. जगांत दुःखें फार आहेत. त्यांचें वर्णन कसें करायचें? साधु-संत जन साक्षी आहेत. . . . यमदूतांनीं नाना परीनें मला जीवनाची नश्वरता दाखवून दिली. पण मी भारी निर्लज्ज आहें. अजून माझा दंभ गेला नाहीं. मी अजूनहि अहंकारीच राहिलों आहे.

अजूनहि मी ईश्वराच्या वास्तविक स्वरूपापासून विमुखच आहें, दूरच राहिलों आहे. आशा अजून नष्ट झाली नाहीं. तृष्णाहि कायम आहे. ती तर सतत मला लुटते आहे; पथभ्रष्ट करते आहे. नाना प्रकारच्या कर्मांमध्यें मी अडकून पडलों आहें. मी स्वतःस परोपरीनें जग-सुखांत गुरफटून ठेवलें आहे. हे प्रभो! तुझा काय रे दोष आहे? मी राम-नाम कधीं घेतलेंच नाहीं. संसार आणि विषयसुखच माझ्या मनीं सदैव खेळत राहिलें. संत रोहिदास म्हणतो, कुठवर या दुःखाचें वर्णन करूं? जगन्नाथाच्या वियोगांत राहून मी फार फार दुःखें झेललीं. त्या ईश्वराच्या भक्तीविना मी अनेक दुःखांस पाचारण करून बसलों!

॥ ५८ ॥

ऐसा ध्यान धरौं बरो बनवारी,
मन पवन दै सुखमन नारी ॥ टेक ॥

सो जप जपौं जो बहुर न जपना ।
सो तप तपौं जो बहुरि न तपना ॥ १ ॥

सों गुरु करौं जी बहुरि न करना ।
ऐसो मरौं जो बहुरि न मरना ॥ २ ॥

उलटी गंग जमुन में लावौं ।
बिनही जल मंजन द्वै पावौं ॥ ३ ॥

लोचन भरि भरि बिंब निहारौं ।
जोति बिचारि न और बिचारौं ॥ ४ ॥

पिंड परे जिव जिस घर जाता ।
सबद अतीत अनाहद राता ॥ ५ ॥

जा पर कृपा सोई भल जानै ।
गूंगो साकर कहा बखानै ॥ ६ ॥

सुन्न मँडल में मेरा बासा ।
ता ते जिव में रहौं उदासा ॥ ७ ॥

कह रैदास निरंजन ध्यावौं ।
जिस घर जावँ सो बहुरि न आवौं ॥ ८ ॥

---

योगसमाधीनें प्राप्त होणाऱ्या अलौकिक आनंदाचें वर्णन करून संत रोहिदास येथें सांगतो आहे–निरंजनाचें ध्यान करा आणि अविनाशी तत्त्वाचें सुख सदासर्वदा प्राप्त करा.

त्या सुंदर श्रीकृष्णाचें (परमतत्त्वाचें) असें स्मरण-चिंतन केलें पाहिजे कीं–

मी असा जप जपत राहीन जो पुनश्च जपावा लागणार नाहीं-अर्थात् माझी साधना यशस्वी होईलच होईल. मी असें तप करीन, अशी साधना करीन कीं, जी पुनः पुन्हा करावी लागणार नाहीं. अर्थात् निश्चित यश मिळवून देईन. मी असा गुरु करीन जो मला हमखास यशस्वी करील, आणि मग मला अशी मुक्ति लाभेल कीं, पुनः पुन्हा मुक्ति मागावी लागणार नाहीं. तें मरण शेवटचें अन यशस्वी मुक्तीचेंच असेल. मी गंगा उलटून यमुनेशीं आणीन, अर्थात् इडा आणि पिंगला या नाड्यांच्या यौगिक प्रक्रियेनें संयोग जुळवून आणीन, मग माझें द्वैत कायमचें विरून जाईल, मग नेत्र भरून त्या परमतत्त्वाचें दर्शन घेईन. त्याचें पुनः पुन्हा अवलोकन करीन. त्या अलौकिक ज्योतीचा प्रकाश नित्य पाहत राहीन. ती दिव्य ज्योति मी सदैव दृष्टीसमोर ठेवीन. माझ्या मनांत दुसरा विचार येणार नाहीं. माझें मन अन्य कांहींहि पाहणारें नाहीं. एकचित्त होऊन मी महातत्त्वाचे चिंतन करीन.

जीव शरीरापासून मुक्त झाल्यावर कुठें जातो ? तो नंतर कोणत्या घरीं जातो ? . . . अनाहताचा स्वर कानीं येतांच जीव मुक्त होतो. तो परमेशाशीं एकत्व पावतो. अनाहताचा शब्द जीवाचें त्या अतीताशीं ऐक्य घडवून आणतो. ज्यावर ही अद्भुत कृपा होते, तोच हें जाणूं शकेल. ज्याला या अलौकिक मीलनाची गोडी ठाऊक नाहीं, त्याला ती कशी समजावून द्यावी. मुका माणूस साखर कशी असते तें कसें सांगूं शकेल ? साखरेचें तो वर्णनच करूं शकत नाहीं. तसेंच साधकाचें आहे. त्याच्या दिव्य आनंदाचा आस्वाद जर तो घेतो, पण त्याला तो आनंद शब्दांत वर्णन करून सांगतां येत नाहीं. शून्य चक्रांत त्या अलौकिक शक्तीचा निवास आहे. त्या महातत्त्वाचा स्पर्श व्हावा, म्हणून जीव उदास असतो, बेचैन असतो. जीव-शिवाचें मीलन व्हावें म्हणून साधकाची सारी साधना सुरू असते. आणि म्हणून संत रोहिदास म्हणतो–साधक-जन हो, नित्य निरंजनाचें ध्यान करा. आणि साधना करीत राहा, त्या साधनेच्या यशस्वितेनंतर तुम्हांला अपूर्व सुखाची प्राप्ति होईल. मग अनंताचें असें घर गवसेल कीं, जेथून पुनश्च फिरणें नाहीं. त्या घरीं निजानंदाचा अमोल ठेवा आहे. तेथून पुन्हा जीवाच्या यातना नाहींत. सदैव जीवन्मुक्ताचा अद्भुत आनंदच आनंद आहे.

॥ ५९ ॥

बापु रो सत रैदास कहै रे।
ज्ञान बिचार चरन चित लावै, हरि की सरनि कहै रे ॥ टेक ॥
पाती तोडे पूजि रचावै, तारन तरन कहै रे।
मूरति काहिं बसै परमेसुर, तौ पानी माहिं तिरै रे ॥ १ ॥
त्रिबिध संसार कौन बिधि तिरबौ, जे दृढ नाव न गहे रे।
नाव छाडि दे डूंगे बसे, तौ दूना दुःख सहे रे ॥ २ ॥
गुरु को सबद अरु सुरति कुदाली, खोदत कोई रहै रे ॥ ३ ॥
झूठी माया जग डहकाया, तौ तिन ताप दहै रे।
कह रैदास राम जपि रसना, काहुके संग न रहै रे ॥ ४ ॥

---

ईश्वरप्राप्तीचा सहजसुलभ मार्ग संत रोहिदास समजावून देतो आहे. तो म्हणतो–हा दीनदुबळा रोहिदास तुला सत्य समजावून देतो आहे, तें नीट ऐक. ज्ञानाचा विचार करून त्या परब्रह्म स्वरूपाच्या चरणीं तुझें चित्त एकाग्र कर. परमशक्तीच्या शरणीं एकचित्त होऊन जो पत्रपुष्पांनीं तूं करतो आहेत. ती पूजा नव्हे. तरण्या-तारण्या-संबंधींच्या तुझ्या साऱ्या कल्पनाहि मिथ्या आहेत. पाषाणाच्या मूर्तीमध्यें तो ईश्वर राहतो काय ? आणि मग तो पाण्यावर तरंगतो तरी कसा ? तो तर सर्वत्र व्यापून राहणारा आहे. संसाराचे त्रिविध ताप तूं सहन करणार ? तुझी त्यांतून मुक्ति कशी होणार? तूं या भवसागरांतून तरून जाण्यासाठीं मजबूत नाव हातीं घे. त्या नावेच्या आश्रयानें तुला भवसागरापार होतां यायला हवें. चांगलीशी नाव घ्यायची सोडून तूं जर डोंगी किंवा कमकुवत नाव स्वीकारशील, तर बुडून जाशील, तुझें दुःख वाढेल. गुरूच्या कृपेनें तूं शब्दांचें ज्ञान करून घे, 'स्मृती'ची कुदळ बनव, आणि अशा प्रकारें साधनेनें तूं ईश्वराची प्राप्ति करून घे. राम-नामाचा जप केलास, तर भवसागराचें पाणी तुझ्या नौकेस त्रस्त करणार नाहीं. तूं तुझ्या इच्छित स्थळीं भवसागरापार जाऊन पोहोंचतील. खोट्या मायेच्या प्रभावानें जग धावरून जातें. आणि मग त्या मायेच्या मोहपाशांत अडकून राहिल्यानें त्रिविध ताप साधकास दग्ध करतात–त्रास देतात, म्हणून संत रोहिदास म्हणतो, हे जिव्हे, तूं राम-नामाचा जप कर. कोणाच्याहि नादीं लागूं नकोस.

॥ ६० ॥

माधवे नो कहियत भ्रम ऐसा । तुम कहियत होहु न जैसा ॥ टेक ॥
नरपति एक सेज सुख सूता, सपने भयो भिखारी ।
आछत राज बहुत दुख पायो, सो गति भई हमारी ॥ १ ॥
जब हम हुते तबैतुम नाहीं, अब तुम हौ हम नाहीं ।
सरिता गवन कियो लहर महोदधि, जल केवल जल माहीं ॥ २ ॥
रजु भुअंग रजनी परगासा, अस कछु भरम जनावा ।
समुझि परी मोहिं कनक अलंकृत, अब कछु कहत न आवा ॥ ३ ॥
करता एक जाय जग भुगता, सब घट सब विधि सोई ।
कह रैदास भगति एक उपजी, सहजै होइ सो होई ॥ ४ ॥

---

हे माधवा ! माझ्या भ्रमाची कहाणी मोठी मजेची आहे. तूं आतां माझा उद्धार केला आहेस. तुझ्या कृपेमुळें आतां तो भ्रम विरून गेला आहे. . .एका राजाची गंमत अशी झाली, सुखशय्येवर पहुडून आरामाची झोप घेत होता तो आणि स्वप्नांत त्याला वाटतें, आपण भिकारी बनलों ! आणि मग त्याला त्या स्वप्नांतील भ्रमामुळें अपार दुःख झालें. त्याचें महा-राज्य असूनहि त्याला फार फार दुःख वाटूं लागलें. असाच वेडगळपणा माझ्या बाबतींत झाला. मी भ्रमांतच स्वतःस हीन लेखूं लागलों होतों,. . . जेव्हां आम्ही होतों, तेव्हां तुम्ही नव्हतात, जेव्हां आतां तुम्ही आहांत, तेव्हां आम्ही नाहीं. अर्थात् मी माझें पण विसरलों नव्हतों आणि मी माझ्याच विकारांत मग्न होतों, तोंवर तूं माझा स्वीकार केला नाहींस, आणि आतां मी आणि तूं दोन नाहीं. तूं आहेस आणि त्यांतच मी आहे. नदी जशी महासागरास जाऊन पावावी आणि पाणी पाण्याशीं एकरूप होऊन जावें, तसें हें मीलन. पण माझा भ्रम जेव्हां दूर झाला नव्हता, तेव्हां रात्रीं जसें साप समजून दोरीस बडवावें, तसा प्रकार होत असे. आतां मला सत्यस्वरूप कळलें आहे, ज्याप्रमाणें सुवर्णाचे अलंकार आणि सुवर्ण एकच असतें, त्याप्रमाणें आपलें नातें आहे. आपल्यांत द्वैत नाहीं, हें मला आतां कळतें आहे. पण हा अलौकिक अनुभव बोलून दाखवितां येत नाहीं–वर्णन करून सांगतां येत नाही. प्रत्येक वस्तूमध्यें प्रभु विद्यमान आहे. तो एकच या साऱ्या सृष्टींत सामावलेला आहे. संत रोहिदास म्हणतो–आतां भक्तीचा बंध निर्माण झाला आहे. सारें सहज सुलभ आहे.

॥ ६१ ॥

केहि बिधि अब सूमिरौं रे, अति दुर्लभ दीनदयाल।
मैं महा विषई अधिक आतुर, कामना की झाल ॥ टेक ॥

कहा बाहर डिभ कीये, हरि कनक कसौटीहार।
बाहर-भीतर साखि तूं, कियौ ससौ अँधियार ॥ १ ॥

कहा भयो बहु पाखँड कीये, हरि हृदय सपने न जान।
जो दारा विभिचारिनी, मुख पतिबरत जिय आन ॥ २ ॥

मैं हृदय हारि बैठ्यों हरी, मो पै सऱ्यो न एको काज।
भाव भगति रैदास दे, प्रतिपाल करि मोहिं आज ॥ ३ ॥

---

त्या अत्यंत दुर्लभ अशा दीनानाथाचें नामस्मरण कसें करावें? आजवर मी विषयोपभोगांच्या आहारीं गेलों होतों. मला विषयविकारांचेंच मोठें आकर्षण होतें. वासनेचाच मी सदैव पाठलाग केला, आणि म्हणून हे दीन-बंधो, मी तुझें स्मरण आतां कसें करूं? मी तुझी भक्ति आतां कशी करूं? ईश्वर शुद्ध सुवर्णाप्रमाणें आहे. मी त्या शुद्ध सुवर्णाचें मर्मच जाणूं शकलों नाहीं. मी कितीतरी पाखंडीपणा केला, ढोंगें केलीं. ईश्वराचें मी स्वप्नांत सुद्धां स्मरण केलें नाहीं. परमतत्त्वाचा मी जरा देखील विचार केला नाहीं. या चुकीची मला जाणीव आहे. माझें मनच मला सांगतें आहे. तें साक्षी आहे. चंद्रमा शीतल प्रकाश देऊं शकलाच नाहीं. त्यानें अंधकारच दिला. तसें झालें. व्यभिचारिणी स्त्री पातिव्रत्याविषयीं बोलूं लागावी, तसा प्रकार झाला. मी वाट चुकलों आणि आतां सन्मार्गाच्या गोष्टींचा विचार करूं लागलों. मी तर माझ्या हृदयीं हरीस राखून ठेवलें नाहीं. मी हरीस हरवून बसलों, माझ्याकडून एकहि सत्कृत्य घडलें नाहीं. मी सदैव पापाचरण केलें. हा संत रोहिदास ईश्वरास विनवून म्हणतो आहे, माझी भावभक्ति आतां सुफलित होऊं दे, हे परमेशा, तूं माझा प्रतिपाळ कर. तूं मजवर कृपा कर, माझा सांभाळ कर. माझा उद्धार कर.

॥ ६२ ॥

रे चित चेत अचेत काहे बालक कौं देख रे ।
जाति ते कोई पद नहिं पहुँचा, राम भगति विसेख रे ॥ टेक ॥

खटक्रम सहित जे बिप्र होते, हरि भगति चित दृढ नाहिं रें ।
हरिकी कथा सुहाय नाहीं, सुपच तूलै ताहि रे ॥ १ ॥

मित्र शत्रु अजात सब ते अंतर लावै हेत रे ।
लाग वाकी कहाँ जानै तीन लोक पवेत रे ॥ २ ॥

अजामिल गज गनिका तारी, काटी कुंजर की पास रे ।
ऐसे दुरमत मुक्त कीये, तो क्यों न तरै रैदास रे ॥ ३ ॥

---

हे माझ्या ईश्वरा ! तूं माझ्यासारख्या तुझ्या भक्ताकडे कृपेच्या दृष्टीनें पाहा. या बालकाकडे दुर्लक्ष कां बरें करीत आहेस ? त्याच्याकडे स्नेहाच्या दृष्टीनें पाहा, त्यावर कृपा कर. प्रभु रामाची भक्ति हीच महत्त्वाची गोष्ट. जातीपातीचा आणि परमपदाचा संबंध नाहीं. त्या परमशक्तीच्या कृपावंत दृष्टीस सर्व जन सारखेच आहेत. बाह्याडंबराचें स्तोम माजविणारे, वृथा खटाटोप करणारे पंडित लोक ईश्वराची भक्ति करीत नाहींत. ज्यांच्या चित्तीं हरीची भक्ति दृढ झालेली नसते. त्यांचें चित्त भ्रमणच करीत असतें. ज्याला भगवंताची कथा रुचत नाहीं, तो साक्षात् डोम होय. ज्याला हरिभक्ति भावत नाहीं, तो शुद्ध मांग होय—नालायक होय. शत्रु-मित्रांचा नाद सोडून दे. एका ईश्वराची अनन्यभावें भक्ति कर. ज्याचा तिन्ही लोकीं लौकिक आहे, जो अखिल सृष्टीचा स्वामी आहे, त्याचें तूं स्मरण कर, त्याचीच तूं आराधना कर. अजामिलाचा त्यानें उद्धार केला. गजराजास त्यानें आपत्तीं-तून मुक्त केलें. गणिकेला त्यानें कृपेची सावली केली. छोटया-मोठया सर्व प्राण्यांचा जो रक्षक आहे—कृमिकीटकांपासून गजेंद्रापर्यंत सर्वांचा जो त्राता आहे, त्याचा तूं भरंवसा ठेव . . . आणि अशा सर्वांना तूं जर मुक्ति दिलीस, तर मग हे परमेश्वरा ! तूं रोहिदासाला कां बरें तारणार नाहींस ? तूं नक्कीच त्याला अभय देशील.

॥ ६३ ॥

रे मन माछला संसार समुदे तूं चित्र बिचित्र बिचारि रे।
जेति गालै गलिये ही मरिये, सो सँग दूरि निवारि रे ॥ टेक ॥
जम छै डिगन डोरी छै कंकन, पर तिया लागो जानि रे।
होइ रस लुबुध रमै यौं मूरख मन पछि तावै अजान रे ॥ १ ॥
पाप गुलीचा भरम निबोली देखि देखि फल चीख रे।
पर तिरिया संग भला जौं होवै, तो राजा रावन देख रे ॥ २ ॥
कह रैदास रतन फल कारन, गोबिन्द का गुन गाइ रे।
काँचे कुंभ भरो जल जैसे, दिन दिन घटतो जाइ रे ॥ ३ ॥

---

हे मनरूपी मत्स्या ! तूं या संसार-समुद्रांत जरा भल्याबुऱ्याचा विचार कर. त्याची नीट ओळख करून घे. चांगल्यावाइटाचा विवेक कर. ज्या गळांत अडकून मृत्यु पावावा लागेल, त्या गळांत अडकूं नकोस. ज्या योगें तूं पथभ्रष्ट होशील, अशा गोष्टींच्या आहारीं जाऊं नकोस. त्यांपासून दूर रहा. ज्याप्रमाणें मत्स्यास भुरळ पाडून कोळी बद्ध करतो, वंशी वाजवून पारधी हरणाला मोहांत टाकून त्यास पकडतो, तद्वत् हे मना ! परस्त्री तुला मोहवून टाकील. तुला मार्गभ्रष्ट करील. आणि वासनेंत रमून तूं वाट चुकशीलहि. मग आपल्या मूर्खपणाबद्दल पश्चात्ताप करशील, हळहळशील. 'गुलीचा' हें फळ गोड असतें आणि लिंबोळी कडवट असते. गोडवा हें एका फळाचें लक्षण, कडवटपणा हा दुसऱ्या फळाचा धर्म. म्हणून तूं असा विवेक कर, चांगलें काय, वाईट काय, तें जाणून घे. आणि मग फलास्वाद घे. परस्त्रीचा संग तुला भुरळ पाडील. त्यांत तुला मौज वाटेल, पण त्या रावण राजाची काय गत झाली, तें जरा आठव, परस्त्री विषयींच्या दुष्ट वासनेमुळें रावण रसातळाला गेला. तूं या कहाणीची आठवण ठेव. संत रोहिदास म्हणतो, तुला जर खऱ्या रत्नफलाची–अमोल ठेव्याची प्राप्ति करून घ्यायची असेल, तर गोविंदाचें गुणगायन कर, ईश्वराचें स्मरण–चिंतन कर. आयुष्य सत्कारणीं लाव, नाहीं तर जसा फुटका कुंभ हळूहळू रिता होत जावा, तसा तूं नष्ट होऊन जाशील. जीवन वृथा समाप्त होईल. म्हणून तूं त्वरा कर नि ईश्वराचें स्मरण कर.

॥ ६४ ॥

माधो अविद्या हित कीन्ह ।
ता ते मैं तोर नाम न लीन्ह ॥ टेंक ॥

मृग मीन भृंग पतंग कुंजर एक दोस बिनास ।
पंच व्याधि असाधि यह तन कौन ता की आस ॥ १ ॥

जल थल जीव जहाँ तहाँ लौं, करम न या सन जाई ।
मोह पासी अबंध बंध्यो, करिये, कौन उपाई ॥ २ ॥

त्रिगुन जोनि अचेत भ्रम भरमे, पाप पुन्न न सोच ।
मानुखा औतार दुरलभ, तहूँ संकट पोच ॥ ३ ॥

रैदास उदास मन भौ, जप न तप गुन ज्ञान ।
भगत जन भवहरन कहिये, ऐसे परम निधान ॥ ४ ॥

---

आपण जप, तप, आदि केलें नाहीं, वास्तविक ज्ञानापासून दूर राहिलों, अशी नम्र कबुली देऊन संत त्या परमनिधानास उद्देशून म्हणतो, हे माधवा, मी अविद्या-मायेच्या मोहपाशांत अडकून पडलों, मी तिच्या आहारीं गेलों आणि तुझें नामचिंतन केलें नाहीं. जन्म वायां दवडला.

हरीण, मत्स्य, भ्रमर, पतंग, हत्ती, इत्यादि प्राण्यांच्या एकेका इंद्रिय-विकारानें त्यांचा नाश होतो आणि मी तर पांचहि इंद्रियांच्या अधीन होऊन बसलेला आहे. मग माझा उद्धार कसा व्हावा ? मला तुझी प्राप्ति कशी व्हावी ? जळींस्थळीं राहणाऱ्या जीवांचा कसें तरी करून निभाव लागून जातो, पण मजसारख्या मोहपाशांत गुरफटून राहिलेल्या साधकाचा उद्धार कसा व्हावा ? कोणत्या उपायानें मी संकटमुक्त व्हावें ? वास्तविक हा मनुष्य-जन्म दुर्लभ होय. पण तो पाप-पुण्याचा कांहीं विचार न करतां भ्रम-मूलक मायेच्या अधीन होऊन संकटांत सापडतो; पथ-भ्रष्ट होतो.

संत रोहिदास कष्टी होऊन सांगतो, जप-तपाची वाट मला ठाऊक नाहीं. खऱ्या ज्ञानाचा मार्ग मला गवसला नाहीं. मी तुझी खरी भक्ति करूं शकलों नाहीं. मी उदास झालों आहे. हे भवदुखहारी ईश्वरा, या तुझ्या भक्तजनावर कृपा कर. तूं परमनिधान आहेस, मजवर दया कर.

॥ ६५ ॥

सुकछु विचार्‍यो तातें मेरो मन थिर ह्वै गयो।
हारे रँग लाग्यो तब बरन पलटि भयो ॥ टेक ॥

जिन यह पंथी पंथ चलावा।
अगम गवन में गम दिखलावा ॥ १ ॥

अबरन बरन कहै जानि कोई।
घट घट व्यापि रह्यो हरि सोई ॥ २ ॥

जेइ पद सुन नर प्रेम पियासा।
सो पद रमि रहुयों जन रैदासा ॥ ६ ॥

---

ईश्वराच्या अस्तित्वाची खूण मला पटली आणि माझें मन सुस्थिर झालें, मनाचे विकार दूर झाले. ईश्वराच्या विचारानें मी जेव्हां व्यग्र झालों, तेव्हां माझे सारे विकल्प विरून गेले, मनाची अस्थिरता नष्ट झाली.

ज्यांच्या सफल साधनेनें या ईश्वराप्रत जाणाऱ्या मार्गावर प्रकाश पसरला आहे, त्यांचेविषयीं संतास कृतज्ञता वाटते. हा ज्ञानमार्ग ज्यांनीं प्रत्यक्ष आचरून दाखवला, त्यांनीं साधकांपुढें फार मोठा आदर्श ठेवला आहे, किंवा ज्यांनीं या मार्गानें प्रवासास आरंभ केला, त्यांना ही वाट सहजसुलभ बनली आहे.

ज्याला वर्ण नाहीं, रूप नाहीं, रंग नाहीं, असा तो निर्गुणनिराकार ईश्वर प्रत्येकाच्या ठायीं वास करतो. तो हरि सर्व प्राणिमात्रांच्या देहांत विद्यमान आहे. त्याचें स्वरूप अत्यंत व्यापक आहे. . . . ज्या अशा ब्रह्म-स्वरूपाविषयीं प्रत्येकास आकर्षण वाटतें. त्या स्वरूपाच्या चरणीं रोहिदास विनम्र आहे. आणि त्याच्याविषयीं अत्यंत कृतज्ञ आहे. त्या परमपदाच्या ठायीं तो नित्य रमून गेलेला आहे.

॥ ६६ ॥

माधो, संगत सरति तुमारी, जग जीवन कृस्न मुरारी ॥ टेक ॥

तुम मखतूल, चतुरभुज, मैं बपुरों जर कीरा ।
पीवत डाल फूल फल अम्रित, सहज भई मति हीरा ॥ १ ॥

तुम चंदन हम अरँड बापुरो, निकट तुमारी बासा ।
नीच बिरिछ ते ऊँच भये हैं, तेरी बास सुबासन बासा ॥ २ ॥

जाति भी ओछी जनम भी ओछा, ओछा करम हमारा ।
हम रैदास रामराई को, कह रैदास बिचारा ॥ ३ ॥

---

हे माधवा, परमेश्वरा ! तुझा सहवास मला खूप आवडतो. तूं जगदीश आहेस. तूं जगाला जीव देणारा आहेस. हें जगजीवन तुझ्या कृपेनेंच पावलेलें आहे. हे मुरारी, तूं अनंत हस्तांचा आहेस. तूं श्रेष्ठ आहेस. आणि मी ? तुझ्या-समोर मी जसा किडा तुच्छ तसा आहे. मी अत्यंत हीन, दीन दुर्बल आहे. परंतु जेव्हां तुझ्या स्वरूपाचा घ्यास मला लागला, जेव्हां मी तुझ्या भक्ति-रूपी अमृतरसाचें सेवन केलें, तेव्हां माझी बुद्धि हिऱ्याप्रमाणें बनली. अर्थात् मति सुस्थिर झाली. तिला वास्तव ज्ञानाचा प्रकाश दिसला. तूं चंदना-प्रमाणें सुवास देणारा आहेस, मजसारखा एरंडहि त्या सुखाच्या सहवासांत श्रेष्ठत्व पावला, तुझ्या निकट राहून माझें मनोमालिन्य दूर झालें, माझी मति सन्मार्गाकडे प्रवृत्त झाली. आतां हा नीच वृक्षहि उच्च झाला. त्याचें रंगरूप पालटलें. तुझ्या सुखद सहवासानें त्याची उन्नति झाली. त्याचें हीनत्व सरलें, त्यानें श्रेष्ठत्व प्राप्त केलें.

संत रोहिदास विनम्र भावनेनें म्हणतो, माझी जातहि हीन आहे, हलकी आहे. कर्महि चांगलें नाहीं. मी जातीप्रमाणेंच कर्मानेंहि नीच आहे. पण रामरायाच्या नामस्मरणाची गोडी जेव्हांपासून लागली आहे, तेव्हांपासून विश्वास बळावला आहे. रैदास रामरायाचा आहे, असा एक आत्मविश्वास जागा झाला आहे.

॥ ६७ ॥

माधौं भरम कैसेहु न बिलाई । ताते द्वैत दरसै आई ॥ टेक ॥
कनक कुंडल सूत पट जुदा, रजु भुअंग भ्रम जैसा ।
जल तरंग पाहन प्रतिमा ज्यों, ब्रह्म जीव द्वति ऐसा ॥ १॥
विमल एक रस उपजै न बिनसै, उदय अस्त दोंउ नाहीं ।
बिगता बिगत घटै नहिं कबहूँ, बसत बसैं सब माहीं ॥ २॥
निश्चल निराकार अज अनुपम, निरभय गति गोबिन्दा ।
अगम अगोचर अच्छर अतरक, निरगुन अंत अनंदा ॥ ३ ॥
सदा अतीत ज्ञान घन बर्जित, निरबिकार अविनासी ।
कह रैदास सहज सुन्न सत जिवन मुक्त निधि कासी ॥ ४ ॥

---

माधवा ! माझा हा 'भ्रम' कसा दूर होत नाहीं ? माझें अज्ञान कसें नष्ट होत नाहीं ? या अज्ञानामुळें मला द्वैत दिसून येतें. मी तुला माझ्याहून दूर समजतों. वास्तविक तूं वेगळा नाहींस. तूं नि मी एक आहोंत. सुवर्ण आणि त्याच्यापासून तयार केलेले अलंकार हे दोन वेगळे नव्हेत. वस्त्र आणि सूत यांचेंहि द्वैत नाहीं. वस्त्राशिवाय सूत नाहीं, सुताविना वस्त्र नाहीं. असा भ्रम होणें म्हणजे रज्जूस भुजंग समजण्याप्रमाणें आहे. मूर्खपणानें दोरीस साप समजणें आहे. जलाचा आणि लहरींचा अभेद, पाषाण आणि त्यापासून बनविलेली मूर्ति ह्यांचें अद्वैत. तसेंच ब्रह्म अन् जीव यांचें ऐक्य. या वस्तु दोन नाहींत. तें परमतत्त्व विमल आहे, पवित्र आहे, एकसंध आहे. तें कधीं नाश पावत नाहीं. त्याच्या बाबतींत उदय किंवा अस्त हे दोन्ही संभवत नाहींत. अविगत तत्त्व कधींहि कमी होत नाहीं. तें अनत आहे. त्याची व्याप्ति सर्वत्र आहे, तें सर्वत्र सामावलेलें आहे. सर्वांत विद्यमान आहे. तें अचल आहे. निराकार आहे. अद्वितीय आहे. गोविंदाचें हें स्वरूप निर्भय असें आहे. तें अगम आहे. दृष्टीस अगोचर आहे. अतर्क्य आहे. अवर्णनीय आहे. निर्गुणतत्त्व अत्यंत आनंदानें भरलेलें आहे. तीं अतीत अशी निर्विकार अविनाशी परम-शक्ति ज्ञानयुक्त आहे. संत रोहिदास म्हणतो, सहज समाधि ज्यानें यशस्वी केली तो हें तत्त्व प्राप्त करतो, त्याला परब्रह्म गवसतें; जीवन्मुक्ताचें संचित धन म्हणजे परमतत्त्वाची प्रचीति.

॥ ६८ ॥

तुम चरनारबिन्द भँवर मन ।
पान करत मैं पायों रामधन ॥ टेक ॥

संपति बिपति पटल माया धन ।
ता में मगन होइ कैसे तेरो जन ॥ १ ॥

कहा भयो जे गत तन छन छन ।
प्रेम जाइ तौ डरै तेरौ निज जन ॥ २ ॥

प्रेमरजा लै राखो हृदे धरि ।
कह रैदास छूटिबो कवन परि ॥ ३ ॥

---

हे भगवंता ! माझें मन भ्रमराप्रमाणें तुझ्या चरणकमलाभोंवतीं गुंजारव करींत आहे. मी तुझ्या चरणीं भक्तिभावानें आकर्षित झालेलों आहें. आतां भ्रमरवत् (तुझ्या प्रेमरसाचें) मधु-रस-पान करीत मी रामरूपी संपत्ति प्राप्त केली आहे. 'राम-धन' मला मिळालें आहे. हा तुझा सेवक संपत्तिसुखांत आतां कसा रममाण होईल ? संपत्ति अन् धन-दौलत त्याला आपत्तीसमान वाटेल. त्यांत आतां त्याला गोडी कशी वाटणार ? हा तुझा दास भगवत्प्रेमाच्या आनंदांत मग्न आहे. तें प्रेमच चिरंतन राहावें, अशी त्याची इच्छा आहे. त्यांत थोडी जरी त्रुटि झाली, तरी ती त्याच्या मनास सहन होणार नाहीं; त्यास वाईट वाटेल. त्या ईश्वरीय स्नेहाचें आकर्षण इतकें जबरदस्त आहे कीं, तें सांगतां येणार नाहीं. अणुरेणु त्या अलौकिक सुखानें स्पंदित झालों आहे.

त्या प्रेमाची धूलि-प्रेमाचा ठेवा मी हृदयीं जतन करून ठेविला आहे, असें सांगून रोहिदास म्हणतो, हा स्नेहबंध आतां कसा तुटेल ?.. हें नातें आतां कायमचें जडलें आहे.

॥ ६९ ॥

ऐसे जानि जपो रे जीव,
जपि ल्यो राम न भरमो जीव ॥ टेक ॥

गनिका थी किस करमा जोग।
पर-पूरुष सो रमती भोग ॥ १ ॥

निसि बासर दुस्करम कमाई।
राम कहत बैकुंठे जाई ॥ २ ॥

नामदेव कहिये जाति कै ओछ।
जाको जस गावै लोक ॥ ३ ॥

भगति हेत भगता के चले।
अंक माल ले बीठल मिले ॥ ४ ॥

कोटि जग्य जो कोई करै।
राम नाम सम तउ न निस्तरै ॥ ५ ॥

निरगुन का गुन देखो आई।
देही सहित कबीर सिधाई ॥ ६ ॥

मोर कुचिल जाति कुचिल में बास।
भगत चरन हरिचरन निवास ॥ ७ ॥

चरिउ बेद किया खंडौति।
जन रैदास करै डंडौति ॥ ८ ॥

हे मानवा, तूं ईश्वराचें नामस्मरण कर. असें नामस्मरण करून तूं उद्धरून जाशील. रामनामाचा उच्चार करीत राहिलें असतां तूं भ्रममुक्त होऊन जाशील, तुझे विकार नष्ट होतील, हें जाणून तूं ईश्वराचें भजन-चिंतन कर. परपुरुषाशीं नित्य संभोग करणारी ती गणिका कोण होती? विषयवासनेंत रमून गेलेली ती गणिका काय योग्यतेची होती? तिच्या दुष्कर्मामुळें तिला कसा मोक्ष प्राप्त होणार होता? परंतु तिनें ईश्वराचें स्मरण केलें. तिला वैकुंठ लाभलें. रात्रंदिन दुष्कर्माची कमाई करणारी गणिकाहि रामनामाचा जप करतांच वैकुंठलोकीं गेली. ती मोक्ष प्राप्त करूं शकली.... अशी ही रामनामाची विलक्षण शक्ति आहे.

नामदेवाचें उदाहरण पाहा. जातीनें शिंपी असलेला नामदेवहि हरिनामाच्या गजरांत जेव्हां रंगून गेला, तेव्हां त्याला ईश्वरानें कृपावंत होऊन मुक्ति दिली. आज सारें जग त्याच्या कीर्तीचें गुणगायन करतें आहे, भक्त विठ्ठलदास जातीनें माळी होता. ईश्वराच्या स्मरणात दंग असतांना एकदां त्याच्याकडून राजसेवेंत खंड पडला. राजाच्या महालांत पुष्पमाळा पोहोंचविण्याचें काम त्याच्याकडे असे, तें झालें नाहीं! भगवंत स्वतः उठून विठ्ठलाचें रूप धारण करून निघाला. भक्तासाठीं राजसेवा करण्यास भगवंत सिद्ध झाला. ईश्वराच्या स्मरणांत ही विलक्षण शक्ति आहे. भगवंत भक्तास वश होऊन जातो. कोटि कोटि यज्ञांचा पसारा कोणी मांडला, तरी ही शक्ति प्राप्त होणार नाहीं. रामानामासारखा भगवत्प्राप्तीचा दुसरा मोठा उपाय नाहीं कबीरदासाची कहाणी तर सर्वश्रुत आहे. निर्गुण निराकाराच्या चिंतनांत सदैव मग्न असलेले कबीर धन्य झाले. ते सदेह वैकुंठवासी झाले. ही नामस्मरणाचीच शक्ति होय. मी कुटिल जमातींत जन्म घेतला. मी जातीनें हीन आहे. परंतु भक्त बनून मी हरिचरणांचा आश्रय केला आहे. चार वेदांनीं ईश्वराचें सत्य स्वरूप जाणून घेण्यासाठीं चर्चेचा खटाटोप रचला आहे. हा संत रोहिदास ईश्वरास दंडवत घालून त्याच्या चरणीं नम्र होऊन त्याचें स्मरणचिंतन करून उद्धरून जाणार आहे.

॥ ७० ॥

बरजि हो बरजिवी उतूले माया।
जग खेला महाप्रबल सबही बस करिये,
सुर नर मुनि भरमाया ॥ टेक ॥
बालक बृद्ध तरुन अरू सुन्दर,
नाना भेष बनावै ।
जोगी जती तपी संन्यासी,
पंडित रहन न पावै ॥ १ ॥
बाजीगर के बाजी कारन,
सब को कौतिग आवै ।
जो देखै सो भूलि रहै,
वा का चेला मरम जो पावै ॥ २॥
षड ब्रह्मण्ड रोक सब जीते,
येहि बिधि तेज जनावै ।
सब ही का चित चोर लिया है,
वा के पीछे लागै धावै ॥ ३ ॥
इन बातन से पचि मरियत है,
सब को कहै तुम्हारी ।
नेक अटक किन राखो कैसो,
मेटो बिपति हमारी ॥ ४ ॥
कह रैदास उदास भयो मन,
भाजि कहाँ अब जैये ।
इत उत तुम गोबिन्द गोसाई,
तुमहीं माहिं समैये ॥ ५ ॥

मायेच्या जबरदस्त शक्तीपुढें माणूस थिटा पडतो आणि तिच्या आकर्षणामुळें तो पथभ्रष्ट होतो. संतकवि त्या मायेच्या या बिकट शक्तीचें वर्णन करतांना म्हणतो,– ही माया मोठी जबरदस्त आहे. जन हो! ही माया अगदीं अतुलनीय अशी आहे. तिच्या शक्तीची तुलनाच कुणाशीं करतां येणार नाहीं. ही महाप्रबल माया साऱ्या जगास नाचविते; आपल्या अधीन करून ठेविते. सुर, नर, मुनि सारे जण तिच्या भ्रमांत अडकून पडतात. बालक, तरुण, वृद्ध आणि सुंदर अशा नाना प्रकारच्या वेषांत ही माया वावरते किंवा अशा सर्व अवस्थांत असलेल्यांनाही माया मोहविते. योग्याचा योग, यतीचा याग, संन्याशाची तपतपस्या किंवा पंडितांचें पांडित्य सारें या बिकट मायेपुढें निष्प्रभ होतें. ही माया या सर्वांवर सत्ता चालविण्याचा यत्न करते. जादूगारानें जसा जादूचा खेळ करून सर्वांस कोड्यांत टाकावें, मोहवून टाकावें, तसा हा मायेचा खेळ आहे. मोठा मोह उत्पन्न करणारा आहे. जो कोणी या जादूच्या खेळास पाहण्यांत रमून जातो, तो साधना असफल करून बसतो. कोणी एखादाच शिष्य मायेचें मर्म जाणतो, तिचा मोहाचा पसारा त्यास कळून येतो. अखिल ब्रह्मांडांतील सारे जन या मायेच्या आकर्षणापुढें दबून जातात. तिचा प्रभावच तसा असतो. सर्वांच्या चित्ताचें ती हरण करते आणि त्या सर्वांना मागें धावावयास लावते. या गोष्टीकडे पाहिलें कीं, हे ईश्वरा ! तुझी स्मृति होते. तूं माझी विपत्ति दूर कर, या मायेच्या कचाटयांतून मला मुक्त कर. या मायेच्या साऱ्या लीलांमध्यें मी गुरफटून बसतों आहे. तूं मला हिच्यापासून परावृत कर.

रोहिदास म्हणतो, या मायेच्या बिकट स्वरूपाकडे पाहून मी दुःखी-कष्टी झालों आहें. आतां मी हिच्यापासूत दूर तरी कसा आणि कुठें पळून जाऊं ? हे गोविंदा, गोस्वामी ! तूंच माझें कसेंहि करून रक्षण कर; तूंच मला संभाळून घे.

॥ ७१ ॥

बंदे जानि साहिब गनी ।
समझि बेद कतेब बोलै काबे में क्या मनी ॥ टेक ॥

स्याही सपेदी तुरँगी नाना रंग बिसाल बे ।
ना पैद तें पैदा किया पैमाल करत न बार बे ॥ १ ॥

ज्वानी जुम्री जमाल सूरत देखिये थिर नाहिं बे ।
दम छ सै सहस इकइस हरदिन खजाने थें जाहिं बे ॥ २ ॥

मनी मारे गर्ब गाफिल बेमेहर बेपीर बे ।
दरी खाना पडै चोबा होइ नहीं तकसीर बे ॥ ३ ॥

कुछ गाँठि खरची मिहर तोसा, खैर खुबीहा थीर बे ।
तजि बदवा बेनजर कमदिल, करि खसम कान बें ।
रैदास की अरदास सुनि, कछु हक हलाल पिछान बे ॥ ४ ॥

हे साधका ! त्या ईश्वराचें स्वरूप एखाद्या परमस्वतंत्र माणसाप्रमाणें आहे. तो तुझी किंवा कुणाचीच पर्वा करणार नाहीं. तो मोठ्या धनिक माणसाप्रमाणें स्वतंत्र वृत्तीचा आहे, हें तूं जाणून घे ! वेदपुराणवादी काय सांगतात, त्यावर विसंबून राहूं नकोस. काबा आदि तीर्थक्षेत्रींहि तो आहे असें नाहीं. त्याचा असा एक रंग नाहीं. काळा, पांढरा काय, सर्व सप्त रंगांचाहि तो नाहीं. तो नाना रंगांच्या पलिकडचा आहे–अत्यंत विशाल आहे, हें जाणून घे. जवानीचा जोश म्हणशील तर तो चार दिवसांचा असतो. सौंदर्याच्या वाट्यालाहि चार दिवसच येतात. यौवन किंवा सौंदर्य दोन्ही कायमचीं नव्हेत. तुझें जीवनहि नश्वर. दिवसागणिक एकवीस हजार सहाशें वेळां तूं श्वासोच्छ्वासाची क्रिया करतोस, आणि हे श्वास सारे तुझ्या जीवनखजिन्यांतून नित्य नष्ट होत आहेत. आणि असें असतांहि हे साधका ! तूं किती गर्वानें फुलून जात असतोस. अरे, तुझा हा गर्व वृथा नव्हे काय ? तुझें हें वागणें खचितच कठोर होय, आत्मघातार्चे होय, विवेकशून्य होय.

तूं अशी चूक करूं नकोस. तूं असा गुन्हे करीत वसूं नकोस. नाहींतर या चुकीपोटीं तुला अंतिम समयींहि छडीचा मार बसेल. ईश्वराच्या दरबारीं तुला सजा झाल्याविना राहणार नाहीं. कांहीं पुण्याचा संचय कर. स्वतःस वेळींच सावरून घे. हा खोटा व्यापार सोडून दे. ठग बनूं नकोस. ईश्वराचें सत्य स्वरूप समजून घे. हे अदूरदर्शी, संकुचित मनोवृत्तीच्या माणसा, जरा त्या ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाचें स्मरण कर, रोहिदासाची ही विनम्र प्रार्थना ऐक. अरे, जरा ईश्वराचें वास्तविक स्वरूप जाणून घे. त्याच्या खऱ्याखुऱ्या रूपाची निश्चित जाणीव करून घे.

॥ ७२ ॥

ऐसी भगति न होइ रे भाई।
राम नाम बिन जो कछु करिये, सो सब भरम कहाई ॥ टेक ॥

भगति न रस नाद भगति न कथै ज्ञान।
भगति न बनमें गुफा खुदाई ॥ १ ॥

भगति न ऐसी हाँसी भगति न आसापासी।
भगति न यह सब कुल कान गँवाई ॥ २ ॥

भगति न इंद्री बाँधा भगति न जोग साधा।
भगति न अहार घटाई ये सब करम कहाई ॥ ३ ॥

भगति न इंद्री साधे भगति न बैराग बाँधे।
भगति न ये सब बेद बड़ाई ॥ ४ ॥

भगति न मूड मुडाये भगति न माला दिखाये।
भगति न चरन धुवाये ये सब गुनी जन कहाई ॥ ५ ॥

भगति न तौ लौं जाना आपको आप बखाना।
जोइ जोइ करै सो सो करम बड़ाई ॥ ६ ॥

आपो गयो तब भगति पाई ऐसी भगति भाई।
राम मिल्यो आपो गुन खोयो रिधि सिधि सबै गँवाई ॥ ७ ॥

कह रैदास छूटी आस सब तब हरि ताही के पास।
आतमा थिर भई तब सबही निधि पाई ॥ ८ ॥

सहज मार्गाचा अवलंब करावा, भाव व भक्तीचा स्वीकार करावा, आडंबराचा त्याग करावा, असें सांगून संत रोहिदास भक्तीचें वास्तविक स्वरूप समजावून देत आहे.

रामनामाखेरीज कोणताहि अन्य मार्ग नाहीं. हरिस्मरणाव्यतिरिक्त प्रत्येक साधन आणि साधना भ्रममूलक होय. ईश्वराचें स्मरण नित्य करणें हाच साधा, सोपा आणि खरा भक्तिमार्ग होय, दानादि क्रियाकर्मे म्हणजे भक्ति नाहीं. ज्ञानाचें स्तोम किंवा पोथी-पुस्तकांचा संभार म्हणजे खरी भक्ति नाहीं. वनांत जाऊन गुहेंत बसून तपस्या करणें हेंहि भक्तीच्या मार्गाचें रहस्य नव्हे. भक्तीचा मार्ग असा हास्यास्पद नाहीं. भक्ति हें एक व्रत आहे. आपल्या नित्य कर्मांचा त्याग; कुल, प्रतिष्ठा आदींचा अव्हेर म्हणजे भक्ति नव्हे. योग-साधना करून आततायी कृत्यें करणें, इंद्रियांचें दमन करणें म्हणजे ईश्वराची भक्ति नव्हे. आहारादि स्वाभाविक वृत्तींचा तिरस्कार हाहि भक्तीचा प्रकार नाहीं. ह्या साऱ्या गोष्टी तर कर्मकांड किंवा बाह्याडंबर होत. इंद्रियांचें नियमबंधन, वैराग्याचें अकारण अनुसरण म्हणजे शुद्ध भक्ति नव्हे. वेदांच्या माहात्म्याचा उद्घोष करणें म्हणजे ईशसेवा नव्हे. डोक्याचें मुंडन करणें, जपमाळा हातीं धरणें वा गळ्यांत अडकविणें—हाहि सारा आचार वृथा होय. सतत चरणप्रक्षाळण किंवा भक्तीच्या नांवाखालीं सदैव स्नानादि कर्मकांडहि फोल होय, असें गुणी जनांना वाटतें. स्वतः स्वतःस पूर्ण समजणें आपला बडिवार सांगणें हेंहि भक्तीच्या कक्षेंत येत नाहीं. जेव्हां स्वतःविषयींचा गर्व दूर होतो. अहंकार नष्ट होतो, तेव्हां खरी भक्ति संभवते. रिद्धिसिद्धि साऱ्या दूर सारून आणि अहंता नष्ट करून जेव्हां आपण रामास भेटतों — रामाचें नित्य स्मरण करतों, तेव्हां वास्तविक भक्ति प्रकट होते. संत रोहिदास म्हणतो, आतां आशा, मोह आदि विकार दूर झाले, मनोमालिन्य नष्ट झालें, मोहपाश तुटून गेले, आतां सर्वस्व त्या एका हरीमध्यें दिसूं लागलें आहे. आतां साधकाचें चित्त स्थिर झालें आहे. आतां माझें मन चंचलतेवर मात करूं शकलें आहे. मी सर्व सर्व भरून पावलों आहें. मला खरेंखुरें निजसुख लाभलें आहे.

॥ ७३ ॥

॥ राग धनाश्री ॥

तेरे देब कमलापति सरन आया ।
मुझ जनम सँदेह भ्रम छेदि माया ॥ टेक ।
अति संसार अपार भवसागर,
जा में जनम मरना संदेह भारी ।
काम भ्रम क्रोध भ्रम लोभ भ्रम मोह भ्रम
अनत भ्रम छेदि मम करसि यारी ॥ १ ॥
पंच संगी मिलि पीडियो प्रान यों,
जाय न सक्यो बैराग भागा ।
पुत्रबरग कुल बंधु ते भारजा,
भखै दसो दिसा सिर काल लागा ॥ २ ॥
भगति चितऊँ तो मोह दुख व्यापही,
मोह चितऊँ तो मेरी भगति जाई ।
उभय सँदेह मोहिं रैन दिन व्यापही,
दीनदाता करूँ कवन उपाई ॥ ३ ॥
चपल चेतो नही बहुत दुख देखियो,
काम-बस मोहिहो करम फंदा ।
सक्ति संबंध कियो ज्ञान पद हरि लियो,
हृदय बिस्वरूप तजि भयो अंधा ॥ ४ ॥
परम प्रकास अविनासी अघमोचना,
निरखि निजरूप बिसराम पाया ।
बंदत रैदास बैराग पद चिंतना,
जपो जगदीस गोबिंद राया ॥ ५ ॥

संसारांतील अनंत अडचणींनीं आणि मोहविकारांनीं त्रासलेला जीव ईश्वराच्या चरणीं शरण येतो आणि तो म्हणतो–हे देवेश्वरा ! हे कमलापति विष्णो ! मी तुला शरण आलेलों आहे. मी या जीवनांत अनंत भ्रमांनीं विचलित बनलों आहे. मायेच्या पोटीं असंख्य संशय निर्माण होतात. या मायेनें माझ्या मनीं अनेक विकल्प निर्माण केले आहेत. जगरूपी भवसागर अपार आहे. येथें जन्ममरणाचा फेरा आहे. अगणित विकारविकल्प आहेत. काम भ्रम आहे. मोहाचा भ्रम आहे. लोभाचा विकार आहे, क्रोध विषय आहे, असे अनंत विषयविकार आहेत. हे भ्रम माझ्याशीं दोस्ती करतात. आणि या रिपूंनीं अशी मैत्री केल्यामुळें मी वाममार्गाकडे प्रवृत्त होतों. या पंचेंद्रियांनीं माझ्या प्राणास असें कांहीं कष्टी केलें आहे कीं, मला विरक्तीच प्राप्त होत नाहीं. मी या पंचेंद्रियांच्या पीडेनें इतका दुर्बल बनलों आहे कीं, मी विकारांचा त्याग करूं शकत नाहीं. पुत्र, बंधु, भार्या, आदि पारिवारिक जनांच्या मोहमायेनें मी बद्ध आहें. काळ तर दाही दिशांनीं मला खावयास सिद्ध झाला आहे. भक्ति करावयास जावें, तर हे सारे मोहपाश आडवे येतात आणि मला भक्तीपासून परावृत्त करतात, आणि या मोहमायेत जेव्हां मी व्यग्र होऊन बसतों तेव्हां माझी भक्ति मी हरवून बसतों, मी भक्तिसुखाला पारखा होतों. हे सारे संशय माझ्या मनीं रात्रंदिन घर करून असतात; मी या संदेहग्रंथींनीं अस्वस्थ होऊन जातों. हे परमेश्वरा, माझी या संकटांतून मुक्तता कर, व दीनानाथा, तूं मला मीं काय करावें तें सांग. या संकटावर उपाय सुचव, मी यापूर्वी जागा झालों नाहीं. मी वास्तविक खूप आधीं जागृत व्हावयास हवें होतें, पण मी भ्रमपाशांतच गुरफटून राहिलों म्हणून मला अनेक दुःखें सहन करावीं लागलीं. काममोहांत मी अडकून राहिलों, विषयविकारांच्या अधीन झालों. मी ईशप्राप्तीचे योग्य ते प्रयत्न केले नाहींत. मी ऐहिक शक्तींच्या मागें लागलों, लौकिक सुखसमृद्धि मिळवीत बसलों आणि खऱ्या ज्ञानापासून दूर राहिलों. वास्तविक ज्ञान मला लाभलेंच नाहीं. हृदयीं त्या विश्वरूपाचें प्रतिबिंब सांठविलें नाहीं. त्या जगन्नायकाचें रूप मनीं घोळविलें नाहीं अन् विषयवासनेंच्या मागें लागून मी अंध बनलों, पथभ्रष्ट झालों, आतां माझी या संकटांतून तूं मुक्ति कर.

हे परमप्रकाशा, अविनाशी ईश्वरा ! मजवर दयेची छाया कर, तूं अघमोचन आहेस, पाप-क्षालन करणारा आहेस, मला तूं तुझें ‘ निजरूप’ दाखव अन् मुक्ति प्रदान कर, हा संत रोहिदास तुला वंदना करतो आहे. विरक्ति लाभावी म्हणून तुझ्या चरणांचें चिंतन करतो आहे, तुझ्या चरणीं नम्र झाला आहे. जगदीशाचें नाम जपावें, गोविंदरायाचें नित्य स्मरण करावें, अशी त्याची इच्छा आहे.

॥ ७४ ॥

अब हम खूब वतन घर पाया ।
ऊँचा खेर सदा मेरे भाया ॥ टेक ॥
बेगमपूर सहर का नाम ।
फिकर अँदेस नहीं तेहि ग्राम ॥ १ ॥
नहिं जहाँ साँसत लानत मार ।
हैफ न खता न तरस जवाल ॥ २ ॥
आव न जान रहम औजूद ।
जहाँ गनी आप बसै माबूद ॥ ३ ॥
जोई सैलि करै सोई भावै ।
महरम महल में को अटकावै ॥ ४ ॥
कह रैदास खलास चमारा ।
जो उस सहर सो मीत हमारा ॥ ५ ॥

---

साधना सफल झाल्यानंतर साधक आनंदातिशयानें गाऊं लागाला–आतां आम्हांला फार छान निवासस्थान मिळालें आहे. आम्हांला जेथें जायचें होतें, त्या घरीं आम्हीं आलों, आम्ही भरून पावलों. हें घर उंचावर आहे आणि मला आवडलें आहे. बेगमपूर (दुःखरहित नगर) असें त्या शहराचें नांव आहे. या शहरीं कसलाहि संशय कुणाच्या मनीं नाहीं. येथें अपराध नाहीं, कीं अत्याचार नाहीं. येथें संकटें नाहींत. अवनति नाहीं. येथें जन्ममृत्यूचा फेरा नाहीं. कुणाचें येणेंहि नाहीं अन् जाणेंहि नाहीं. या उच्च स्थळीं एक फक्कड साधक पोहोंचला आहे. त्याची त्यानेंच पूजा बांधली आहे. त्याच्या या साधनामंदिरांत फक्त अंतरंग-मित्रासच प्रवेश आहे. आणि अंतरंग मित्रास अडविणार तरी कोण ? त्या दिव्य नगरींतील जो अंतरंगमित्र संत रोहिदासाला भेटला आहे, तो दुसरातिसरा कोणी नसून प्रत्यक्ष परमेश्वरच आहे. संत रोहिदास म्हणतो, आतां तो रोहिदास चांभार म्हणून जो कुणी आहे तो उरलाच नाहीं. त्या अलौकिक मित्रानें त्याला सोबत केली आहे. त्या अलौकिकाच्या नगरींत अर्थात् योगमार्गानें सफल साधना केल्यावर प्राप्त झालेल्या सिद्धावस्थेंत संताला ईश्वराचा सहवास लाभला आहे.

॥ ७५ ॥

ऊँचे मंदिर सालि रसोई,
एक घरी पुनि रहन न होई ॥ १ ॥
यहु तन ऐसा जैसे घासकी टाटी,
जल गयो घास, रलि रई माटी ॥ २ ॥
भाई-बंधु कुटुंब सहेरा,
ओइ भी लागे काढु सबेरा ॥ ३ ॥
घरकी नारि उरहि तिन लागी,
वह तो भूत भूत करि भागी ॥ ४ ॥
कहि 'रविदास' सबै जग लूटचो,
हम तो एक राम कहि छूटचो ॥ ५ ॥

---

डामडौलाचें घर आणि स्वादिष्ट भोजन—सुखाचा कितीहि मोठा पसारा असला तरी एकदां घटका भरली कीं या जगांत मग एक क्षणहि राहणें अशक्य होऊन बसतें. हें शरीरच इतकें नश्वर आहे कीं, जसें वाळलेलें गवत असावें. जळल्यावर क्षणांत त्या गवताची माती होऊन जाते. बंधु, परिवार आणि साथीसोबती सारेच मग त्वरित निरोप देतात. प्रेमाची पत्नीहि मग संगतसोबत करायला उरत नाहीं. निष्प्राण पतीकडे पाहून तीहि 'भूत भूत' म्हणून पळून जाईल, . . . अर्थात् या क्षणभंगुर शरीराची सुखासीनता व्यर्थच. कितीहि ऐहिक सुख असो, कौटुंबिक समाधान असो; एकदां का शरीर नष्ट झालें कीं त्याची मातीच व्हायची. किती प्रेमाचें कोणीहि असलें, तरी शेवटीं त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. तेव्हां ऐहिक आनंदाची व्यर्थ ओढ कशाला ?

—— संत रोहिदास म्हणतो, या भ्रमजालांत सारें जग गुंतून राहिलें. जगाचा नाश होत राहिला. फसवणूक होत राहिली. आम्ही मात्र एक त्या प्रभु रामाच्या भरंवशावर राहिलों अन् कृतकृत्य झालों. आम्ही रामनामाच्या साहाय्यानें उद्धरून गेलों.

॥ ७६ ॥

हरि को टाँडो लादै जाइ रे,
मैं बनिजारो रामको।
रामनाम धन पाइयो,
ता ते सहज करूँ ब्योहार रे ॥ टेक ॥
औघट घाट घनो घनारे,
निरगुन बैल हमार रे।
राम नाम धन लादियो,
ता ते विषय लाद्यो संसार रे ॥ १ ॥
अंतही धन धर्‍यो रे,
अंतेहि ढूंढन जाइ रे।
अनत को धरो न पाइये,
ता ते चाल्यो मूल गँवाइ रे ॥ २ ॥
रैन गँवाइ सोह करि,
दिवस गँवायो खाइ रे।
हीरा यह तन पाइ करि,
कौडी बदले जाइ रे ॥ ३ ॥
साधुसंगति पूंजी भई रे,
बस्तु भई निर्मोल रे।
सहज बरवा लादि करि,
चहुँ दिसि टाँडो मोल रे ॥ ४ ॥
जैसा रंग कुसुंभ का रे,
तैसा यह संसार रे।
रमइया रंग मजीठ का
ता ते भन रैदास बिचार रे ॥ ५ ॥

ईश्वराच्या सेवकांचा तांडा हरिनामाचें सामानसुमान लादून चाललेला आहे. या समूहांतीलच मी एक रामनामाचा व्यापारी (फेरीवाला) आहें. रामनामाचें धन मला मिळालेलें आहे. आतां मी माझा व्यापारउदीम–व्यवहार चांगल्या तऱ्हेनें करूं शकेन. माझ्या वाटेंतील घाट जरा अवघडच आहेत, पण निर्गुणज्ञानाचे बैल आमच्यापाशीं आहेत. (ते गाड्या व्यवस्थित नेतील). रामनामाचें धन आम्ही आमच्या गाड्यांवर लादलेलें आहे. जगानें मात्र विषयविकारांचें ओझें आपल्या उरावर घेतलें आहे. भलतेंच धन समजून मंडळी चालली आहेत. म्हणून भलत्याच वाटा शोधीत निघाली आहेत. जें ईश्वरीय धन प्राप्त केलें पाहिजे, त्यापासून तीं माणसें फार दूर आहेत. जें मूलभूत (रामनामरूपी) धन त्यांनीं मिळविलें पाहिजे, तेंच ते हरवून बसले आहेत. या माणसांचें काय वर्णन करावें ? यांनीं रात्रीं झोपून घालविल्या. दिवसां हे लोक खाण्यापिण्यांत मग्न राहिले. हिऱ्यासारखी मौल्यवान् वस्तू (आत्मसुख) प्राप्त होऊनहि हे करंटे ठरले. यांनीं वास्तविक सुखास कवडी-मोल करून टाकलें. आत्मवस्तु अमोल आहे. साधुसज्जनांच्या सहवासाचें भांडवल आहे. आतां हे (निर्गुणरूपी) बैल हरिनामाची धनदौलत लादून नीटपणें चालले आहेत. सर्वत्र भ्रमण करणारा हा तांडा आतां सुखेनैव व्यवहार करीत चालला आहे आणि जग ?

अफू आणि भांगेपासून तयार केलेल्या त्या कुसुंभाचा रंग जसा लाल अन् मादक असावा, तसें हें जग. (मजीठ नामक वेलीपासून लाल रंग तयार करतां येतो. ) तो मोहविणारा लाल रंग या जगाचाहि आहे, असें म्हणून संत रोहिदास विचार करतो आहे–या जगाच्या मायावीं स्वरूपाचा आणि स्वतःच्या परमार्थसिद्धीचा मेळ कसा बसावा, याचा विचार करतो आहे.

॥ ७७ ॥

मन मेरो सत्त सरूप बिचारं ।
आदि अंत अनंत परमपद, संसा सकल निवारं ॥ टेक ॥
जस हरि कहिये तस हरि नाहीं, है अस जस कछु तैसा ।
जानत जानत जान रह्यो सब, मरम कहो निज कैसा ॥ १ ॥
करत आन अनुभवत आन, रस मिलै न बेगर होई ।
बाहर भीतर प्रगट गुप्त, घट घट प्रति और न कोई ॥ २ ॥
आदिहु एक अंत पुनि सोई, मध्य उपाइ जु कैसे ॥ ३ ॥
कह रैदास प्रकास परमपद, का तप जप बिधि पूजा ।
एक अनेक एक हरि, कहौं कौन बिधि दूजा ॥ ४ ॥

---

परमेश्वराच्या सत्य स्वरूपाचें वर्णन करतांना संतकवि म्हणतो, माझें मन जेव्हां ईश्वराच्या वास्तविक स्वरूपाचा विचार करतें, तेव्हां मला असें वाटतें-तो ईश्वर अनंत आहे, त्याला आदि अन् अंत नाहीं. तें परमस्वरूप सकल संशयांचा समूळ नाश करणारें आहे. जसा हरि आहे म्हणून तुम्ही सांगतां, तसा तो नाहीं. जसा-कसा आहे तसा तो आहे, अर्थात् तो कसा आहे, तें समजावून सांगतां येत नाहीं. जाणण्याचा प्रयत्न आजवर खूप जणांनीं केला; पण त्याचें वास्तविक स्वरूप कोणास आकलन झालेंच नाहीं. त्याचें मर्म कुणीं जाणलेंच नाहीं. खरें तर तो प्रत्येकाच्या अंतरीं आहे. त्याचा सकल सृष्टींत वास आहे. अंतर्बाह्य कधीं प्रकट, तर कधीं गुप्त, असा तो सर्वत्र सामावलेला आहे. आदिहि तोच, अंतहि तोच. त्यास मध्य नाहीं. अर्थात् तो अनंत आहे. शाश्वत आहे. सर्वव्यापी आहे. निरंतर आहे. आम्ही भ्रमवश होऊन त्याला आमच्याहून दूर समजतों. वस्तुस्थिति तशी नाहीं. सुवर्ण आणि अलंकार दिसायला दोन दिसतात. परंतु अलंकार अन् सुवर्ण अंततोगत्वा एकच असतात. आकाराचा फक्त फरक असतो. संत रोहिदास म्हणतो, परमपदाचा प्रकाश जर पहावयाचा असेल, ईश्वराच्या सत्यस्वरूपाचें ज्ञान जर करून घ्यायचें असेल, तर जपतप किंवा पूजा-अर्चा इत्यादींचें आवडंबर कशासाठीं ? निर्गुणनिराकाराची पूजा आदि कशी व्हावी ? एकांतून हें अनंत विश्व प्रकटलें. अनेकविध विश्वाचा त्राता तो एक . . . मग पूजाविधि कसला ?

॥ ७८ ॥

जो तुम गोपालहिं नहिं गैहो ।
तो तुम कॉ सुख में दुख उपजै सुखहि कहाँ ते पेहौ ॥ टेक ॥
माला नाय सकल जग डहको झूंठो भेख बनै हौ ।
झूंठे ते साँचे तब होइहौ हरि की सरन जब ऐहौ ॥ १ ॥
कनरस बतरस और सबै रस झूंठहि मूड डोलै हौ ।
जब लगि तेल दिया में बाती देखत ही बुझि जैहौ ॥ २ ॥
जो जन राम नाम रँगराते और रंग न सुहै हौ ।
कह रैदास सुनो रे कृपानिधि प्रान गये पछितै हौ ॥ ३ ॥

---

जर तूं त्या गोपालाचें चिंतन केलें नाहींस, तर तुला सुखाची प्राप्ति होईल ? तुझें दुःख कसें दूर होईल ? तुला वास्तविक आनंदाचा लाभ कसा होईल ? ईश्वराच्या स्मरणाचा मार्ग त्यजून आम्ही खोटया आचारांत व्यग्र राहतों. आम्ही असत्याचा वेश परिधान करतों. असत्याचाच पुरस्कार करीत राहतों. ईश्वराच्या चरणीं जर आम्ही तनामनानें शरण गेलों, तर असत्याकडून सत्याकडे जातां येईल, विकारांचा त्याग करून वास्तविक ज्ञानाचा मार्ग अनुसरतां येईल. कानानें श्रवण करण्यातील मौज, मुखानें बोलण्यांतील आनंद आणि अन्य सारेच अशा प्रकारचे आनंद खोटे आहेत, नकली आहेत. हे आनंद असत्याच्याच अवतीं भोवतीं असतात. जोंवर दिव्यांत तेल अन् वात असते, तोवर तो पेटतो, पण तोहि त्या तेलवातीच्या पश्चात् पाहतां पाहतां विझून जातो. जे लोक रामनामाच्या रंगांत रंगून जातात, त्यांना अन्य कशाचें भान म्हणून उरत नाहीं. त्यांना अन्य कुठचीच साधनाप्रणाली आवडत नाहीं. रोहिदास म्हणतो, हे कृपानिधि, माझें म्हणणें ऐक. प्राण निघून गेल्यावर आम्हांला जाग येते. अर्थात् आम्ही उशिरां जागृत होतों. आम्ही लवकर जागृत व्हायला हवें.

॥ ७९ ॥

॥ राग बिलावल ॥

का तूं सोवै जाग दिवाना।
झूठी जिउन सत्त करि जाना ॥ टेक ॥
जिन जनम दिया सो रिजक उमडावै,
घट घट भीतर रहट चलावै।
करि बंदगी छाडि मैं मेरा,
हृदय करीम संभारि सबेरा ॥ १ ॥
जो दिन आवै सो तुखमें जाई,
कीजै कूच रह्यो सच नाहीं।
संगि चली है हम भी चलना,
दूर गवन सिर ऊपर मरना ॥ २ ॥
जो कुछ बोया लुनिये सोई,
ता मं फेर फार कस होई।
छाडिय कूर भजै हरि चरना,
ताको मिटै जनम अरु मरना ॥ ३ ॥
आगै पंथ खरा है झीना,
खांडे धार जैसा है पैना।
जिस ऊपर मारग है तेरा,
पंथी पंथ सँवार सबेरा ॥ ४ ॥
क्या तैं खरचा क्या तैं खाया,
चल दरहाल दिवाना बुलाया।
साहिब तो पै लेखा लेसी,
भीड पडे तूं भरि भरि देसी ॥ ५ ॥
जनम सिराना किया पसारा,
सूझि पऱ्यो चहुँ दिसि अँधियारा।
कह रैदास अज्ञान दिवाना,
अजहूँ न चेतहु नीफँद खाना ॥ ६ ॥

ईश्वराच्या स्नेहाची वाट सोडून जगांतील ऐहिक सुखदुःखांची कास धरणाऱ्या पथभ्रष्ट सामान्य जनांना उद्देशून संतकवि म्हणतो,– हे मानवा ! तूं असा निद्रित कसा ? तूं त्वरित जागा हो, हें जीवन कांहीं खरें नाहीं. हें सत्य तूं लवकरांत लवकर जाणून घे. तूं वृथा संकटकाळजींत मग्न झाला आहेस. अरे, ज्यानें तुला हा जन्म दिला, तो तुझ्या उपजीविकेची काळजी वाहणार नाहीं काय ? तोच तुझी जीविका चालविण्यास मदत करील. त्यानेंच हा विश्वाचा पसारा सावरला आहे. प्रत्येक प्राणिमात्राच्या देहांत जी जीवशक्ति आहे, तिचा कर्ताकरविता तोच आहे. तूं त्याला शरण जा. त्याची सेवा कर, 'मी-माझें', 'तूं-तुझें' ही भावना सोडून दे. अहंकाराचा त्याग कर, हृदयीं करीमाचें – रामाचें – भगवंताचें नामस्मरण करूं लाग. हें सत्वर सुरू कर. आला दिवस निघून जातो. दुःखाचे दिवस संपत जातात. येथील मुक्काम सरत जातो. आणि तुला येथून जायचेंच आहे. इथें राहणें हें सत्य नाहीं. येथून 'कूच' करणें, निघून जाणें हेंच सत्य होय. आपल्याला जायचेंच असतें. आणि हें जाण्याचें काम आपण नित्यप्रति करीत असतोंच, शिरावर मरणाचें ओझें घेऊन आपण सदैव त्याच वाटेनें प्रवास करतो. जें कांहीं तूं पेरलेंस, तेंच उगवणार. जें केलेंस तेंच भरावें लागणार, त्यांत फरफार कसा होईल ? तें तर अटल आहे. तूं व्यर्थ गोष्टींचा त्याग कर आणि हरिचरणीं राहून भजन कर, यामुळेंच तुझा जन्ममृत्यूचा फेरा नष्ट होईल. तुझा पुढचा मार्ग कठीण आहे. जशी तलवारीची धार असावी, तसा तो मार्ग आहे आणि या दुर्गम रस्त्याची नीट माहिती करून घे. आणि त्वरित त्या मार्गानें चालूं लाग. जीवनाचा हिशोब करीत बसूं नकोस. काय काय केलें आणि काय काय राहिलें, याचा विचार करीत बसण्यापेक्षां लगेंच मार्गक्रमण करूं लाग, तुला ईश्वराच्या दरबारीं जायचें आहे.

तूं झट्दिशी चालूं लाग. त्या घरीं जातांना ही कसली एवढी तयारी करीत बसलास ? सारा जन्मभर पसारा मांडीत राहिलास, आतां तुला समजूं लागेल – चारहि दिशा कशा अंधारल्या आहेत ! अज्ञानाच्या अंधाराची जाणीव तुला होईल. संत रोहिदास म्हणतो, हा संसाराचा मोह त्यागून तूं ईश्वराची मनोभावें भक्ति कर. हे पागल माणसा, अज्ञान सोडून दे. अजूनहि जागा हो. अज्ञानानें निर्मिलेले–सारे पाश सोडून दे. लौकिक मोहाचीं बंधनें झुगारून दे, अजूनहि जागा हो !

॥ ८० ॥

प्रभुजी संगति सरन तिहारी ।
जग जीवन राम मुरारी ॥ टेक ॥

गली गली को जल बहु आयो,
सुरसरि जाय समायो ।
संगतके परताप महातम,
नाम गंगोदक पायो ॥ १ ॥

स्वाँति बूंद बरसै फनि ऊपर,
सीस विषै होइ जाई ।
ओही बूंद कै मोती निपजै,
संगति की अधिकाई ॥ २ ॥

तुम चंदन हम रेंड बापु रे,
निकट तुम्हारे आसा ।
संगतके परताप महातम,
आवै बास सुबासा ॥ ३ ॥

जाति भी ओछी करम भी ओछा,
ओछा कसब हमारा ।
नीचै से प्रभु ऊँच कियो है,
कह रैदास चमारा ॥ ४ ॥

हे ईश्वरा! तुझ्या सत्संगतीच्या प्राप्तीसाठीं मी तुला शरण आलों आहे. हे रामा, जगजीवना, मुरारी! मला तुझ्या चरणांची ओढ लागली आहे. मी तुला भेटून निरंतर तुझ्यापाशीं राहावें, म्हणून आलों आहे. नाना ठिकाणांहून वाहात आलेलें पाणी अखेर गंगेंत जाऊन मिळतें. ओहोळ असो, नाला असो, . . . कुठूनहि आलेलें जल गंगामाईशीं एकरूप होऊन गंगाजल बनून जातें. सत्संगाची महती कशी वर्णन करावी? सज्जनसंगाचें माहात्म्य अपार आहे. सारें पाणी अखेर भागीरथीस मिळून गंगोदक बनून जातें. त्या पाण्याला गंगाजलाचें पावित्र्य लाभतें. इकडे एखादा स्वातीचा थेंब नागाच्या फण्यावर पडावा. त्याचें विष होऊन जातें. दुर्जनासंगें स्वातीचा थेंब विष होतो. आणि तोच स्वातीचा थेंब जर शिंपल्याच्या मुखांत जाऊन पडला, तर त्याचा मोती बनून जातो. एकाच स्वातीच्या थेंबाची ही विष–अमृताची कहाणी संगतीचा महिमा पटवून सांगते. खरेंच संगतीचें महत्त्व अपार आहे. तूं चंदनवत् आहेस. हे प्रभो! तुझ्या ठायीं चंदनाचें पावित्र्य आहे. चंदनाचा आपल्यासारखेंच दुसऱ्यास सुगंधयुक्त करण्याचा गुण आहे. मी तर रिठ्याच्या झाडासारखा तुच्छ आहे. माझी मोठी योग्यता नाहीं. पण मला तुझ्या निकट यायचें आहे. चंदनाशेजारी रिठाहि गंधयुक्त होऊन जाईल. त्याचेंहि मूल्य वाढेल. हा सत्संगाचा महिमा मी जाणतों. साधु-संगतींचा प्रताप अद्‌भुत असतो.

संत रोहिदास चांभार म्हणतो, माझी जाति हीन आहे. दैवानें मला ज्या कुलांत जन्म दिला, तें हलकें आहें. माझें कर्मंहि हीन आहे. समाजानें माझ्या वांट्याला जें काम दिलें, तेंहि दुर्दैवानें हलक्या प्रतीचें आहे. माझें हें हीनत्व, दैन्य, अगतिकता त्या ईश्वरानें दूर केली. प्रभुचरणीं मी समर्पित झालों आणि त्यानें माझें दुःख दैन्य दूर केलें. माझ्या दुर्दैवाची कहाणी त्यानें बदलून टाकली. आतां मी हीन नाहीं, मी दीन नाहीं. मी दुर्बल नाहीं. माझें कर्म हलकें नाहीं. माझी जाति अन् व्यवसायहि हलका नाहीं.–मी ईश्वराचा सेवक, मला त्यानें कृपावंत होऊन उद्धरलें आहे.

॥ ८१ ॥

ऐसो कछु अनुभौ कहत न आवै।
साहिब मिलै तो को बिलगावै ॥ टेक ॥

सब में हरि है हरि में सब है, हरि अपनो जिन जाना।
साखी नहीं और कोइ दूसर, जाननहार सयाना ॥ १ ॥

बाजीगर सों राचि रह, बाजी का मरम न जाना।
बाजी झूट साँच बाजीगर, जाना मन पतियाना ॥ २ ॥

मन थिर होइ तो कोइ न सूझै, जानै जाननहारा।
कह रैदास विमल बिवेक सुख, सहज सरूप सँभारा ॥ ३ ॥

---

ईश्वरप्राप्तीचा आनंद अवर्णनीय असतो. प्राप्तीनंतर तो अनुभव अनुभवतां जरी आला, तरी तो दुसऱ्यास सांगतां येत नाहीं.

ईश्वराचें अस्तित्व सर्वाठायीं आहे. सर्वत्र तो भरून राहिलेला आहे. आणि सर्व त्याच्यांत सामावलेले आहेत, ईश्वर ज्यांनीं आपलासा केला, त्यांना तो अद्‌भुत आनंद दुसऱ्यास वर्णन करून सांगतां आला नाहीं. त्या अद्‌भुत सुखास अन्य कोणाची साक्ष देतां येत नाहीं. ज्याला तो दिव्य आनंद लाभला, तोच तो जाणतो आणि शहाणा ठरतो. जादूगाराच्या मोहिनीप्रमाणें हा अनुभव. जादू तर आवडते, पण जादूचें रहस्य उलगडत नाहीं. जादू खोटीच, पण ती निर्माण करणारा मात्र खराखुरा, हें सारें समजतें, पण वर्णन करून सांगतां येत नाहीं. मन जेव्हां स्थिर होतें, त्यांतील विकार नष्ट होतात, तेव्हां केवळ ईश्वराचाच विचार सुचतो. अन्य कांहीं सुचत नाहीं. रोहिदास म्हणतो, विशुद्ध विवेकानें जें सुख मिळतें, तें त्या ईश्वराचें सहज स्वरूप अनुभवास आल्यामुळेंच मिळतें.

॥ ८२ ॥

प्रीति सुधारन आव ।
तेज सरूपी सकल सिरोमनि, अकल निरंजन राव ॥ टेक ॥

पिउ सँग प्रेम कबहुँ नहिं पायो, करनी कवन बिसारी ।
चक को ध्यान दधिसुत सों हेत है, यों तुम ते मैं न्यारी ॥१॥

भवसागर मोहिं इक टक जोवत, तलफत रजनी जाई ।
पिय बिन सेजइ क्यो सुख सोऊं, बिरह बिथा तन खाई ॥२॥

मेटि दुहाग सुहागिन कीजै, अपने अंग लगाई ।
कह रैदास स्वामी क्यों बिछोहे, एक पलक जुग जाई ॥ ३ ॥

---

परमेशाच्या प्रीतिसुखासाठीं व्याकुळ झालेली विरही साधिका त्याला विनवून सांगते आहे-हे प्रियतमा ! हा प्रीतीचा आनंद लुटण्यासाठीं त्वरित तूं मला भेटावयास ये. हे तेजःस्वरूप प्रियकरा ईश्वरा, हे सकलजगन्नायका निरंजना, लवकर ये.

विरहिणीची प्रेमाची तक्रार आहे-प्रियतमाच्या संगतीचें सुख कधीं लाभलेंच नाहीं. तो निष्ठुर प्रियकर मला विसरून गेला आहे, मला त्याची याद छळते आहे. चातकाला जशी चंद्राची ओढ असावी तसा हा आमचा अतूट प्रेमाचा संबंध आहे. हे प्रिय प्राणेशा, तुझ्यापासून मी दुरावलें आहे. चातक-चंद्राप्रमाणें आपला विरह आतां मला साहवेना. तूं ही प्रीत सफल करावयास ये. सारें हें नश्वर जग पाहा, मजकडे टक लावून पाहत आहे. सारी रात्र विरहदुःखामुळें तडफडत घालवावी लागते आहे. प्रियाविना शय्या तरी सुखाची व्हावी कशी ? ह्या विरहव्यथेनें शरीर खाऊन टाकलें आहे. माझें सारें जीवन कष्टी झालें आहे. या दुःखिनी साधिकेस भेटून तूं तिला सौभाग्यवती कर, तिला आनंदी कर, तूं तिला आपल्या निकट घे अन् सुख दे. संत रोहिदास म्हणतो, हे स्वामी, कां बरें असा विरहाच्या ड ागण्या देतो आहेस ? एक एक क्षण युगायुगासारखा आहे.

## ॥ ८३ ॥

अबिगति नाथ निरंजन देवा । मैं क्या जानूँ तुम्हरी सेवा ॥टेक॥
बाँधूँ न बंधन छाऊँ न छाया । तुमहीं सेऊँ निरंजन राया ॥ १ ॥
चरन पताल सीस असमाना । सो ठाकुर कैसे सँपुट समाना ॥ २ ॥
सिव सनकादिक अंत न पाये । ब्रह्मा खोजत जनम गँवायें ॥ ३ ॥
तोडूँ न पाती पूजूं न देवा । सहज समाधि करूँ हरिसेवा ॥ ४ ॥
नख प्रसाद जाके सुरसरि धारा । रोमावली अठारह भारा ॥ ५ ॥
चारो बेद जाके सुमिरत सांसा । भगति हेत गावै रैदासा ॥ ६ ॥

---

हे अज्ञेय ईश्वरा ! निरंजना, देवा ! तुझी सेवा कशी करावी, हें मी कसें समजूं ? तुझी भक्ति मी कशी करूं ? बंधनांचा, व्रतवैकल्यांचा मार्ग मी स्वीकारणार नाहीं. मी तुझी निरंतर सेवा करीन. हे निरंजन राया ! मी तुझी भक्ति करीन. ज्याच्या चरणाशीं पाताळलोक आहे, ज्याचें शिर अस्मानांत आहे – अर्थात् जो साऱ्या विश्वांत भरून राहिला आहे, तो ईश्वर छोटयाशा आकाराच्या बंदिस्त जागेंत ( उदा. देवळांत ) कसा राहील ? त्याचा शोध घेतां घेतां शिव-सनकादिक ऋषिमुनिहि थकून गेले. त्यांना यश लाभलें नाहीं. परब्रह्माच्या मूळ स्वरूपाचा शोध करीत त्यांनीं जन्म दवडला. पण त्यांना तें सत्य गवसलें नाहीं.

हे ईश्वरा ! तुझ्या भक्तीसाठीं पुष्पपत्रांचा वापर मी करणार नाहीं. बाह्याडंबराचा स्वीकार करून मी तुझी भक्ति करणार नाहीं. मी हरि-भक्तीची वाट म्हणून सहजमार्गाचा स्वीकार केला आहे. सहज समाधि अर्थात् आडंबरविरहित भावभक्ति मी स्वीकारली आहे. अशीच हरि-सेवा मी करणार आहे. मी त्या अनंत शक्तीची उपासना करतों. भागीरथाच्या दिव्य तप:साधनेमुळें प्रभावित झालेल्या विष्णूच्या अंगठ्यापासून साठ हजार सगर-पुत्रांचा जन्म झाला. त्यांना तारण्यासाठीं गंगा पृथ्वीवर आली. अशा अद्भुत शक्तिशाली विष्णुदेवाची मी भक्ति करतों. ज्याच्या नाभीच्या वरील रोमरोमांत अठरा लोक सामावले आहेत, अशा त्या भगवंताची मी भक्ति करतों, चारहि वेद जिचें स्मरण करतात, त्या दिव्य शक्तीचें संत रोहिदास स्मरण करतो आणि भक्तिभावानें गातो.

॥ ८४ ॥

अब कछु मरम बिचारा हो हरि ।
आदि अंत औसान रामबिन, कोइ न करै निवारा सो हरि ॥टेक॥
जब मैं पंक पंक अमृत जल जलहि सुद्ध होइ जैसे ।
ऐसे करम भरम जग बाँध्यो, छूटै तुम बिन कैसे हो हरि ॥ १ ॥
जप तप विधी निषेध नाम करूँ, पाप पुन्न दोउ माया ।
ऐसे मोहिं तन मन गति बीमुख जनम जनम डँहकाया हो हरि ॥२॥
ताडन छेदन त्रायन खेदन, बहु विधी कर ले उपाई ।
लोन खडी संजोग बिना जस, कनक कलंकन जाई हो हरि ॥ ३ ॥
भन रैदास कठिन कलिके बल, कहा उपाय अब कीजै ।
भव बूडत भयभीत जगत'जन, करि अवलंबन दीजै हो हरि ॥४॥

---

हे ईश्वरा ! आतां तूं तुझ्या प्रतिज्ञेप्रमाणें माझें रक्षण करायलाच हवेंस. रामाशिवाय आतां मला कोणताहि अन्य आश्रय उरलेला नाहीं. सर्व प्रकारें मी प्रयत्न केला. आतां प्रभुरामाची कृपा एवढा एकच एक मार्ग माझ्यासाठीं उरलेला आहे. मी चिखलाप्रमाणें आहे. पण चिखलाशीं अमृतजलाचा संपर्क आला, तर अमृतजलाचें अमृतत्व चिखलालाहि लाभतें, सारें पाणी शुद्ध होऊन जातें. हे हरि ! मी कर्माच्या आणि भ्रमाच्या पसाऱ्यांत बंदिवान बनलों आहे. माझी या भ्रमजालांतून सुटका होत नाहीं. मी कर्मेंहि नीट पूर्ण करीत नाहीं. आतां तुझ्याविना मला येथील संकटांतून तारणार कोण ? जपातपाच्या मी मार्गें लागलों. विधिनिषेध मानले. कर्मकांड करीत राहिलों. पाप आणि पुण्याचा हिशेब लावीत बसलों. पण शेवटीं ही सारी मायाच. हें सारें करूनहि मला गति लाभली नाहीं. मी तुझ्या वास्तविक स्वरूपापासून विन्मुख राहिलों. म्हणून जन्मोजन्मीं फसत राहिलों. माझी निराशा होत राहिली. ताडना दे. शिक्षा दे. वाटल्यास माझे तुकडे कर. पण माझें रक्षण कर. कांहींहि उपाय करून तूं माझें रक्षण करायला हवेंस. नवसागराच्या योगाशिवाय सुवर्णाचा कलंक दूर होत नाहीं.

संत रोहिदास म्हणतो, मी भवसागरांतील दुःखांमुळें भयभीत झालों आहे. जगाच्या साऱ्या व्यापारास पाहूनच मला भीति वाटूं लागली आहे. तूं आतां कांहीं उपाय कर. तूं या कठिण समयीं मला आश्रय दे आणि माझा उद्धार कर.

॥ ८५ ॥

परचै राम रमै जो कोई।
या रस परसे दुबिध न होई ॥ टेक ॥
जे दीसे ते सकल बिनास ।
अनदीठे नाहीं बिसवास ॥ १ ॥
बरन कहंत कहैं जे राम ।
सो भगता केवल निःकाम ॥ २ ।
फलकारन फूलै बनराई।
उपजै फल तब पुहुप बिलाई ॥ ३ ॥
ज्ञानहि कारन करम कराई ।
उपजै ज्ञान त करम नसाई ॥ ४ ॥
बट का बीज जैसा आकार ।
पसर्‍यौ तीन लोक पासार ॥ ५ ॥
जहँ का उपजा तहाँ बिलाई ।
सहज सुन्नि में रह्यो लुकाई ॥ ६ ॥
जलमें जैसे तूंबा तिरै।
परिचै पिंड जीव नहि मरै ॥ ७ ॥
सो मन कौन जो मन को खाइ ।
बिन छोरे तिरलोक समाइ ॥ ८ ॥
मन की महिमा सब कोइ कहै।
पंडित सो जो अनभै रहै ॥ ९ ॥
कह रैदास यह परम बैराग ।
राम नाम किन जपहु सभाग ॥ १० ॥
घृत कारन दधि मथै सयान ।
जीवनमुक्ति सदा निरबान ॥ ११ ॥

रामनामाची ज्यास एकदां गोडी लागली, तो तरून गेला, असें संतकवीस वाटतें. रामनामरूपी अद्‌भुत रसाचें सेवन करणाऱ्या साधकास दुविधा वाटत नाहीं, त्याचे मनींचे सारे संशय दूर होतात. त्याचा भ्रम विरून जातो. त्या परमतत्त्वाचें दर्शन होऊन त्याचे सारे विकार नष्ट होतात. जें दृश्य स्वरूपांत आहे तें नष्ट होणारें वाटतें. आणि जें दृश्य नाहीं त्यावर तर विश्वास ठेवतां येत नाहीं. पण रामनामामुळें हा संशय दूर होतो. जे रामनामाचा नित्य उच्चार करीत राहतात, ते भक्त निष्काम बनून जातात.

फलधारणा व्हावी, म्हणूनच उपवनांत फुलांचा सुगंध दरवळतो. आणि वृक्षवेलींवर फळें जेव्हां येऊं लागतात, तेव्हां फुलें त्यांना जागा देतात, स्वतः गळून पडतात. असेंच कर्म आणि ज्ञान यांचें नातें आहे. वास्तविक ज्ञान लाभावें म्हणून कर्मरत राहायचें. आणि जेव्हां ज्ञान प्राप्त होतें, तेव्हां अर्थातच कर्म नाश पावतें. छोटयाशा बीजांत वटवृक्षाचा भला मोठा पसारा सामावलेला असतो, हा पसारा मुळांत त्या बीजापासून निर्माण होतो. पण तो विस्तीर्ण वृक्ष निर्माण झाल्यावर बीज उरत नाही, तें नष्ट होऊन जातें. जेथून तें आलें त्या ठिकाणीं तें बीज परत जातें. ज्यांतून तें अस्तित्वांत आलें, त्याशीं तें एकरूप होऊन जातें. तशीच साधकाची साधना यशस्वी होते. सहजसमाधि सफल होऊन तो साधक नित्यानंदांत रमून जातो, मग्न होऊन जातो.

जळामध्यें जसा लाकडाचा ओंडका तरंगत असावा, तसा आत्मसाक्षात्कार झालेला साधक संसारांत राहूनहि संसारापासून अलिप्त असतो. यामुळेंच तो जीवन्मुक्त बनून जातो. जें स्वतःच स्वतःला खात असतें, असें जें मन अत्यंत दुर्बळ असतें त्याला मन तरी काय म्हणावें ? तें मनच नव्हे. असें दुबळें मन साऱ्या त्रिलोकांत भरकटत राहतें. कल्पनाविश्वांत, भाव-विश्वांत गुंग होऊन राहतें. हा मनाचा विशेष तर साऱ्या जणांनीं सांगितला आहे. मनाचा हा दुबळेपणा संतकवीस आवडत नाहीं. साधक सदा निर्भय असावयास हवा. आणि जो असा निडर साधक असतो, मनानें जो अचल असतो, तो खरा पंडित होय. तो खरा ज्ञानी होय.

संत रोहिदास म्हणतो, तूं नितांत विरक्त बनून रामनामाचा जप कां करीत नाहींस ? तूं ताबडतोब हरिस्मरण करूं लाग. नवनीत मिळावें, म्हणून शहाणीं माणसें दह्याचें मंथन करतात. त्याप्रमाणें जीवन्मुक्ति अन् अमर निर्वाण जर प्राप्त करायचें असेल, तर हे मानवा ! तूं रामनामाचा उच्चार करूं लाग.

॥ ८६ ॥

अखिल खिलै नहिं का कहि पंडित,
कोइ न कहै समुझाई।
अबरन बरन रूप नहिं जाके,
कहँ लौ लाइ समाई ॥ टेक ॥
चंद सूर नहिं रात दिवस नहिं,
धरनि अकास न भाई।
करम अकरम नहिं सुभ आसुभ नहिं,
का कहि देहुँ बड़ाई ॥ १ ॥
सीत वायु ऊसन नहिं सखत,
काम कुटिल नहिं होई।
जोग न भोग क्रिया नहिं जाके,
कहौं नाम सत होई ॥ २ ॥
निरंजन निराकार निरलेपी,
निरबीकार निसासी।
काम कुटिलता ही कहि गावैं,
हरहर आवै हांसी ॥ ३ ॥
गगन धूर धूप नहिं जा के,
पवन पूर नहिं पानी।
गुन निर्गुण कहियत नहिं जाके,
कहो तुम बात सयानी ॥ ४ ॥
याही सों तुम जोग कहत हो,
जब लग आस की पासी।
छुटै तबहि जब मिलै एकही,
भन रैदास उदासी ॥ ५ ॥

साऱ्या विश्वांत भरून राहिलेल्या ईश्वराच्या व्यापक स्वरूपाची तुला नीटशीं जाणीव नाहीं. हे पंडिता ! ज्याला वर्णावर्ण नाहीं, ज्याचें स्वतःचें निश्चित असें रूप नाहीं, त्या निर्गुणनिराकार महाशक्तीला तूं कुठें नेऊन पाहतोस ?...किती भ्रामक समजूत उराशीं घेऊन त्या शक्तीचें स्वरूप ओळखल्याचा दावा सांगतोस ? चंद्रमा अन् सूर्य, धरती आणि आकाश, रात्र आणि दिवस या साऱ्या तुला ज्ञात असलेल्या गोष्टींच्या पलिकडे तो आहे. कर्मअकर्माच्या आणि शुभअशुभाच्या गोष्टी काय सांगतोस ? आणि तुझ्या त्या देहाचा तरी कोण बडिवार सांगतोस ? शीत, वायु आणि चुन्यांत मिसळलेलें पाणी—(पाण्याबरोबर उष्णता) या साऱ्याच्या पलिकडची ती अज्ञेय शक्ति होय. काम आणि कुटिल वासनांच्या ती अतीत आहे. योग अन् भोगहि जिला मंजूर नाहीं. ती परमशक्ति या सर्व ज्ञेय गोष्टींच्या आणि भोग्य वस्तूंपेक्षां खूप व्यापक अशी आहे. निरंजन, निराकार, निर्लेप, निर्विकार, निःश्वासी असें या परमतत्त्वाचें स्वरूप आहे.

पण तूं मात्र कामाच्या व कुटिलतेच्या नेत्रांतून त्या शक्तीकडे पाहतोस. तिची उपासना करतांना तूं या कामकुटिल कृतीचा त्याग करीत नाहींस. हें तुझें मूर्खपण पाहून मला हरघडीं हंसूं आल्याखेरीज राहत नाहीं. आकाश, पृथ्वी, तेज (अग्नि), वायु अन् पाणी या पंचतत्त्वांच्याहि पलिकडचें असें त्या दिव्यशक्तीचें व्यापक स्वरूप आहे. त्या शक्तीला गुणानिर्गुणाच्या कसोट्या तरी कशा लावतोस ? गुणानिर्गुणाच्या अतीत अशी ही शक्ति. हे शहाण्या पंडिता, तूं जरा हें समजून घेऊन शहाण्यासारखें बोल.

संत रोहिदास विनम्रभावानें तुला सांगतो आहे—त्या निर्गुण निराकार परम रूपाची प्राप्ति व्हावयाची असेल, तर आशामोहाचा (मायेचा) पाश तोडावयास हवा. तो जोंवर तुटत नाहीं तोंवर तुझें ईश्वराशीं मिलन होणार नाहीं. जेव्हां तो मायेचा बंध तुटून जातो, तेव्हांच त्या ईश्वराचा साक्षात्कार घडतो.

॥ ८७ ॥

॥ जंगली गौडी ॥

पहिले पहरे रैन दे बनज़ारिया, तैं जनम लिया संसार ब ॥
सेवा चूकी रामकी, तेरी बालक बुद्धि गँवार बे ॥ १ ॥
बालक बुद्धि न चेता तूँ, भूला मायाजाल बे ।
कहा होइ पाछे पछिताये, जल पहिले न बाँधी पाल बे ॥ २ ॥
बस बरसका भया अयाना, थाँभि न सक्का भाव बे ।
जन रैदास कहै बनजरिया, जनम लिया संसार बे ॥ ३ ॥
दूजे पहरे रैन दे बनजरिया, तूँ निरखत चाल्यौ छाँह बे ।
हरि न दामोदर ध्याइया बनजरिया,तैं लेय ना सक्का नाँव बे ॥४॥
नाँव न लीया औगुन कीया, नस जौबन दै तान बे ।
आपनी पराई गिनी न काई, मंद करम कमान बे ॥ ५ ॥
साहेब लेखा लेसी तूँ भरि देसी, भीर परै तुझ ताँह बे ।
जन रैदास कहै बनिजरिया, तूँ निरखत चाला छाँह बे ॥ ६ ॥
तीजे पहरे रैन दे बनिजरिया, तेरे ढिलडे पडे प्रिय पान बें ।
काया खनि का करै बनिजरिया, घट भीतर बसे कुजान बे ॥ ७॥
एक बसै काया गढ़ भीतर, पहला जनम गँवाय बें ।
अबकी बेर न सुकिरित कीया, बहुरि न यह गढ़ पाय बे ॥ ८ ॥
कंपी देह काया गढ़ खाना, फिरि लागा पछितान बे ।
जन रैदास कहै बनिजरिया, तेरे ढिलडे पडे परान बे ॥ ९ ॥

चौथे पहरे रैन दे बनिजरिया, तेरी कंपन लागी देह बे।
साहिब लेखा माँगिया वनिजरिया, तेरी छाडि पुराही थेह बें ॥१०॥
छाडि पुरानी जिद्द अजाना, बालदि हाँकि सबरियाँ बे।
जम के आये बाँधि चलाये, बारी पूगी तेरियाँ बे ॥ ११ ॥
पंथ अकेला बराउ हेला, किसको देह सनेह बे।
जन रैदास कहें बनिजरिया, तेरी कंपन लागी देह बे ॥ १२ ॥

---

एका फेरीवाल्याला उद्देशून येथें संतकवि त्याच्या जीवनाचा हिशोब सांगतो आहे. सारा जन्म कसा वायां गेला, याचें चित्रच कवीनें उपस्थित केलें आहे. बनजारी किंवा व्यापारी शब्दाचा अर्थ येथें चार दिवसांची सफर करायला जगांत आलेला सामान्य जीव, असा घ्यावा.

हे जीवा, तुला जाणीव करून देतो. ऐक, प्रथम तूं येथें जन्म घेतलास. तुझी बालबुद्धि अत्यंत अपुरी, तूं अडाणी माणूस, तुझ्या हातून प्रभु रामाची सेवा कांहीं घडली नाहीं. त्या सेवेंत सतत काटकसर घडली, बोलून चालून तुझी बाळबुद्धिच ती. तूं येथील मायामोहांत हरवून बसलास. मुग्ध होऊन गेलास. आतां मागाहून पस्तावून उपयोग काय? भवसागरामध्यें नाव वल्हावयाची असतांना तूं शिडें उभारलींच नाहींस. संयम केलाच नाहींस. आतां तुझ्या नावेवर संकट आलें. मागाहून पश्चात्ताप करून काय उपयोग ?

जेव्हां वीस वर्षांचा झालास, तरुण झालास, तेव्हांहि स्वतःचे भाव आवरूं शकला नाहींस. यौवनाच्या नशेंत दंग झालास. हे सामान्य जीवा, तूं या जगांत जन्म घेतला आहेस. येथें कसें वागायला हवें, तें तुला कळलें नाहीं. असंयमी झालास, वायां गेलास.

तुझ्या आयुष्याच्या मध्यकाळांतील स्थिति आतां तुला निवेदन करतों. ती नीट ऐक. या वेळीं तर तूं स्वतःची सावलीच पाहत चाललास. भलत्याच गोष्टी आपल्या म्हणून ममतेनें पसारा जुळवीत बसलास. हरीचें, दामोदराचें, ईश्वराचें तूं स्मरण केलें नाहीं. त्याचें नांवच तूं घेऊं शकला नाहींस. नांव तर घेतलें नाहींसच, उलट अवगुण मात्र करीत राहिलास. जसें तुझें यौवन

तुला नाचवीत होतें, तसा तूं नाचत राहिलास. आपलें काय, दुसऱ्याचें काय-याचा तूं कांहीं विचारच केला नाहींस ? वास्तविक ज्ञानाची पर्वाच केली नाहींस. उलट व्यांपार मात्र जोरदारपणें केलास, खूप कमाई केलीस. तो ईश्वर या तुझ्या साऱ्या वागण्याचा हिशोब मागणार. तेव्हां तूं काय त्याला सांगणार ? तूं तर या साऱ्या भ्रामक पसाऱ्यामध्यें स्वतःला गुंतवून ठेवलेलें. तूं स्वतःची सावलीच पाहत चालला आहेस. वृथा अभिमान बाळगून आहेस. खोटयाच गोष्टींचा भरंवसा ठेवून आहेस.

तुझ्या जीवनाच्या तिसऱ्या प्रहरींहि पाहा. या वेळीं काय स्थिति झाली ती कथन करतों. ऐक. आतां तुझीं सारीं गात्रें शिथिल झालीं आहेत. तुझ्या शरीराची दुर्दशा झाली आहे. शरीरांत आतां रोगराईनें घर केलें. सुंदर स्त्रीचा तुला आतां काय उपयोग ? कुठें गेला तुझा यौवनाचा उन्माद ? तुझी सारी दुर्दशा होऊन बसली.

अशा प्रकारें तुझा हा जन्म वायां गेला. आतां हा पुनश्च मिळणें नाहीं. त्या शरीररूपी गडामध्यें परम शक्तीचा निवास आहे. पण तुझा हा वायां गेलेला देह आतां कंप पावूं लागला आहे. जीवनाचा चौथा प्रहर आला. आयुष्याची सायंकाळ झाली, ईश्वरानें तुजजवळ आतां तुझ्या पापपुण्यांचा हिशोब मागितला आहे. आणि तुझा सारा पूर्वीचा आश्रय–ज्यावर तूं अवलंबून होतास, त्या साऱ्या विश्वासाच्या गोष्टी आतां कुचकामी ठरल्या आहेत.

रोहिदास तुला जाणीव करून देतो आहे. हे फेरीवाल्या, तुझी सारी वृथा जिद्द सोडून दे. अज्ञानजन्य आग्रह-दुराग्रह सोडून दे आणि सकाळीं उठूनच गाडी हाकल, त्वरित सुमार्गी लाग, यमाचे दूत तुझ्यासाठीं सिद्ध आहेत कारण तुझी वेळ आतां भरलेली आहे. या तुझ्या शरीराचें इतकें प्रेम कसलें घेऊन बसलास ? या नश्वर देहाचें कसलें कौतुक करतो आहेस ? . . तूं एकटाच तुझा पंथ निश्चित करून चालूं लाग. हे फेरीवाल्या, बरेच अपराध आजवर करीत राहिलास. आतां बेगि बेगि सन्मार्गावर वाटचाल करूं लाग.

॥ ८८ ॥

॥ राग आसावरी ॥

केसवे बिकट माया तोर, ताते बिकल गति मति मोर ॥टेक॥
सुबिषंग सन कराल अहिमुख, ग्रसति सुटल सुभेष ।
निरखि माखी बकै व्याकुल, लोभ कालर देख ॥ १ ॥

इंद्रियादिक दुख दारुन, असंख्यादिक पाप ।
तोहि भजन रघुनाथ अंतर, ताहि त्रास न ताप ॥ २ ॥

प्रतिज्ञा प्रतिपाल प्रतिज्ञा चिन्ह, जुग भगति पूरन काम ।
आस तोर भरोस है, रैदास जै जै राम ॥ ३ ॥

---

हे केशवा ! या बिकट मायेनें मी ग्रासून गेलों आहे. मायेच्या त्रासानें माझी मति विकल झाली आहे. मला काहीं सुचत नाहीं. भलेभलेहि या मायेच्या कराल रूपानें भयभीत होतात. कराल सर्पाप्रमाणें हिचा अवतार आहे. भयावह असें या मायेचें स्वरूप आहे.

हें मायेचें भयंकर रूप पाहून मी गोंधळून गेलें आहे. मला कांहीं कळेनासे झालें आहे. मायेबरोबर ही लोभाचीहि व्यथा आहेच. असंख्य पापें मजकडून घडलीं आहेत, घडत असतात. इंद्रियादिक दु:खेंहि अगणित आहेत.

पण तुझें जर मनोयोगपूर्वक भजनगायन केलें, तर त्रास दूर होईल. जो तुझें मनापासून स्मरण करील, त्याचे भवताप दूर होतील.

संत रोहिदास प्रभु रामाचा जयजयकार करून त्याला विनवितो–हे ईश्वरा, आतां मला केवळ तुझाच भरंवसा आहे. मी तुझ्या कृपेनेंच केवळ उद्धरून जाणार आहे. तूं तुझी प्रतिज्ञा पूर्ण कर. तूं माझें–या भक्ताचें रक्षण कर. या भक्ताची इच्छा पूर्ण कर, त्याचा उद्धार कर.

॥ ८९ ॥

नरहरि प्रगटसि ना हो प्रगटसि ना हो ।
दीनानाथ दयाल नरहरे ॥ टेक ॥
जनमेऊँ तौही ते बिगरान । अहो कछु बुझै बहुरि सयान ॥ १ ॥
परिवारि विमुख मोहिं लागि । कछु समुझि परत नहिं जागि ॥ २ ॥
यह भौ विदेस कलिकाल । अहो में आइ पऱ्यो जमजाल ॥ ३ ॥
कबहुक तोर भरोस । जो मैं न कहूँ तो मोर दोस ॥ ४ ॥
अस कहिये तेऊ न जान । अहो प्रभु तुम सरबस मैं सयान ॥ ५ ॥
सुत सेवक सदा असोच । ठाकुर पितहिं सब सोच ॥ ६ ॥
रैदास बिनवै कर जोरि । अहो स्वामी तुम मोहिं न खोरि ॥ ७ ॥
सु तौ पुरबला अकरम मोर । बलि जाऊँ करो जिन कोर ॥ ८ ॥

---

हे दीनांच्या नाथा ! जगदीश्वरा, तूं प्रकट हो. तूं प्रकट होऊन मजवर कृपा कर. हे दयाळा, तूं मजवर स्नेहाची कृपा कर ना रे ! नरहरि, प्रकट हो. दर्शन दे.

मी जन्मल्यापासूनच तुझ्याशीं वियोग झाला आहे. फारा दिवसांचा हा विरहकाल आहे. या विरहाची व्यथा कशी सांगू ? तुला ती सहज समजू शकेल. मी परिवारापासून विमुख झालों. माझ्या निकटवर्तीयांपासून माझी ताटातूट झाली, असें मला वाटतें. या जगांत मला कांहीं कळेनासें झालें आहे. तूं कृपावंत होऊन मला मार्ग दाखव. हा भवसागर कलिकालाप्रमाणें भासतो. मी विदेशींच आहे, असें वाटतें. मी यमदूतांच्या जाळ्यांत गुंतलों असें भय वाटतें आहे. मी तुला सांगून ठेवतों--मी तुझ्याच भरंवशावर राहिलों आहे. आतां हें सांगितल्यानंतरहि तूं माझें रक्षण केलें नाहींस, तर मग पाहा--दोष माझा नाहीं. असें मी बोलतो याचें कारण आहे, हे भगवंता, तूं माझें सर्वस्व आहेस. मी सदैव तुझा सेवक आहे. वेडाभाबडा आहे. अडाणी आहे. तूं माझा पिता आहेस. तुला माझी काळजी आहे. हे ईश्वरा, हा रोहिदास तुला हात जोडून विनंती करतो आहे--हे स्वामिनाथा, माझ्या दोषावर तुझ्या क्षमेचें पांघरूण घाला. माझे अपराध विसरून जा. माझ्या पूर्वजन्मींच्या कुकर्मांनाहि क्षमा कर. माझ्या साऱ्या उणीवा पदरांत घे. माझ्यावर कृपावर्षाव कर.

॥ ९० ॥

देहु कलाली एक पियाला,
ऐसा अवधू है मतवाला ॥ टेक ॥

हे रे कलाली तैं क्या किया,
सिरका सा तैं प्याला दिया ॥ १ ॥

कहै कलाली प्याला देऊँ,
पीवनहारे का सिर लेऊँ ॥ २ ॥

चंद सूर दोई सनमुख दोई,
पीवै प्याला मरै न कोई ॥ ३ ॥

सहज सुन्न में भाठी सखे,
पावै रैदास गुरुमुख देखे ॥ ४ ॥

---

हे साकी !...ज्ञानरूपी मदिरा देणाऱ्या गुरुदेवा ! मला एक प्याला भरून दे. या मस्त, फक्कड अवधूताला तूं एक प्याला ज्ञान-मदिरा दे... पण तूं माझी विनंती मानीत नाहींस ? अरे कलाला, तूं असें काय करतो आहेस ? तूं तर हा फल–रसाचा आंबट प्याला मला प्राशन करायला दिलास !

पण यावर कलाल साधकास म्हणतो, मी तुला प्याला देईन, पण त्याच्या बदल्यांत तुझें शिर घेईन, अर्थात् तुला सर्वस्व समर्पण करायला लावीन.

चंद्र आणि सूर्य दोन्ही समोर येतील, अर्थात् इडा आणि पिंगला या दोन्ही नाड्यांस भेदून कुंडलिनी शक्ति पार होईल. साधक या योगसुखानें अमर होऊन जाईल. साधकाची सहज शून्यांत समाधि लागेल. संत रोहिदासाला दिव्यसुख लाभेल, गुरुमुखांतून ज्ञानामृताचा लाभ मिळेल, साधना सफल होऊन योगानंद प्राप्त होईल.

॥ ९१ ॥

अब मेरी बूडी रे भाई, ताते चढी लोक बड़ाई ॥ टेक ॥
अति अहंकार उरमाँ सत रज तम, ता में रह्यो उरझाई ।
कर्मन बझि पऱ्यो कछू नहिं सूझै, स्वामी नावँ भुलाई ॥ १ ॥

हम मानौं गुनी जोग सुनि जुगना, महामुरुख रे भाई ।
हम मानो सूर सकल बिधि त्यागी, ममता नहिं मिटाई ॥२॥

हम मानो अखिल सुन्न मन सोध्यो, सब चेतन सुधि पाई ।
ज्ञान ध्यान सबही हम जान्यो, बूझौं कौन सों जाई ॥ ३ ॥

हम जानौ प्रेम प्रेमरस जाने, नौ बिधि भगति कराई ।
स्वाँग देखि सब ही जन लटक्यो, फिर यों आन बँधाई ॥ ४ ॥

यह तो स्वाँग साच ना जानो, लोगन यह भरमाई ।
स्वच्छरूप सेली जब पहरी, बोली तब सुधि आई ॥ ५ ॥

ऐसि भगति हमारी संतो, प्रभुता इहइ बड़ाई ।
आपन अनत और नहिं मानत, ताते मूल गँवाई ॥ ६ ॥

भन रैदास उदास ताहि ते, अब कछु मो पै कऱ्यो न जाई ।
आप खाए भगति होत है, तब रहै अंतर उरझाई ॥ ७ ॥

---

अहंतेचा संपूर्ण त्याग केला आणि सर्वस्वाचें समर्पण केलें कीं ईश्वराची खरीखुरी भक्ति होते, हें तत्त्व समजावून सांगतांना संतकवि म्हणतो–

लोकव्यवहाराच्या मोहांत मी सांपडलों, आणि मग तेव्हां माझें पतन झालें. अरे साधका ! मी जग-मायेच्या मागें लागलों आणि पथभ्रष्ट झालों. मनांत अत्यंत अहंकार वाढला. सत्त्व, रज, तम–या गुणांतच मी गुरफटून बसलों. कर्मे मी करीतच राहिलों. त्यापासून मला मुक्ति मिळाली नाहीं. मला तें शक्यच झालें नाहीं. ईश्वरास मी विसरून बसलों होतों !

आम्ही गुणी जनांचे सद्विचार ऐकले नाहींत. उलट त्यांनाच आम्ही दोष देत राहिलों. आम्ही महामूर्खपणा केला. आम्ही फार मोठा अपराध केला. सारे विधिनिषेध न जुमानणाऱ्यांना आम्हीं जवळ केलें. ईश्वरापासून दूर असलेल्यांची आम्हीं संगतसोबत केली. मनींची ममता दूर झाली नाहीं. मायामोहाचा आम्ही त्याग करूं शकलों नाहीं.

पण आम्हीं (संतांनीं) आखिल शून्यांत मनाचा शोध घेतला. सृष्टीचें आणि सृष्टिनिर्मात्याचें व्यापक स्वरूप जाणून घेऊन मनाचें नियमन केलें. ज्ञान, ध्यान आदि तपतपस्येचें मार्ग आम्हीं जाणून घेतले. कोण कसा आहे, ते आम्हीं समजून घेतलें, सर्व साधनांचें निरीक्षण केलें. भक्तीचे नवविध प्रकार आम्हीं पाहिले. आम्ही प्रेममार्गाचाहि (मधुराभक्तीचा) विचार केला. पण या सर्व साधनामार्गांतील अपुरेपणा, ढोंगहि आम्हीं पाहिलें. जनांची फसगत झालेली पाहिली आणि आम्ही मग त्या सर्वांपासून दूर राहिलों. पण लोकांना मात्र कुठचें खरें अन् कोणतें खोटें, हें उमजलें नाहीं. सोंग आणि सत्य यांतील नेमका फरकच कळला नाहीं. लोक भ्रमापासून मुक्त झाले नाहींत. ते भ्रमांतच लीन राहिले.

आम्हीं जेव्हां जपमाळेचा स्वीकार केला, नामस्मरणाचें महत्त्व स्पष्टपणें जाणून घेतले, तेव्हां आम्हांला योग्यायोग्यतेचा निर्णय करतां आला. वास्तवाची जाणीव झाली, खऱ्याखोटयाचें कोडें उमगलें.

केवळ स्वतःचाच विचार करणें आणि आपल्याशिवाय अन्य सर्वांस तुच्छ लेखणें, म्हणजे भक्ति नहीं. यामुळें तर सारेंच गाडें फसतें. आपण पथभ्रष्ट होतो. हो संतजन हे ! आम्ही करतों ती भक्ति हरिस्मरणास प्राधान्य देणारी आहे.

...अहंता काढून टाकावी, मी-माझें ही वृत्ति सोडून द्यावी, त्या योगानें अंतरांतील सारे विकार नष्ट होऊन जातात. संत रोहिदास म्हणतो— मी अन्य सर्व गोष्टींचा त्याग केला आहे. आतां मी ईश्वराच्या नामस्मरणांत रंगून गेलों आहे. भगवंताच्या नामजपांत माझें चित गढून गेलें आहे. मला भक्तीचा खराखुरा मार्ग गवसला आहे. सर्वस्वाचें समर्पण करून परमेशाच्या स्मरणांत रमून जाणें, ही खरी भक्ति होय !-

॥ ९२ ॥

भाई रे राम कहाँ मोहिं बताओ।
सत राम ता के निकट न आओ ॥ टेक ॥
राम कहत सब जगत भुलाना, सो यह राम न होई।
करम अकरम करुनामय केसो, करता नावँ सु कोई ॥ १ ॥
जा रामहीं सबै जग जानै, भरम भुले रे भाई।
आप आप ते कोइ न जानै, कहै कौन सो जाई ॥ २ ॥
सत तन लोभ परस जीतै मन, गुना प्रश्न नहिं जाई।
अलख नाम जाको ठौर न कतहूँ, क्यो न कहो समुझाई ॥ ३ ॥
भन रैदास उदास ताहि ते, करता क्यों है भाई।
केवल करता एक सही सिर, सत्तराम तेहि ठाईं ॥ ४ ॥

---

(हे उपदेशका ) राम कुठें आहे, तें जरा मला समजावून सांग. ईश्वर कोठें असतों, तें तुला ठाऊक असलें, तर मलाहि सांग . . . राम सत्यस्वरूप आहे. तुझ्या भ्रामक समजुती घेऊन तूं त्याच्याजवळ येऊं नकोस !

अरे, रामाचें नांव घ्यायचें,-ईश्वराचें चिंतन करायचें आणि साऱ्या जगास विसरून जायचें, ही कुठली तऱ्हा ? ईश्वराच्या भक्तीचा हा मार्ग कांहीं खरा नाहीं. कर्म अन् अकर्म हीं दोन्ही त्यानेंच व्यापिलेलीं आहेत. तो केशव करुणामय आहे. कर्ताकरविता असलेल्या त्या भगवंताचें नांव मग कांहींहि असो. राममय असेंच सारें विश्व आहे, हें जेव्हां तुला कळून येईल, तेव्हां तुझा सारा भ्रम पूर होईल. तुझ्या मनींचे सारे संशय फिटून जातील. नियम-बंधनांचा अवलंब करून जरी तूं शरीराचें संयमन केलेंस, लोभस्पर्शावर विजय मिळविलास आणि जीवाचें नियमन केलेंस, तरी समस्या दूर होतातच असें नाहीं. उलट बंधनांत त्या वाढतच जातात.

त्या निराकार, निर्गुण, निरामय ईश्वराचें कांहीं नांव नाहीं. कोणतीहि एकच अशी त्याची जागा सांगतां येणार नाहीं, हें तूं कां समजून घेत नाहींस? आणि हें कां समजावून देत नाहींस ?

संत रोहिदास ईश्वराचें हें सत्यरूप सांगून म्हणतो—कर्ता कसा आहे ? ईश्वर कसा आहे . . . तो एकमेव आहे, तेंच या जगांतील सर्वोपरि सत्य होय. सत्यस्वरूप एक रामच आहे, हें जाणून घे.

॥ ९३ ॥

जो मैं बेदनि कासनि आखूं, हरि बिन जिव न रहै कस राखूं ॥टेक॥
जिव तरसै इक दंग बसेरा, करहु सँभाल न सुर मुनि मेरा ।
बिरह तपै तन अधिक जरावै, नींद न आवै भोज न भावै ॥ १ ॥
सखी सहेली गरब गहेली । पिउकी बात न सुनहु सहेली ।
मैं रे दुहागनि अघ कर जानी, गया सो जोबन साध न मानी ॥२॥
तू साईं औ साहिब मेरा, खिजमतगार बंदा मैं तेरा ।
कहै रैदास अँदेसा येही, बिन दरसन क्यों जिवहि सनेही ॥ ३ ॥

---

भगवंताच्या दर्शन-सुखासाठीं तहानेलेला भक्त म्हणतो, आतां ईश्वराविना हा जीव राहत नाहींसें दिसतें. मी आतां हा जीव कसा सांभाळूं ? त्याची समजूत कशी घालूं ? माझें दुःख कुणाला सांगूं ? मी आतां कुणाकडे पाहूं ?

माझा जीव विरहदुःखानें व्याकुळला आहे. माझ्या वेदनेनें मला कांहीं सुचेनासें झालें आहे. आतां सुर किंवा मुनीहि माझा सांभाळ करूं शकणार नाहींत—ऋषिमुनि किंवा ज्ञानी जनांचा उपदेश आतां माझी समजूत पटवूं शकत नाहीं.

विरहदुःखाचा दाह भयंकर आहे. त्या वेदनेनें मी त्रासलों आहे. शरीराची लाही लाही होते. निद्रा नाहींशी झाली आहे. भोजन रुचेनासें झालें आहे. हे सखे, तूं मला त्या प्रियकराचें नांव सुद्धां सांगूं नकोस. त्याची गोष्टहि काढूं नकोस. तूं निष्ठूर नाहींस, माझी जिवाभावाची मैत्रिण आहेस, तर मग त्या प्रियतमाचें नांवहि काढूं नकोस, माझी ही एवढी विनंती तूं ऐक.

मी अभगिनी आहे. साधनेंत सारें यौवन गेलें, तरी मी खंत मानली नाहीं. पण मला माझा प्रियकर भेटला नाहीं. माझी साधना निष्फळ ठरली. माझेंच कांहीं चुकलें असावें, मी दुर्दैविनी आहे.

... रोहिदास म्हणतो, हे स्वामी, तूं माझा परमेश आहेस. मी तुझा सेवक आहे. दास आहे. माझ्या मनींचा संशय दूर कर. मला दर्शन न देतां कां बरें असा माझ्या जिवाला यातना देतो आहेस ? हे स्नेहशील प्रियकरा, तुझ्या भेटीविना मला जिवंत तरी कां ठेवतो आहेस ?

॥ ९४ ॥

कहाँ सूते मुग्ध नर काठ के मँझ सुख।
तजिय बस्तु राम चितवत अनेक सुख ॥ टेक ॥

असहज धीरज लोप कृस्न उधरंत कोप,
मदन भुवंग नहिं मंत्र जंता।
विषय पावक ज्वाल ताहि वार न पार,
लोभ की अयनी ज्ञात हंता ॥ १ ॥

विषय संसार व्याल व्याकुळ तवै,
मोह गुन विषै संग बंध भूता।
टेरि गुन गारुडी मंत्र स्रवना दियो,
जागि रे राम कहि कहि के सूता ॥ २ ॥

सकल सिम्रित जिती सत मति कहै तिती,
हैं इनही परम गति परम बेता।
ब्रह्म ऋषि नारद संभु सनकादिक,
राम राम रमत गये पार तेता ॥ ३ ॥

जजन जाजन जाप रटन तीरथ दान,
औषधी रसिक गद मूल देता।
नागदवाने जरजरी राम सुमिरन बरी,
भनत रैदास चेत निमेता ॥ ४ ॥

अरे मानवा ! काळाच्या जबड्यांत राहून तूं किती गाफील बनून झोपला आहेस ? तूं अशा कोणत्या भ्रमांत मुग्ध होऊन राहिला आहेस ? जागा हो. . . रामरूपी परमतत्त्वाचा त्याग करून तूं अनेक अन्य सांसारिक मोहसुखांच्या मागें लागला आहेस. तुझी दृष्टि 'राम' सोडून भलत्याच सुखांकडे भिरभिरते आहे. कामविकाराचा त्याग कसा करावा, ह्याचा मंत्र तुला सांपडलेला नाहीं. क्रोधापासूनहि तुझी सुटका झालेली नाहीं.

या लोभाच्या प्रचंड सैन्यानें तुझ्या वास्तविक ज्ञानाचा पराभव केला केला आहे. काम आदि विकारांच्या ह्या अग्निज्वाला भयंकर आहेत. त्यांना अंतच नाहीं. या विषम अशा संसाररूपी सर्पानें तुला व्याकुळ केलेलें दिसतें. मोहगुणाच्या विषानेंहि तूं बद्ध आहेस, तो विकारहि तुला बंधनांत ठेवतो आहे. अरे निद्रित माणसा, जरा तूं रामनामाचा मंत्र म्हणत जागा हो. तो मंत्र सदैव जपत राहा. मग पाहा, विषय विकारांनीं भिनविलेलें विष उतरविण्याची किमया तुला साधेल. गारुड्यानें सापाचें विष उतरावें, तसें तूं रामनामाच्या आधारें त्या विकारांपासून मुक्त होशील. साऱ्या स्मृति, सगळीं धर्मशास्त्रें आणि जेवढी म्हणून सद्बुद्धि आहे. त्या शक्तीच्या ठायीं सारें ज्ञान आहे. ब्रह्मर्षि नारद आणि शंभु महादेव, सनक आदि ऋषिमुनि देखील रामनामाच्या मंत्राचा स्वीकार करून त्रेतायुगापार झाले. उद्धरून गेले. . . हे तुझे यज्ञयाग काय कामाचे ? तीर्थ–व्रत-वैकल्यें तरी काय करतात ? या यज्ञ-यागामुळें, जततप, तीर्थयात्रा आदींमुळें तर रोगाचा फैलाव होतो. ह्याच साऱ्या गोष्टी तुझ्या आजारांचे मूळ आहेत.

संत रोहिदास म्हणतो, हे नियमबंधनें बनविणाऱ्या माणसा, जागा हो.

॥ ९५ ॥

खालिक सिकस्ता मैं तेरा ।
दे दीदार उमेदगार, बेकरार जिव मेरा ॥ टेक ॥
औवल आखिर इलाह, आदम फरिस्ता बंदा ।
जिसकी पनह पीर पैगंबर, मैं गरिब क्या गंदा ॥ १ ॥
तू हाजरा हजूर जोग इक, अवर नहीं है दूजा ।
जिसके इसक आसरा नाहीं, क्या निवाज क्या पूजा ॥ २ ॥
नालीदोज हनोज बेबखत, कमि खिजमतगार तुम्हारा ।
दरमांदा दर ज्वाब न पावै, कह रैदास बिचारा ॥ ३ ॥

---

हे सृष्टिनिर्मात्या परमेशा ! मी तुजपासून दुरावलेला एक दुर्दैवी प्राणी आहे. तुझ्यापासून मी विलग झालों आहे. आपली ताटातुटी झाली आहे. मला दर्शन दे. हे दिव्यशक्ति, मी तुझ्या दर्शनासाठीं व्याकुळलें आहे. माझा जीव बेचैन झाला आहे. मला तुझ्या भेटीची ओढ लागून राहिली आहे.

शेवटीं तो ईश्वरच परमशक्तिमान् आहे. मनुष्य फार फार तर देवदूत बनेल, पण मनुष्य तरीहि त्या परमशक्तीचा सेवक आहे. त्या दिव्यशक्तीच्या कृपेची छाया गुरु, ज्ञानी आणि ईश्वराचा संदेश सांगणाऱ्यास लाभते, तो ईश्वर प्रेषितांवर आणि ज्ञानी गुरुजनांवर कृपा करतो. पण मी तर दीन-दुर्बळ आणि पापी आहे.

तुझा-माझा संबंध एकत्वाचा आहे. त्यांत द्वैत नाहीं. ज्यांत प्रेमाचा आश्रय द्वैत नाहीं, त्याचा कसला नमाज आणि त्याची पूजा तरी कसली ? अर्थात् ईश्वरीय स्नेहप्रेमाव्यतिरिक्त अन्य साधनें अर्थहीन आहेत. मी तुझ्याशीं स्नेहाचें नातें जोडलें आहे.

पण हे भगवंता, मी जोडें शिवणारा चांभार आहे. आजवर मी भाग्य-हीनच राहिलों. माझ्या नशिबीं दुःखेंच वाढून ठेवलेलीं होतीं. मी अत्यंत हीन असा तुझा सेवक आहे. असा हा विचित्र सेवक तुझ्या दारीं येऊन उभा आहे. तो थकलाभागला आहे. तुझ्या कृपेची सावली अजून त्याला लाभलेली नाहीं, असें संत रोहिदास तुला विनवून सांगतों आहे.

॥ ९६ ॥

मरम कैसे पाइब रे ।
पंडित कौन कहै समुझाई, जा ते मेरो आवागमन बिलाई ।।टेक।।
बहुबिधि धरम निरूपिये, करते देखै सब कोई ।
जेहि धरमे भ्रम छूटि है, सो धरम न चीन्हे कोई ।। १ ।।
करम अकरम बिचारिये, सुनि सुनि बेद पुरान ।
संसा सदा हिरदे बसै, हरि बिन कौन हरै अभिमान ।। २ ।।
बाहर मूंदि के खोजिये, घट भीतर बिबिध बिकार ।
सुची कौन बिधि होहिंगे, जस कुंजर बिधि व्योहार ।। ३ ।।
सतजुग सत त्रेता तप करते, द्वापर पुजा अचार ।
तिहूँ जुगी तीनो दृष्टी, कलि केवल नाम अधार ।। ४ ।।
रबि प्रकास रजन जथा यों गत दीसै संसार ।
पारस मलि ताँबो छिपा, कनक होत होत नहिं बार ।। ५ ।।
धन जोबन हरि ना मिलै, दुख दारुन अधिक अपार ।
एकै एक बियोगियाँ, ता को जानै सब संसार ।। ६ ।।
अनेक जतन करि टारियें, टारे न टरै भ्रम पास ।
प्रेम भगति नहिं उपजै, ता ते जन रैदास उदास ।। ७ ।।

---

हे पंडिता, ज्ञानी पुरुषा ! या सृष्टीचें जें मर्म आहे, या जगद्व्यापाराच्या मुळाशीं जी महाशक्ति आहे, तिचें मर्म मला कसें जाणून घेतां येईल ? तें रहस्य मला कोण समजावून सांगेल ? ज्याच्या योगानें माझी आवागमनाच्या बंधनांतून मुक्तता होईल, तें रहस्य मला कोण बरें सांगूं शकेल ?

अनेक प्रकारें धर्माचें निरूपण करणारे खूप जण भेटले. पण ज्यामुळें जिवाची भ्रमजालांतून सुटका होईल, अशा प्रकारचा धर्म मात्र कोणाला ओळखतां आलेला दिसत नाहीं. वेदपुराणांचें श्रवण करीत बसतां आणि कर्मा-अकर्माचा विचार सांगत राहतां. आणि संशय तर मनांतच ठाण मांडून बसलेला असतो. हृदयांत जो अभिमान सांठून राहिला आहे, त्याचें हरण ईश्वराखेरीज कोण बरें करणार ? डोळे मिटून ध्यानचिंतन करतात. ईश्वराचा शोध करीत बसतात; पण शरीराच्या आंत जे अनेक विकार शिल्लक असतात, त्यांचें काय ?

हत्तीसारखीच ही या साधकांची तऱ्हा झाली. हत्ती पाण्यांत स्नान करून स्वच्छ होतो आणि लगेच पुन्हा स्वतःवर धूळ उडवून घ्यायला तयार असतो. तसा प्रकार माणसांचा होतो. बाह्याडंबर आम्ही करतों. पण मनांतील विकारांवर मात्र विजय मिळवितां येत नाहीं. मग आम्ही शुचिर्भूत होणार तरी कसे ? ...सत्ययुगांत सत्याची उपासना केली. त्रेता युगांत तपस्या केली. द्वापरयुगांत ईश्वराच्या आराधनेचे वेगवेगळे मार्ग दिसून येतात. पण आतां कलियुगांत भगवंताचें नामस्मरण हाच केवळ एक मार्ग उरलेला आहे. त्याच्या योगानेंच ईश्वरप्राप्ति होऊं शकेल.

पारसमण्याच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होऊन जातें. पण तांब्याचें मात्र परिवर्तन होत नाहीं. तें तसेंच राहतें. सूर्यप्रकाशानेंच रजनीचा नाश होतो. रात्र संपून जाते. तसेंच जगांतील जीवांना ईशप्राप्ति केवळ वास्तविक सत्याचा प्रकाश दिसला असतांनाच होते. अन्य प्रकारें होत नाहीं.

धनदौलत आणि यौवनसुखांत दंग राहिल्यानें भगवंत प्राप्त होत नाहीं. या ऐहिक सुखलालसेमुळें उलट दारुण दुःखेंच निर्माण होत असतात.

संत रोहिदास म्हणतो, भ्रमपाशांतून मुक्त होणें अत्यंत कठीण असतें. सांसारिक मायामोह टाळण्याची शिकस्त करून टाळणें कठीण होतें. पण ते टाळल्याशिवाय प्रेमभक्ति करतांच येत नाहीं. म्हणून अन्य साऱ्या आडंबराचा त्याग करून आणि भ्रमपाशांतून स्वतःची सुटका करून घेऊन साधकानें नामस्मरणयुक्त प्रेमभक्तीची वाट धरली पाहिजे.

॥ ९७ ॥

रामभगत को जन न कहाऊँ, सेवा करूँ न दासा ।
जोग जग्य गुन कछू न जानूँ, ताते रहूँ उदासा ॥ टेक ॥
भगत हुआ तो चढै बढाई, जोग करूँ जग मानै ।
गुन हूआ तो गुनी अन कहै, गुनी आपको आनै ॥ १ ॥
ना मैं ममता मोह न महिया, ये सब जाहिं बिलाई ।
दोजख भिस्त दोउ समकर जानौं, दुहुँ ते तरक है भाई ॥ २ ॥
मैं अरू ममता देखि सकल जग, मैं से मूल गँवाई ।
जब मन ममता एक एक मन, तबहि एक है भाई ॥ ३ ॥
कृष्ण करीम राम हरि राघव, जब लग एक न पेखा ।
वेद कतेब कुरान पुरानन, सहज एक नहिं देखा ॥ ४ ॥
जोइ जोइ पूजिय सोइ सोइ काँची, सहज भाव सतहोई ।
कह रैदास मैं ताहिको पूजूँ, जाके ठावँ नावँ नहिं होई ।

---

मी स्वतःस रामाचा भक्त म्हणवून घेत नाहीं. मी त्याची सेवा करणारा किंवा दास आहे, असेंहि नाहीं. योग आदि साधनें आणि यज्ञयाग यांपैकींहि मी कांहीं जाणीत नाहीं. या सर्वांपासून मी दूर राहतों, अलिप्त असतों. भक्त म्हणवून घेणेंहि गर्वाचेंच होय. योगसिद्धि संपादन करूनहि लोकांकडून मान्यता मिळवायची नाहीं. गुणी म्हणवून स्वतःचें माहात्म्य प्रस्थापित करावयाचें नाहीं; मी माया–ममता–मोहाच्या पलिकडे जाऊं इच्छितों, मला या सर्व विकारांवर विजय प्राप्त करावयाचा आहे. नरक आणि स्वर्ग या दोन्हींना मी समान लेखतों. कारण या दोहोंहून श्रेष्ठ असें विवेकाचें स्थान आहे. मी-माझें यांतच सारें जग व्यग्र असतें. यामुळेंच जगास सत्याचा शोध लागत नाहीं. जेव्हां मायामोहापासून मनाची मुक्तता होते आणि मन पूर्णार्थानें ईश्वराच्या ठायीं एकाग्र होतें, तेव्हांच तो ईश्वर भेटतो. जोंवर कृष्ण, करीम, राम, हरि, राघव, यांस एकच समजत नाहीं––या सर्व नामांतील अभेद मान्य होत नाहीं, तोंवर ईश्वराची प्राप्ति होत नाहीं. वेद आदि शास्त्रग्रंथ, कुराण, पुराण आदि ग्रंथ यांतूनहि हेंच प्रतिपादन आहे. या सर्व ग्रंथांचें सार एकच. तें जाणलें पाहिजे. जें जें म्हणून आम्ही पूजीत बसतों, तें तें सर्व निरर्थक म्हटलें पाहिजे. वास्तविक पाहतां केवळ सहज-भावच सत्य होय. मनापासून भगवंताची भक्ति करणें हेंच मनुष्यकर्तव्य आहे. रोहिदास म्हणतो, ज्याचें एकच एक निश्चित स्थान नाहीं, अर्थात् जो अत्यंत व्यापक आहे, सर्वत्र सामावलेला आहे, अशा त्या निर्गुण निराकार परब्रह्माची मी पूजा करतों; आराधना करतों.

॥ ९८ ॥

संत उतारें आरती देव सिरो मनिये ।
उर अंतर तहाँ बैसे बिन रसना भनिये ॥ टेक ॥

मनसा मंदिर माहिं धुपइये ।
प्रेम प्रीति की माल राम चढइये ॥ १ ॥

चहुँ दिसि दियना बारि जगमग हो रहिये ।
जोति जोति सम जोती हिलमिल हो रहिये ॥ २ ॥

तन मन आतम वारि तहाँ हरि गाइये री ।
भनत जन रैदास तुम सरना आइयें री ॥ ३ ॥

---

भगवंताच्या चरणीं सर्वस्व समर्पण करूण शरन आलेला भक्त विनम्र भावनेनें त्याची आरती गात म्हणतो...हे देवाधिदेवा! संतहृदय तुझी मनोभावें आरती ओवाळीत आहे. अंतर्यामीं तूंच तूं व्यापून राहिला आहेस. या अलौकिक सुखाचें शब्दांत वर्णन करून सांगतां येत नाहीं. हें सुख जिव्हेनें सांगतां येत नाहीं. हा आनंद केवळ अनुभवाश्रचा, तो कथन करतां येत नाहीं.

...मनाच्याच मंदिरांत धूप धुपवावा. प्रेमप्रीतीची सुंदर माळा प्रभु रामास अर्पण करावयाची. सर्व बाजूंस दीपज्योतीचा प्रकाश पसरून राहिला आहे. ज्योतीच्या तेजाशीं ज्योति समरूप झाली आहे. आत्मज्योतीचें परमज्योतीशीं तदात्म्य झालें आहे. आणि तनमनासह साधकाचा आत्मा हरिचरणीं लीन होऊन त्याचें गुणसंकीर्तन करतो आहे.

..संत रोहिदास ईश्वरास सांगतो आहे, बा ईश्वरा, मी तुला शरण आलेलों आहे.

॥ ९९ ॥

आरती कहाँ लों जोवै ।
सेवक दास अचंभो होवै ॥ टेक ॥
बावन कंचन दीप धरावै ।
जड बैरागी दृष्टि न आवै ॥ १ ॥
कोटि भानु जाकी सोभा रोमै ।
कहा आरती अगनी होमै ॥ २ ॥
पांच तत्त्व तिरगुनी माया ।
जो देखैं सो सकल समाया ॥ ३ ॥
कह रैदास देखा हम माहीं ।
सकल जोति रोम सम नाहीं ॥ ४ ॥

---

परमेश्वराच्या सर्वव्यापक स्वरूपाचा साक्षात्कार घडून आल्यावर भक्त-हृदय आनंदानें आरती गाऊं लागतें...कुठवर भगवंताच्या आरतीची शोभा वर्णन करून सांगावी ? या नम्र ईश्वर-सेवकास आश्चर्य वाटून राहिलें आहे. तो स्तिमित झालेला आहे–हा आरतीचा सोहळा पाहून !

बावन्नकशी सुवर्णाच्या दीपांनीं आरती ओवाळावी आणि ती मंद-बुद्धीच्या साधकास समजून येऊं नये...अर्थात् भगवंताची ही भावपूजा इतकी स्पष्ट आहे, इतकी सहजसंवेद्य आहे कीं, ती कोणत्याहि सर्वसामान्य साधकास दिसून यावी–जाणवावी.

कोटि कोटि सूर्य या आरतीचे दीप उजाळीत आहेत. अग्निनारायणानें या आरतीसाठी होम सुसज्ज केला आहे. पंचमहाभूतें आणि त्रिगुणात्मक मायेनें या आरतीचा पसारा मांडला आहे. ज्याला हें जाणवलें तो कृतार्थ झाला.

संत रोहिदास म्हणतो...अशा प्रकारें ईश्वराच्या सर्वव्यापी रूपाचा साक्षात्कार घडला. सकल विश्वांत भरून राहिलेलें तें परमतत्त्व आम्हीं आमच्या अंतरंगांत अनुभविलें !

॥१००॥

नाम तुम्हारी आरत भंजन मुरारे।
हरि के नाम बिन झूठे सकल पसारे ॥ टेक॥
नाम तेरी आसन नाम तेरो उरसा। नाम तेरो केसरि लै छिडका रे॥१॥
नाम तेरो अमिला नाम तेरो चंदन। घसि जपै नाम ले तुझ कूंचा रे॥२॥
नाम तेरो दीया नाम तेरो बाती। नाम तेरो तेलै ले माहिं पसारे॥३॥
नाम तेरे की जोति जगाई। भयो उँजियार भवन सगरा रे॥४॥
नाम तेरो धागा नाम फूल माला। भाव अठारह सहस जुहारे॥५॥
तेरो कियो तुझे का अरपूं। नाम तेरों तुझे चँवर दुलारे॥ ६ ॥
अष्ठादस अठसठ चारि खानि हू । बरनत है सकल संसारे॥७॥
कह रैदास नाम तेरो आरति। अंतरगत हरि भोग लगा रे॥ ८॥

---

हे जगदीश्वरा ! तुझें नांवच मुळीं आर्तिभंजन आहे, तूं भक्तांचें दुःख निवारण करणारा आहेस. हे मुरारी, तुझ्याविना जगाचा अन्य सारा पसारा व्यर्थ आहे, अर्थहीन आहे. तुझ्या नामस्मरणाखेरीज दुसरें कांहींहि खरें नाहीं. तुझ्या नामस्मरणाचेंच आसन मी केलें, त्याचीच मी सहाण बनविली. तुझ्या नामाचेंच केशरी द्रव्य करून त्याचा शिडकावा केला, तुझें नाम अमल आहे पवित्र आहे–तें चंदनवत् सुगंधी आहे. तुझ्या नामस्मरणाचाच मला आधार आहे. म्हणून मी सदैव त्याचाच स्वीकार केलेला आहे.

तुझ्या नामाचा दीपक मी बनविला आहे. त्याची ज्योतीहि नामाचीच आहे. त्यांतील तेलहि नामाचेंच, त्या नामरूपी ज्योतीच्या प्रकाशित होण्यानें माझें सारें घरच उजळून निघालें आहे.

तुझ्या नामाचा धागा अन् त्याची पुष्पमाळा केली. अष्टादश सहस्र भावांनीं तुला मी नमन करीत आहें. तुझेंच हें सारें देय मी तुला देत आहे. तुझ्याच नामाचा अवलंब करून मी तुला चवरी ढाळीत आहे, तुझी पूजा बांधीत आहे. अठरा पुराणें, अडुसष्ट तीर्थमाहात्म्यें, आणि चारी (सर्व प्राणी मात्र ) तुझे वर्णन करतात पण–

संत रोहिदास म्हणतो–तुझें नामच तुझी आरती आहे, अंतरीं हरीची पूजा मी बांधली आहे. माझ्यांतच सामावलेला माझा भगवंत मला भेटला आहे.

# सेना न्हावी-कृत कबीर-रोहिदास-स्तवन

प्रस्तुत काव्य आम्हांस हस्तलिखित स्वरूपांत उपलब्ध झालें आहे. धुळें येथील समर्थ वाग्देवता मंदिराच्या पोथीशाळेमध्यें या कृतीच्या दोन्ही पाठांचीं हस्तलिखितें सुरक्षित आहेत. [1] आमचे ज्येष्ठ स्नेही श्री. दा. शं. जोशी ( धुळें ) यांच्या सहकार्यानें हीं हस्हलिखितें आम्हांला प्राप्त होऊं शकलीं.

दोन्ही पाठांत असलेला फरक फारसा महत्त्वाचा नाहीं. नक्कल करणाऱ्याच्या हातूनच बहुधा मूळ पाठांत कांहीं बदल घडला असावा. आम्ही बाडांक १० मधील 'रोहिदास–कबीर–स्तवन' च फक्त येथें दिलें आहे.

ह्या संवादाची कल्पना मोठी चांगली आहे. संत कबीर आणि संत रोहिदास या दोहोंमध्यें अध्यात्मविषयक कांहीं चर्चा सुरू असून दोघेहि हिरीरीनें आपलें मत मांडीत आहेत, अशी ही कल्पना आहे. या सर्वच संवादांत एक प्रकारची नाटयमयता आहे. मराठी वळणाची आणि अत्यंत सुबोध अशी हिंदी भाषा असल्यानें या संवादाचा अर्थ दिलेला नाहीं.

या संवादांत कवीनेंसंत कबीर आणि संत रोहिदास यांच्या लोकप्रियतेचा फायदा घेऊन आपले आध्यात्मिक सिद्धान्त स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न केला असावा, असे जाणवतें. वास्तविक संत कबीरदास आणि संत रोहिदास यांच्या तत्त्वज्ञानाचा वारसा एकच आहे. दोघांचेहि आध्यात्मिक गुरु आचार्य रामानंदच आहेत. हिंदी संतमताचा–निर्गुण तत्त्वज्ञानाचाच पुरस्कार या दोन्ही संतांनीं केलेला आहे. त्यामुळें या दोन संतांचा अशा स्वरूपाचा संवाद संभवतोच कसा ?–असा प्रश्न निर्माण होतो. याचें उत्तर देतां येण्यासारखें नाहीं.–म्हणूनच कदाचित् या दोन महात्म्यांची काल्पनिक चर्चा घडवून आणून कवीनें शेवटीं त्या दोहोंनाहि मनोभावें वंदन केलें आहे.

१ रोहिदास-कबीर–स्तवन-शेना न्हाऊ बाडांक १० आणि संवाद–सेना न्हावीकृत, बाडांक १४५०

धने कबीरा धन्य रहीदासा। गावे शेना न्हाउ ॥
गरुड चढे बिष्णु जो आये । सांच भगत मेरे दोउ ॥

. . . संत कबीरदास आणि संत रोहिदास हे दोघेहि सत्पुरुष धन्य होत, असें सेना न्हावी म्हणतो, भगवान श्रीविष्णु आपल्या गरुडावर स्वार होऊन येतात आणि म्हणतात–हे दोघेहि माझे खरेखरे भक्त आहेत.–

संत कबीरदास आणि संत रोहिदास यांच्या आध्यात्मिक श्रेष्ठत्वाची ग्वाही देणारा हा संवाद कोणीं लिहिला ? या संवादांत 'शेना न्हाउ' असें जें कविनाम आलें आहे, तो कवि कोण ? –असे कांहीं प्रश्न उपस्थित होतात. रामानंदांच्या भक्तभारतींत ज्या संत सेनाचें नांव गौरवानें घेण्यांत येतें, त्याचेंच तर हें काव्य नव्हे ? आणि हा सेना न्हावी नामक महाराष्ट्रीय संतकविच तर नव्हे ? . . . या प्रश्नांची चर्चा आम्हीं अन्यत्र केली आहे.[२]

येथें इतकेंच सांगतां येईल कीं, प्रस्तुत संवाद महाराष्ट्रीय कवीनेंच रचलेला आहे, हें रचनेवरून स्पष्ट आहे. आणि यावरून संत कबीर आणि रोहिदास यांच्या तत्त्वज्ञानाचें रंजक स्वरूपांत दर्शन घडतें आणि या दोन महापुरुषांच्या थोर लोकप्रियतेची प्रचीति येते.

## कबीर-रोहिदास-संवाद

संगुन भगत करे रोहिदासा । बैस्नव आप कव्हावे ॥
माला टिलक मुद्रा छापे, कबिरा सुनके आवे ॥
सुन सुन साधुजी, राजाराम कहो जी ॥ १ ॥
पूजा जाकी कबिरा देखे । चाम ही चाम पसारा ॥
चाम कटोरा चाम कमलमो । बाल मुकुंदा बिहारा ॥
सुन सुन साधुजी, राजाराम कहो जी ॥ २ ॥

० ० ०

कबिरा मन पस्ताये गयो है । भक्त सुन रोहिदासा ॥
निर्विकार परब्रह्मफु । चामकू दीन्हो बासा ॥ पद ॥

२. प्रसाद, मार्च १९६८.

चामनहीं सो दिखावो कबिरा। चामको हाती चाम कोरा ।।
ऊपर चाम करे झकझोरा ।। १ ।।
चामको राजा चामको परजा। चामको लोक सकल बिहारा।।२।।
चामके साध चामके सिध । चामके भक्त चाम आधारा ।। ३ ।।
रोहिदासके प्रभु बाळ गोविंदा। सोही लै चाम लिये अवतारा ।।४।।

० ० ०

राम जनम आजुध्यामें सुनके। दुष्टन छाती फाटे ।।
कौशनके डर मारन हाटें। गोकुल च्यपहार पैटे ।। ३ ।।
भागा नही हरि सुन रे मूरख । याते मथुरा छोरे।।
बाल दशामो आग बन। केशाला तन मार पछयारे ।। ४ ।।
बालपनमो येक बानसो। ताटिका वे मारी ।।
याग रुसीके सिध कीने। रामकी गतमत न्यारी ।। ५ ।।
रंडीपर ज्याहां बान उठाया। बोलत लाज्य न आई।
बान बिना पूतना ज्यों चोसी। गोवर्धन उठि धाया ।। ६ ।।
रामही एक बानही येक । येक बंचेन येक सया ।।
दूर करो परदारा गमनी। छष्टा काहासे ल्याया ।।
भोग भोगके वोहो तो न्यारा । पूरन बाल ब्रह्मच्यारी ।।
घटघटा जैसा सुरजे बींबे। वैसा वो अविकारी ।। ७ ।।
मातपिता बंदीखानमो। पावज्ये जोर जिराई ।।
ज्या लंडी दूर आधे सेत। काहेकी कृष्ण बड़ाई ।। ८ ।।
दशेरथ पिता पतन पडे। तब सीता चोर चुराई ।।
सीता सीता रोये पुकारे। झ्यार खोर मिल ज्यावे ।। ९ ।।
तोसे साधक कहते । चेमरा केते काळ झोरे ।।
आतम ग्यान नही तुज्या। नेत्री गुन नादीमो बुरे ।। १० ।।
मा तुरकीन बाप जीलहाया । पुत भये ब्रह्मग्यानी ।।

बेदकी बात कछु नही माने। बात आपनी थाणे ।। ११ ।।
ब्रह्मपुरीसे ब्रह्मा आया । साकी बेद बुलाया ।।
साची भगत रोहिदास करतु है । कबीरा भक्त न पाया ।। १२ ।।
झूटा ब्रह्मा झूटा बेद । भगत कहा पछानी ।।
ज्या ब्रह्मा (××) आगे सेती । झूटी शाखन ज्यानो ।। १३ ।।
मुख कचेटे धुंडी जो आये । बोलत मधुरा बानी ।।
साच भगत रोहिदास करत है । कबीरा भक्त न जानी ।। १४ ।।
झूटा मुखक झूटा धुंडी । भगत काहा पछानी ।।
ज्या धुंडी तुही झूटा झूटी । शाख न ज्यानी ।। १५ ।।
सींव्ह चढे सीव्ह ब्यान अवाई । बोलत मधुरा बानी ।।
साध भगत रोहिदास करत है । कबीरा भक्त न ज्यानी ।। १६ ।।
आष्टम चौदस गले कटावे । घर घर खाती उले ।।
आचेडी दूर आधे सेती । झूटी भाखा बोले ।। १७ ।।
व्रशेभ चढे शे× ज्यो आये । बोलत मधुरा बानी ।।
साच्य भगतक रोहिदास करत है । कबिरा भक्त न ज्यानी ।।१८।।
शमशानीके ठाकुर भूतप्रेतके । भगत काहा पछचानी ।।
जेगद्गुरु सेंकरसे कहिये । झूटी बाका बोले ।। १९ ।।
धने कबीरा धन्य रहीदासा । गावे शेना न्हाउ ।।
धरुड चले बीष्णु जी आये । साच भगत मेरे दोउ ।। २० ।।

# श्री संत रोहिदास

## भाग तिसरा : परिशिष्टें

परिशिष्ट : १

जाति भी ओछी, करम भी ओछा, ओछा कसब हमारा।
नीचेसे प्रभु ऊँचा किये है, कह रविदास चमारा ॥

# रोहिदासाचा चर्मकार समाज

ज्या समाजामध्यें संत रोहिदासासारखा श्रेष्ठ सत्पुरुष जन्माला आला तो समाज हीन आहे, असें कसें म्हणतां येईल ? संत रोहिदासाची जाति हीन नाहीं. कोणत्याहि चर्मकाराची जाति हीन नाहीं. व्यवसायावर हीनत्व आणि श्रेष्ठत्व अवलंबून नाहीं. कोष्टयाच्या घरीं वाढलेला कबीर हीन नाहीं. सोनाराचा नरहरी कनिष्ठ नाहीं. कसायाघरचा सदन नीच नाही. न्हाव्या घरचा सेना सुद्धां निम्नवर्गीय नाहीं. अशीं शेकडों उदाहरणें देतां येतील. योगायोगानें एखाद्या जातींत किंवा समाजांत आपण जन्माला येत असतों. जन्माबरोबर कोणीच कांहीं घेऊन येत नाहीं. माणसासारखा माणूस. सर्वत्र सारखा. सर्व जमातींत एकसारखाच तो असतो--पुढें हळुहळू तो संस्कारानें, कर्तृत्वानें आचरणानें श्रेष्ठत्व किंवा हीनत्व प्राप्त करतो. रोहिदास व्यवसायानें चांभार असला तरी ज्ञान-संपन्न होता, म्हणून ब्राह्मण होय. त्याचे ठायीं साऱ्या चर्मकार समाजाचें भलें करण्याची तीव्र आकांक्षा होती, त्यासाठीं आयुष्यभर मनसा वाचा कर्मणा तो कांहींतरी करीत राहिला. ती त्याची, आपल्या समाजाच्या वाट चुकलेल्या जनांच्या अज्ञानाविरुद्धची लढाई पाहिली, म्हणजे तो आदर्श क्षत्रिय होता, असें म्हणावेंसें लागतें.

--ब्राह्मण काय, क्षत्रिय काय, वैश्य काय नि शूद्र काय--या साऱ्या योगायोगाच्या गोष्टी. ज्या काळीं असे वर्णभेद अस्तित्वांत आले, तेव्हां त्या समाजानें त्यांत सोय पाहिली होती. समाजाच्या सुखा-समाधानासाठीं ही कामाची वांटणी होती--पण पुढें या सोयीचा कांहीं जण गैरअर्थ लावूं लागले. आणि स्वतःचा स्वार्थ साधून समाजाची घडीच विसकटवूं लागले. हीं समाजाची दुर्दशा मध्ययुगांत कळसाला पोहोंचली. तेव्हां या अन्यायाविरुद्ध

सुजनांनीं चळवळ उभारली. विविध जातींतून विवेकशील माणसें एकत्र आलीं आणि समतेचें गीत गाऊं लागलीं. संत रोहिदास हा चर्मकारांचा प्रतिनिधि ! त्याच्या दिव्य वाणीनें आणि अलौकिक चरित्रचारित्र्यानें सारा समाज प्रभावित झाला. त्याची तळमळ समाजाला अन्यायापासून परावृत्त करणारी ठरली. आमचा समाज कबीरानें सावरला. रामानंदांनीं त्याला शहाणें केलें. सेना न्हाव्यानें त्याला विवेकाची संवय लावली. नरहरी सोनारानें त्याला समजुतीचे हलके हलके घाव घालून जागे केले--यांतून सारा समाज आंदोळून निघाला. साऱ्या जातीजमाती जागृत झाल्या. अन्याय्य रूढींचा बीमोड होऊं लागला. चर्मकारांचा समाज जागा झाला. सोनार मंडळी जागी झाली. न्हावी जागे झाले. माळी जागे झाले. सारे जागे झाले. खोटें भय संपलें. अर्थशून्य बंधनें मोडलीं गेलीं. अन्याय्य रीतिरिवाज नष्ट झाले-- संतांनीं ही न्यायाची, योग्य प्रतिष्ठेची जाणीव करून दिली. संत रोहिदासानें चर्मकारांच्या सुस्थितीस हातभार लावला. त्याच्या जातिबंधूंचा आत्मसंमान जागा झाला. आत्मविश्वास दुणावला. त्यांना अगदीं आपल्यांतील एक चांगला आदर्श लाभला. चर्मकार धन्य झाले. त्यांचे जीवनमार्ग अधिक उजळून निघाले. या भाग्यवान् जमातीची सर्वांगीण ओळख आपण या प्रकरणांत करून घेणार आहोंत.

चर्मकार शब्द, त्याचा आणि या व्यवसायाचा मायबोलीवर झालेला गमतीजमतीचा परिणाम पहायचा आहे. चर्मकार बंधूंच्या रीतिरिवाजांची, आवडीनिवडींची जाणीव करून घ्यायची आहे. त्यांच्या उदयाच्या, आणि गतिप्रगतीच्या दिशांचें अवलोकन करायचें आहे. ज्या थोर संतमहात्म्याची पुण्याई या समाजानें आपलीशी केली आहे. त्या महात्म्याच्या चरित्राबरोबर हा विचार क्रमप्राप्तच ठरतो. आणि शिवाय, महाराष्ट्राच्या संदर्भात या गोष्टीचें अगदीं विशेष असें महत्त्व आहे.

## महाराष्ट्राचें महद्‌भाग्य

वास्तविक रैदास हा हिंदी भाषिक चांभार काशी नगरींत वास्तव्य करणारा, त्याचें सारें कार्यक्षेत्र हिंदी प्रदेशांत, त्याची सारी वाणी हिंदी भाषेंत आहे. . . महाराष्ट्रापासून दूर, खप दूर उत्तरेंत घडलेली, सुमारें

चारशें वर्षांपेक्षांहि अधिकच काळापूर्वींची ही सारी कहाणी, आपणांस अगदीं अपरिचित आणि अनाकलनीय वाटावी अशी, पण वस्तुस्थिति अशी नाहीं. आमचे मराठी चांभार बांधव संत रैदासाला रोहिदास–आपला रोहिदास म्हणून ओळखतात. त्याची पूजा करतात. त्याच्या भजनगायनांत दंग होऊन जातात. त्याच्यापासून प्रेरणा घेतात. त्याच्या महान् जीवनाचें मनन करून त्यापासून बोधग्रहण करतात.

- - - ही किमया काय आहे ? हें सारें घडलें कसें ? अन् आजहि वस्तु-स्थिति स्पष्ट असतांना घडतें कसें ? - - याचें उत्तर काय द्यावें ? - - -याचें उत्तर संतजनांच्या सफल जीवनयज्ञाचें संचित. ही सारी त्यांच्या धन्य जीवनाची पुण्याई.

- - - रोहिदासाची पुण्याई ज्या समाजाला लाभली, त्याचा थोडाबहुत परिचय करून घेऊं या.

## चांभार शब्द

प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांनीं आपल्या व्युत्पत्तिकोशामध्यें ‘चांभार’ शब्दाची व्युत्पत्ति अशी दिली आहे[१]–

चांभार–पुं. जोडे शिवणारा, कातडें कमविणारा.

A Cobbler or Shoe–Maker

[ संस्कृत चर्मकार; पाली चम्मकारो; प्राकृत चम्मारअ; बंगाली चांमार; ओरिया चमारा; बिहारी हिंदी चमार; सिंधी चमारु; नेपाळी चमार्; सिंहली सोम्मारू; पंजाबी चमार, चमिआर; याकाम. चाम्हारू ( ली. च. १–१२ ), चामाडी ( ली. च, १–५५ ); अकामसा. चांभारचौकशी. या नोंदींवरून चांभार हा शब्द वेगवेगळ्या भाषेंत कसा थोडाफार फरकानें सारखाच आहे तें कळून येतें. हा शब्द मुळांत संस्कृत भाषेंतील चर्मकार या शब्दावरून आलेला आहे.

---

१ मराठी व्युत्पत्तिकोश–प्रा. कृ. पां. कुलकर्णी, पृष्ठ ३००. द्वितीयावृत्ति १९६४.

## चर्मकाराची उत्पत्ति

चर्मकार ज्ञातीचा प्रादुर्भाव हा त्याच्या विशिष्ट व्यवसायामुळेंच झाला. प्राचीन काळांत व्यवसायानुरूप जाति निश्चित होत असे, म्हणून या ज्ञातीचें वेगळेपण कायम राहिलें, हें आपण पाहिलेंच. पण ही ज्ञाति नेमकी केव्हां-पासून आमच्या समाजांत आहे, याचीहि माहिती करून घेणें उद्बोधक ठरेल.

वेद-काळापासून भारतीयांस चामडयाचा व्यवसाय ठाऊक आहे, असें विद्वानांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. ऋग्वेद हा सर्व वेद-ग्रंथांत प्राचीन. यांत चामडयापासून वस्तू बनविण्यासंबंधींची चर्चा आली आहे. 'चर्मना' अर्थात् चामडें ताणून तें भिजवावें आणि त्यापासून व्याघ्रचर्म ( वाघाच्या कातडयाचें आसन) आदि तयार करावें. यासारखे हे उल्लेख आहेत. ऋग्वेदांत पखालीची नोंदहि आहे. बैलाच्या चामडयापासून धनुष्याची दोरी, लगाम इत्यादि वस्तू बनवीत असत. [२] 'मृगाजिन्' अर्थात् हरिणाच्या कातडयाचें बस्कर–हेंहि आमच्या देशांत वैदिक काळापासून ज्ञात आहे. अथर्ववेदामध्यें 'चर्म,' 'चर्मन,' आदि शब्द येतात. आणि सोमरस तयार करण्याच्या संदर्भांत या शब्दांचा मोठा वापर केलेला आढळतो. सोम गाळतेवेळीं ज्या फलकावर ठेवून तो दगडानें दाबीत, त्या फलकावर बैलाचें चामडें अंथरीत असत. पाणिनीच्या 'अष्टाध्यायी' ग्रंथांतहि चामडयाच्या वस्तूंचा उल्लेख आहे. पुढें ब्राह्मण ग्रंथांतून तर हा शब्द सरीस मिळतो. आणि महाभारतकालांत चामडयाच्या वस्तूंना फार मोठें महत्त्व प्राप्त झालें. युद्धकालामध्यें चामडयाच्या अनेकविध वस्तू आवश्यक होऊन बसत. महाभारतांतील युद्ध-वर्णनें चामडयाच्या ढाली, कवचें, पट्टे इत्यादींनीं भरलेलीं आहेत. या वर्णनांत 'चर्मकार' या व्यावसायिक शब्दाचा स्पष्ट उल्लेख मिळतो येथें 'चर्मकार' बरोबरच 'चर्मकृत्', 'पादुकृत्', आणि 'पादुकार' असे शब्द आढळतात. 'सर्वांत मोठा विचार करण्यासारखी गोष्ट आहे ती – चर्माच्या वस्त्रांची ही कला आम्ही फार पुरातन काळा-पासून जाणतों. चामडयाचीं वस्त्रें आमच्या पूर्वजांनीं परिधान केलीं. ही सारी

---

२. भारतीय संस्कृति कोश खंड ३।३४५

माहिती चर्मकार ज्ञातीचा एक थोर विदेशी अभ्यासक ब्रिग्ज् यानें आपल्या विद्वत्ताप्रचुर ग्रंथांत दिली आहे. या विद्वान् संशोधकानें भारतांतील चांभार समाजाचें सूक्ष्म अवलोकन करून त्यांच्या उत्पत्तीची, विकासाची आणि व्यवसायाची भरपूर माहिती एकत्र केली. आणि इंग्लिश भाषेमध्यें आपला ग्रंथ 'दि चमार्स' या भारतीय नांवानेंच प्रसिद्ध केला आहे.[३] ब्रिग्ज साहेबानें आपल्या ग्रंथांत संत रोहिदासाचा गौरवानें उल्लेख केला आहे, तो आपण पुढें पाहणारच आहोंत.

—— महाभारतकाळांतहि चर्मकारांचा स्पष्ट उल्लेख सांपडतो. पुढें बुद्ध-प्रभावित युगामध्येंहि या व्यावसायिकांचे स्पष्ट निर्देश मिळतात. हिंदी विश्वकोशामध्यें 'पाराशर महति' या बौद्ध ग्रंथाची माहिती आहे. या माहितीवरून असें दिसतें कीं, बौद्ध युगांत चार वर्णांखेरीज दोन प्रकारच्या कनिष्ठ व्यवसायांचें स्पष्ट अस्तित्व होतें. पक्षी पकडणारे, गाड्या चालविणारे आणि गाड्या बनविणारे यांचा स्वतंत्र वर्ग या 'महति' ग्रंथांत दिला आहे.[४] आणि दुसऱ्या अशाच एका स्वतंत्र वर्गांत कुंभार, न्हावी, कोष्टी आणि चांभार इत्यादि नित्य उपयोगाच्या वस्तू बनवून अखिल समाजाची सेवा करणारा वर्ग आहे. याच ग्रंथामध्यें (चर्मकारांची उत्पत्ति 'चण्डाली' म्हणजे ब्राह्मण स्त्री आणि शूद्र पुरुष यांच्या योगानें झाली असें म्हटलें आहे. अशा प्रकारच्या बऱ्याच कथा प्रचलित आहेत. त्यांपैकीं कांहींचा आढावा घेऊं या.)

## कल्पनेच्या गोष्टी

(चँवर वंशीय क्षत्रियांपासून चर्मकारांची उत्पत्ति झाली असावी असेंहि मानण्यांत येतें. यास महाभारतांतील आधार देण्यांत येतो.) अनुशासन पर्वामध्यें मेकल, लाट, पौंड्रिक, कोन्वशिर, दर्व, शर्वर इत्यादि अनेक जातींप्रमाणें चँवरांचा उल्लेख आहे. ब्रह्मज्ञानाच्या अभावीं या जातीची अवनति झाली, असें म्हटलें आहे.

---

३. दि चमार्स् – जी. डब्ल्यू ब्रिग्ज्. असोसिएशन प्रेस, कलकत्ता आणि ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९२०

४. हिंदी विश्वकोश, खंड ४.

एक कथा गमतीची आहे. एका गांवांत. चार भाऊ राहात होते एकदां घरचें वासरू मेलें. आतां त्याला उचलून कोणी न्यावें, असा प्रश्न पडला. शेवटीं धाकटा भाऊ म्हणाला, बाबांनो, भांडू नका. मी उचलून नेतों. त्यांत काय मोठेंसें आहे ?–धाकटा भाऊ वासरू नेऊन पुरून आला. मग गांवांतील सारे जण असलीं कामें त्याला सांगूं लागले. मोठे तीन भाऊ आनंदानें त्याचा सांभाळ करूं लागले. सारें सुरळीस सुरू झालें. पुढें एकदां कोणाची तरी म्हैस मेली. आतां ही म्हैस एकटयानें उचलायची कशी ?–छोटया भावाचे फार हाल झाले. समाज त्याची अवहेलना करूं लागला. त्यानें शंकर महादेवाला गाऱ्हाणें घातलें. तो दयार्द्र अंतःकरणाचा देव द्रवला. कचरापेटींतून एक शक्तिशाली पुरुष पुढें आला ! म्हणून हा मदतनीस ईश्वर कुरील ! 'कुरीला 'चा वंश तो चर्मकार, अशी ही कहाणी.

आजहि कुरील ही चांभारांची एक उपजाति आहे. कथेंतील तीन भाऊ म्हणजे समाजाचे तीन वर्ण, असेंहि म्हणतात. तात्पर्य, एवढेंच कीं, कातडयाचा उद्योग करण्यासाठीं समाजाचा एक घटक पुढें आला––तो व्यवसायांतून एका जातीच्या रूपानें नांदत राहिला.

एका राजाघरची कहाणी सांगतात. त्याला होत्या दोन मुली. त्यांचीं नांवेंहि गंमतीचीं––मोठी ती चामू, धाकटीचें नांव गामू. दोघींना एक एक पुत्ररत्न होतें. एकदां राजाचा हत्ती मेला. हा हत्ती राजाचा जीव कीं प्राण होता. राजाला वाटलें, हा हत्ती जसाच्या तसा उचलून त्याचा दफनविधि करावा. पण हें कसें शक्य होतें ? भले भले पुढें आले पण कुणाच्यानें हें जमेना. चामूच्या मुलानें हें आव्हान स्वीकारलें आणि आपल्या आजोबांची इच्छा पूर्ण केली- पुढें परिणाम असा झाला कीं, चामूच्या मुलाच्या वांटयाला हें काम कायमचेंच आलें- आणि त्याला जातिबहिष्कृत करण्यांत आलें. या चामू पुत्राच्या वंशजांना चांभार म्हणूं लागले.

## कथांचें मर्म

या सर्व कथांत पूर्ण सत्य आहे असें नाहीं. या कथांतून तत्कालीन समाजाची धारणा स्पष्ट होते इतकेंच. समाजांतील स्वार्थी आणि सुखवस्तु लोक आपापल्या सोयीनुसार अशा कथांना जन्म देतात आणि अज्ञ जनांच्या

अंधविश्वासाच्या मदतीनें आपला डाव साधून घेंत असतात. ही साऱ्याच समाजांची सदैव आढळून आलेली प्रवृत्ति आहे. आमच्याकडेंच हें पूर्वीं घडलें असें नव्हे. आजहि समाजांतील सुखवस्तु आणि तथाकथित प्रतिष्ठित माणसें आपला स्वार्थ दामटण्यासाठीं अडाणी आणि दुर्दैवी जीवांची हरघडीं फसवणूक करीत असतात. असो. या साऱ्या चर्चेचा निष्कर्ष असा नव्हे कीं, हें सारें चांगलें आहे. तात्पर्य इतकेंच कीं, या साऱ्या समाजप्रवाहाच्या भल्या-बुऱ्या गोष्टी–त्यांना फार महत्त्व देऊं नये. विवेकाचा आणि योग्य ज्ञानाचा जेवढा प्रसार होतो, तेवढी समाजाची दुरवस्था दूर होत राहते. आज सुशिक्षणाच्या गंगेबरोबर या साऱ्या जुन्यापुराण्या गोष्टींची व्यर्थता सिद्ध होत आहे. आज फक्त इतकेंच ध्यानीं घ्यायचें कीं, कर्तृत्वानें माणूस व्यवसायांत उन्नति करूं शकतो. कोणताहि व्यवसाय मुळांत अप्रतिष्ठित नाहीं. माणसाच्या अंगच्या बहुविध गुणांनीं तो त्या व्यवसायांत प्रतिष्ठा प्राप्त करतो. आणि कोणत्याहि व्यवसायांत प्रगति करण्याचा अधिकार, समाजाच्या सर्व अंगास समानपणें उपलब्ध आहे. . . संत रोहिदासानें प्रतिष्ठेची सुयोग्य जाणीव साऱ्या समाजाला करून दिली. माणूस हा जन्मत: समान आहे आणि आपल्या उज्ज्वल चारित्र्यानें तो समाजांत संतत्व पावतो– मग तो ब्राह्मण असो, महार असो, न्हावी असो, सोनार असो, कीं चांभार असो.

## चर्मांचा उद्योग करणारा तो चर्मकार

परंपरेनें चामड्याचाच व्यवसाय चांभार लोक करीत आले आहेत. गाई, बैल, म्हशी इत्यादि जनावरांचीं कातडीं कमावणें आणि मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावणें हें काम चांभार करूं लागले. म्हणजे चर्माचा उद्योग करूं लागले, म्हणून हे चर्मकार. पुढें चामडें नीटनेटकें करणें, त्यापासून पादत्राणें, आदि विविध स्वरूपाच्या वस्तू तयार करणें हेंहि या जमातीचें कार्य होऊन बसलें. चामड्याच्या वस्तू बनविण्याची एक मोठी कलाच आमच्या देशांत विकास पावली. भारतांत या व्यवसायास नितांत महत्त्वाचें स्थान आहे. आज या क्षेत्रांत प्रचंड प्रमाणावर यांत्रिकीकरण सुरू झाले आहे. पण तरीहि परंपरेनें चालत आलेल्या चर्मकारीच्या 'हस्तव्यवसायाचें' महत्त्व कमी झालेलें नाहीं. भारतांतील या उद्योगाची आजची स्थिति मोठी उद्‌बोधक आहे.

## उज्ज्वल भविष्य

जगांतील कातडी कमाविण्याच्या धंद्याच्या १९५५ च्या अहवालावरून या धंद्यांत भारताचा दुसरा क्रमांक आहे. [५]

१९५० च्या सुमारास कातड्याच्या धंद्यांतील जगाचें आणि भारताचें चित्र असें आहे–

| प्राणिहत्येची एकूण जगांतील संख्या | भारतांतील संख्या |
|---|---|
| १०८,०००,००० | २०,०००,००० (गुरेंढोरें) |
| | + ३६,०००,००० (शेळ्यामेंढ्या) [६] |

## चामडेंहि पवित्र

चामडें म्हणजे विटाळाची वस्तू, असें आम्ही मानतों.––हें म्हणणें जरा चुकीचेंच होईल. आम्ही जर चामड्याला अपवित्र मानीत होतों तर आमच्या थोर पूर्वजांनीं चामड्याचीं वस्त्रप्रावरणें परिधान केलीं कशीं ? ––आणि आपल्या अद्भुत प्रज्ञेनें साऱ्या जगाला दिपवून टाकणारे ऋषिमुनि – त्यांचें आसनच मुळीं 'व्याघ्रचर्म' असे, मृगचर्मासहि पावनत्व लाभलें आहे. जपतपासाठीं या दोन्हीं आसनांचा आम्ही उपयोग करीत आलों. ओलें गज-चर्म तर स्वत: शंभु महादेव पांघरतो. असा समज आहे. फार प्राचीन काला-पासून मुंजीच्या वेळीं बटूस मृगचर्म पांघरावयास देण्याची चाल आहे. आज परिस्थिति बदलली. मृगचर्म पाहायला देखील मिळणें दुरापास्त होऊं लागलें आहे. म्हणून हल्लीं मुंजीच्या वेळीं मुंजा मुलाला मृगचर्माच्या ऐवजीं मृग-चर्माचा तुकडा जानव्याबरोबर बांधीत असतात.

चामड्याच्या व्यवसायास अप्रतिष्ठा जर लाभलीच असेल, तर ती मध्यकाळांत लाभली असेल. प्राचीन काळीं हा व्यवसाय प्रतिष्ठेचाच असला पाहिजे, असें या चर्माच्या सार्वजनीन उपयोगावरून आणि उल्लेखांवरून निश्चितपणें वाटतें.

---

५. हिंदी विश्वकोश, खंड ४।१५९

६. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका, १९६४, खंड १३।८४७

संत रोहिदासानें आपल्या एका पदांत चर्माची ही सार्वननीनता फार छान शब्दांत मांडली आहे–

ज्यांहा देखो वांहा चामही चाम।
चामके मंदिर बोलत राम ।। १ ।। इत्यादि

(पदक्रमांक ८, पृष्ठ १२२.)

## चर्मकारांची जनसंख्या

अस्पृश्य म्हणून आजवर ज्यांवर अन्याय झाला, त्यांत चांभारांची संख्या अधिक आहे, हें खेदानें म्हणावें लागतें. डॉ. केतकर यांनीं १९०१ च्या शिरगणतीप्रमाणें भारतांतील चर्मकारांची संख्या दिली आहे ती अशी–

| | |
|---|---|
| हिंदू चांभार ११,०४३,०९३ | मोची ५३१९२५ |
| मुसलमान चांभार १६९९२ | मोची ४७६४४० |
| शीख चांभार ७६२६३ | मोची ५४ |
| जैन चांभार ५७ | मोची २३९ |
| बौद्ध चांभार १९ | मोची ... [७] |

त्या वेळीं हिंदुस्थांनांतील (पाकिस्तानसह) एकंदर चांभारांची संख्या १ कोटी १५ लक्ष होती. यांपैकीं ६० लक्ष संयुक्त प्रांतांत आणि मुंबई इलाख्यांत केवळ ३ लक्ष होती.

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनीं आपल्या ग्रंथांत चर्मकारांची एकूण लोकसंख्या १,११,३७, ३६२ इतकी दिलेली आहे. [८]

## जातीजमाती आणि भाविकाल

चर्मकारांत असंख्य जाती-उपजाती आहेत. यांपैकीं जटिया, जैस्वार, धारिया, चौधरिया, बुंदेला, चामर, दोहर, कुरिल, पूर्बिया, कोरी किंवा कोली, अहिरबार, धुसिया किंवा झुसिया इत्यादि कांहीं प्रमुख आहेत.

---

७. महाराष्ट्रीय ज्ञानकोश–डॉ. श्री. व्यं केतकर १३।५४

८. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न––वि. रा. शिंदे. नवभारत ग्रंथमाला, नागपूर.––पृष्ठ ५६१

अहिरवाराच्या कन्येला जोड्यावर कलाबतूचें काम करतां आल्याखेरीज तिचा विवाह होत नाहीं. जैस्वार हे मोतद्दाराचा व्यवसाय करतात. छत्तीसगडच्या आसमंतांतील चांभार अत्यंत प्रगत आहेत. त्यांनीं स्वतःस सुस्थिति प्राप्त करून घेतली आहे. मध्यप्रदेशांतील सतनामी चांभार चामड्यास स्पर्शहि करीत नाहींत. ते शेतीभातीचीं कामें करतात.

या समाजाची साऱ्या भारतभर असलेली वस्ती, यांतील विविध धर्मांचे (हिंदु, मुसलमान, शीख, जैन, बौद्ध) लोक आणि यांच्या व्यवसायास आज लाभलेली प्रतिष्ठा यावरून. समाजाचें भविष्य चांगलें आहे, असें खात्रीनें दिसतें. शिक्षण जितकें वाढेल तितका भारतांतील एक सधन आणि पुढारलेला समाज म्हणून याला महत्त्व लाभेल.

## विवाहादि रूढी

चांभारांची अधिक वस्ती उत्तर हिंदुस्थान आणि बिहारमध्यें आहे, हें डॉ. केतकरांचें म्हणणें खरें आहे, पण बंगाल, पंजाब, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्रांतहि चर्मकारांची संख्या आज मोठ्या प्रमाणांत आहे. दक्षिण भारतांत मद्रासेकडे हा समाज मोठा आहे. या भागांत यांना 'चमूर' म्हणतात. या लोकांत वैवाहिक संबंध जरा शिथिल स्वरूपांत आहेत. एकूण चर्मकार समाजांतच बालविवाहाची पद्धति रूढ दिसते. पोटजातींत विवाह होतात. सगोत्र विवाह मात्र होत नाहींत. कन्याशुल्क म्हणून मुलीच्या बापाचा सन्मान करतात. यावरून या समाजांत स्त्रीविषयीं मुळामध्यें आदर आहे, हें स्पष्ट होऊं शकेल. बहुविवाहाची पद्धति आतां मागें पडत चालली आहे. चर्मकारांत विधवाविवाहाचें प्रचलन दिसून येतें.[१] फार पूर्वीपासून या बाबतींत हा समाज प्रगतिशील आहे. पतीच्या दुर्दैवी मृत्यूनंतर स्त्रीचें जीवन तिला पुनश्च सुखी करतां यावें, हा सुजाण समाजाचा नवविचार या तथाकथित मागासलेल्या जमातीनें फार पूर्वींच मान्य करावा, ही विशेष कौतुकाची गोष्ट आहे. पण याबरोबरच चारित्रिक दुराचाराचा उल्लेख येतो. बहुविवाह, विवाहोत्तर प्रेम, वाममार्गानें संतती अशासारख्या दुःखद रूढी या समाजांत नांदत होत्या. पण हळुहळू या दुःस्थितीवर समाजानें विजय मिळविला आहे, आजचा चर्मकार समाज आपल्या अन्याय्य आणि निंद्य रूढींपासून परावृत्त होतो आहे.

---

१, हिंदी विश्व कोश, खंड ४।१६३

## कांहीं अंध विश्वास

आपल्या देशांत सर्वच अशिक्षित वर्गांत अंधविश्वास आढळून येतात. आजहि खेड्यापाड्यांतून लोक भूत, प्रेत, चेटूक, जादूटोणा इत्यादींवर फार विश्वास ठेवतांना आढळतात. वास्तविक विज्ञानाची जसजशी प्रगति होते, तसतशी आमची भोळीभाबडी समजूत, वेडेबावळे विश्वास कमी होतात,—पण अन्य मागासवर्गांप्रमाणेंच आजहि चर्मकारांत भूत-प्रेत, जादूटोणा इत्यादींवर विश्वास दिसून येतो. बळीची प्रथा अजूनहि रूढ आहे. [१०] याचें कारण केवळ अशिक्षण हेंच होय. जसजसा शिक्षणाचा प्रसार होत जाईल, तसतशी ही दुर्दैवी स्थिति नष्ट होईल.

## देव-धर्म

चर्मकार केवळ वेताळ, चुडेल, गयाल, मसान इत्यादि भूत-पूजाच करतात, असें नाहीं. कांहीं चांभार मरी, शितळा, मसनी, आग्वानी या रोगनाशक देवींचीहि उपासना करतात. चोरदेव, जिलैया, मरेली, जवळीदेवी, भूमिया, भैरव, गणपति, भवानी, हनुमान इत्यादि देवतांचीहि ते पूजा करतात. गांवाच्या सीमेवर या चर्मकार-दैवतांचीं छोटीं छोटीं मंदिरें दिसून येतात.

संत रोहिदासाप्रमाणेंच हेमराज, नटबावा, पांचपीर, काळूवीर, गोरखनाथ, गूगा पीर, हर्दौल या पुरुषांनाहि या समाजांत पूज्यत्व लाभलें आहे. या महात्म्यांचीं समाधिस्थानें आज तीर्थक्षेत्रें बनलीं आहेत.

रोहिदासपंथीयांप्रमाणेंच कबीर पंथी, नानक पंथी, सतनामी पंथी असेहि पंथभेद आले. पंजाबांत भाविक चांभारांना ‘ रामदास ’ असेंहि नांव मिळालें आहे.

## सण, उत्सव आदि

अन्य भारतीयांप्रमाणेंच चर्मकारहि उत्सवप्रिय आहेत. नागपंचमी, दिवाळी, होळी इत्यादि सण ते साजरे करतात. नागपंचमी विशेष उत्साहानें साजरी करतात. होळीच्या दिवशीं स्वैर वागण्याची चाल आहे.

दिवाळीच्या दिवशीं जुने दिवे टाकून द्यायचे आणि मृतात्मे घरीं येतात. या कल्पनेनें जागरण करायचें, अशी एक रूढी दिसून येते.

गोवर्धन दिवाळी असा एक सण या समाजाचे लोक करीत असतात. या दिवशीं गोमयाची कृष्णप्रतिमा करून तिच्याभोंवतीं गोमयाचेच छोटे ढीग पर्वत म्हणून उभे करतात. पर्वतावर झाडें म्हणून कापूस लावलेल्या

१०. हिंदी विश्वकोश, खंड ४।१६३

गवताच्या काडया रोवतात. गुरें, गुराखी यांच्या शेणाच्या आकृत्या करतात. या दिवशीं गोपाळांना बोलावून त्यांना जेवण घालतात.

## एक अनुकरणीय प्रथा

चर्मकारांच्या 'पंचायती' गांवोगांव आढळून येतात. महाराष्ट्रांतून अशा पंचायतींचें कार्य चांगल्या रीतीनें सुरू आहे. सामाजिक आणि धार्मिक कार्ये करण्याच्या उद्देशानें या पंचायती निर्माण होतात.

चांभारांच्या या पंचायतींचा त्यांच्या समाजावर चांगला वचक असतो. पंचायत-प्रमुखाला चौधरी, सरपंच, प्रधान, इत्यादि नावें असतात. तहहयात अथवा वंशपरंपरेनें हीं पदें चालत येतात. जेंव्हां नव्यानें एखादा सरपंच होतो तेव्हां त्यास पगडी घालण्याचा एक समारंभ करतात. या वेळीं होम करून जेवणावळ घालतात.

जातींतील भांडणांचे आणि चोरी, व्यभिचार, जातनियम मोडणें आदि गुन्ह्यांचे निवाडे पंचायतीमार्फत होतात.

## महाराष्ट्रांतील चर्मकार

चांभारांचा मूळ प्रांत बिहार व संयुक्त प्रांत आहे, असें ज्ञानकोशकार डॉ. केतकर म्हणतात. [११] कातडी कमाविण्यापेक्षां कातड्याच्या वस्तु तयार करणारे मोची स्वत:ला उच्चकुलीन समजतात. अशीहि माहिती डॉ. केतकरांनीं दिली आहे. गुजरातेंत मोची लोक धनिक आहेत आणि सुशिक्षितहि आहेत. त्यामुळें त्यांना अस्पृश्य मानण्यांत येत नाहीं. [१२] आपल्याकडे मात्र दुर्दैवानें असें नाहीं.

महाराष्ट्रांतील चांभारांविषयीं डॉ. केतकर लिहितात, "नाशिक जिल्ह्यांत दक्षिणी चांभारांचा भरणा आहे. यांचा धर्मगुरु निफाड तालुक्यांतील सकेना येथील 'भगतबाबा' हा आहे. भगतबावाचा गुरूपदेश घेण्यापूर्वी चोरी, चहाडी व छिनालकी न करणें हे तीन नियम आचरण्याबद्दल कबुली द्यावी लागते. मालेगांव, नांदगांव, चांदूर वगैरे ठिकाणीं दरसाल भगतबावाची फेरी असते. अहिर्वाल, जातवा, ढोर व कताई अशा चार परदेशी चांभारांच्या पोटजाती या जिल्ह्यांत आढळतात. यांचे सर्व धर्मविधि इतर चांभारांप्रमाणें असतात. लग्नप्रसंगीं अंत:पाट धरण्याची चाल नाहीं. त्याऐवजीं नवरानवरीला एका स्तंभाभोंवतीं सात प्रदक्षिणा घालाव्या लागतात. यांत व्याही-भोजन नाहीं व कार्य आटोपेपर्यंत मांसभक्षण वर्ज्य करण्याची चाल यांच्यामध्यें आहे. ह भवानीचे उपासक आहेत."

---

११. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खंड १३।५४.
१२. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न–वि. रा. शिंदे, पृष्ठ १३२

"महाराष्ट्रांत चांभारांची उत्पत्ति धीवर बाप व चांडाळ आईपासून झाल्याबद्दल कथा सांगतात. पण चांभारांचा बांधा, चेहऱ्याचा सुबकपणा पुष्कळ जागीं आढळतो. मुंबई इलाख्यांतील कानडी जिल्ह्यांत तर चांभार बायका फार सुंदर असून पद्मिनी जातीच्या नायिका यांच्यांतच सांपडतात. छत्तीसगडांत सुद्धां चांभार लोक उंच बांध्याचे, साधारण गोऱ्या रंगाचे असून ब्राह्मणांपेक्षां जास्त सुंदर दिसतात. यांच्या शरीराचा सुदृढपणा व सुंदर बांधा त्यांच्यांतील प्रोढविवाह व मांसाशनामुळें असावा, असें रसेल म्हणतो." [१३]

## चर्मकार आणि मराठी

आपली मराठी भाषा समृद्ध आहे. भारतीय भाषांत आपल्या साहित्यिक संपन्नतेमुळें आणि अद्ययावत्पणामुळें मराठीला मानाचें स्थान लाभलें आहे.

मराठीच्या महानतेंत चर्मकारबंधूंनीहि कळत नकळत भर टाकलेली आहे. या समाजाच्या संवयी, चालीरीती आणि स्वभाववैशिट्यांमुळें अनेक रंजक शब्द मराठींत मिसळले आहेत. त्यांपैकीं कांहीं शब्दांचा परिचय करून देणें वाचकांस आवडेल. अशा प्रकारच्या अभ्यासांतून समाजाचें सुंदर दिग्दर्शन घडत असतें. आणि क्वचित् जर कांहीं किल्मिष निर्माण झालें असेल, तर तें दूरहि व्हावयास मदत होतें. भाषेंत एखाद्या व्यवसायांतील शब्द रूढ होत असतांना त्यामागें त्या व्यवसायाची अप्रतिष्ठा करण्याचा हेतु असत नाहीं. तसा प्रयत्न कोणीच जाणून बुजून करीत नाहीं. अगदीं करायचा म्हटलें तरी असला प्रयत्न करतां येत नाहीं. कारण भाषा एखाद्या नित्य प्रवाहशील सरितेप्रमाणें असते. तिचा ओघ अखंड वाहत असतो. त्यांत अनेक गोष्टी सहज सामावून जात असतात. असेच कांहीं शब्द, लोकप्रचार अथवा म्हणी-वाक्प्रचार आमच्या चर्मकार समाजापासूनहि मराठीनें घेतले आहेत. त्यामागें या समाजाची अवहेलना करण्याची वृत्ति नाहीं. कांहीं उहाहरणांचा विस्तृत परामर्श घेऊं या.

**चांभारचौकशी किंवा चांभारचतुराई**—चांभाराचा व्यवसाय पादत्राणांशीं संबंधित असल्यानें त्याची स्वाभाविकच जाणाऱ्यायेणाऱ्यांच्या पादत्राणांकडे नजर असते, अशी समजूत. या समाजांतूनच वरील वाक्प्रचार प्रसृत झाला आणि सूक्ष्म दृष्टीनें केलेली परीक्षा, अत्यंत कांटेकोर व्यवहार किंवा घासाघीस अशा अर्थानें 'चांभारचतुराई'चा वापर होऊं लागला. भुरळ पाडणारें भाषण अशा अर्थानेंहि हा शब्द प्रयुक्त होतो. अकारण चौकशा किंवा नसती उठाठेव अशा अर्थानेंहि 'चांभारचौकशी'चा प्रयोग करतात.

---

१३. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खण्ड १३।५४-५५

प्रा. श्री. म. माटे यांनीं मराठी भाषेंत प्रविष्ट झालेल्या अनेक 'धंदेसूचक' शब्दांचा विचार करून आपल्या एका लेखांत तो मांडला आहे.[१४] प्रा. माटे यांच्याच सुंदर शैलींत हा विचार वाचायला हवा. चांभारकामाशींच संबंधित एक शब्द **इंगा फिरविणें**. कातडें मूळचें खडबडीत असतें. चांभाराला आपल्या कामासाठीं तें मऊ करून घ्यावें लागतें. त्यासाठीं तो कातडें पायाच्या दाबांत धरून एका हातानें लोखंडाचा इंगा त्यावरून फिरवितो. या प्रकारें दबाव देऊन घासल्यामुळें कातडें अगदीं ढिलें पडतें. हा अनुभव जमेस धरून आपण म्हणतों, "मोठे खाडखाड बोलत आहेत, पण एकदां साहेबापुढल्या नोकरीचा इंगा फिरला म्हणजे नरम येतील."

**चांभाराच्या देवाला खेटराची पूजा** अशी एक म्हण आहे. ज्याचा जो व्यवसाय असतो, त्याच मालाची भेट तो परमेश्वरासहि अर्पण करणार, असा या म्हणीमागील आशय आहे. चर्मकारीचा उद्योग करणारा माणूस देवास काय देणार, तर त्यानें स्वत: कष्ट करून तयार केलेले जोडे तो देणार, म्हणूनच तो देवाची खेटरानें पूजा करणार. वास्तविक जशास तसें हा अर्थ येथें अभिप्रेत आहे. आणि हा तर व्यवहाराचा फार महत्त्वाचा नियम होय.

'**चांभाराचा जोडा फाटका**' असाहि एक वाक्प्रचार आहे. साऱ्या जगाच्या चरणांची चिंता वाहणारा चर्मकार स्वत: मात्र दीन असतो, गरीब असतो. तो सर्वजनांस सुरेख जोडे बनवून देतो, त्यासाठीं अपार कावाडकष्ट उपसतो. परंतु त्याला मात्र स्वत:कडे लक्ष देण्यास सवड होत नाहीं. आणि सवड झाली तर आर्थिक अडचणीनें स्वत:साठीं पादत्राणें बनवणें शक्य होत नाहीं. म्हणून त्याचा जोडा शेवटीं फाटकाच राहतो, देवाघरीं देवाला जागा नाहीं अशी ही दीनता. चर्मकारांच्या आर्थिक आणि सामाजिक दास्याचा विचार समोर ठेवून वरील म्हण रूढ झाली आहे. या म्हणीमागें एक करुण सत्य दडलेलें आहे. इंग्रजी भाषेंतहि अशाच प्रकारची एक म्हण प्रचलित आहे.

'**चांभारचाळवणी**' या मराठी म्हणीचा इतिहास मौजेचा आहे. आपल्याकडे पूर्वीं बलुतेदारीची प्रथा सर्रास चालू होती. आजहि खेडेगांवांतून अशी रूढी सुरू आहे–गांवाच्या गरजा भागविणाऱ्या अनेक कष्टकऱ्यांचे बारा प्रकार साधारणपणें मान्य असत, हेच बारा बलुतेदार. गांवकऱ्यांच्या पायताणांची गरज पूर्ण करण्याची जबाबदारी अर्थातच गांवच्या चांभार कुटुंबाकडे असे. एका गांवांत असे कितीसे चांभार असणार? गांवकऱ्यांची संख्या खूप, सर्वांना पायताणें लागणार, आणि ही सर्वांची नित्याची असलेली गरज

---

१४, 'साहित्यधारा'–प्रा. श्री. म. माटे,
'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टि', पृ. ७.

पूर्ण करणारा चांभार मात्र एखाददुसराच असे. अर्थातच त्याच्यावर फार मोठ्या कामाचा बोजा पडत असे. शिवाय वहाण मागितली कीं तावडतोब देण्यानें चांभाराचीहि थोडीशी अडचण होत असे. कारण त्याला वर्षाच्या शेवटीं त्याच्या धान्याचा वांटा शेंतकऱ्यांकडून मिळणार, आणि वर्षभर शेत-करीदादांची पायताणांची गरज उद्‌भवत राहणार, म्हणून चांभार वहाणा देण्याचे वायदे सांगत राहत असावा. आणि असे वायदे सतत करण्यानें त्याला वरील गुण चिकटला. चांभारचाळवणी म्हणजे सतत वायदे करणें. आणि अशा प्रकारें काम जरा उशिरां पूर्ण करणें. असा प्रकार फक्त चांभारच करतात असें नव्हे. परंतु एकदा म्हण पडून गेली आणि लोक अजूनहि म्हणत राहिले आहेत.

'**चांभाराची उडी, जोडयाच्या सांच्या एवढी**' असें म्हटलें जातें प्रत्येक माणस आपल्या कुवतीप्रमाणें एवढी गोष्ट करूं शकतो किंवा बोलूं शकतो, असा या म्हणीचा भाव आहे. पण चांभाराचीच उडी त्याच्या जोडयाएवढी असते असें नव्हे, तर मुल्ला किंवा धर्मोपदेशकाचीहि चाल मशिदीपर्यंतच असते. सरडयाचीहि धांव कुंपणापर्यंत असायची. प्रत्येक प्राण्यास स्वतःची म्हणून कांहीं कुवत असते. त्या कुवतीचें ज्यांना भान असतें ते खरे यशस्वी होतात.

## चर्मकारांचें लोक-साहित्य

भारतांतील खेडोपाडयांतून शिक्षणाचा प्रसार जरी पुरेसा झालेला नाहीं, तरी आमच्या समाजाचें लोकसाहित्य इतकें प्रगत आहे कीं, त्याचा अभिमान वाटावा. अज्ञ जनांनीं आपल्या वेडयाभावडया भावभावनांची गुंफण साध्या सोप्या शब्दांत करायची त्याला आम्ही लोकसाहित्य म्हणतों, चर्मकारांच्या विशाल समाजांत असें लोकसाहित्य फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. स्थलाभावीं येथें त्याचा अधिक परामर्श घेतां येणार नाहीं. एकच उदाहरण द्यायचें आहे. मराठी मुलुखांत चांभारांची 'ढवळी' प्रसिद्ध आहेत.[१५]

अरे अरे विठ्ठल नवऱ्या तुम्ही, एवढा जुलूम कां केला
पांडूच्या पोरीला तुम्ही कां देवळीं नेली,
देवाला नेउनि तिला काई जो केला,
हजाराची कंठी मोडून तिला खुर्ची केली,
खुर्ची दिली बैसायला ग टेबल दिलें लिवायला,
पोथी दिली वाचायला ग इंग्रजी शिकविलें ग इंग्रजी
इंग्रजी अक्कल मोठी ग तिनें कागदाच्या केल्या नोटी
तिनें देशोदेशीं पाठविल्या चिठ्ठी
विठ्ठल नवऱ्याच्या लग्नासाठीं आणि नवरीच्या देजासाठीं

---

१५. बदलापूर—ना. गो. चापेकर पृष्ठ १८४

या गीतांतील भावसौंदर्य अवर्णनीय आहे. यांतील 'अद्ययावत्पणा'– हि नजरेंत भरल्याखेरीज रहात नाहीं.

उत्तर भारतांतील चांभारांचीं 'सोहर'-गीतगायनाबद्दल विशेष प्रसिद्धि आहे. सोहर म्हणजे पुत्रजन्मोत्सवाच्या वेळीं गायचें आनंदगीत. कांहीं भागांत तर मूल जन्माला आल्यानंतर सहा सहा दिवसपर्यंत अखंड 'सोहर'-गायन करण्याची रूढी आहे.

चांभार स्त्रियांची सुइणीच्या कामाबद्दलहि ख्याति आहे. खेडोपाडीं चांभार सुइणी आजहि आढळून येतात, मोठ्या वत्सलतेनें त्या आपलें काम करतात.

या विशाल समाजाच्या अनेकविध चालरीती, त्यांची आवडनिवड आणि काळाबरोबर त्यांनीं ग्रहण केलेल्या गोष्टी या लोकसाहित्यांतून व्यक्त झालेल्या आहेत. त्यांचा अभ्यास व्हायला पाहिजे.

## सत्याचा इतिहास

चर्मकारांच्या समाजाचा हा स्थूल परिचय करून घेतल्यानंतर संत रोहिदासाची महती अधिकच स्पष्ट होते. ज्या समाजांत युगायुगांचें दास्य होतें, जेथें अशिक्षणाचें आणि असंस्कारांचें दुर्दैवहि लिहिलेलें होतें. असा तो दीन दुर्बल समाज ! त्यांत जन्म ग्रहण करायचा म्हणजे त्यांच्याच भाषेंत सांगायचें तर 'आसपासचीं गुरेंढोरें मेल्यावर त्यांना वाहून नेत बसायचें.' किती वंचना ! किती दुर्भाग्य ! पण संत रोहिदासानें दैवावर विजय मिळविला. सुसंस्कारानें तो शुचिर्भूत बनला. स्वाध्यायानें तो पंडित झाला. आपल्या वर्तनानें आणि कृतिशीलतेनें तो द्रष्टा सुधारक बनला. त्याच्या या पुण्यकार्याचा नियतीनें गौरव केला. त्याच्या चर्मकार ज्ञातीबरोबरच सारा समाज जागृत झाला. मध्यकालीन जागृतीचें फार मोठें श्रेय रामानंद-कबीराबरोबर रोहिदासासहि द्यावें लागेल. कारण तो ज्या दलितांचा प्रतिनिधि आहे, त्यांच्या मनःपटलावर त्याच्या अलौकिकतेचें चित्र उमटलेलें आहे. त्यांच्या दुःखदैन्याचें आणि पथभ्रष्टतेचे दुर्दिन आतां संपले आहेत. आज समाजानें आपल्या वेडगळ समजुतींचा त्याग केला आहे. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या त्रयीचा संगम सजीव झाला आहे. पण याचें श्रेय संत रोहिदासालाहि द्यायला हवें. त्यानें चर्मकारांच्या उन्नतीसाठीं असें स्वतंत्र प्रयत्न केले नसतील. तसें म्हणणें अनैतिहासिक ठरेल. पण चर्मकारांनीं रोहिदासाचा आदर्श आपल्यासमोर ठेवला आणि अधिक आत्मविश्वासानें ते सन्मार्गाची वाट चालूं लागले, हा मात्र इतिहास आहे.

● ● ●

परिशिष्ट : २

## पुणें विद्यापीठांतील रोहिदास-पदावली

पुणें विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयांत कांहीं हिंदी पोथ्या (हस्तलिखितें) एकत्रित करण्यांत आल्या आहेत. यांपैकीं 'संतबाणी शब्दसंग्रह' नांवाची हस्तलिखित पोथी विशेष महत्त्वाची वाटली. या पोथीची ग्रंथालय हस्तलिखित क्रमसंख्या ३९३ असून १०॥ इंच लांब आणि ६॥ इंच रुंदीची एकूण ६७० पाठपोठ पृष्ठें आहेत. हस्ताक्षर सुरेख असून पोथी उत्तम स्थितींत आहे.

हें हस्तलिखित निरंजनी पंथाचें असून लेखकाचें नांव हरिराम असें नमूद केलेलें आहे. हा स्वतःस निरंजनी साधु हरणदास याचा शिष्य म्हणवितो. हस्तलिखिताचा लेखनकाल त्यानें श्रावण शुद्धद्वादशी संवत १८६८ असा नोंदविला आहे. अर्थात् ही पोथी फार प्राचीन नाहीं. तरीहि या पोथींत अनेक महत्त्वाच्या संतकवींचें काव्य उत्तम स्वरूपांत उपलब्ध असल्यानें तिचें महत्त्व वादातीत आहे.

पोथीच्या ५५४ व्या पानापासून तें ५६३ व्या पानापर्यंत म्हणजे एकूण दहा पानें संत रोहिदासाच्या पदांसाठीं देण्यांत आलीं आहेत. हीं सर्व पदें आम्ही बारकाईनें अवलोकिलीं आहेत. पाठ अत्यंत शुद्ध वाटतो. बहुधा याच पोथीवरून वेलवेडियर प्रेसनें आपलें पुस्तक तयार केलें असावें.[1] 'रैदासजीकी बानी' या पुस्तकांत संगृहीत असलेल्या पदांशी प्रस्तुत पोथीचा क्रमहि बहुतांशीं जुळतो. फक्त या पुस्तकांतील खालील पदें–

पद क्रमांक ६७––ऐसे जानि जपो रे जीव।

,, ८५––जो तुम गोपालहि नहिं गैहो।

,, ८६––अब कैसे छूटे राम रट लागो।

,, ८७––प्रभुजी संगति सरन तिहारी।

या पोथींत आढळून आलीं नाहींत.

या पोथीची भाषा अधिकाधिक प्राचीन आणि प्रामाणिक (True to Origin) वाटल्यावरून आम्ही या पोथींतील पाठ स्वीकारला आहे. ज्या पदांचे राग उपलब्ध झाले, ते सर्व नोंदविले आहेत. प्रस्तुत संग्रहांत केवळ याच पोथींतील पदें नाहींत, हेंहि येथें स्पष्ट करावयास हवें. 'संतसुधासार', 'गुरुग्रंथसाहेब' आणि वेलवेडियर प्रेसमार्फत प्रकाशित 'रैदासजीकी बानी' या सर्व पुस्तकांतूनहि उर्वरित पदें आम्हीं एकत्रित केलीं आहेत.

---

१. रैदासजीकी बाणी (जीवनचरित्रसहित) वेलवेडियर प्रेस, प्रयाग, सहावी आवृत्ति १९४८.

परिशिष्ट : ३

# रोहिदासाचें प्रामाणिक चित्र

'दि कोर्ट पेंटर्स् ऑफ दि ग्रँड मुगल्स्' ह्या अत्यंत दुर्मिळ पुस्तकांत[1] संत रोहिदासाचें चित्र प्राप्त होतें. प्रस्तुत पुस्तकाचें संपादन श्री. लॉरेन्स बिन्यॉन या इंग्रज संशोधकानें केलें आहे. ऐतिहासिक टीकाटिप्पणी टी. डब्ल्यू. ॲर्नाल्ड या अभ्यासकानें जोडली आहे.


या पुस्तकांत सोळाव्या आणि सतराव्या शतकांतील सुमारें चाळीस चित्रें छापलेलीं आहेत. त्यांपैकीं अठरा आणि एकोणीस क्रमांकाचें चित्र आपल्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें आहे. हें चित्र कप्टन स्पेन्सर चर्चिल यांनीं मिळविलेलें आहे. एक दरवेशांच्या नाचाचें दृश्य चित्रित केलें असून त्याखालीं संत-मंडळी दालनांतून बसली असल्याचें दाखविलें आहे. हें चित्र रंगीत असून अत्यंत स्पष्ट आहे.

प्रस्तुत चित्राचें ऐतिहासिक महत्त्व सांगतांना श्री. ॲर्नाल्ड यांनीं लिहिलेल्या मजकुराचा सारांश असा–" दरबेशांच्या नाचाच्या या चित्रासोबत जें भारतीय धर्मसुधारकांचें चित्र आहे, तें जरी अगदीं विश्वासार्ह नसलें, तरी अत्यंत महत्त्वाचें आहे. या चित्रांतील संतांचे चेहरे प्रामाणिक वाटतात. भारतीय संतांचीं चरित्रें त्यांच्या उपदेशाच्या रूपानेंच चिरंतन झालीं. त्यांच्या जन्ममृत्यूचा काल आणि जीवनप्रसंग आजहि अज्ञात राहिले. परंतु शिष्यमंडळानें त्याची फारशी खंत न बाळगतां त्यांची आदर्श शिकवणूक मात्र जपून ठेविली, हें आमचें भाग्य होय."

आचार्य रामानंदांचा काळ आणि त्यांचें वैशिष्टच नमूद करून श्री. ॲर्नाल्ड यांनीं चित्रांतील सर्व संतांचा त्रोटक परिचय करून दिला आहे.

---

१. 'दि कोर्ट पेण्टर्स् ऑफ दि ग्रँड मुगल्स्'–लॉरेन्स् बिन्यॉन. प्रकाशक हम्प्रे मिल्फोर्ड, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. १९२१, पृष्ठ ४० समोर.



श्रीरोहिदास, श्रीपीपा, श्रीनामदेव, श्रीसेना न्हावी, श्रीकमाल, श्रीअगहर, श्रीकबीर.

या चित्रांत एकूण बारा संत आहेत. इंग्लिश अभ्यासकानें या चित्राचे दोन भाग करून ते अधिक मोठ्या आकाराचे करून छापले आहेत. प्रत्येक चित्रावर फारशी लिपींत नांव लिहिलेलें आहे. त्यानुसार हे बारा संत असे–

(१) संत रोहिदास, (२) संत पीपा, (३) संत नामदेव, (४) सेना न्हावी, (५) कमाल, (६) अगहर, (७) संत कबीरदास, (८) पीर मछिंदर, (९) गोरख, (१०) जीव रूप अथवा जदरूप, (११) लाल स्वामी, (१२) पीर पंथस्वामी — यांपैकीं पहिल्या सात संतांचीं चित्रें असलेला भाग आम्ही प्रस्तुत पुस्तकांत दिला आहे. यांतील कबीराचें चित्र अन्य विश्वासार्ह चित्रांशीं जुळणारें आहे. डॉ. पारसनाथ तिवारी आणि डॉ. श्यामसुंदरदास यांनीं आपल्या ग्रंथांतून याच चित्रास प्रसिद्धि दिली आहे.

नामदेवमहाराजांचें हें चित्र कदाचित् उपलब्ध चित्रांत सर्वात जुनें आहे.

संत रोहिदासाचें हें चित्र काल्पनिक असलें, तरी तें सर्वांत प्राचीन असल्यानें तें ग्राह्य मानावयास हवें. हें चित्र उत्तरभारतीय कलाकारानेंच रंगविलें आहे, असें त्याच्या शैलीवरून वाटतें आणि उपलब्ध चित्रांत हें संतचित्र प्रामाणिक मानण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं, असें चित्रकार श्री. दीक्षित यांनीं सांगितलें.

प्रस्तुत चित्र प्राप्त होण्यासाठीं माझे मित्र प्रा. डॉ. प्र. ल. सासवडकर यांची खूपच मदत लाभली. त्यांनीं मोठ्या आत्मीयतेनें मला या कामीं सहाय्य केलें.

---

२. कबीर : डॉ. पारसनाथ तिवारी, नॅशनल बुक ट्रस्ट दिल्ली, मुखपृष्ठ. कबीरग्रंथावली – डॉ. श्यामसुंदरदास.

परिशिष्ट : ४

## रोहिदासाची भावपूजा

संतनमें रविदास संत है, सुपच ऋषी सो मानिया।
हिंदू तुर्क दुई दीन बने हैं, कछू नहीं पहिचानिया ॥ —कबीर

सदाचार श्रुति शास्त्र बचन अविरुद्ध उचार्‍यो।
नीर खीर विवरन परम हंसनि उर धार्‍यो ॥
भगवत् कृपा प्रसाद परम गति इहि तन पाई।
राज सिंहासन बैठि ज्ञाति परतीति दिखाई ॥
वर्णाश्रम अभिमान तजि पदरज बंदहि जासुकी।
संदेह ग्रंथि खण्डन निपुन, बानी विमल रैदासकी ॥ —नाभादास
(भक्तमाल, पृष्ठ ४७०)

रैदास रगीला रंग है दिये जनेऊ तोड।
जग्य ज्योनार चोले धरे इक रैदास इक गौड ॥ —गरीबदास
(गरीबदासकी बानी, पृष्ठ ३२)

गुरु रैदास मिले मोहि पूरे, धुरसे कलम भिडी।
सतगुरु सैन दई जब आके जोतमें जोत रली —मीराबाई

मीराने गोविंद मिल्या जी, गुरु मिलिया रैदास! —मीराबाई

आदि मिली जयदेव कूँ, रैदास समानी। —रज्जबदास

जगत विदित पीपा, धना, अरु रैदास कबीर।
महाधीर दृढ़ एकरस, भरे भक्ति गंभीर ॥ —भक्तनामावली
(संपादक–राधाकृष्णदास, पृ. १० । दोहा ९९

"चौदहवी शताब्दी के आसपास संशोधनवादी और सुधारवादी दर्शनके कई व्याख्याता हुए जिन्होंने जागतिक रूढियों और संस्कारोंके विरुद्ध संघटित आंदोलन किए। रामानंदके प्रसिद्ध रविदास उन्हीं में थे जिन्हें चमार जातिके लोग अपना पूर्वपुरु मानते हैं। यहाँतक कि रैदास शब्द आगे चलकर चमारोंकी संमानित उपाधि बन गया।" —श्याम तिवारी
(हिंदी विश्वकोश)

रैदास संतयुगके प्रतीक थे। उनकी वाणी में उनके गुरु स्वामी रामानंदके विशिष्टाद्वैतवादका मूल उपदेश बोलता है। परमात्माका राम, गोविंद आदि नामोंसे अनुस्मरण है, अंतर्मुखी वृत्ति, वैराग्य और शून्यसाधना की झलक है और भक्तिकी ललित, दासोचित भाषा है। वे विद्वान् न थे, परंतु उनकी वानीका स्रोत उस जगह था, जहाँ साधक ही पहुँच सकता है। संतोंकी रचनाओंमें पांडित्य नहीं मिलता, परंतु पदे पदे इस बातका परिचय मिलता है कि तत्त्वसाक्षात्कार व्यक्त हो रहा है।...हिंदूसमाज बहुत दिनोंसे जातपातके बंधनोंमें पडा हुआ है, परंतु कबीर, सदन, पीपा, रैदास जैसे महापुरुषोंके व्यक्तित्वने समय समयपर इस बंधन को तोडा और इस बातको सिद्ध किया कि ' जातपात पूछे नहिं कोई। हरिको भजे सो हरिका होई ॥ '

--डॉ. सम्पूर्णानंद

कबीर. रैदास, धर्मदास, नानक, दादू, पलटू आदिकी बानीको छूतेही ऐसा लगा कि अलौकिक महारसका पूर्ण परिपाक तो यहींपर हुआ हे। साहित्यालोचकों के यह कथन अर्थंकशून्य-से जँचे कि ' इन संतोंकी अटपटी रचनाओंमें न तो साहित्यिक सरसता है, न संगीत की लय है और न कलाकी अभिव्यंजना ही, और भाषा भी उनकी उभडसाबड-सी है। ' मैंने देखा कि रीतिग्रंथोंका फीता लेकर वे साहित्यालोचक संतवाणीका असीम क्षेत्रफल निर्धारित करने गये थे---चौकोर बँधे हुए तालाब पर धीरे धीरे सरकती हुई नौका जैसे असीम अनंत सागरके बिखरे वैभवको मापने पहुँची थी !

--वियोगी हरि

महात्मा रैदासकी बडे उँचे घाटकी बानी है। प्रेमपराभक्ति का कई शब्दोंमे बडा ही विशद निरूपण उन्होंने किया है। समता और सदाचारपर बहुत बल दिया है। भक्तिरसका ऐसा सुंदर परिपाक अन्यत्र कम देखनेमें आता है। सत्यकी शुद्ध निर्मल अभिव्यक्ति ही, अपरोनभूनि ही उनका परम ध्येय था। भाषाने की भावका मूक अनुसरण किया है। --वियोगी हरि

ऐका श्रोते हो सावकाश। परम वैष्णव रोहिदास।
हरिभजन रात्रंदिवस। प्रेमभावें करीतसे ॥
मनें दुराशा सांडोन। भावें करीतसे हरिकीर्तन।
नित्यनेम स्नान करून। विष्णुपूजन करीतसे ॥ --महीपति
( भक्तविजय। अध्याय २५. १-३ )

# श्रीसंत रोहिदास

संत रोहिदास । रोहिदास संत, जयासी भेटे भगवंत ।। धृ० ।।
जातिचा हिंदू । हिंदू चांभार, मनाचा प्रेमळ अनिवार ।।
नित्यकर्म त्याचें । त्याचें शिवण्याचें, वहाणा जोडहि जोडयांचे ।।
त्यावरि चालवि तो । चालवि संसारा, मनीं दे मत्सरा न थारा ।।
शिवूनिया देअी । देअि दान भक्ता, वहाणा अनवाणी त्या त्या ।।
स्नान करी घेअी । घेअी तो वाचे, गोड तें नाम विठोबाचें ।।
पूजेचा होता । होता जो बाण, शालिग्राम दिव्य जाण ।।
त्यासि तो ठेवी । ठेवि कातडयाच्या, करुनिया संपुष्टा साच्या ।।
आसनही त्याचें । त्याचें चर्मांचें, बसे बा भक्तिभरें नाचे ।।
संत रोहिदास । रोहिदास संत, जयासी भेटे भगवंत ।।
त्यासि लोक हंसुनी । हंसुनि बोलती ते, कातडें अशुद्ध त्यामध्यें ।।
देवमूर्ति कैशी । कैशी ठेवावी, कां न ती विटाळली जावी ।।
त्यासि संत वदला । वदला प्रिय वाचा, बोलतों अर्थ करा याचा ।।
कातडयामध्यें । मध्यें गर्भाच्या, बैसला मनुष्य मातेच्या ।।
आई दे दूध । दूध गात गाणीं, स्तनाच्या चर्मकुप्यांतूनी ।।
मुख हें मढवीलें । मढवीलें देवें, कातडयानेंच काय नोंहे ।।
मढवीले हात । हातपाय आणी, प्राणही चर्मे देवांनीं ।।
ऋषीमुनी बसती । बसति तपस्येसी, घेति मृगचर्म आसनासी ।।
आणि व्याघ्रचर्म । चर्म आवडीनें, उपरणें केलें सांबानें ।।
सांब सदाशिवजी । शिवजी ज्यां शिवती, चर्मे अशुद्ध कैशीं तीं ।।
अशुद्ध ना चर्म । चर्म न चांभार, तयाचा तोची अधिकार ।।
अधिकारी साचा । साचा जो भक्त, मांग वा महार वा शाक्त ।।

प्रेमचि अधिकारा । अधिकारा भक्ती, देतसे नाम-भजन मुक्ती ॥
असे हिंदुधर्म । धर्म विठलाचा, सनातन सकला कथि साचा ॥
चित्ताचा शुद्ध । शुद्ध तोचि होतो, जातिचा असो कुण्याही तो ॥
अशुद्ध जरि चित्त । चित्त तरी तो तो, ब्राह्मणहि अस्पृश्यचि होतो ॥
क्षत्रियहि अस्पृश्यचि होतो ॥
महार तो चोखा । चोखामेळयाला, आलिंगिता देव झाला ॥
झाला सजणासी । सजण कसायासी, प्रसन्नचि परमेश्वर त्यासी ॥
धंदा हा सारा । सारा उपकारी, त्याविण न चले संसारीं ॥
म्हणूनिया कोणीं । कोणीं कर्माचा, विटाळ न मानावा साचा ॥
कथी हिंदुधर्म । धर्म विठ्ठलाचा, आमुच्या वाडवडीलांचा ॥
तुम्ही अम्ही हिंदू । हिंदू जातीचे, सर्वही भक्त विठ्ठलाचे ॥
रक्षुं हिंदुधर्म । धर्म विठ्ठलाचा, आमुच्या वाडवडीलांचा ॥
असें रोहिदास । रोहिदास संत, वदे त्या भेटे भगवंत ।

—स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

० ० ०

जन्म झालासे चर्मकार वंशीं ।
ज्ञान पाहतां लाजवी वसिष्ठासी ॥
शांति ज्याची आणि उणें सागराला ।
धाम वैराग्या सदय नांदण्याला ॥
जडजीव उद्धराया आले भूवरि धरूनि अवतार ।
कंठमणी श्रीहरिचे हीन कुळीं रोहिदास चांभार ॥

—श्रीदासगणूमहाराज

● ● ●

# सहाय्यक ग्रंथांची सूची


१ हिंदी साहित्य का इतिहास–आचार्य रामचंद्र शुक्ल

२ हिंदी साहित्य की भूमिका–आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी

३ हिंदी साहित्य का उद्भव और विकास–डॉ. भगीरथ मिश्र, रामबहोरी शुक्ल

४ हिंदी साहित्य का आलोचनात्मक इतिहास–डॉ. रामकुमार वर्मा

५ हिंदी साहित्य का वैज्ञानिक इतिहास–डॉ. गणपतिचंद्र गुप्त

६ हिंदी को मराठी संतों की देन–आचार्य विनयमोहन शर्मा

७ हिंदी साहित्य कोश, खण्ड १–ज्ञानमण्डल, वाराणसी

८ हिंदी काव्यधारा–राहुल सांकृत्यायन.

९ हिंदी भाषा और उसके साहित्यका विकास–अयोध्यासिंह उपाध्याय हरिऔध

१० हिंदी काव्यमें निर्गुण संप्रदाय–डॉ. पीतांबरदत्त बडथ्वाल

११ संत नामदेव की हिंदी पदावली–संपादक–डॉ. भगीरथ मिश्र, डॉ. राजनारायण मौर्य

१२ उत्तरी भारत की संतपरंपरा–आचार्य परशुराम चतुर्वेदी

१३ निर्गुण साहित्य : सांस्कृतिक पृष्ठभूमि–डॉ. मोतीसिंह

१४ भक्तिसाहित्य–सांस्कृतिक पृष्ठभूमि

१५ रामानंद-संप्रदाय तथा हिंदी साहित्यपर उसका प्रभाव–डॉ. बदरीनारायण श्रीवास्तव, हिंदी परिषद्–प्रयाग विश्वविद्यालय

१६ संतसुधासार–संपा. वियोगी हरि.

१७ भक्तमाल–नाभादास

१८ हिंदी विश्वकोश, खंड ४–नागरी प्रचारिणी सभा, काशी

१९ श्रीगुरुग्रंथसाहेब–सर्व हिंद सिक्ख मिशन, अमृतसर

२० संत रविदास और उनका काव्य–संपादक–स्वामी रामानंद, वीरेंद्र पांडये. श्री भारतीय रविदास सेवा संघ, ज्वालापूर

२१ रैदासजीकी बानी–वेलवेडियर प्रेस, प्रयाग

२२ रविदास रामायण

२३ भक्तनामावली–ध्रुवदास. संपा, राधाकृष्ण दास नागरी प्रचारिणी सभा, काशी

४ भक्तमाल रामरसिकावली–रीवां नरेश रघुराजसिंह
वेंकटेश्वर प्रेस मुंबई

२५ रामानंददिग्विजय–भगवदाचार्य,
अलबर रामानंद साहित्य मंदिर, १९४७

२६ भगवान रविदासकी सत्यकथा–म. रामचरण कुरील, कानपूर

२७ मीराँबाई की पदावली–आचार्य परशुराम चतुर्वेदी
हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग

२८ मीराँ, एक अध्ययन–डॉ. पद्मावती शबनम.

२९ मीराँ माधुरी–ब्रजरत्नदास

३० मीराँबाई का जीवनचरित्र–मुंशी देवीप्रसाद

३१ संत-बानी-संग्रह भाग १, २–वेलवेडियर प्रेस, प्रयाग

३२ संत-काव्य-संग्रह–संपादक, आ. परशुराम चतुर्वेदी

३३ कबीर–डॉ. पारसनाथ तिवारी. नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली
प्रकाशन १९६७

३४ कबीर–आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी

३५ कबीर साहित्यकी परख–आ. परशुराम चतुर्वेदी

३६ संत कबीर–डॉ. रामकुमार वर्मा

३७ कबीर साहित्य का अध्ययन–पुरुषोत्तमलाल श्रीवास्तव

३८ कबीर साहित्य और सिद्धान्त–यज्ञदत्त शर्मा

३९ कबीर ग्रंथावली–बाबू श्यामसुंदरदास

४० गरीबदासजी कीं बानी–वेलवेडियर प्रेस, प्रयाग,

४१ भीखासाहब की बानी–वेलवेडियर प्रेस, प्रयाग.

४२ दादूदयाल की बानी–वेलवेडियर प्रेस, प्रयाग.

४३ पलटूसाहब की कुंडलिया व बानी–वेलवेडियर प्रेस, प्रयाग.

४४ मलूकदासकी बानी–वेलवेडियर प्रेस, प्रयाग.

४५ रज्जबकी वाणी–व्यंकटेश्वर प्रेस, बंबई.

४६ भजनसंग्रह, भाग २ –गीता प्रेस, गोरखपूर

४७ महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग १३–श्री. व्यं. केतकर

४८ भारतीय संस्कृतिकोश, खण्ड ३–महादेवशास्त्री जोशी

९ संकेत-कोश–श्री. शा. हणमंते

० श्रीगुरुवाणीविलास–ईश्वरसिंग ठाकूर

१ महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश, खंड (१) व (२)–
य. रा. दाते, चिं. ग. कर्वे

क्र. १६०३३

५२ ह. भ. प. संतकवि श्रीदासगणूमहाराज-कृत 'सच्चरित्रगुच्छ' प्रकाशक, दा. ना. मोघे, कोल्हापूर १९४९

५३ बदलापूर–ना. गो. चापेकर

५४ मुंबई इलाख्यांतील जाती : गो. मं. कालेलकर

५५ महाराष्ट्र सारस्वत : वि. ल. भावे, शं. गो. तुळपुळे.

५६ भक्तविजय–महीपति

५७ संतांच्या चरित्रकथा–रामचंद्र चितामण ढेरे

५८ मराठी वाङ्मयाचा इतिहास, खण्ड १ व २–ल. रा. पांगारकर

५९ नामयाची जनी–रा. चिं. ढेरे

६० कबीराचा गाथा–वि. ना. गोडबोले, पंढरपूर

६१ संतसमागम–प्रा. भ. श्री. पण्डित

६२ भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न–विठ्ठल रामजी शिंदे. नवभारत ग्रंथमाला, नागपूर १९३३

६३ अस्पृश्यता व देवालयप्रवेश–प्रो. ना. ह. पुरंदरे अस्पृश्य सेवक समाज, पुणें १९३२

६४ स्पर्शास्पर्शविचार–पं. श्री. दा. सातवळेकर

६५ साहित्यधारा–प्रा. श्री. म. माटे

६६ साहित्यमंजिरी–प्रा. श्री. म. माटे

६७ विवेकमंडन–प्रा. श्री. म. माटे

६८ संत, पंत व तंत–प्रा. श्री. म. माटे

६९ 'कल्याण' (संत अंक)<br>'कल्याण' (साधनांक)<br>'कल्याण' (भक्त-चरितांक) } गीता प्रेस, गोरखपूर

७० 'प्रसाद' मासिक, पुणें

७१ संत-वाणी-शब्दसंग्रह (पुणें विद्यापीठ, जयकर ग्रंथालय)

७२ समर्थ वाग्वदेवता मंदिर, बाडांक १०.

७३ दि चमार्स्–जी. डब्ल्यू. ब्रिग्ज्

७४ दि कोर्ट पेण्टर्स् ऑफ दि ग्रॅण्ड मुगल्स्–लॉरेन्स् बिनयॉन (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन १९२१)

७५ एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका, १९६४ आवृत्ति

७६ सावरकरांची कविता–संपा. प्रा. वा. गो. मायदेव

REFBK-0016033